
म. ग्रं. सं. ठाणे
विषय
क्र नं. ५
१९३०

# ासिद्ध नट
# ग्यारकचें चरित्र.



जन्म १७१६ मृत्यु १७७९

Sir, The King, God bless him, can ... ol an officer but it is only ... t can make an actor.

(*Garrick*)

REFBK-0004111

...ा मुर्खाला सुद्धां पाहिजे त्या अधिकाऱ्याच्या जागवर ठेवूं शकेल; परंतु नट उत्पन्न करणें हें एक ईश्वरच करूं शकतो

प्रत
म. ग्रं. सं. ठाणे
353 पं.
मराठी ग्रंथ संग्रहालय
ता.
ठाणे.
मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद क्र.
ठाणे,

# प्रस्तुत लेखकाचें नाट्यविषयक वाङ्मय

## अण्णासाहेब किर्लोस्कर यांचें सचित्र चरित्र

[ यांत नाट्यकलेचा १८८५ पर्यंतचा व पुणें शहरांतील सामाजिक चळवळीचा इतिहास आहे.] २–०–०

## भाऊराव कोल्हटकर

किर्लोस्कर नाटकमंडळींतले आद्य व अद्वितीय संगीत नट यांचें चरित्र ०–६–०

## महाराष्ट्रीय नाटककार–सचित्र

[ यांत आद्यनाटककार विष्णुदास भावे यांच्यापासून पहिल्या पिढींतल्या १५ नाटककारांचीं चरित्रें आहेत. पृष्ठसंख्या १५०.]
०–१०–०

## महाराष्ट्रीय नट–सचित्र

[ यांत २८ नटांचीं चरित्रें व चित्रें आहेत. पृष्ठसंख्या ११०.]
०–६–०

## चित्रमय नट-नाट्य

[ इंग्रजींतील "प्ले पिक्टोरियल"च्या धर्तीवर किर्लोस्कर मंडळींतील माजी नट के० जोगळेकर, रा० गंधर्व, रा० बोडस यांचे रंगभूमीवरील फोटो व पाश्चिमात्य रंगभूमीवरील चुंबनाचे प्रकार व इतर नटांच्या फोटोचें पुस्तक.]

पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें—

पूना प्रिंटिंग प्रेस, शनवार पेठ, पुणें.
कसबा, घर नंबर १९९, पुणें सिटी.

# लवकरच प्रसिद्ध होणारीं पुस्तकें

## किर्लोस्कर संगीत मंडळीचा ४५ वर्षांचा इतिहास

मंडळीच्या आरंभापासून म्हणजे सन १८८० पासून ते १९२४ अखेर किर्लोस्कर मंडळीचा साग्र इतिहास– अनेक उलाढाली, मंडळीनें वाङ्मयात्मक व समाजदृष्ट्या केलेलें कार्य, मंडळींत वेळोवेळीं येऊन गेलेल्या नटांचें वर्णन व फोटो इत्यादि माहिती यांत येईल. पृष्ठें सुमारें २००. किंमत रु. २. ग्राहकांनीं आगाऊ नांवें नोंदवावीं.

---

## पुणें शहरचा पेशवाईनंतरचा इतिहास

सदर इतिहासांत पुण्यांत पेशवाईनंतर वेळोवेळीं झालेल्या राजकीय, सामाजिक व धार्मिक चळवळी व घडामोडी, तसेंच निरनिराळ्या गुणानें, विद्वत्तेनें व कसबानें उदयास आलेले व प्रसिद्धीस आलेले पुरुष, पेशवाईतील पुणें शहरांत विद्यमान् असलेलीं व नष्ट झालेलीं ऐतिहासिक स्थळें, इमारती, इत्यादीसंबंधानें माहिती यावयाची आहे. ग्राहकांनीं आगाऊ नांवें नोंदवावीं.

कसबा, घर नं. १९९,
पुणें शहर.

शं. वा. मुजुमदार.

जगप्रसिद्ध नट

# ग्यारिक यांचें चरित्र

ग्रंथ संग्रहालय
ग्रंथांक नं.
ता.
ठाणे.

लेखक

**शंकर बापूजी मुजुमदार**

ग्रंथालय
ठाणे.

प्रकाशक—श्रीधर शंकर मुजुमदार
पूना प्रिंटिंग प्रेस, ६१९ शनिवार पेठ, पुणें नं. २.

मुद्रक—अनंत सखाराम गोखले,
'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें नं. २.

वा. क.
ठाणे (महा राज्य)
REFBK-0004111

किंमत १। रुपया

# वुईलयमशेक्सपीयर.



जन्म १५६४ मृत्यु १६१६

ज्यानें मनुष्य स्वभावाचें संशोधन करून तें नाट्यसृष्टीच्या द्वारें जगासमोर मांडलें व ज्याची कृति एक जगमान्य नट ग्यारिक यानें आपल्या अतुल नाट्याभिनयानें, आपल्या बरोबर अजरामर करून ठेवली त्याच्या मूर्तीला त्याच्याच शिष्याचें हें चरित्र अर्पण असो.

बालोद्यान प्रेस, पुणें.

# हें चरित्र कां लिहिलें ?

महाराष्ट्रभाषेंत नाट्यकलेच्या वाङ्मयाचा प्रसार अद्याप व्हावा तसा झाला नाहीं. याला कारण त्याला वाचक जितके असावयास पाहिजेत तितके नाहींत. नाटकाचा व्यवसाय करणारांकडून वास्तविक या वाङ्मयाला मदत झाली पाहिजे. परंतु तो वर्ग नाटकाच्या धंद्यावर पोट भरीत असूनही, जो धंदा आपण करतों त्याचें ज्ञान करून घेण्याविषयीं उदासीन आहे. ही उदासीनता नाहींशी व्हावी म्हणून नाटकाच्या वाङ्मयाला वाहिलेलें असें 'रंगभूमि' नांवाचें मासिकपुस्तक प्रसिद्ध करून त्याच्या द्वारें उपयुक्त वाङ्मय प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न करून पाहिला; परंतु सदर मासिकाचे ग्राहक धंद्यांत असणाऱ्या लोकांपेक्षां बाहेरचेच विशेष आढळून आले. रंगभूमि मासिकानंतरचा, प्रस्तुतचें ग्यारिकचें चरित्र हा एक नाट्यविषयक इतिहास म्हणून आणखी प्रयत्न आहे.

महाराष्ट्र नाट्यसृष्टीच्या विद्यमान स्थितींत असें उदाहरण आढळून येत नाहीं कीं, एखाद्या नटाच्या सामाजिक पात्रतेचा, गुणांचा व नाट्य-कौशल्याचा अनुकरणीय प्रभाव दुसऱ्या नटांवर पडला आहे. महाराष्ट्रीय नटांना आदर्शभूत होईल असें सर्वगुणपरिपूर्ण चरित्र शोधण्याकरितां बाहेरचा इतिहास पाहावा लागला. या इतिहासांत, शेक्स्पीयरच्या बरोबरीनें इंग्लंडच्या नाट्यकलेच्या इतिहासांत ज्याचें नांव अजरामर होऊन राहिलें आहे, असें ग्यारिक नांवाच्या नटाचेंच चरित्र योग्य दिसलें. ग्यारिक, नट म्हणून प्रसिद्धीस आला व त्याच्याशीं स्पर्धा करून त्याचें अनुकरण करणारे किंवा स्वतंत्र बुद्धीचे कांहीं नट त्याच्या विद्यमान काळीं व नंतरही आपल्या नाट्यकौशल्यांत प्रसिद्धीस आले; परंतु त्यांपैकीं कोणीही ग्यारिकचें नांव लोपवूं शकले नाहींत.

शेक्स्पीयरचा काळ (१५६४-१६१६) होऊन गेल्यास आज तीन शतकें झालीं; तरी इतिहासकारांना त्याचा इतिहास पूर्ण आहे असें वाटत नाहीं. त्याप्रमाणेंच ग्यारिकच्या चरित्रकारांनाही त्याचें चरित्र लिहिण्या-सारखें आतां कांहीं राहिलें नाहीं असें वाटत नाहीं. नेपोलियनचें चरित्र

लिहिण्यास जितके चरित्रकार पुढें आले किंवा ग्लेडस्टनचें चरित्र जितक्या चरित्रकारांनीं लिहिलें, तितकेच ग्यारिकचेही चरित्रकार झाले आहेत. सुमारें दीडशें वर्षें, म्हणजे ग्यारिक रंगभूमीवर गर्जू लागल्यापासून अलीकडे म्हणजे सन १९०५ पर्यंत त्याच्या चरित्रावर ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत व हें चरित्र लिहिण्यास एकेका चरित्रकारास पाऊणपाऊणशें मोठाले ग्रंथ धुंडाळावे लागले आहेत. यावरूनच या नटाच्या चरित्राचें महत्त्व इतिहासकारांस किती वाटलें असेल व तें चरित्र वाचणारे जिज्ञासू व उत्सुक वाचक किती असतील याची कल्पना करतां येईल.

त्याच्या एका चरित्रकारानें म्हटलें आहे कीं, "आयुष्य सुखमय कसें करावें हें ग्यारिकनें दाखविलें आहे." (Garrick gladdened life) ग्यारिकची स्मृति, ज्यांनीं जगांत आपलें नांव आपल्या गुणांनीं अजरामर करून ठेवलें आहे, त्यांच्या बरोबरीनें ठेवण्याच्या योग्यतेची आहे. इंग्लंडच्या इतिहासांतील प्रसिद्ध वक्ता बर्क यानें ग्यारिकची योग्यता ओळखली होती. त्यानें असें म्हटलें आहे कीं, "ग्यारिकनें आपल्या धंद्याला वरच्या दर्जाच्या ज्या कला आहेत त्यांच्या पंक्तीला नेऊन बसविलें आहे." आपल्याला शिष्ट समाजांत मान मिळावा व आपला धंदा शिष्टजनसंमत असा समजला जावा या अभिमानानें असा प्रयत्न महाराष्ट्रीय नाट्यसमाजांत फक्त संगीत नाट्यकलेचे उत्पादक अण्णासाहेब किर्लोस्कर यांनीं केला. त्यांची परंपरा त्यांच्याच मंडळींतील भाऊराव कोल्हटकर, मोरोबा वाघुलीकर, नाटेकर, जोगळेकर इत्यादि प्रमुख नटांनीं राखली होती; ती परंपरा पुढें संगीत मंडळ्या म्हणून पोट भरणाऱ्या नाटकमंडळ्यांनीं चालविली असती तर आजमितीस नाट्यकलेला जी कीड लागल्यासारखी वाटत आहे ती लागली नसती.

"ग्यारिकचें चरित्र कां लिहिलें?" याचें उत्तर-नाटकाच्या गुणांत तो अद्वितीय नट होऊन गेला, या त्याच्या गुणाबरोबर नाटकाचा व्यवसाय करणाऱ्या लोकांत न आढळणारे, अनुकरण करण्यासारखे, धंद्यांत व समाजांत उपयोगी पडणारे गुण त्याच्या अंगीं होते ते चरित्ररूपानें महाराष्ट्रीय नटवर्गास दाखवावे या उद्देशानें लिहिलें-हें आहे.

"An abridgment of all that was pleasant in man"

" मनुष्यस्वभावांतील चांगुलपणाचें सार म्हणजे ग्यारिक " असें गोल्ड-स्मिथनें म्हटलें आहे. त्याचे ( ग्यारिकचे ) दुसरे चरित्रकार म्हणतात कीं, कवि आणि तत्त्ववेत्ते, शिल्पज्ञ आणि मुत्सद्दी, श्रीमान् आणि गुणवान् हे ग्यारिकच्या गुणांचे दास बनले होते. त्याच्यावर द्वेष व मत्सरमूलक दोषांचे शिंतोडे उडविण्याचे जे प्रयत्न झाले होते ते चंद्रावरच्या डागा-प्रमाणें किंवा संगमरवरी शुभ्र शिळेच्या पुतळ्यावर बसणाऱ्या मच्छरा-प्रमाणें केवळ क्षुल्लक होते.

प्रस्तुत चरित्रलेखकाचा नाटकाच्या धंद्यांतील स्वतःचा अनुभव ग्यारिक-च्या चरित्राशीं एका बाबतींत पुष्कळ पटत असल्यामुळें हें चरित्र लिहिण्या-ची प्रवृत्ति त्याला झाली हें एक आणखी कारण आहे. ग्यारिकला धंद्यांतील जे कटु अनुभव आले त्याच स्वरूपाचे लेखकाला आले आहेत. एक तर नाटकाचा धंदा बहुजनसमाजाच्या लहरीवर अवलंबून असणारा आहे. एक प्रकारें ती लहर संभाळतां येईल; परंतु ज्यांच्यावर धंदा चालविणें अवलंबून आहे, त्या लोकांच्या लहरी, तब्येती, महत्त्वाकांक्षा, मत्सरी स्वभाव, दुष्ट मनो-वृत्ति इत्यादि इत्यादि संभाळणें फार कठिण आहे. या एकंदर मनोवृत्तींची कल्पना धंद्याबाहेर असणाऱ्या माणसांस करून देणें कठिणच आहे. नाटकधंद्याच्या चालकाला सर्वतोपरी अशांच्या मनोवृत्ति संभाळून धंदा चालवावा लागतो; परंतु ह्या धंद्यांत हरीचे लाल असे असतात कीं, त्यांच्यापुढें सारासार विचाराचा कांहीं उपयोग न होतां हात टेंकावे लागतात. ग्यारिकला आपला धंदा केव्हां सोडीन असें झालें होतें :

[I shall shake my chains and no culprit in a jail delivery will be happier.]

" ह्या धंदा सोडल्यावर तुरुंगांतून मुक्त झालेल्या कैद्यालाही होणार नाहीं इतका मला आनंद होईल " असे उद्गार ग्यारिकला काढावे लागले होते. याच प्रकारचे उद्गार आणखी जे जे प्रसिद्ध नट आणि चालक होऊन गेले त्यांचेही आहेत. म्याक्रेडी नांवाच्या एका प्रसिद्ध नटानें (१८४१) म्हटलें आहे कीं, " ज्याला दुसरा कोणताही धंदा चांगला करतां येण्यासारखा आहे तो नाटकाच्या धंद्यांत फसून गेल्याशिवाय पडणार नाहीं." ( No person who had the power of doing

anything better would unless deluded into it, take it up.)

संगीत नाटचकलेचे उत्पादक अण्णासाहेब किर्लोस्कर यांनीं निरक्षर लोकांना धंदा दाखवून दिला खरा; परंतु भोंवतालचें वातावरण पाहून त्यांनीं उद्गार काढले कीं, "नाटकाचा धंदा केशराच्या शेतासारखा आहे. परंतु त्यांत गाढवें चरत आहेत." नाटकगृहें म्हणजे सैतानाचीं घरें व नटवर्ग म्हणजे सैतानाचीं मुलें अशी समजूत ग्यारिकच्या वेळेचा मेथाडिस्ट लोकांचा म्हणून जो धर्मपंथ आहे, त्याची होती. परंतु ग्यारिकनें आपल्या प्रभावानें ती बदलून टाकली. ती इतकी कीं, याच पंथाच्या धर्माचार्यांनीं शेवटीं म्हटलें कीं, "सध्यांच्या बाह्य स्थितीवरून जरी नाटचकलेच्या सुपरिणामाची आशा करतां येत नाहीं, तरी ही कला चांगल्या कामाला लावतां येईल अशी माझी कल्पना धावूं लागली आहे."

सारांश, कांटेरी रस्त्यांतूनही आपला मार्ग काढून तो ग्यारिकनें आपल्या पश्चात् येणाऱ्या नटांना सुगम करून दिला व त्याचें फळ त्याला कसें मिळालें हें त्याच्या चरित्राचा शेवटचा भाग वाचला म्हणजे कळून येतं. आमच्याकडे नाटचकलेचा इतिहास अद्याप बनावयाचा आहे. तो बनविणारीं कर्तीं माणसें नाटच-समाजांत निपजल्याशिवाय असा इतिहास होणें शक्य नाहीं. ग्यारिकच्या योगानें इंग्लंडच्या नाटचकलेचा इतिहास तयार झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. "सूरत तो जाति रही कीरत कबू न जाय" असें म्हणतात, त्याप्रमाणें ग्यारिकची कीर्ति त्याच्या पश्चात् राहिली आहे. नटवर्गांत आपली कीर्ति मागें ठेवणारा एवढा प्रसिद्ध नट दुसरा कोणी झाला नाहीं असें म्हटलें तरी चालेल.

हें चरित्र लिहितांना बरेच ग्रंथ धुंडाळावे लागले हें जागजागीं जे इंग्रजी उतारे दिले आहेत त्यांवरून समजून येईल. बहुतेक उताऱ्यांचें भाषांतर दिलें आहे. तथापि मूळ उताऱ्यांतील वर्णनशैलीची सर भाषांतरांत येईल का नाहीं याविषयीं शंका आहे. परंतु निव्वळ मराठी वाचकांना भाषांतर अर्थबोध करून देईल यांत शंका नाहीं. चरित्रांत देण्यासारख्या आणखी कितीतरी गोष्टी राहिल्या असतील व कदाचित् नको त्या आल्या असतील. तथापि ज्या आल्या आहेत, त्यांवरून एका जगप्रसिद्ध नटाची ओळख महाराष्ट्र-वाचकांस पूर्ण होईल अशी खात्री आहे.

आजपर्यंत परभाषेंतील थोर व प्रसिद्ध पुरुषांचीं चरित्रें महाराष्ट्र-भाषेंत पुष्कळ झालीं आहेत. साक्रेटीसचें चरित्र, ग्यारिबाल्डीचें चरित्र, नेपोलियनचें चरित्र, ग्ल्याडस्टनचें चरित्र अशा अनेक व्यासंगी पुरुषांच्या चरित्रांनीं महाराष्ट्र-वाङ्मयांत भर पडली गेली आहे, इंग्रजी नाटकें व कादंबऱ्या या आमच्या महाराष्ट्रीय लेखकांना भाषांतराला जीवनाधार आहेत; तर एका जगमान्य कलेंतील प्रसिद्ध पुरुषाचें चरित्र महाराष्ट्र-भाषेला जड आहे असें खचीत वाटणार नाहीं. नाट्यव्यवसायी लोकांना तर हें चरित्र मार्गदर्शक होईलच परंतु सामान्य जिज्ञासू वाचकांना हें इतिहास या दृष्टीनें बोधक होईल अशी आशा आहे.

चरित्राच्या अनुरोधानें तिकडील नाट्यसमाजाच्या इतिहासाशीं साम्य दाखविणाऱ्या आपल्या नाट्यसमाजाचेंही थोडेंसें दिग्दर्शन चरित्रांत केलें आहे. देश सुधारलेला असो किंवा मागसलेला असो, त्यांतील मनुष्य-स्वभावाची रचना बहुतेक सारखी असते, हें इकडील नाट्यस्थितीचे जे मधून मधून दाखले दिले आहेत, त्यांवरून समजून येतें. तथापि पाश्चिमात्य नटवर्गाच्या स्वभावांतील कांहीं दोष असले तरी आपल्या देशाच्या इतिहासाचें एक पान तरी आपण आडवूं अशा महत्त्वाकांक्षेनें तिकडचे नट धंदा करीत असतात. म्हणून गेल्या चार शतकांतल्या प्रसिद्ध नटांचीं चरित्रें पाहावयास मिळतात. ती परिस्थिति आपल्या नाट्यसमाजांत दिसत नाहीं याबद्दल वाईट वाटतें. महाराष्ट्र नाट्यकलेचें भवितव्य काय आहे? याची काळजी नाट्यसमाजाबाहेरच्या लोकांस जितकी वाटते, तितकी नाटकाचा धंदा करणाराला नाहीं हें आज स्पष्ट दिसत आहे. शिवाय अलीकडील सिनेमाच्या धंद्यानें नाटकाच्या धंद्यावर मोठी धोंड आणली आहे. तिचा प्रतिकार करण्याचा जर नाटकवाले उपाय शोधणार नाहींत व प्रयत्न करणार नाहींत तर ते आपल्या हातानेंच आपल्या धंद्याला मूठ-माती देतील कीं काय अशी भीति वाटते.

ग्यारिकनें, शेक्स्पीयरला रंगभूमीवर पुन्हां अवतीर्ण केलें असें इतिहास-कार म्हणतात. (Restorer of Shakespeare to the English stage)-इलिझाबेथच्या कारकीर्दीपासून म्हणजे शेक्स्पीयरच्या उदया-पासून तों ग्यारिकच्या कारकीर्दीपर्यंत-मोठमोठ्या नटांना महत्त्वाकांक्षेनें आपलें कौशल्य दाखविण्याला क्षेत्र नव्हतें. नाट्यकलेची उन्नति व्हावी असें

अंतःकरणपूर्वक ज्यांना वाटत होतें; त्या-सुजाण व प्रबुद्ध समाजाचें शेक्स्पीयरच्या नाटकांपासून मनोरंजन होत होतें; परंतु ग्यारिकनें मार्गदर्शित्व पत्करून त्याच्या नाटकांत फेरफार केल्यानें तीं लोकांना अधिक प्रिय झालीं. ग्यारिकची एकंदर चाळीस वर्षांची नाटकधंद्याची कारकीर्द नाटचसृष्टीच्या अंतर्बाह्य उलाढालींत गेली. कालानुरोधानें लोकरुचीला वळण लावण्याचें काम त्याला करावें लागलें. म्हणून इंग्लंडांतील १८ वें शतक म्हणजे नाट्यकलेच्या इतिहासांत नटाचें शतक (Century of the Actor) असें म्हटलें गेलें आहे. या शतकांतच नटांना आपलें कौशल्य दाखविण्याला संधि मिळाली व या शतकांतच नाटकारांपेक्षां नटांनाच प्राधान्य दिलें गेलें.

नटांची योग्यता ग्यारिकमुळें किती वाढली याचा हा १९ व्या शतकांतला, इतिहास आहे. परंतु २० व्या शतकांत म्हणजे आयर्व्हिंगसारख्या प्रमुख नटाच्या कारकीर्दींतही नटाचेंच वर्चस्व स्थापित झालें नटाच्या संबंधानें जें पूर्वापार लोकमत कलुषित होतें तें ग्यारिकपासून हळुहळु मावळत गेलें होतें. व्हिक्टोरिया राणीच्या कारकीर्दींत नटांची योग्यता समाजांत अधिक वाढली जाऊन नटांसंबंधाचें वाईट लोकमत ही गोष्ट मागिल इतिहासांतील होऊन बसली. Public Life in England (इंग्लंडमधील जनचर्या) या इंग्लिश ग्रंथांत म्हटलें आहे कीं:—

Prejudices which, in England atleast, so far concern actors of the best class are now quite things of the past. Mr. Irving was offered some years ago Lord Rectorship by the students of Glasgow University. The drawing room of Mr. Bancroft in Cavendish square is one of the most sought in London. There is no literary or social gathering which would not gladly welcome Miss Ellen Lerry or any other actors who allied dignity of life with professional talent. *We may say that the social position of actors is superior to that of dramatic authors.*

वरील इंग्रजी उताऱ्यांत आयर्व्हिंग (१८३८-१९०५) बॅंक्रॉफ्ट, (१८४१ जन्म) याची बायको, एलन टेरी (१८४८ जन्म) हे प्रसिद्ध नट व नटी यासंबंधानें जें वर्णन आहे, त्यावरून समजून येईल कीं, या

नटवर्गानें, आपल्या अंगच्या कलेच्या कौशल्याबरोबर आपल्या शीलानेंही आपली प्रतिष्टा वाढवून घेतली. समाजांत कोणत्याही समारंभांत यांच्याशिवाय पान हालत नसे. शेवटीं तो ग्रंथकार म्हणतो कीं, "म्हणून आम्हांस असें म्हणावेंसें वाटतें कीं, नाटककारापेक्षां नटांची योग्यता समाजांत श्रेष्ठ आहे."

इंग्लिश समाज व प्रेक्षकवर्ग, नाट्य-व्यवसायाकडे किती उदार दृष्टीनें पाहात आहे हें आमच्या नटवर्गाला समजावें म्हणून प्रस्तुत चरित्रांत इंग्रजी पुस्तकांतले आधार जागजागीं दिले आहेत. महाराष्ट्र नाट्य-समाजांत नटवर्गासंबंधानें उदारपणाचे उद्गार निघण्याचा योग नटवर्ग केव्हां आणील याबद्दल आजच भविष्य करतां येत नाहीं म्हणून त्याच्या माहितीकरितां तिकडील नाट्य-समाजाचें चित्र ग्यारिकच्या चरित्ररूपानें दाखवीत आहों. आपले देशी वैद्य सोडून रोग्यांना परकी डॉक्टराकडे धांव घ्यावी लागते, त्याप्रमाणें इकडच्या नटांना परकीय नाट्यसमाजाचें चित्र दाखविलें जात आहे. त्यामुळें, सांप्रतच्या भारत-नाट्यसमाजाचें व पाश्चिमात्य नाट्य-समाजाचें चित्र या दोहोंकडेपाहून "हें चित्र पाहा आणि तें चित्र पाहा" असें म्हणण्याची पाळी आली आहे.

तथापि या चरित्राच्या अनुरोधानें, आमचें महाराष्ट्रीय नाट्य-वाङ्मय सांप्रत रूक्ष आहे तरी, यांत महाराष्ट्रीय प्रसिद्ध नाटकारांचीं व नटांचीं चरित्रें प्रसिद्ध झालीं आहेत; याही नाटककार व नटवर्गानें एके काळीं महाराष्ट्र रंगभूमि जागृत केली आहे व महाराष्ट्र नाट्य-इतिहास व वाङ्मय अस्तित्वांत आणलें आहे हें सांगून ठेवावेंसें वाटतें.

प्रस्तुत चरित्र बरेच दिवस पडून राहिलें होतें; परंतु रा० रा० अनंत सखाराम ऊर्फ आप्पासाहेब गोखले 'विजय' छापखान्याचे मालक यांच्या मेहेरबानीनें यानें शेवटीं प्रकाश पाहिला याबद्दलचा आभारपूर्वक उल्लेख करणें जरूर आहे.

चित्रांचे ब्लॉक रा० रा० स. ब. सहस्रबुद्धे, बालोद्यान प्रेसचे मालक यांच्या छापखान्यांत तयार होऊन छापून घेतले आहेत. पुणें शहरांत असलीं कामें सोयीनें व चांगलीं होत आहेत हें पुणें शहरांतील औद्योगिक चळवळीचें निदर्शक आहे यांत शंका नाहीं.

कसबा पेठ, पुणें.
घर नंबर १९९

शंकर बापूजी मुजुमदार.

# चरित्रांत आलेल्या पात्रांची माहिती

**स्याम्यूएल जॉन्सन**—(१७०९–१७८४) इंग्लंडच्या इतिहासांत हा एक प्रसिद्ध पुरुष होऊन गेला. हा ग्यारिकचा गुरु होता. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या निबंधमालेंतील निबंधानें महाराष्ट्र वाचकांस याची माहिती पूर्वींच झालेली आहे.

**क्वीन**—(१६९३–१७६६) ग्यारिकचा समकालीन व प्रतिस्पर्धी नट. ग्यारिक उदयास येण्यापूर्वीं हा फार लोकप्रिय होता. परंतु ग्यारिकच्या प्रसिद्धीपासून याची लोकप्रियता मावळूं लागली. हा १७५१ मध्यें धंदा सोडून घरीं बसला.

**फ्लीटवुड**—ग्यारिकचा समकालीन नट व एका नाटक-मंडळीचा चालक. रिच व हा भागीदारींत आपली मंडळी चालवीत होते.

**रिच**—(१६७१–१७६१) ग्यारिकचा समकालीन नट व एका नाटक-मंडळीचा चालक. या नटासंबंधानें अशी आख्यायिका आहे कीं, गे नांवाच्या एका नाटककारानें "बेगर्स ऑपेरा" नांवाचें एक नाटक लिहिलें होतें. व यांत रिच हा नटाचें काम करीत होता. या नाटकानें इंग्लंडांत मोठी खळबळ उडाली होती. या नाटकाबद्दल त्या वेळीं लोकांत अशी म्हण पडून गेली होती कीं, "गे"च्या नाटकानें रिचला "रिच्" (Rich) म्हणजे श्रीमंत केलें व रिचच्या अभिनयानें "गे"चें नाटक लोकप्रिय होऊन तो "गे" Gay म्हणजे रंगेल बनला.

**वुफिंग्टन**—(१७१८–१७६०) नाट्यकलेच्या इतिहासांत ग्यारिकच्या वेळीं इंग्लंडांत प्रसिद्ध होऊन गेलेली नटी.

**बेलामी**—(१७३३–१७८८) नाट्यकलेच्या इतिहासांत ग्यारिकच्या वेळीं इंग्लंडांत प्रसिद्ध होऊन गेलेली नटी.

**सिबर**—(१७१०–१७६६) नाट्यकलेच्या इतिहासांत ग्यारिकच्या वेळीं इंग्लंडांत प्रसिद्ध होऊन गेलेली नटी. ही स्वरूपवान्, अभिनय-निपुण; परंतु मोठी दुर्दैवी होती.

**प्रिचर्ड**—(१७११–१७६८) नाट्यकलेच्या इतिहासांत ग्यारिकच्या वेळीं इंग्लंडांत प्रसिद्ध होऊन गेलेली नटी.

फूट—(१७२०-१७७७) याच्याबद्दल इतिहासकारानें असें लिहिलें आहे कीं, हा मोठा नकल्या होता. त्यानें लंडन शहराची आपल्या कारकीर्दींत फार करमणूक केली. ग्यारिकच्या बरोबरीचा नट. परंतु हा ग्यारिकचा फार द्वेष करीत असे.

म्याक्लीन—ग्यारिकचा समकालीन नट. हा १०७ वर्षांचा होऊन वारला. "मर्चंट ऑफ व्हेनिस" नाटकांतील "शायलॉक"ची भूमिका याच्यासारखी उत्तम कोणास साधली नाहीं. म्हणून पोप कवीनें याच्या या भूमिकेबद्दल असें म्हटलें होतें कीं,

This is the Jew
That Shakespeare drew.

शेक्सपीयरनें जी शायलाकची भूमिका निर्माण केली ती यालाच (म्याक्लीनला) उत्तम वठवितां आली.

अबिंग्टन—(१७३१-१८१५) ग्यारिकच्या वेळची नटी. ग्यारिक इचा फार तिरस्कार करीत असे. That most worthless creature, or that worst of bad women. असे उद्गार तिच्याबद्दल तो नेहमीं काढी.

यंग—(१७४०-१७९७) ग्यारिकच्या चरित्रांत त्याला सतावून सोडणाऱ्या ज्या तीन स्त्रियांचें वर्णन आहे त्यांपैकीं एक.

येट्स—(१७३७-१७८७) ग्यारिकच्या चरित्रांत त्याला सतावून सोडणाऱ्या ज्या तीन स्त्रियांचें वर्णन आहे त्यांपैकीं एक.

सिडान्स—(१७५५-१८३१) ग्यारिकच्या अगदीं शेवटच्या कारकीर्दींत इची व त्याची गांठ पडली; परंतु त्या वेळीं ही एक पुढें नामांकित नटी होईल असें लोकांनीं भविष्य केलें होतें. इंग्लिश नाट्यविषयक वाङ्मयांत इचें चरित्र प्रसिद्ध आहे. "वेस्टमिनिस्टर ॲबे"मध्यें इचा पुतळा आहे.

ब्यारी—(१७१९-१७७७) ग्यारिकच्या बरोबरीचा नट. "रोमियो" आणि "किंग लियर" या भूमिकांत हा ग्यारिकचा प्रतिस्पर्धी होता.

इंग्लंडच्या इतिहासांत बर्क, शेरिडन, गिबन इत्यादि ग्यारिकच्या वेळचे व त्याच्या ऋणानुबंधाचे इतिहासप्रसिद्ध पुरुष होते, त्यांची माहिती नसणारे वाचक असण्याचा संभव नाहीं, म्हणून त्यांच्यासंबंधानें येथें विशेष कांहीं लिहिलें नाहीं. इतर नटांची व नटींची माहिती चरित्रांत त्या त्या प्रसंगीं आली आहे. ग्यारिकच्या चरित्रांतील वरील माहितीवरून असें दिसून येईल कीं, या सर्वांचा नाटकाच्या धंद्यांत प्रवेश, त्यांचा उदयकाळ व त्यांचें धंद्यापासून विराम पावणें किंवा शेवटीं निधन हें जवळ जवळ कांहीं वर्षांच्या अंतरानें पुढेंमागें झालेलें आहेत. म्हणून या काळाला नटांचें युग (age of actors) असें म्हटलेलें आहे. सुमारें १७व्या शतका-च्या अखेरीपासून तों १७७९पर्यंत म्हणजे ग्यारिकच्या मृत्यूपर्यंत व नंतरही कांहीं वर्षें इतर व्यवसाय सोडून नाटकाच्या धंद्याकडे मनाची प्रवृत्ति धांवले-लें बरेच नट इतिहासांत दिसतात. यांपैकीं कांहींतर प्रथम कायद्याचा अभ्यास करणारे, परंतु नाटकाच्या धंद्याच्या आवडीनें महत्त्वाकांक्षेनें व हौसेनें त्यांनीं कायद्याची काथ्याकूट सोडून लोकरंजनाचा मार्ग पत्करला व त्यांत ते प्रसिद्धीस आले. हे सर्व नट व नटी अमहमिकेनें आपलें नैपुण्य दाखविण्या-करितां प्रयत्न करीत असल्यानें त्यांची कीर्ति, नाट्यकलेच्या इतिहासांत त्यांच्या पश्चात् एक शतक ओलांडून आली आहे.

# अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| जन्मवृत्त / शिक्षण ... ... | २ |
| भावी उद्योग ... ... | ४ |
| लंडनच्या रंगभूमीवर प्रवेश ... | ७ |
| ग्यारिकचीं घरीं पत्रें ... ... | ११ |
| ग्यारिकबरोबर नटांची स्पर्धा | १३ |
| आयर्लंडची मोहीम ... ... | १६ |
| लंडनला परत येणें ... ... | १७ |
| पुन्हा डब्लिन येथें ... ... | २२ |
| मार्गारेट वुफिंग्टन ... ... | २३ |
| संयुक्त प्रयोग ... ... | २६ |
| नाटकगृहाची मालकी ... | २९ |
| संसारांत प्रवेश ... ... | ३४ |
| मालकीचा अनुभव ... ... | ३६ |
| प्रवेशक ... ... ... | ३९ |
| चढाओढीचे प्रयोग ... ... | ४० |
| अभिनयपटुत्व ... ... | ४४ |
| ग्यारिकचे टीकाकार... ... | ५० |
| नटांस उपदेश ... ... | ५८ |

| | पृष्ठ |
|---|---|
| ग्यारिकविषयीं लोकमत ... | ६० |
| नाटककारांशीं प्रसंग ... ... | ६६ |
| गुणदोषविवेचन ... ... | ६९ |
| ग्यारिक आणि जान्सन ... | ७४ |
| नाटकगृहांतील दंगे ... ... | ७९ |
| ग्यारिक आणि शेक्सपीयर ... | ८२ |
| एक खलपात्र ... ... ... | ८६ |
| ग्यारिक ग्रंथकार म्हणून ... | ८९ |
| स्वभाव ... ... ... | ९२ |
| मधलीं आठ वर्षें (१७६६–७४) | ९९ |
| शेवटचे प्रयोग ... ... | १०२ |
| ग्यारिकचें रंगभूमीवर अखेरचें येणें | १०४ |
| आणखी कांहीं गोष्टी ... | १११ |
| ग्यारिकचा परिवार ... ... | ११७ |
| शेवटचा पडदा ... ... | ११८ |
| प्रेतयात्रा ... ... ... | १२० |
| राष्ट्राचा आनंद मावळला ... | १२२ |
| ग्यारिकचें चरित्र संपलें ... | १२५ |
| उपसंहार ... ... | १२६–१२८ |

# चरित्रांतील चित्रांची अनुक्रमणिका


| चित्रें. | पृष्ठ. |
|---|---|
| १ शेक्सपीयर-अर्पणपत्रिका ... ... ... | |
| २ ग्यारिकचें जन्मस्थान-लिचफील्ड ... ... | २-३ |
| ३ मार्गारेट वुफिंग्टन ... ... ... ... | २४-२५ |
| ४ ग्यारिकचा नटवर्ग व ग्यारिकच्या मालकीचें ड्रूयूरिलेन नाटकगृह ... ... ... ... | २८-२९ |
| ५ ग्यारिक व त्याची पत्नी ... ... ... | ३४-३५ |
| ६ डॉ० सॅम्युएल जॉन्सन ... ... ... | ७४-७५ |
| ७ स्वर्गदेवता ग्यारिकला घेऊन जात आहेत ... | ११४ |
| ८ ह्यांपटन येथील ग्यारिकचें उद्यान ... ... | ११५ |
| ९ ग्यारिकच्या प्रेतयात्रेचें प्रसिद्धिपत्रक व ग्यारिकचें निर्याण | ११७ |
| १० नाटककार व नट यांचें वेस्ट मिनिस्टर आबेमधील अक्षय्यस्थान ( Poet's corner ) ... ... | १२३ |

# ग्यारिकच्या चरित्रावरील अभिप्राय

## रा० रा० नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब केळकर

रा० रा० शंकरराव मुजुमदार यांस—

सा० न० वि० वि०—आपल्याकडून ग्यारिकच्या चरित्राचे सुटे फॉर्म आले ते वाचून पाहिले. हें तुमचें पुस्तक पुष्कळ दिवस लिहून तयार झालें होतें व तें यापूर्वी बरेच दिवस प्रसिद्ध होणार होतें असें माझ्या स्मरणांत आहे; पण मार्गांतील अडचणीही तशाच असतील. कसेंही असो, तुमच्या पुस्तकानें नाट्यविषयांतील एका प्रमुख अंगावर पश्चिमेकडील प्रकाश पाडणारें एक पुस्तक वाचकांना मिळत आहे हें पाहून बरें वाटतें. दीडशें वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या एका परराष्ट्रीय नटासंबंधाची माहिती—अर्थात् परकीय ग्रंथकाराकडूनच—मिळावयाची. तशीच ती तुम्हांस मिळवावी लागली. तथापि या एकाच विषयावर अनेक पुस्तकें असतां त्यांतील वेंचक—निवडक भाग घेऊन त्याचा यथाप्रमाण व मार्मिक उपयोग करून दाखविण्यांत तुम्हीं बरेंच कौशल्य दाखविलें आहे. तसेंच कित्येक चटकदार व अर्थपूर्ण अशा वाक्यांचें भाषांतर जरी तुम्हीं काळजीपूर्वक दिलें आहे, तरी मूळ अवतरणांचे शब्दही दिले, ही योजना चांगली आहे.

ग्यारिक हा एक मोठा नट होऊन गेला हें इकडे सर्वश्रुत आहे, तथापि त्याच्या मोठेपणाची सांगोपांग कल्पना तुमचें हें चरित्र वाचून जशी आली तशी ती मला पूर्वी नव्हती. त्याच्या काळीं त्याला प्राप्त झालेली मान्यता सर्वव्यापी व सर्वंकष होती हें उघड दिसतें. या बाबतींत अगदीं वेगवेगळ्या लोकांचीं तीन उदाहरणें दिलीं असतां ही गोष्ट ढळढळीतपणें नजरेस येईल. त्या वेळचा इंग्लंडचा राजा व पिट्सारखा मुख्य प्रधान हे त्याचीं नाटकें पहावयाला मुद्दाम जात व त्याला बहुमानपुरःसर भेटीला बोलावीत. जॉन्सनसारखा एककल्ली, खत्रुड, नीरस पण पहिल्या प्रतीचा जाडा वाङ्मयसेवक याला ग्यारिक यास नाहीं नाहीं म्हणतां आपल्या सुप्रसिद्ध वाङ्मयचर्चा-मंडळाचें सभासदत्व द्यावेंच लागलें व ग्यारिकनें आपलें नाटक बसविणें हा आपल्यावर एक मोठा उपकार अशी अप्रत्यक्ष कबुली द्यावी लागली. तिसऱ्या लोकांची गोष्ट म्हटली म्हणजे एक फ्रेंच नटी त्याचें नाट्यचातुर्य पाहून इतकी बेहोषीनें खुषींत आली कीं, तिनें

वाळले नाहींत तोंच ही आमची हानि वज्रलेप करण्याकरितां अबिंग्टनही धंदा सोडून बसली, ही वार्ता कानांवर आली. ही ऐकून रंगदेवता दुःखी झाली! नाटयकलेचें सौंदर्य नष्ट झालें! व नाटकगृहांत फक्त एकमेकांचे दुःखाचे सुस्कारे ऐकूं येऊं लागले.]*

ग्यारिकचें चरित्र वाचीत असतां आमच्या नाटकधंद्यांतील लोकांच्या स्वभावाची पदोपदीं आठवण होते. या बायकांनीं त्याला वेळोवेळीं असें अडवून धरावें कीं, ऐन वेळेला कोणत्याना कोणत्या कारणानें काम करण्याचें त्यांनीं टाळावें. मनासारखे पैसे देऊनही वेळेवर काम करीत नाहीं म्हणून सांगून नाटकाचा बेरंग होईल असें करावें. येट्स नांवाच्या नटीला ६०० पौंड वर्षाचा पगार, शिवाय पोषाखाकरितां तिला २०० पौंड पाहिजे होते. ग्यारिकनें तिचा तनखा एकंदर ८०० पौंड ठरविला. शिवाय तिच्या नवऱ्याला आठवड्याचे बारा पौंड निराळे; परंतु इतकें करूनही तिची लहर नसली म्हणजे कारण नसतां तिनें काम करूं नये. अशीं या बायकांच्या आडमुठेपणाचीं उदाहरणें त्याच्या चरित्रांत अनेक आहेत; तोच अनुभव इकडेही आहे. एका गालाला रंग लावून दुसऱ्याला लावण्यापूर्वीं मालकानें पैसे दिले तर दुसरा गाल रंगवावयाचा, नाहींतर लावलेला रंग पुसून पसार होणाऱ्या नटांचीं उदाहरणें सांपडतात.

ग्यारिकचा समकालीन नट फूट याच्याबद्दलचा उल्लेख यापूर्वीं येऊन गेला आहेच. हा हजरजबाबी होता. यानें ग्यारिकचा "बस्ट" (मुखवटा) आपल्या खोलींत ठेवला होता. ग्यारिकला या गोष्टीचा मोठेपणा वाटून तो फूटला विनोदानें म्हणाला, "तुमच्या नोटा, नाणें वगैरे जेथें असतें तेथें मला ठेवण्याची तुम्हांला शंका वाटत नाहीं का?" त्यावर फूटनें उत्तर दिलें तेंही कोटीबाज आहे: "नाहीं. कारण तुम्हांला हात नाहींत." (बस्ट म्हणजे नुसता मुखवटा असतो हें वाचकांना ठाऊक आहेच.)

ग्यारिकच्या उदारपणाच्या गोष्टी पूर्वीं येऊन गेल्या आहेत. तो

---

* मध्यंतरीं "गंधर्व क्याप" म्हणून एक टोपीचा प्रकार निघाला होता, तो–इच्या वेळेस "अबिंग्टन क्याप" म्हणून एक टोपीचा नमुना होता, त्यावरून निघाला असावा. अमीर-उमरावांच्या बायका आपल्या पोषाखाची तऱ्हा इच्यापासून उचलीत असत.

चार लोकांदेखत त्याच्या गळयाला मिठी मारून त्याचें चुंबन घेतलें. आपल्या इकडे नाटकाचा धंदा खरा असा गेल्या पांचपन्नास वर्षांतलाच आहे; तथापि नाटक कंपन्यांतले नट, मालक व मॅनेजर यांचे अनुभव व दीडशें वर्षांपूर्वी विलायतेंत उत्कर्ष पावलेल्या या धंद्यांतील धंदेवाइकांचे अनुभव हे दोन्ही एकाच जातीचे आहेत याचें कारण मनुष्यस्वभाव तेव्हां व आतां, तिकडे व इकडे एकसारखाच असणार. तथापि या पुस्तकांत तुम्हीं मधूनमधून एखादे ठिकाणीं इकडील अनुभवांचा ओझरता उल्लेख केला आहे, तो केला नसता तर अधिक चांगलें झालें असतें असें मला वाटतें. कारण या उल्लेखामुळें टीका करणारे कांहीं वाचक भेटतील अशी भीति वाटते. असल्या ग्रंथवाचनाच्या वेळीं व्यक्तिविषयक आठवणी कोणासही न झालेल्या बऱ्या.

ग्यारिक हा गंभीर व विनोदी ह्या दोन्ही भावना प्रगट करणारा कुशल नट होता व आपल्या धंद्याला रामराम ठोकतांना त्यानें जे प्रयोग केले त्यांतला शेवटला प्रयोग एका प्रहसनाचा होता. यावरून जर कोणी असें अनुमान काढील कीं, विनोदाला तो गंभीर भावनेपेक्षां अधिक महत्त्व देत होता, तर तें बरोबर होईल असें वाटत नाहीं. कारण त्याच्या सर्व जन्माचा उद्योग या अनुमानाविरुद्ध आहे. तसेंच हाताशीं इतर नाटकग्रंथ असतां त्यानें शेक्स्पीअरचीं नाटकेंच हातीं घेतलीं आणि तीं पुढें आणलीं यावरून त्याची अभिरुचि उच्च दर्जाची असावी असें दिसतें; म्हणजे समाज हा थिल्लरपणाकडे झुकण्याला केव्हांही एका पायावर तयार असतोच, तसा तेव्हांही तो असणारच. तथापि आपण समाजाच्या आधीन न होतां त्यानें समाजाला आपल्या आधीन ठेविलें व शेक्स्पीयरचें नाटयमर्म जगाला पटविण्याला मदत केली हा त्याच्या अंगचा मोठेपणा होय. स्वतः तो लेखक व कवि होता हें त्यानें लिहिलेल्या पद्यात्मक नाटयप्रयोग प्रस्तावनांवरून उघड दिसून येतें व जॉन्सननें त्याच्याविषयीं दाखविलेला तुच्छतामिश्रित मत्सर हा अयोग्य होता असेंही वाटतें. ग्यारिकनें येऊन जाऊन दुसऱ्यानें लिहिलेले शब्द तोंडपाठ म्हणून कीर्ति मिळविली, असा डॉ० जॉन्सननें ग्यारिकला टोमणा दिला खरा; पण स्वतः जॉन्सनला ज्या शब्दकोशरचनेबद्दल जगविख्याति लाभली त्या कोशांतले शब्द झाले तरी जॉन्सननें स्वतः थोडेच निर्माण केले होते ? शिवाय

स्वतःची शब्दरचना हीच महत्त्वाची असा दिमाख मिरविणाऱ्या जॉन्सन-नें आयरिन नांवाचें जें नाटक लिहिलें तें ग्यारिकसारखा पुरस्कर्ता व आश्रयदाता भेटूनही आठ दिवसदेखील प्रेक्षकसमाजापुढें तग धरूं शकलें नाहीं याही गोष्टीवरून बराच बोध घेण्यासारखा आहे. असो. तुमचें हें पुस्तक दीडशें वर्षांपूर्वीच्या विलायतेंतील लोकसमाजाची व विशेषतः रंगभूमीची वस्तुस्थिति समजण्याला बरेंच उपयोगी पडेल. कळावें.

पुणें,
ता. १७।७।३०.

ॐ ॐ ॐ

## रा० रा० दत्तो अप्पाजी तुळजापूरकर, बी. ए., एल्‌एल्. बी., 'माझें रामायण' या पुस्तकाचे कर्ते—

इंग्लंडांतील सुप्रसिद्ध 'नटसम्राट्' ग्यारिक याचें नाट्यकलेच्या दृष्टीनें अत्यंत उद्बोधक असलेलें चरित्र प्रसिद्ध करून श्री० शंकरराव मुजुमदार यांनीं मराठी वाङ्मयांत एका सुंदर ग्रंथाची भर टाकली आहे. शेक्स्-पीयर म्हणजे जगांतील अत्यंत श्रेष्ठ कवि किंवा नाटककार, पण त्याची ही प्रसिद्धि होण्यास त्याच्या मृत्यूनंतर बरोबर शंभर वर्षांनीं जन्मास आलेल्या ग्यारिकचें अभिनयकौशल्यच कारणीभूत झालें आहे. शेक्स्पीयर-बद्दल इंग्रज लोकांना एवढा अभिमान आहे कीं, एकीकडे शेक्स्पीयर व एकीकडे ब्रिटिश साम्राज्य असा पेंच येऊन पडल्यास आम्ही साम्राज्याला दूर सारून शेक्स्पीयरला जवळ करूं असे उद्गार एका सुप्रसिद्ध इंग्रज गृहस्थानें काढले आहेत; पण एवढ्या मोठ्या शेक्स्पीयरलाही 'चिरंजीव' बनविण्याचें श्रेय ग्यारिकनेंच मिळविलें. मनुष्यस्वभावाचें संशोधन करून मानवी प्राण्यांच्या निरनिराळ्या मनोविकारांचें यथातथ्य चित्र शब्दांत उमटवून दाखविणारा शेक्स्पीयरसारखा बुद्धिमान् व चतुर नाटककार जगांत पूर्वीं कधीं झाला नाहीं, कदाचित् पुढेंही-पण पुढचें कोणीं सांगावें-'कालोह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी'-परंतु मानवी गूढ मनोविकाराचें बरोबर आविष्करण प्रत्यक्ष रीतीनें रंगभूमीवर करून दाखविण्याचें अवघड कार्यही आजपर्यंत एकट्या ग्यारिकनेंच केलें. अभिनय ही कला शब्दांनीं किंवा चित्रांनीं लिहून दाखवितां येत नाहीं.

शेक्सूपीयरचे ग्रंथ जिवंत आहेत, ते आज आपण प्रत्यक्षपणें वाचूं शकतो; पण ज्या अभिनयकौशल्याबद्दल ग्यारिकची सर्वतोमुखीं प्रशंसा झाली होती तो अभिनय कसा होता याचें दृश्य कधींच आपल्या दृष्टीस पडूं शकणार नाहीं. परंतु शेक्सूपीयरच्या नाटकांतील मानवी गूढ मनो-विकारांचें आविष्करण रंगभूमीवर बरोबर रीतीनें करून दाखवून ग्यारिकनें त्या वेळचे प्रसिद्ध विद्वान्, मुत्सद्दी, वक्ते, तत्त्वज्ञानी, कवि व ग्रंथकार या सर्वांकडून वाहवा मिळविली. ह्यावरून त्याचें अभिनयकौशल्य किती उच्च दर्जाचें असलें पाहिजे हें उघड होत आहे. त्याच्या अभिनयकौशल्या-चीं वर्णनें त्या वेळच्या मोठमोठ्या लोकांनीं प्रसंगोपात लिहून ठेवलीं आहेत. अभिनयासंबंधानें किंवा एकंदर नाट्यकलेसंबंधानें ग्यारिकनें आपले स्वतःचे विचारही निरनिराळ्या प्रसंगीं प्रदर्शित करून ठेविले आहेत. त्यांवरून आपल्या इकडील नटवर्गाला फारच फायदा होण्यासारखा आहे. शेक्सूपीयरच्या बहुतेक सर्व नाट्यकृतींचीं मराठींत भाषांतरें किंवा रूपांतरें झालीं आहेत परंतु शेक्सूपीयरच्या नाट्यकृतींना अत्यंत उच्च दर्जाच्या अभि-नयाची जोड असल्याशिवाय त्यांचे प्रयोग रंगभूमीवर यशस्वी होऊं शकत नाहींत, हा अनुभव इंग्लंडांतील लोकांना पूर्णपणें आला होता म्हणूनच त्यांना ग्यारिकचें महत्त्व विशेष वाटतें. या दृष्टीनें ग्यारिकचें चरित्र मराठी भाषेंत आजपर्यंत कोणीही लिहिण्याचें मनांत आणलें नाहीं हें मराठी रंगभूमीचें दुर्दैव होतें. ती उणीव भरून काढून मुजुमदार यांनीं मराठी रंगभूमीला उपकृत करून ठेवलें आहे यांत शंका नाहीं.

मुजुमदार यांनीं सदरील पुस्तक केवळ तादात्म्य वृत्तीनें लिहिलें आहे. ग्यारिकनें रंगभूमीवर प्रथम प्रवेश केला त्या वेळीं इंग्लंडांत नाट्यकलेला जसें ओबडधोबड स्वरूप होतें तसेंच ओबडधोबड स्वरूप सन १८८० साला-पर्यंत मराठी रंगभूमीचेंही होतें. त्या सुमारास अण्णासाहेब किर्लोस्करांनीं मराठी रंगभूमीचें नवीन युग सुरू केलें व त्याच वेळीं स्वतः मुजुमदार यांनींही रंगभूमीवर त्यांच्याबरोबर आपलें पाऊल टाकलें. तेव्हांपासून आज पन्नास वर्षांचे अवधींत त्यांना ग्यारिकप्रमाणेंच त्यासंबंधींचे बरे-वाईट–अर्थात् बऱ्यापेक्षां वाईटच जास्त–अनुभव आले. त्यामुळें नट, नाटकें, नाटककार किंवा एकंदर नाटकाचा धंदाच ह्यासंबंधीं ग्यारिकनें जे प्रसंगोपात उद्गार काढले आहेत ते जसे काय आपल्या स्वतःलाच

तंतोतंत लागू पडतात, अशा भावनेनेंच त्यांनीं ग्यारिकच्या चरित्रांतले ते ते प्रसंग केवळ समरस होऊन मोठ्या चित्ताकर्षक रीतीनें वर्णिले आहेत.

मुजुमदार हे मराठी भाषेंतले एक चांगले लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. पुस्तकाची भाषा सुबोध व सरस आहे; परंतु कांहींशी जुन्या वळणावर गेली आहे. त्याचप्रमाणें ठिकठिकाणीं आपल्या लिखाणाला त्यांनीं इंग्रजी पर्याय देण्याचा जो अट्टाहास केला आहे, त्यामुळें भाषेचें सौंदर्य नाहक कमी झालें आहे. उदाहरणार्थ 'हातकाठी', 'रांड', 'संसारग्रंथी पडली', 'आख्यायिका चालत असतात' यांसारखे कांहीं शब्दप्रयोगही कानाला कसेसेच लागतात.

आपल्या इकडल्याप्रमाणेंच ग्यारिकच्या वेळेस तिकडे नाटकाचा धंदा हीन दर्जाचा समजला जात असे. नटांच्या किंवा नटींच्या शीलाबद्दल कोणालाही खात्री देतां येत नसे. केवळ धंद्याच्या दृष्टीनेंसुद्धां त्यांचें वर्तन उद्दामपणाचें व अडवणुकीच्या मार्गाचें असे. ह्या सर्व गोष्टींचें हुबेहुब प्रतिबिंब मराठी रंगभूमीवर मुजुमदारांना प्रत्यक्ष पाहाण्यास मिळालें असल्यामुळें त्यासंबंधींचे तुलनात्मक परंतु खेदजनक उद्गार त्यांनीं पुस्तकांत ठिकठिकाणीं काढले आहेत; पण असल्याही दुर्गुणांच्या भोंवऱ्यांतून मराठी रंगभूमीला बाहेर काढून तिला बऱ्याचशा उच्च दर्जावर नेऊन ठेवण्याचें कार्य महाराष्ट्रांतही झालें आहे. या कार्याला स्वतः मुजुमदारांनींही पुष्कळ हातभार लावला आहे. परंतु स्वतःला आलेल्या कटु अनुभवांच्या दडपणा-मुळें मराठी रंगभूमीच्या ह्या उज्ज्वल स्वरूपाविषयीं पुस्तकांत चार चांगले शब्द लिहिण्याचा हुरूप शंकररावांना राहिला नसावा. इंग्लंडांतल्या ग्यारिकप्रमाणेंच शेक्स्पीयरच्या नाटकांचे हृद्गत बरोबर ओळखून मानवी मनोविकारांचे बरोबर प्रदर्शन मराठी रंगभूमीवर करून दाखवून आपल्या अभिनयनैपुण्यानें महाराष्ट्रांतील विद्वान् व रसिक लोकांनाही ज्यानें कांहीं काल दिपवून टाकलें होतें त्या महाराष्ट्रीय ग्यारिकचा उल्लेख तुलनात्मक दृष्टीनें पुस्तकांत अवश्य यावयास पाहिजे होता. ग्यारिकचा अभिनय प्रत्यक्ष पाहिलेला कोणताही माणूस आज हयात नाहीं; परंतु त्याच्या अभिनयाच्या वर्णनावरूनच त्याची परीक्षा करावयाची असेल तर गणपतराव जोशांचें अभिनयकौशल्य ग्यारिकच्याच तोडीचें असलें पाहिजे असें निःसंशय म्हणतां येईल. कदाचित् असेंही म्हणतां येईल

कीं, गणपतरावांचें हॅम्लेटचें काम व ग्यारिकचें हॅम्लेटचें काम ह्यांत कांहीं उजवा डावा फरक असेल तर गणपतरावांचेंच काम जास्त उजवें होत असावें! त्याचप्रमाणें भाऊराव कोल्हटकर व नारायणराव राजहंस ऊर्फ बालगंधर्व यांनींही ह्या कलेंत फार उच्च दर्जाचें स्थान संपादन करून ठेवलेलें आहे. अभिनयाच्या कलेच्या दृष्टीनें मराठी रंगभूमिवरच्या ह्या त्रिमूर्तींचें तुलनात्मक वर्णन प्रसंगोपात ह्या पुस्तकांत आलें असतें तर पुस्तकाला जास्त शोभा आली असती. दुसरी आवृत्ति काढण्याचा सुयोग आल्यास ही उणीव मुजुमदार भरून काढतील अशी आशा आहे.

प्रसिद्ध इतिहाससंशोधक भावे यांच्या शब्दांत म्हणावयाचें म्हणजे, या पुस्तकाचेद्वारें शंकरराव मुजुमदार यांनीं नाट्यदरबाराचें एक 'नवें दालन' उघडलें आहे. उतारवयांतही त्यांनीं घेतलेल्या ह्या श्रमाबद्दल त्यांचें कोणीही कौतुकच करील.

मुंबई,
ता. १५।७।१९३०.

❀ ❀ ❀

## रा० रा० वसंतराव देसाई, बी. ए., एल्एल्. बी. 'विधिलिखित' नाटकाचे कर्ते—

श्री० शंकरराव मुजुमदार यांनीं लिहिलेलें ग्यारिकचें चरित्र मीं समग्र वाचलें आहे. कादंबरी किंवा नाटकाप्रमाणेंच चरित्रलेखनांतही एकसारखी संगति कायम ठेवणें ही गोष्ट अवघड असते; परंतु ती कामगिरी मुजुमदारांनीं यशस्वीरीतीनें पार पाडली आहे. विशेषतः 'ग्यारिकचे टीकाकार', 'ग्यारिक व जॉन्सन', 'ग्यारिक व शेक्सूपीअर' वगैरे व शेवटचे सर्वच भाग मनोरंजक, बोधप्रद आणि हृदयस्पर्शी आहेत. ग्यारिकच्या चरित्रांतील वेगवेगळे प्रसंग रंगवितांना, चरित्रकारांनीं स्वानुभवावरून महाराष्ट्र-रंगभूमीवरील असमाधानकारक गोष्टींची आठवण वाचकवर्गास करून दिली आहे. परंतु आमच्या रंगभूमीवरील वाइटाबरोबरच तिचा चांगुलपणादेखील नमूद असावा, या हेतूनें, नाट्यक्षेत्रांत प्रायः होणाऱ्या प्रगतिपर सुधारणांचा उल्लेख, शेक्सूपीअरच्या नाटकांतील नांवाजलेल्या भूमिका रंगवून दाखविण्याच्या बाबतींत

ग्यारिक इतकें जरी नव्हे, तरी युरोपियनांनींही तारीफ करावी अशा प्रतिष्ठेचें यश मिळविलेल्या कै० गणपतराव जोशांचा उल्लेख, किंवा उत्तम नाट्यगुणांच्या बाबतींत आजही उत्तमच यश मिळविलेले श्री० नारायणराव राजहंस यांचा प्रसंगविशेषीं गौरवानें उल्लेख करणें अवश्य होतें.

थोरांच्या चरित्रलेखनाचा एक हेतु त्यांची स्मृति जागृत ठेवणें हा असला तरी आपल्या चरित्रनायकाच्या जीवनकथेपासून आजच्या जनतेनें बोध घ्यावा हा हेतु चरित्रकाराच्या मनांत प्राबल्यानें वास करीत असतो. ग्यारिकसारख्या अद्वितीय आणि त्रिभुवनवंद्य नटाचा जीवनवृत्तान्त महाराष्ट्रीय नटवर्गासमोर मांडण्यांत श्री० शंकरराव यांचा हाच हेतु आहे हें त्यांच्या 'उपसंहारा'वरून दिसून येईल. उत्कृष्ट नट म्हणून नांवाजलेला ग्यारिक, कर्तबगार मालक म्हणून नांवाजलेला ग्यारिक, प्रतिपक्षीयांचे टीकाप्रहार संथपणें सहन करून त्यांपासून स्वतःची सुधारणा करून घेणारा ग्यारिक, समकालीन आणि समगुणी नटांचा मत्सर न करितां त्यांचे गुण कबूल करून, क्वचित्प्रसंगीं आपल्यांत नाहीं तें त्यांच्यांत आहे हें दिलदारपणानें कबूल करणारा ग्यारिक, शेक्स्पीयरच्या नाटकांच्या चिरंजीवतेला ज्याच्यामुळें नवचैतन्याचा लाभ झाला तो ग्यारिक, जॉन्सन, गोल्डस्मिथ, शेरिडन वगैरे तत्कालीन विद्वानांच्या बैठकींत हक्काचें स्थान पटकावून, ज्यानें उत्तम नटाची योग्यता समाजांतील इतर कोणत्याही घटकापेक्षां कमी नाहीं हें सिद्ध केलें व ज्याच्या रोमरोमांत स्वदेशा-विषयींचें प्रेम अहर्निश जागृत होतें त्या ग्यारिकच्या जीविताचा सोज्वळ इतिहास महाराष्ट्रीय नटवर्गाला आदर्शभूत झाल्याशिवाय राहाणार नाहीं. सारांश, ग्यारिकचें चरित्र लिहून रा० मुजुमदारांनीं आमच्या नाट्यसंबंधीं वाङ्मयांत चांगली भर टाकली आहे यांत शंका नाहीं.

पुणें, }
ता. २६।६।३०. }

ॐ ॐ ॐ

प्रो० नारायण केशव बेहेरे, एम्. ए., बी. एस्सी., एल्. टी.—

किर्लोस्कर संगीत मंडळीचे नेते व आधारस्तंभ श्री० शंकर बापूजी मुजुमदार यांनीं लिहिलेलें ग्यारिकचें निबंधात्मक चरित्र मीं वाचून

पाहिलें. शेक्सपीयरचीं नाटकें ग्यारिकच्या कलानैपुण्यानें व अभिनय-चातुर्यानें इंग्लंडच्या रंगभूमीवर लोकप्रिय झालीं. ग्यारिकच्या या कामगिरीमुळें जॉन्सनसारखे पंडित, गोल्डस्मिथसारखे कवि, शेरिडनसारखे नाटककार आणि बर्कसारखे मुत्सद्दी व वक्ते संतुष्ट होऊन त्याला परोपरीनें नाणावूं लागले. ग्यारिकचा सर्वत्र जयजयकार होऊं लागला. ग्यारिक इंग्लिश रंगभूमीवर अवतीर्ण होण्यापूर्वी तिकडील समाजांत नटाला फारसा मान मिळत नसे. ग्यारिकनें आपल्या कामगिरीच्या जोरावर आपलें नांव तर अजरामर केलेंच; परंतु त्याबरोबरच नटाची थोरवी समाजाला पटवून दिली. अशा या थोर नटाचें चरित्र मराठी भाषेंत लिहिण्याची इच्छा नाट्यव्यवसायांत सर्व आयुष्य वेंचलेल्या नानासाहेब मुजुमदारांना व्हावी हा योगायोग अपूर्व होय. चरित्राची भाषा गोड व सरळ असून ग्यारिकच्या आयुष्यांतील अनेक उद्बोधक आख्यायिकांचा त्यांत समावेश केला आहे. तत्कालीन थोर इंग्रजांच्या उक्तींनीं सदर पुस्तक सजविलें आहे. हा चरित्रात्मक निबंध महाराष्ट्र रंगभूमीवरील आधुनिक व भावी नटांना स्फूर्तिदायक व मार्गदर्शक होईलच; परंतु सामान्य मराठी वाचकांना देखील तो मनोरंजक वाटेल अशी माझी खात्री आहे.

नागपूर,<br>ता. ३०।६।३०.

---

नाट्यवाङ्मयाकडे व्यापक दृष्टीनें टीका करणाऱ्या टीकाकारांचे चरित्रनायकासंबंधानें काय अभिप्राय आहेत, हें समजून येण्याला वरील अभिप्राय पुरे आहेत. महाराष्ट्र रंगभूमींत प्रसिद्ध असे नट होऊन गेले आहेत व प्रस्तुत विद्यमान् आहेत ही गोष्ट लेखकास कबूल आहे, अशा नटांच्या संबंधानें नुसत्या त्यांच्या नामनिर्देशानें त्यांची योग्यता कळून येणार नाहीं. महाराष्ट्ररंगभूमीच्या इतिहासाचीं कांहीं पृष्ठें अडलीं जातील अशी त्यांची योग्यता आहे. आणि तसा योग परमेश्वरकृपेनें लवकरच येईल.

शं. बा. मुजुमदार.

---

ग्रंथ संग्रहा

## जगप्रसिद्ध नट

# ग्यारिक याचें चरित्र

"The actor adds grace to the poet's labour, for what in the poet is but ditty, in him is both ditty and music."

[ नट हे कविकृतीला सौंदर्य आणणारे असतात. कारण कवीच्या ठिकाणीं फक्त काव्यस्फूर्ति असते. परंतु नटांच्या अंगीं काव्य आणि माधुर्य हीं असतात.]

महाराष्ट्र-नाट्यसमाजांत, नटवर्गाला अद्याप ग्यारिकच्या योग्यतेला बसविण्यासारखे नट उदयास आले नाहींत, इतकेंच नाहीं तर ग्यारिक म्हणून पाश्चिमात्य नाट्य-समाजांत एक जगमान्य नट होऊन गेला ही गो ही महाराष्ट्र-नाट्य-समाजांत फारच थोड्यांस माहीत असेल आणि तीही अलीकडच्या एक दोन पिढ्यांतच असेल. पाश्चिमात्य नाट्य-समाजांत हा एक अतिशय नाट्यनिपुण, बुद्धिमान् व लोकमान्य नट होऊन गेला. यानें आपली बुद्धिमत्ता आपल्या काळच्या सर्व वर्गांच्या लोकांस जाणविली होती. कीर्तीच्या महत्त्वाकांक्षेनें नाटकाचा धंदा स्वीकारलेले नट पाश्चिमात्य नटांतच सांपडतात. त्यांचीं चरित्रें बोधप्रद व महत्त्वाकांक्षा उत्पन्न करण्यासारखीं आहेत. अशा नटांच्या मालिकेंत ग्यारिक हा अग्रणी नट आहे. यानेंच नाट्य-कलेचें महत्त्व जगाच्या निदर्शनास आणून दिलें. याच्यासंबंधानें अनेक आख्यायिका प्रचलित आहेत. त्या कुटुंबांतील मंडळी दिवाणखान्यांत (Parlour) शेगडीच्या मंद उष्णतेनें थंडीचें निवारण करीत एकत्र बसली असतां तेथें, किंवा पान-गृहें, विश्रांति-गृहें, वाचनालयें, मुत्सद्दी लोकांच्या करमणुकीकरितां एकत्र बसण्याच्या जागा (Clubs) या सर्वांतून चालत असतात.

ग्यारिकच्या चरित्रापेक्षां त्याच्या नाट्यनिपुणतेच्या गोष्टी व त्यांवर रसिकपणाची टीका, त्याच्यासंबंधाच्या दंतकथा व आख्यायिका यांचाच एक ग्रंथ होईल.

## जन्मवृत्त

ग्यारिकचा जन्म सन १७१७ च्या फेब्रुवारी महिन्यांत झाला. ग्यारिकचें मूळचें कुटुंब फ्रान्समधलें होतें; परंतु त्याच्या आजापासून तें लंडन येथें येऊन राहिलें. ग्यारिकचा बाप लष्करी नौकर होता. ज्या पलटणींत तो होता, ती पलटण हियरफर्ड नांवाच्या एका परगण्यांत आली असतां, तेथें लिचफील्ड गांवांतील एका धर्मोपदेशका-च्या मुलीशीं त्याचें प्रेम जुळून त्यानें तिच्याशीं लग्न लावलें. या संबंधा-पासून झालेल्या संततींत ग्यारिक डेव्हिड हा क्रमानें तिसरा होता. स्ट्राटफर्ड शहराला जसें शेक्सपीयरची जन्मभूमि म्हणून महत्त्व आहे, तसेंच लिचफील्ड या शहराला ऐतिहासिक महत्त्व ग्यारिकची जन्म-भूमि म्हणून आहे. याच लिचफील्ड शहरांत एका पिढींत दोन पुरुष जन्मास येऊन कीर्तीनें अजरामर होऊन राहिले. अठराव्या शतकांतला तत्त्वज्ञ व पंडिताग्रणी स्याम्यूयल जान्सन हाही लिचफील्डच्याच पुण्यभूमींत निर्माण झालेला नरमणि आहे. जॉन्सन आणि ग्यारिक दोघांनीं जरी निरनिराळे पंथ आक्रमिले होते तरी कीर्तिमंदिराच्या पायरी-ला पोंचण्याच्या शर्यतींत एकापेक्षां दुसरा अगोदर कोण पुढें गेला हें सांगणें कठीण आहे.

ग्यारिकच्या बापानें ग्यारिकचा जन्म झाल्यावर आपली नोकरी सोडली. याचें कारण संसाराच्या मोहजाळांत त्याचें मन अधिक ओढूं लागलें. म्हणून तो लिचफील्ड येथें संसार थाटून सुखानें राहूं लागला. त्याची प्राप्ति बेताची होती; तरी काटकसरीनें त्यानें आपला संसार चालविला; व सौजन्यानें आणि चालचलणुकीनें वागून गांवच्या कुटुंब-वत्सल लोकांत भलेपणा मिळविला.

## शिक्षण

डेव्हिडच्या शिक्षणाची काळजी त्याचा बाप घेत असे. त्यानें



ग्यारिकचें जन्मस्थान. लिच फील्ड. पृष्ठ–२–३

बालोद्यान प्रेस, पुणें.

त्याला दहाव्या वर्षीं शाळेंत घातलें; परंतु ज्या गुरूच्या हाताखालीं त्याला दिलें होतें, त्याच्या विक्षिप्तपणामुळें ग्यारिक पुढें थट्टेखोर मात्र निपजला; व गुरूविषयीं त्याच्या मनांत पूज्यबुद्धि राहिली नाहीं असें जर कोणी अनुमान बांधलें तर तें अतिशयोक्तीचें होणार नाहीं.

ग्यारिक लहानपणीं बुद्धीनें तरतरीत असे; परंतु अभ्यासीपणा त्याच्या ठिकाणीं नव्हता; इतकेंच नव्हें तर तो खेळकर होता म्हटलें तरी चालेल. लहानपणापासून दुसऱ्याच्या नकला करण्याकडे त्याचा कल असे. त्यामुळें आपल्या सोबत्यांत तो फार प्रिय झाला होता. त्याच्या याच गुणांत नाटकाची आवड उत्पन्न होणाचा अंकुर उद्भवला असें म्हटलें तरी चालेल. प्रथम त्याच्या गांवीं एखादी नाटक मंडळी आली कीं, तिचीं नाटकें करून दाखविण्याची त्याला हौस उत्पन्न झाली. त्या नाटकांत त्याला जी भूमिका आवडत असे ती तो आपल्याकडे घेत असे व इतर भूमिका आपल्या समवयस्क सोबत्यांना देत असे. अशा रीतीनें अकराव्या वर्षींच तो छोटेखानी नाटक मंडळीचा मॅनेजर बनला होता.

लिस्बन येथें त्याचा एक चुलता दारूचा व्यापार करून होता, त्याच्याकडे ग्यारिकला त्याच्या बापानें पाठविलें. परंतु तो वयानें लहान व खेळकर असल्यानें चुलत्याच्या दुकानावर विक्री करण्याचें काम त्याच्याकडून बरोबर होईना; म्हणून दुसऱ्या वर्षीच बापाकडे तो परत आला. बापानें पुन्हा त्याला पहिल्याच गुरूच्या हाताखालीं शिकावयास ठेविलें; परंतु अभ्यासापेक्षां छांदिष्टपणाकडेच त्याचें लक्ष अधिक होतें. त्याला नाटकाचा छंद लागलेला पाहून त्याच्या बापाचे स्नेही कधीं लंडन येथें जात तेव्हां ग्यारिकलाही घेऊन जात होते व त्याची नाटकें पाहण्याची हौस पुरवीत होते. तथापि खेळतखेळतही त्यानें कांहीं अभ्यास केला होता; परंतु तो एखाद्या मुलाला, खेळावयास जाण्याची आतुरता असली म्हणजे घाईनें व उतावळीनें तो जसा आपले अभ्यास उरकून टाकतो, तशा स्वरूपाचा असला पाहिजे.

जान्सननें लिचफील्ड येथें प्राचीन भाषाशास्त्राचें शिक्षण देण्याचा वर्ग याच सुमारास काढला होता. त्यांत ग्यारिकला त्याच्या बापानें ठेवलें. त्याच्याबरोबर सात-आठ विद्यार्थी होते. ग्यारिकनें या ठिकाणीं

मन लावून कांहींसा अभ्यास केला; परंतु जान्सनला ही गुरुहाकी करण्याचा कंटाळा आला व ग्यारिकला खेडवळ वस्तींतल्या आयदी-पणाचा कंटाळा आला. या वेळेला ग्यारिकचें वय १८ वर्षांचें होतें. ह्याच्या बुद्धीची तीव्रता अधिक वाढूं लागली होती. आपल्याला कांहीं उद्योग करतां येईल व आपल्या अंगची कर्तबगारी दाखवितां येईल, अशी वेळ केव्हां व कशी येईल याचा तो विचार करूं लागला होता. जान्सन व ग्यारिक यांच्या मनाची स्थिति एकच झाली होती. उभयतां-चे विचार जुळले व दोघांनीं लंडनचा रस्ता धरला. ही गोष्ट सन १७३६त घडली.

## भावी उद्योग

आपली जन्मभूमि सोडून हे दोघे तरुण बाहेर पडले त्या वेळीं त्यांच्या-जवळ साहुग्री म्हणजे जान्सननें शाळा घातली तेव्हां त्यानें लिहून ठेवलेलें एक नाटक व ग्यारिकजवळ फक्त त्याच्या मनाचा हुरूप. लोकां-मध्यें आपण ज्या मार्गानें प्रसिद्धीस येऊं तो मार्ग स्वीकारावयाचा ही त्याची महत्त्वाकांक्षा होती. कायद्याचा अभ्यास करावयाचा या विचारानें जरी ग्यारिकनें घर सोडलें होतें, तरी तो पुढें त्यानें सोडून दिला. जान्सन आपल्या उदरनिर्वाहाकरितां एखाद्या ग्रंथप्रकाशकाची गांठ घेऊन आपल्या नशिबाची परीक्षा पाहणार होता. लिचफील्डच्या एका गृहस्थानें दोघांनाही शिफारसपत्रें दिलीं होतीं. त्यांत ग्यारिकबद्दल असे उद्गार होते कीं, हा मुलगा हुशार व होतकरु असून लहानपणापासून माझ्या सहवासाला आहे व त्यावर माझें फार प्रेम आहे. जान्सनबद्दल थोड-क्यांतच "जान्सन" नांवाचा एक कवि व हुशार विद्यार्थी ग्यारिक-बरोबर आहे" एवढी शिफारस होती. दोघेही निघतांना निष्कांचन होते. काय चारआठ आणे किंमतीचें नाणें प्रत्येकाच्या खिशांत होतें तेवढेंच.

ग्यारिक लंडन येथें येऊन राहिल्यावर, त्याचा लिस्बन येथें जो चुलता होता, तोही लंडनमध्यें कायम राहण्याच्या उद्देशानें आला होता; परंतु येथें तो आजारी पडून थोड्या दिवसांनीं वारला. मरतांना त्यानें मृत्युपत्रांत एक हजार पौंड ग्यारिकच्या नांवानें लिहिले होते.

ग्यारिकला कायद्याच्या अभ्यासाची मोठीशी आवड नव्हती. तेव्हां त्यानें आपल्या भावाबरोबर लंडन शहराच्या डर्‌ह्यामयार्ड नांवाच्या एका भागांत दारू विकण्याचें दुकान काढलें. भावानें लिचफील्ड येथील दुकान चालवावें व ग्यारिकनें लंडन येथील चालवावें असें ठरलें. ग्यारिकचें दुकान ज्या भागांत होतें, त्या भागांत इतर लोकांचीं विश्रांती-चीं निरनिराळीं ठिकाणें असत. या ठिकाणीं थिएटरचे नट येत जात असत. ग्यारिकचीही बैठक तेथें होई. त्या वेळीं त्यांच्या, नाटकावर टीका चालत त्यांत ग्यारिकची मार्मिकता चांगली दिसून येत असे. ज्या विषयाकडे त्याच्या बुद्धीचा स्वाभाविक कल असे, त्याला अधिक उत्तेजन येण्याला ग्यारिकला ही आयतीच संधि मिळाली. त्यानें प्रत्येक नांवाजलेल्या नटाचें बारीक रीतीनें निरीक्षण करून ठेवलें व वर्तमानपत्रांत निःपक्षपात-बुद्धीनें आपलें नांव प्रसिद्ध न करतां टीका चालविली. केव्हां केव्हां स्वतःही तो नटांच्या नकला हुबेहूब करून दाखवी. अशा तऱ्हेनें दोन वर्षें त्याचा क्रम चालला होता.

या काळांत इंग्लंडमध्यें नाट्यकला निकृष्ट स्थितींत होती, व तिच्या-वर अवलंबून असणारे नटही कनिष्ठ प्रतीचेच होते. दुःखपर्यवसायी नाटक ( Tragedy ) म्हणजे मोठ्या आवाजांत ओरडणें, शृंगार म्हणजे कांहींतरी अद्वातद्वा भाषण करणें, दुःख म्हणजे मुळूमुळू रडणें, भय म्हणजे आरडा-ओरड करणें, प्रीतीची याचना म्हणजे हेल काढून बोलणें किंवा मृदु शब्दांनीं बोलणें. सारांश नाटकाचें त्या वेळेचें चित्र म्हणजे स्वाभाविक-पणाचा येथूनतेथून अभाव. आनंदपर्यवसायी नाटक ( Comedy ) म्हणजे विदुषकी बाष्कळपणा व सावळागोंधळ. अशी एकंदर नाट्य-कलेची स्थिति होती. अशा स्थितींतही पात्रापात्र विचार करणारे, म्याक्लीन व क्वीन यांसारखे नट होते. ( त्यांची माहिती चरित्राच्या अनुरोधानें येणार आहे.) अशी स्थिति असण्याला कारण लोकांची कमी दर्जाची अभिरुचि असें नटवर्ग दाखवीत असत. जणुं काय भ्रष्ट अभिरुचि हा आपोआप उद्भवणारा रोग आहे. व नट-वर्गाकडून क्रमाक्रमानें लोकरुचि बिघडली जात असे हा दोष नव्हे.

ज्यांनीं आमचीं पौराणिक नाटकें पाहिलीं असतील त्यांना वरील

स्थितीची बरोबर कल्पना येईल. पौराणिक नाटकाच्या काळांत 'ट्रॅजेडी' व 'कॉमेडी' हे शब्द जरी प्रचारांत नव्हते, तरी त्यांला समानार्थक 'शोक-रसप्रधान' व 'शृंगाररसप्रधान' या नांवाच्या नाटकाच्या जाहिराती प्रसिद्ध करण्यांत येत असत. 'शोकरसप्रधान' हरिश्चंद्र आख्यान किंवा 'शृंगार-रसप्रधान' रासक्रीडा, मदालसा हीं नाटकें 'ट्रॅजेडी' व 'कॉमेडी' या संज्ञेचीं निदर्शक होतीं. पौराणिक नाटकांतलीं पात्रें मोठे मोठे संस्कृत शब्द घालून भाषणें करीत असत. बोलतांना हेल काढून बोलत असत, राक्षस-पात्रें रंगमहालांत प्रियेशीं एकान्त करीत असलीं तरी त्यांचें भाषण नाटक-गृहाबाहेरच्या प्रेक्षकांनाही चांगलें ऐकावयास येईल असें हळू (!) असे. विदूषक हें पात्र तर वेळीं अवेळीं हास्यरस उत्पन्न करण्याकरितां राखून ठेवलेलें असें. याशिवाय 'स्टेज'वरची हमालगिरी म्हणजे खुर्च्या उचलणें, पात्रांची सरबराई करणें हीं कामें त्याच्याकडे असत. तथापि अशा काळांतही समयसूचकता, प्रसंगावधान, कल्पकता, भूमिकेशीं एकरूप होणें इत्यादि गुण अंगीं असणारे कुशल नट इ०सन १८४३पासून ते इ०सन १८८० सालापर्यंत अनेक होऊन गेले आहेत. इंग्लिश नाटकाच्या पूर्व-काळाशीं पौराणिक नाटकाचें हें साम्य आहे.

सुमारें तीन वर्षें ग्यारिकने लंडन येथें नाट्यकलेवर त्यामंग चालविला; परंतु त्याचा धंदा मात्र त्याच्या महत्त्वाकांक्षेला पाठबळ मिळण्यासारखा चालेना. म्हणून आपल्या भावाशीं भागीदारी असलेला धंदा सोडून नाट्य-कलेवर आपलें दैव काढण्याचा त्यानें निश्चय केला व या निश्चयानुरूप त्यानें अंतस्थ तयारी चालविली. प्रथम त्यानें शेक्स्पीयरच्या नाटकां-तील वंचक व ठळक भूमिकांचें मोठ्या आस्थेनें व बुद्धि खर्चून निरीक्षण चालविलें; परंतु जशी शेक्स्पीयरच्या नाटकांतील एकेका पात्राशीं त्याची ओळख होऊं लागली. तशी शेक्स्पीयरनें तें कशाकरितां योजिलें आहे, याची साक्ष त्याच्या मनाला पटूं लागली, प्रत्येक पात्राच्या मनो-विकाराच्या नाजूक व स्पष्ट छाया त्याच्यापुढें उभ्या राहूं लागल्या. सारांश, शेक्स्पीयरची नाट्यरचना अद्वितीय कां, याचें जसें जसें त्याला ज्ञान होऊं लागलें तसें तसें आपण किती अल्पज्ञ आहोंत याबद्दल त्याच्या मनाची त्याला खात्री पटूं लागली. त्यानें विचार केला कीं, शेक्स्पीयर-

च्या भूमिका यथार्थत्वानें करून दाखवावयाच्या म्हणजे यापुढें-ज्या अभिनयाच्या पद्धतीवर आजपर्यंत प्रेक्षकजन संतुष्ट होत आले आहेत, तिच्यापेक्षां निराळी पद्धत आपण अनुसरली पाहिजे.

याच सुमारास ग्यारिकचे आईबापही वारले. त्यापैकीं एक कोणी जीवमान असतें तर त्याचें मनोराज्य जागच्याजागींच राहिलें असतें; परंतु आपल्या विचाराला आडकाठी आणण्याला आतां कोणी उरलें नाहीं असें पाहून त्यानें आपला मनोदय अमलांत आणला. गिफर्ड नांवाच्या एका म्यानेजराची व ग्यारिकची याच सुमारास ओळख झाली. त्याच्या विचारानें असें ठरलें कीं, प्रथमतः ग्यारिकनें शहरांत रंगभूमीवर न येतां जवळच्या एखाद्या गांवीं जाऊन तेथें काम करावें. त्याप्रमाणें गिफर्ड व ग्यारिक हे इपस्विच नांवाच्या गांवीं एक नाटक मंडळी होती तेथें गेले; व तिच्याशीं ठराव करून ग्यारिकनें ल यडेल हें टोपण नांव धारण करून एका दुःखपर्यवसायी नाटकांत भूमिका घेतली. त्यानें जी भूमिका घेतली ती काळ्या वर्णाची होती. ही भूमिका त्यानें पसंत केली याचें कारण एक, आपला खरेपणा झांकला जावा हें व दुसरें, ही भूमिका इतकी महत्त्वाची नव्हती. त्यानें प्रथम ही भूमिका केली ती चांगली केली. कांहीं चरित्रकारांचें म्हणणें आहे कीं, ही भूमिका लोकांस पसंत पडली नाहीं. कांहीं चरित्रकार म्हणतात कीं, त्यानें पहिल्याच भूमिकेनें लोकांस चकित करून सोडलें. तथापि या ठिकाणीं हा त्याचा अभ्यास म्हणजे शर्यतीच्या मैदानावर जशी घोड्याची तालीम चालते तशी तालीम होती. त्यानें या ठिकाणीं ज्या लहानमोठ्या भूमिका केल्या, त्यांनीं त्याची प्रसिद्धि लोकांत होऊं लागली. भोंवतालच्या गांवचे लोक नाटकास जमूं लागले. सुमारें तीन महिने या रीतीनें लोकरंजन करून त्यानें आपलें खरें नांव प्रगट केलें. या वेळीं याचें वय २५ वर्षांचें होतें.

## लंदनच्या रंगभूमीवर प्रवेश

ज्या नटाच्या अंगचे गुण प्रेक्षकांच्या प्रथमदर्शनींच लक्षांत येतील तो खरा नट. ज्या नटाचे गुण समजून येण्याला काळ जावा लागतो, तो खरा नट नव्हे. तसेंच ज्या नटाला परिश्रम करण्यास नकोत त्यानें

आपल्या धंद्यांत कीर्तीची कधींही आशा करूं नये. ग्यारिकनें प्रथम अप्रसिद्ध ठिकाणीं दीर्घश्रम करून जें नांव मिळविलें, त्या योगानें त्याला त्याच्या भावी उदयकाळाची आशा उत्पन्न झाली. या अप्रसिद्ध ठिकाणीं, नाटकाच्या धंद्यांत प्रवेश केल्याबरोबर मिळालेल्या यशाचें त्याला जेव्हां जेव्हां स्मरण होई, तेव्हां तेव्हां त्याला आनंद वाटत असे; व त्या प्रसंगाचें तो कृतज्ञबुद्धीनें स्मरण ठेवी. तो नेहमीं म्हणे कीं, प्रथम मला अपयश आलें असतें तर मी कुठेंतरी दुसऱ्या धंद्यांत शिरलों असतों. त्याला ज्या गोष्टींचा नुसता हव्यास होता तो आतां कायम झाला; व त्यापासून लोकांस आनंद मिळण्याचें एक साधन झालें.

लंडनच्या रंगभूमीवर येण्याचा संकल्प करून तो त्या तयारीस लागला; परंतु "प्रथम ग्रासे मक्षिका पातः" या म्हणीप्रमाणें त्याला प्रथम एक अपमान सहन करण्याचा प्रसंग आला. शहरांत एका नाटक-मंडळीचे मालक फ्लीटवूड व रिच हे दोन प्रसिद्ध नट असत, यांच्या-कडे ग्यारिक आपल्यास मंडळींत घ्यावें म्हणून गेला; परंतु त्यांची ग्यारिक-बद्दलची कल्पना म्हणजे हा कोणी तरी भटकणारा नाटक्या असावा अशी झाली व त्यांनीं ग्यारिकला झिडकारलें. लोकांत पुढें येण्याची आपल्या अंगीं पात्रता आहे, अशी मनाची पक्की खात्री असूनही एखाद्या दुढ्ढाचार्याकडून आपल्याला अपमान सोसण्याची पाळी येते; परंतु तोच पुढें लोकांत चमकूं लागला, म्हणजे ज्यानें त्याची परीक्षा केल्या-वांचून उद्धटपणानें त्याचा अपमान केलेला असतो, अशा मनुष्याला केलेल्या कृत्याचा पश्चात्ताप करण्याची पाळी केव्हां केव्हां येते. तसाच प्रकार ग्यारिकला झिडकारणाऱ्याच्या संबंधांत झाला. फ्लीटवूड आणि रिच यांनीं झिडकारल्याकारणानें गिफर्डबरोबरच त्यानें काम करण्याचें ठरविलें. प्रथम पांच पौंड आठवड्याचा तनखा ठरला. लंडनसारख्या राजधानीच्या शहरांत अगदीं कोंपऱ्यांतल्या वस्तींत काम करण्याचा त्याला कमीपणा वाटूं लागला. ज्या ठिकाणीं हें नाटकगृह होतें त्याला "गुडमॅन्स फील्ड" हें नांव होतें. शहरांत भरवस्तींत दुसरीं दोन नाटक-गृहें होतीं. तीं अमीर उमराव, बडे लोक यांनीं गजबजलेलीं असत. कव्हेंट व गार्डन ड्र्यूरिलेन या नांवांनीं तीं प्रसिद्ध आहेत. त्या वेळीं

नाटकगृहें सरकारी परवानगीशिवाय चालत नसत, व नटांनाही परवानगी-शिवाय काम केलें तर दंडाची किंवा कैदेची शिक्षा असे. नाटकगृहा-संबंधाच्या अशा सक्त कायद्यानें, धंदेवाल्यांची नुकसानी होत आहे असें दिसतांच त्यांनींही कायद्यांतून सुटण्याची युक्ति काढली. "गुडमॅन्स-फील्ड" नाटकगृहाला "जुनें नाटकगृह" असें नांव देऊन, त्यांत जीं नाटकें होत, त्यांना नाटकें न म्हणतां मजलस (concert) असें नांव दिलें; या मजलसीचे दोन भाग करून "मधल्या वेळांत एखादा प्रयोगाचा भाग फुकट करून दाखविण्यांत येईल" म्हणून जाहिरातीवर प्रसिद्ध करण्यांत येत असे.*

या "गुडमॅन्स फील्ड" नाटकगृहांतच काम करून आपलें नांव गाजवीन ही ग्यारिकच्या अंगीं हिम्मत होती. प्रतिकूल परिस्थितींतून पुढें येण्याची आपली बुद्धिमत्ता आहे असें त्याचें मन त्याला साक्ष देत असे. म्हणून अधिक उत्साहानेंच त्यानें या धंद्यांत मन घातलें व जणुं नशिबा-शीं झगडण्याच्या उद्देशानेंच शेक्सपीयरच्या 'रिचर्ड दी थर्ड' नाटकांतील रिचर्डची अवघड भूमिका घेऊन तो सन १७४१ च्या १९ व्या तारखेस रंगभूमीवर प्रगट झाला. पहिल्या प्रयोगानेंच चोहोंकडे शहरांत खळबळ उडाली त्याच्या कामाची पहिल्याच खेळाला इतकी वाहवा झाली कीं, एका वर्तमानपत्रानें तर दुसऱ्या दिवशीं असें म्हटलें कीं, "आजपर्यंत असा नट पाहण्यांत आला नाहीं." त्याची भूमिका पाहून हा मूर्तिमंत रिचर्ड पुन्हा दिसत आहे काय असा प्रेक्षकांस भास झाला. मनोविकार प्रगट करण्यांत त्यानें जी एकतानता दाखविली, तिच्या योगानें प्रेक्षकांचें लक्ष त्याचेकडे वेधलें व त्याची भूमिकेच्या ठिकाणीं विलक्षण तद्रूपता पाहून प्रेक्षक आश्चर्यचकित होऊन गेले. ग्यारिकच्या नाट्यकुशलतेचा

---

* आमच्या पौराणिक नाटकाच्या पिढींत—"नाटक संपल्यावर वेळ राहिल्यास एक हास्यकारक फार्स करून दाखविण्यांत येईल." म्हणून एक कलम जाहिरातींत असे. नाटक रात्रीं ११ वाजतां सुरू होऊन पहांटे ४ वाजेपर्यंत चालावयाचें व नंतर "फार्स" व्हावयाचा असा सुमारें सन १८८० सालापर्यंत प्रघात असे.

गवगवा जसा जसा सर्व शहरभर होऊं लागला, तसें सर्व शहर जागें झाल्यासारखें होऊन दुसरीं नाटकगृहें रिकामीं पडूं लागलीं. मोठमोठे सरदार त्याच्याकरितां नाटक पाहण्यास येऊं लागले. पोपसारखा वृद्ध व मान वांकलेला कविही आपली पर्णकुटिका सोडून ग्यारिकला पाहण्याकरितां आला व याची भूमिका पाहून म्हणाला, "या तरुण मुलाला आतां कोणी प्रतिस्पर्धी राहणार नाहीं. म्हणून कदाचित् हा बिघडण्याचा संभव आहे असें मला वाटतें."

ग्यारिकच्या एका टीकाकारानें त्याच्या "रिचर्ड"च्या भूमिके-संबंधानें फार मार्मिक दृष्टीनें वर्णन केलें आहे, तें मूळांतच वाचलें असतां, रसिक प्रेक्षक व टीकाकार नाटक कसें पाहतात, व टीका कशी करतात हें चांगलें समजेल.

"From the moment the new actor appeared, they saw a Richard and not an actor of that personage, of the audience he seemed unconscious so thoroughly did he identify himself with the character. He surrendered himself to all its requirements, was ready for every phase of passion, every change of humour, and was as wonderful in quiet sarcasm, as he was terrific in the hurricane of the battle scenes. Above all the audience was delightd with his nature. Garrick spoke not as an actor but as King Richard himself might have spoken."

[ ग्यारिक, रिचर्डच्या भूमिकेनें रंगभूमीवर आल्याबरोबरच प्रेक्षकांस, रिचर्डची भूमिका घेणारा हा कोणी नट नसून प्रत्यक्ष रिचर्ड आहे की काय असें वाटावयास लागलें. भूमिकेशीं इतका तो तद्रूप झाला होता कीं, आपल्यासमोर प्रेक्षक म्हणून कोणी आहेत ही गोष्ट त्यानें ध्यानांतच घेतली नाहीं. भूमिकेशीं तादात्म्य होण्याला जें काय पाहिजे होतें, तें त्यानें पूर्णपणें मनांत बिंबवून

घेतलें होतें. मनोविकाराची प्रत्येक छाया किंवा मनोविकाराचे प्रत्येक फेरफार व्यक्त करून दाखविण्याची त्याची तयारी होती. रणसंग्रामाच्या वादळांत त्याचा उग्रपणा जसा दिसून आला, तशी वर्मी न लागतां उपरोधिक भाषण करण्याची त्याची चतुराईही दिसून आली. सारांश, त्याच्या अभिनय-कौशल्यानें सर्व प्रेक्षक-समाज खूष झाला. ग्यारिकचें भाषण—नटाचें नसून प्रत्यक्ष राजा रिचर्डनें जसें केलें असतें तसें होतें.]

ग्यारिकनें ही भूमिका प्रथमच केली. तरीपण तिची प्रशंसा फार झाली. त्यामुळें त्या वेळच्या प्रसिद्ध नटांना, आपलें यश ग्यारिक हिरावून घेईल कीं काय अशी भीति पडली. ग्यारिकचें नाटक-गृह शहरच्या भरवस्तीपासून (Westminister) दूर अंतरावर होतें. तरी नाटक-गृहाबाहेरचा रस्ता लोकांच्या गाड्या-घोड्यांनीं भरला जात असे. कव्हेंट-गार्डन व ड्र्यूरीलेन हीं प्रमुख नाटकगृहें फ्लीटवुड व रिच यांच्या मालकीचीं होतीं. तीं सरकारी परवानगीनें चालत असत. त्यांनीं आपलीं नाटकगृहें रिकामीं पडूं लागलीं हें पाहून—ग्यारिकच्या नाटक-मंडळीच्या मालकानें परवानगीशिवाय नाटकगृह चालविलें आहे ही सबब काढून त्यावर नुकसानीचा दावा लावण्याचा धाक घातला. फ्लीटवुड व रिच यांना ग्यारिकला प्रथम झिडकारल्याबद्दल हें एक प्रायश्चित्त मिळालें.

## ग्यारिकचीं घरीं पत्रें

ग्यारिकची कीर्ति जसजशी पसरत चालली तसतशीं त्याच्या घरून त्याला पत्रें येऊं लागलीं. ग्यारिकनें आपण होऊन नाटकाचा धंदा मी पत्करला हें न कळवितां लिचफील्ड येथील आपल्या स्नेह्याच्या मार्फत हळहळू ही गोष्ट कळविण्यास सुरुवात केली. नाटकांत गेल्याबद्दल त्याच्या सर्व नातेवाइकांस वाईट वाटत होतें. भावास घरीं पत्रें लिहितांना त्यानें आपल्या मनाचा कल कोणीकडे आहे हें प्रथम कळविलें. एका पत्रांत असा मजकूर होता—

"My mind has always been inclined to the stage. All my illness and lowness of spirits was

owing to my want of resolution to tell you my thoughts when here."

[ नाटकांत जाण्याकडे माझ्या मनाचा नेहमीं कल असे. माझें सर्व दुखणें व मनाची खिन्नता याला कारण माझी इच्छा तुला कळविण्याचा मला धीर होईना हें होय.]

नाटकांत जाण्यापूर्वीं त्याच्या मनाची अस्वस्थता आणि त्यानें रंगभूमीवर प्रवेश केला त्याच्या दुसऱ्या दिवशींचा त्याच्या मनाचा उल्हास यांतील अंतर त्यानें दुसरें पत्र लिहिलें, त्यावरून ध्यानांत येण्यासारखें आहे. तें पत्र हें—

" Last night I played Richard The Third to the surprise of Every body, and as I shall make very near £. 300 per annum by it, and as it is really what I dote upon I am resolved to persue it."

[ काल रात्रीं आपण रिचर्डची भूमिका केली व सर्वांना आश्वर्यचकित करून सोडलें. आतां लौकरच ३०० पौंड वर्षाचा तनखा मला मिळूं लागेल आणि खरोखर जी गोष्ट आज कित्येक दिवस माझ्या मनांत घोळत होती ती शेवटास नेण्याचा निश्चय मीं केला आहे.]

नट म्हटला कीं तो दुर्गुणी असावयाचा, असा त्या वेळीं तिकडेही इकडच्याप्रमाणें सर्वसाधारण ग्रह होता. म्हणून नाटकाचा धंदा करण्याला आपल्या भावाचें अनुमोदन मिळणार नाहीं ही त्याला भीति होती. आपण या धंद्यांत शिरल्यानें आपल्या आप्तवर्गाला कमीपणा येईल व दुःख होईल हें तो जाणून होता; म्हणून तो भावाला यासंबंधानें पत्र लिहिणें झालें म्हणजे मोठ्या आर्जवानें लिहीत असे:

" Though I know you will be much displeased at me yet I hope when you find I may have the genious of an actor, without the vices, you will think less severe of me, and not be ashamed to own me for a brother."

[ माझ्यावर तुझा राग झाला असेल हें मी समजतों; परंतु मला

अशी आशा आहे कीं, माझ्या अंगीं दुर्गुण न लागतां नट होण्याची पात्रता आहे, असें जेव्हां तुला आढळून येईल, तेव्हां माझ्यावरचा तुझा राग कमी होऊन, मला भाऊ म्हणावयास तुला लाज वाटणार नाहीं.]

इकडे जसजशी त्याची प्रसिद्धि वाढत चालली तसतशी सर्व हकीगत आपल्या भावाचें मन वळविण्याकरितां तो त्यास लिहून कळवीत असे. एका पत्रांत पुढील मजकूर आहे—

"Mr. Pit, who is reckoned the greatest orator in the House of Commonce, said, I was the best actor the English Stage has produced; and he sent a gentleman to let me know, he and the other gentlemen would be glad to see me. The Prince has heard so great a character of me, that we are in daily expectation of his coming to see me.'

[पिट ज्याला हाऊस ऑफ् कॉमन्ससमधील मोठा वक्ता म्हणून गणलें जातें, त्यानें इंग्लिश रंगभूमीवर माझ्यासारखा नट आजपर्यंत झाला नाहीं असे उद्गार काढले आहेत. शिवाय त्यानें एका गृहस्थाला मुद्दाम माझ्याकडे निरोप देऊन पाठविलें आहे कीं, त्याची व कांहीं सभ्य गृहस्थांची मला भेटण्याची इच्छा आहे. युवराजांनीही माझ्या कामाची तारीफ इतकी ऐकली आहे कीं, ते माझें काम पाहण्याकरितां केव्हां येतात अशी आम्ही रोज मार्ग-प्रतिक्षा करून आहोंत.]

## ग्यारिकबरोबर नटाची स्पर्धा

ग्यारिक व त्याच्या वेळेच्या इतर नटांमध्यें हा फरक असे कीं, त्यानें घेतलेली भूमिका, हास्यरसजीवि असो किंवा करुणरसप्रधान असो, ती चित्रित करण्यांत तो निष्णात झाला होता. तसेंच निरनिराळ्या मनो-विकारांच्या भूमिका तो घेत होता; परंतु त्या निरनिराळ्या नटानें घेतल्या

आहेत असें भासविण्याचीही कला त्याला साध्य झाली होती. रिचर्डची भूमिका तो जितकी तिच्याशीं तादात्म्य होऊन करीत असे तितकीच लियरचीही भूमिका तिच्याशीं तादात्म्य पावून करीत असे. सारांश, या दोन भूमिका घेणारे दोन निराळे नट आहेत असें तो प्रेक्षकांस भासवीत असे.

मोठमोठ्या लोकांना त्यानें आपलेंसें करून टाकलें होतें. लोकांच्या स्तुतीनें नट शेफारून जातात असा नाट्यसृष्टींतला अनुभव आहे. म्हणूनच गेल्या प्रकरणांत पोप कवीला "हा स्तुतीनें बिघडून जाईल कीं काय" ही जी भीति वाटली म्हणून सांगितलें आहे, त्याला कारण नटाच्या मागें जो स्तुतिपाठकांचा घोळका असतो, तो होय. शहरांतील प्रतिष्ठित म्हणविणारे (The Best in town) अशा लोकांचे याला बिघडविण्याचे प्रयत्न चालले होते. सरदार लोकांच्या पंक्तीचा लाभ त्याला नेहमीं होत असे. त्याला ते म्हणत कीं, "इंग्लंडमधलों तूं शोकरसमूर्ति (Tragedian) आहेस असेंच नाहीं तर 'हास्यरसमूर्ति'ही (Comedian) आहेस. शेक्सपीअरचीं नाटकें प्रतिबिंबित करणारा तूंच जन्मास आला आहेस! (only born to act what Shakespeare has writ) ही स्तुति रोज रोज ऐकून मला बरें वाटतें, (These things daily accuring give me great pleasure) असें तो म्हणे परंतु विचारी व धोरणी असल्यामुळें, तो अशा लोकांच्या स्तुतीला तितकीच किंमत देत असे. त्याला खरा आनंद होत असे तो, सिबरसारख्या* वृद्ध, प्रसिद्ध व अनुभविक नटाच्या साध्या शब्दाच्या टीकेंत होत असे. सिबरचे नेहमींचे उद्गार जवळच्या मनुष्याजवळ असे असत: "खरोखर पोरगा हुशार आहे" (i" faith the lad is clever) परंतु कांहीं चरित्रकार म्हणतात कीं, हा सिबर, ग्यारिकची पोपनें स्तुति केल्यापासून त्याचा मत्सर करूं लागला होता.

ग्यारिकचा लौकिक वाढत चालल्यानें इतर नटांत त्याच्याविषयीं

* कालीसिबर हा ग्यारिकच्या पूर्वीच्या पिढींतला प्रख्यात नट होता. सन १७५७ मध्यें हा वारला. या वेळीं याचें वय ८६ वर्षांचें होतें. यानें कांहीं नाटकेंही लिहिलीं आहेत. आपल्या पिढींतल्या नटवर्गावर टीका लिहिल्या आहेत.

मत्सर उत्पन्न होऊं लागला. क्विन् नांवाचा एक नट होता. हाही लोकप्रसिद्ध होता. त्यानें उघडपणें ग्यारिकची थट्टा करण्यास सुरुवात केली. तो म्हणे कीं, "ग्यारिकसारखें नवें पोर आतां नाटकांत हुड्डाचार्य होऊं पाहात आहे; व लोकही त्याच्या भजनीं लागले आहेत; परंतु आम्हीच बरे आहोंत असं म्हणण्याची पाळी त्यांना लौकरच येईल." मुळांतला मजकूर असा आहे—

"This is the wonder of a day. Garrick is a new religion. The people follow him as another White. field, but they will soon return to church again."†

क्वीननें आपली कुचेष्टा चालविली आहे, हें ग्यारिकला माहीत होतें. परंतु त्यानें ती मनावर घेतली नाहीं. फक्त एक चुटका रचून त्यांत क्वीनला पुढील उत्तर दिलें—

Pope Quin, who damns all churches but his own
Complains that heresy infects the town.
That Whitefield Garrick has misled the age
And taints the sound religion of the stage.
He says that Schism has turned the nations brain
But eyes will open and to church again.
Though grand infalible forbear to roar
Thy bulls and errors are rever'd no more.
When doctrines meat with general approbation
It is not heresy but reformation.

† व्हाइटफील्ड हा ख्रिस्ती धर्मांतून एक निराळाच धर्मपंथ काढणारा होऊन गेला. हा ग्यारिकचा समकालीन होता. आपल्या तऱ्हेवाईक वर्तनामुळेंच हा लोकप्रिय झाला होता. "व्यासपीठावर, रात्रीची टोपी (night cap) घालून किंवा एखाद्या झाडावर बसून जरी तो उपदेश करी तरी लोकांची गर्दी त्याच्याभोंवता जमेल" असें जान्सन् याच्याबद्दल म्हणत असे.

[ क्वीन हा स्वतःला पोप ( धर्माध्यक्ष ) समजून आपल्याशिवाय इतर पंथ तुच्छ आहेत असें समजत आहे. शिवाय तो बडबडत सुटला आहे कीं, "ग्यारिकनें धर्मप्रवर्तक बनून लोकांना वांकड्या मार्गानें चालविलें आहे, तसेंच नाट्यकलेचें धर्मशास्त्र भ्रष्ट करून, व त्यांत भेदभाव उत्पन्न करून समाजाचा मेंदू त्यानें बिघडून टाकला आहे." क्वीनला अशीही घमेंड आहे कीं शेवटीं लोकांचे डोळे उघडून ते मूळपदावर येतील म्हणजे त्याच्याच संप्रदायाला चिकटतील; परंतु अहो प्रतिष्ठित, आतां ही वटवट पुरे करा. तुमच्या या वटवटीला आतां कोणी किंमत देत नाहीं. कारण बहुमतानें जेव्हां एखादी गोष्ट चांगली ठरते तेव्हां तिला कोणी पाखंड म्हणत नाहींत तर सुधारणाच म्हणतात.]

ग्यारिकचें हें उत्तर त्या वेळीं सर्वतोमुखी झालें असलें पाहिजे. कारण त्याच्या बहुतेक चरित्रकारांनीं तें मुद्दाम चरित्रांत दिलें आहे.

## आयर्लंडची मोहीम

रिचर्ड दि थर्डच्या भूमिकेचा चोहोंकडे बोलबाला झाल्यावर ग्यारिकनें दुसऱ्या नाटकांतील निरनिराळ्या मनोवृत्तींच्या भूमिका केल्या; व त्यांतही त्याला यश आल्यावरोबर आपल्या अंगीं अभिनय निपुणता आणण्याची शक्ति आहे अशी त्याची खात्री झाली सुमारें नऊ महिने लंडनच्या रंगभूमीवर त्यानें काम केलें. सन १७४१च्या आक्टोबरपासून १७४२च्या मे महिन्यापर्यंत १३३ वेळां तो रंगभूमीवर येऊन गेला व तेवढ्या अवधींत त्याची कीर्ति लौकर पसरत गेली आयर्लंडमधून त्याला बोलावणें आलें. हें बोलावणें निकडीनें येण्याचें असें कारण झालें कीं, डब्लीनमध्यें जीं नाटकगृहें होतीं, त्यांपैकीं एका नाटकगृहांत क्वीन व मिसेस सिबर या दोन नामांकित नट व नटीकडे शहरांतले प्रेक्षक तुटून पडत व दुसरें जें नाटकगृह होतें-त्यांत तसें लोकांचें लक्ष आकर्षण करण्यासारखे कोणी नट नसल्याकारणानें तें जवळ जवळ रिकामें पडत असे. म्हणून त्या नाटकगृहाच्या मालकांना ग्यारिकला घेऊन जाण्याची

आवश्यकता वाटली* व त्याप्रमाणें ग्यारिक व त्याचा मालक गिफर्ड हे डब्लीनला निघाले व आपल्याबरोबर वुफिंग्टन नांवाची एक तरुण व सुंदर नटी त्यानें नेली. इच्यासंबंधानें पुढें वर्णन यावयाचें आहे.

ग्यारिक व वुफिंग्टन यांचें डब्लिन येथें फार अगत्याचें स्वागत झालें. अमीर उमराव, हौशी लोक नाटक-गृहाचे वारकरी बनले होते. दिवस उन्हाळ्याचे होते. त्यामुळें शहरांत उकाड्याचा अतिरेक होऊन रोगाचाही प्रादुर्भाव झाला होता. अशा स्थितींत ग्यारिकला पाहण्याविषयीं लोकांची उत्सुकताही परमावधीला गेली होती. म्हणून या सांथीचें नांव (Garrick fever) ग्यारिकची सांथ असें पडलें होतें. नाट्यकाच्या इतिहासांत ही एक महत्त्वाची व आठवणीची गोष्ट म्हणून ग्यारिकच्या चरित्रकारांनीं दिली आहे.

लंडन शहराचा १६६५ मधला प्लेग व १६६६ मधला अग्निप्रलय या जशा ऐतिहासिक आठवणी आहेत, त्याप्रमाणें १८ व्या शतकांत नाट्यकलेच्या इतिहासांत डब्लिन शहरांतली, ग्यारिकचा फीव्हर ही एक आठवण आहे.

डब्लिन येथील लोकांचें दोन अडीच महिने रंजन करून ग्यारिकनें मान्यता मिळविली व तो लंडन येथें परत आला.

## लंडनला परत येणें

अशा रीतीनें मोठें यश संपादून ग्यारिक लंडनला परत आला. परत आल्यावर याचा लौकिक ऐकून, याला पूर्वी झिडकारणाऱ्या ड्र्यूरिलेन नाट्यगृहाच्या मालकानें विचार केला कीं, आतां ग्यारिकशीं

* नाटकाच्या इतिहासाकरितां वरील गोष्टीचें साम्य दाखविणारा आमच्या इकडचाही इतिहास आहे. धंद्याची बाजू पडती दिसूं लागली म्हणजे उसने नट आणून नुकसान भरून काढण्याची चाल आमच्या पूर्वीच्या व आतांच्या मंडळ्यांत होती व आहे. गोपाळराव दाते व शंकरराव लोखंडे जे जुने नट यांना बोलावून 'नारायणरावाचा फार्स' लावला किंवा रा० बोडस यांच्या नांवानें "मानापमान" नाटक लाविलें कीं, नाटक मंडळ्या आपला फायदा करून घेत असत.

स्पर्धा केल्यानें आपल्या पायावर धोंडा पाडून घेणें आहे. हा सामान्य योग्यतेचा नट नसून विलक्षण कर्तबगारीचा आहे अशी त्याची खात्री झाली व त्याच्याशीं फ्लीटवुडनें बोलणें सुरू केलें, आणि त्यांच्या एकमेकां-च्या अटी ठरून ग्यारिकला ठरीव मुदतीपुरतें † ५०० पौंड वेतन ठरवून आपल्या मंडळींत घेतलें. इतकें मोठें वेतन यापूर्वीं कोणत्याही नटास देण्यांत आलें नव्हतें. ग्यारिकच्या शिफारशीवरून त्याचा मालक गिफर्ड, त्याची बायको व आणखी जे कोणी चांगले नट होते तेही फ्लीटवुडनें ठेवून घेतले. या नवीन व्यवस्थेनें मंडळीचा संच चांगला जमला जाऊन लोकांसही तो पसंत पडला.

ग्यारिकनें या संधीचा फायदा घेतला याचें कारण एक आपलें नांव लोकांत गाजविण्याची त्याची जी महत्त्वाकांक्षा होती ती पूर्ण झाली व पुढेंमागें आपल्याकडे नाटकगृहाची मालकी व व्यवस्था येईल असा संभव त्याला दिसूं लागला.

ग्यारिकचे समकालीन नटही नामांकित होते. क्वीन, ब्यारी, फूट, मॅक्लीन, यांचीं नांवें त्या वेळेच्या नाटयकलेच्या इतिहासांत प्रसिद्ध आहेत. तसेंच बुफिंगटन, बेलामी, प्रिचर्ड या स्त्रियांचीही स्वतंत्र चरित्रें प्रसिद्ध आहेत. ग्यारिकच्या चरित्राच्या अनुरोधानें हीं नांवें त्याच्या चरित्रांत वारंवार आलीं आहेत. नाटकगृहांत ड्र्यूरिलेन व कव्हेंट-गार्डन हीं प्रमुख असून, प्रसिद्ध प्रसिद्ध नट यांत काम करून गेल्यामुळें या नाटकगृहांचेही स्वतंत्र इतिहास आहेत. केव्हां केव्हां या नटांचा एकाच नाटकांत व एकाच नाटकगृहांत काम करण्याचा योग आला म्हणजे तो पाहण्याची उत्सुकता लोकांत अपूर्व होती. केव्हां केव्हां दोन्ही नाटकगृहांत एकच प्रयोग एकमेक नाटक-मंडळ्याच्या चुरशीनें लागत असत. फ्लीटवुडच्या व्यवस्थेखालीं ग्यारिक, क्वीन, बुफिंगटन इत्यादि निवडक मंडळी असे, तरी पुढें पुढें फ्लीटवुडला आपला धंदा

† नटाला ठरीव मुदतीपर्यंत गुंतवून ठेवावयाच्या मुदतीला ( Season ) म्हणतात. घरें किंवा बंगले भाड्यानें घ्यावयाचे त्यालाही इकडे "सीझन-पुरते भाड्यानें घेतले." असें म्हणण्याची वहिवाट आहे.

फायदेशीर पडेना म्हणून त्यानें मुख्य नटांचा तनखा कमी करण्याचा विचार केला व हा विचार त्यानें मॅक्लीनला कळविला. मॅक्लीनचें या वेळीं ग्यारिकवर चांगलें वजन असे. कारण हे दोघे व वुडिंग्टन एकत्र राहात असत. तेव्हां मॅक्लीनच्या मध्यस्तीनें ग्यारिक आपल्या म्हणण्याला रुकार देईल अशी फ्लीटवुडची कल्पना होती. परंतु मॅक्लीनच्या मध्यस्तीचा कांहीं उपयोग झाला नाहीं. कारण ग्यारिक व इतर नटांचा बराच तनखा थकला होता. फ्लीटवुडला जुगारीचा व शर्यतीचा नाद असल्यामुळें त्यांत त्याचे पैसे खर्च होत असत. त्यामुळें मंडळीला आपला पगार मिळण्याची आशा दिसेना. म्हणून ग्यारिक व इतर मंडळींनीं निराळी मंडळी उभारण्याचा विचार केला.

मंडळीला वाटलें कीं, ग्यारिकच्या वजनानें आपल्याला दुसऱ्या नाटकगृहांत नाटकें करण्याची परवानगी मिळेल. परंतु ज्या अधिकाऱ्याकडे परवानगी देण्याचें काम होतें त्यानें ती साफ नाकारली त्यामुळें मंडळी तोंडघशीं पडली. इकडे फ्लीटवूडही हट्टास पेटला. तो आपलें म्हणणें मागें घेईना. शेवटीं प्रसंगावर नजर देऊन मंडळीनें त्याचें म्हणणें कबूल केलें. दोन्ही पक्षांचा समेट झाला. परंतु यांत मॅक्लीनला अधांतरीं टांगल्यासारखें झालें. याचें कारण हा एका प्रसंगानें फ्लीटवूडच्या उपकारांत होता. तेव्हां तो आपल्या बाजूचा आहे असें फ्लीटवूडला वाटत होतें. परंतु तोही फूट पाडणाऱ्या मंडळीच्या कटांत सामील झाल्यामुळें त्याला पुन्हा आपल्या मंडळींत घेण्याचें त्यानें नाकारलें. ग्यारिकनें मॅक्लीनबद्दल फार रदबदली केली. आपला जो पूर्वीं तनखा ठरलेला होता, त्यांतून शभर पौंड स्वतःला कमी घेऊन ते मॅक्लीनला देण्याला तो तयार झाला. एवढा मनाचा मोठेपणा ग्यारिकनें दाखविला. परंतु फ्लीटवूडचा मॅक्लीनवरचा रोष कमी झाला नाहीं. शेवटीं ग्यारिकनें फ्लीटवूडच्या दुसऱ्या भागीदाराकडून मॅक्लीनच्या बायकोला आठवड्याचे तीन पौंड तनख्यावर ठेवविलें. व मॅक्लीनला, त्याची सोय जमेपर्यंत स्वतःच्या पगारांतून आठवड्याचे सहा पौंड देण्याचें कबूल केलें. परंतु मॅक्लीन मोठा हट्टी व खुनशी होता. त्याला ग्यारिकची ही योजना पसंत पडेना. ग्यारिक फ्लीटवूडला पुन्हा जाऊन निठाळ

याबद्दल त्याची त्यानें वर्तमानपत्रांतून नालस्ती चालविली. नाटकगृहांत गुंड लोक जमवून दंगा करण्याचे प्रकार सुरू केले. शेवटीं एके रात्रीं ग्यारिकच्या पक्षाचे सुमारें तीस पहिलवान फ्लीटवूडनें नाटकगृहाच्या मागील दारानें आधींच आणून पीटमध्यें बसविले. नाटक चाललें असतांना मॅक्लीनच्या लोकांनीं दंगा करण्यास सुरुवात करण्याबरोबर एकानें पुढें होऊन सांगितलें कीं, "आजच्या प्रयोगाला कांहीं लोक दंगा करणार आहेत असें मी ऐकतों. तरी अशा लोकांस मी सांगतों कीं, मी नाटक पाहण्याकरितां आलों आहें व त्याकरितां पैसे खर्च केले आहेत, ज्यांना नाटक पहावयाचें नसेल त्यांनीं खुशाल बाहेर जावें; परंतु माझ्या करमणुकींत अडथळा आणूं नये.' या भाषणानें मोठी ओरडाओरड मात्र नाटकगृहांत माजली. तेव्हां या गृहस्थाच्या लोकांनीं शेरास सव्वाशेर होऊन मॅक्लीनच्या लोकांस धक्के मारून बाहेर घालविलें. पुढें नाटकाला सुरळीतपणें सुरुवात झाली [१७४३-४४].

रिचर्ड दि थर्डच्या भूमिकेंत ग्यारिकनें कीर्ति मिळविल्यावर दुसऱ्या कांहीं नाटकांतून भूमिका केल्या, परंतु तीं नाटकें व त्यांचे ग्रंथकार मराठी वाचकांना व आपेला अगदींच अपरिचित असल्यामुळें त्यासंबंधानें ग्यारिकच्या भूमिकांचें वर्णन देण्याची आवश्यकता नाहीं. त्यानें एवढ्या अवकाशांत (१७४४-४५) शेक्स्पीयरच्याच नाटकांतील आणखी तीन भूमिका—"लियर," "हॅम्लेट" व "मॅक्बेथ" या अभ्यासपूर्वक तयार केल्या. पैकीं लियरच्या भूमिकेला एक प्रत्यक्ष पाहिलेली अशी हृदयद्रावक हकीगत उपयोगी पडली. त्याच्या ओळखीचा एक वृद्ध गृहस्थ होता व त्याला दोन वर्षांची एक मुलगी होती, तिच्यावर त्याचा जीव कीं प्राण असे. एके दिवशीं तो मुलीला घेऊन खिडकीशीं खेळत असतां, मुलीनें एकदम खिडकीबाहेर अंग टाकल्यानें ती बापाच्या हातून निसटून खालीं फरशीवर पडली व तत्काळ तिचा प्राण निघून गेला आणि त्याबरोबर बापाची स्मृति नाहींशी होऊन तो भ्रमिष्ट झाला जवळ असलेल्या माणसांनीं, त्यानें पुन्हा शुद्धीवर यावें म्हणून मुलीचें प्रेत त्याच्याजवळ नेलें; परंतु त्याची शुद्धि गेली ती गेली! पुढें तो रस्तोरस्तीं शोक करीत हिंडूं लागला. कधीं कधीं त्यानें खिडकीशीं यावें व

आपल्या हातांतून मुलगी निसटून पडली आहे असा त्याला भास व्हावा व पुन्हा यानें तिच्याकरितां आक्रोश करावा अशी त्याची स्थिति झाली होती. ग्यारिक वरचेवर त्याच्या समाचाराला जात असे. या प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टीवरून "किंग लियर" नाटकांतील, लियरची मुलगी जी "कार्डेलिया" इच्या प्रेतावर पडतांना जो दुःखातिरेकाचा प्रसंग आहे, त्याची कल्पना ग्यारिकनें घेतली होती. लियरच्या भूमिकेबद्दल ग्यारिकच्या चरित्रकारांनीं काय लिहिलें आहे याचें वर्णन पुढें येईल.

यानंतर त्यानें "म्याकबेथ"ची भूमिका घेतली. आजपर्यंत "म्याकबेथ" नाटकांत पुष्कळ फेरफार होऊन तीं करण्यांत येत असे. प्रत्यक्ष नटांनासुद्धां यांत काय फेरफार केले आहेत हें माहीत नव्हतें. ग्यारिक, शेक्स्पीयरच्या मूळच्या खऱ्या प्रतीप्रमाणें म्याकबेथ रंगभूमीवर आणणार आहे हें दुसऱ्या एका नटाला समजल्यावर तो म्हणाला, "याचा अर्थ काय? शेक्स्पीयरच्या प्रतीप्रमाणें मी प्रयोग करीत नाहीं काय?" येथून वादाला सुरुवात झाली. ग्यारिकवर चोहोंकडून टीका सुरू झाली. तेव्हां त्यानें आपलें शस्त्र सरसावून नांव प्रसिद्ध न करतां टीकाकारांवर भडिमार केला, व आपल्या निश्चयाप्रमाणें तो म्याकबेथच्या भूमिकेंत रंगभूमीवर आला.

ही शेक्सूपीयरच्या नाटकांतली एक महत्त्वाची व कठिण अशी भूमिका आहे; ग्यारिकनें ती उत्तम करून दाखविली; परंतु ती सर्वथैव उत्कृष्ट झाली नाहीं असें एका चरित्रकाराचें मत आहे. यानें या भूमिकेंत वीरश्रीचा मनोभाव दाखविण्यापेक्षां स्वभावपरिपोष अधिक व्यक्त करून दाखविला व यांतच त्यानें आपली स्वभावनिरीक्षणाची विवेचक बुद्धि व सदभिरुचि दाखविली म्याकबेथ ही भूमिका अशा कांहीं संक्षोभक व उत्कट मनोभावनेंत रेखाटली गेली आहे कीं, तिच्यांत अस्वाभाविक एखादी मनोवृत्ति दिसली असती कीं, तो एक दोषच झाला असता. म्याकबेथच्या भूमिकेंत अनेक नट प्रसिद्ध होऊन गेले आहेत. Dagger scene-खंजिराचा प्रवेश-हा त्या नाटकांतील विशेष महत्त्वाचा समजला जातो. यांतच ग्यारिकची इतरांपेक्षां खरी करामत दिसून येत असे.

## पुन्हा डब्लिन येथें

इ० सन १७४५–४६–इंग्लंडमध्यें या सुमारास स्कॉटिश रेबिलियन-ची धामधूम सुरू झाली होती. दुसऱ्या जेम्सचा मुलगा चार्लस एडवर्ड हा इंग्लंडच्या गादीवर आपला हक्क सांगण्याकरितां सैन्य घेऊन आला होता. तेव्हां राजाला व सरकारला मदत करण्याकरितां ड्र्यूरिलेन नाटकगृहाचा नवा मालक लेसी यानें दोनशें माणसें सैन्यांत भरती करण्याकरितां परवानगी मागितली. ड्र्यूरीलेन नाटकगृहाच्या सर्व नट-मंडळानेंही या कृत्याला आपली संमति दिली. या स्कॉटिश रेबिलियन-मुळें जी एक अस्वस्थता लोकांत उत्पन्न झाली होती, तिच्यामुळें लोकांचें लक्ष करमणुकीच्या गोष्टींकडे फारसें नव्हतें; तें लागावें व त्यांची सहानु-भूति मिळावी म्हणून नाटककारांनीं राजकीय परिस्थितीला अनसरून ऐतिहासिक नाटकें लिहून तीं रंगभूमीवर आणण्याचा संकल्प केला. परंतु हीं नाटकें रंगभूमीवर येण्यापूर्वींच बंड मोडलें जाऊन पुन्हा शांतता प्रस्थापित झाली. तथापि हें वर्ष नाटकाच्या धंद्याला थंडपणाचें गेलें. ड्र्यूरिलेन नाटकगृहाची मालकी फ्लीटवुडकडून लेसी नांवाच्या एका गृहस्थाकडे आली. ग्यारिकला पुन्हा आयर्लंडमध्यें जावें लागलें. याचें कारण वरील राजकीय अस्वस्थता व नाटकगृहाची मालकी बदलणें हें तर होतेंच; परंतु या वेळीं आयर्लंडचा लॉर्ड लेफ्टनंट लॉर्ड चेस्टरफील्ड हा होता. हा नाटकाचा शोकी असून रंगेल होता, त्याप्रमाणें त्यानें आपला अंमलही ख्यालीखुशालींत चालविला होता. तेव्हां धंद्याला ही संधि बरी आहे असा विचार करून शेरिडननेंही ग्यारिकला आग्रह करून नेलें. डब्लिनचा हाही मुक्काम धामधुमीचा गेला. शेरिडन, ब्यारी व ग्यारिक हे एकापेक्षां एक सरस नट एकाच नाटकांत काम करण्याला असल्या-मुळें लोकांत नाटकाची चळवळ फारच उडाली. शेरिडन हाही एक चांगल्यापैकीं नट असे. प्रसिद्ध नाटककार व वक्ता जो शेरिडन त्याचा हा बाप होता. विशेषतः डब्लिन येथेंच हा आपला नाटकाचा धंदा चालवून असे. यानें आपल्या ताब्यांत डब्लिनचीं दोन नाटकगृहें ठेविलीं होतीं. ग्यारिक व याचें असें ठरलें होतें कीं, एका हिंवाळ्यांत लंडन येथें नाटकें

करावीं व एका हिंवाळ्यांत डब्लिन येथें करावीं. असे दिवस दोघांनीं वांटून घेतले होते. दुसऱ्या नाटकगृहांत क्विन् व इतर प्रसिद्ध नट-नटी असत. त्यामुळें लंडनच्या खालोखाल डब्लिन शहरही नाट्यकलेचें शोकी झालें होतें. येथील मुक्काम संपल्यावर शेरिडन व ग्यारिक लंडन येथें परत आले.

## मार्गारेट वुफिंग्टन

ग्यारिकच्या पूर्वचरित्राशीं या लोकोत्तर नटीचा संबंध चिकटला गेला आहे व नाट्यकलेच्या चरित्रांत तिचेंही चरित्र इतिहासकारांनीं दिलं आहे "स्त्रियांनीं नाटकांत कामें करावींत कीं नाहींत" हा अलीकडे महाराष्ट्र नाट्यसमाजांत वादविषय होऊन बसला आहे. अनुकरणप्रिय लोक आहेत त्यांना पाश्चिमात्य नाट्यसमाजांत स्त्रियांचीं कामें नाटकांत स्त्रियाच करतात त्याप्रमाणें आपल्याकडेही स्त्रियांनींच हीं कामें करावींत असें वाटतें. असे जे लोक आहेत ते पाश्चिमात्य नाट्यसमाजांतील कांहीं चरित्रें वाचतील तर समाजदृष्ट्या ही चाल आपल्या समाजांत चालू करावी किंवा नाहीं याबद्दल त्यांना विचार करावा लागेल. पाश्चिमात्य नाट्यसमाजांत नाटकाच्या धंद्यावर आपला उपजीविका करणारें एकेक कुटुंब असतें. मग तें कुटुंब एका नाटकमंडळींत काम करणारें असो, किंवा नवरा एका नाटकमंडळींत तर त्याची बायको दुसऱ्या नाटकमंडळींत काम करणारी असो. शिवाय, रंगभूमीवर नवऱ्याला बायको मिळावयाची ती त्याची स्वतःचीच मिळेल असा कांहीं नियम नसतो. याचें कारण नवराबायको होण्याला अनुरूप तें जोडपें कदाचित् नसतें. कदाचित् आपली बायको रात्रीपुरती रंगभूमीवर दुसऱ्याची कृत्रिम बायको होऊं शकते. या पद्धतीचा तिकडच्या समाजानें निषेध मानला नाहीं; तथापि अशा पद्धतींत राहूनही नाटकाच्या धंद्यावर राहणारीं कुटुंबें अब्रूनें राहूं शकतात. कांहीं स्त्रिया अशाही असतात कीं, रंगभूमीवर त्यांची योग्यता मोठी असली तरी समाजदृष्ट्या त्यांचें वर्तन दूषणीय असतें अशा प्रकारच्या मार्गारेट अथवा पेग वुफिंग्टन नांवाच्या एका नटीशीं ग्यारिकची नाटकाच्या धंद्यांत गांठ पडली. ही रिच नांवाच्या एका

नट व नाटकमंडळीचा मालक याच्या मंडळींत काम करीत होती. नाटकांत शिरण्यापूर्वीं, ग्यारिकचें नाटकमंडळीच्या पडद्यांत जाणेंयेणें असे व यामुळें त्याचें दळणवळण वुफिंग्टनशीं वाढलें. तिची हुषारी, उपजत कुशाग्रबुद्धि व तिच्या भाषणांतील मार्मिकपणा इत्यादि तिचे गुण पाहून ती याच्या मनांत भरली. याशिवाय तिचें सौंदर्य व तारुण्य हीं त्याला तिच्या मोहजालांत पाडण्याला सज्ज होतीं. त्यानें तिच्यावर कविता रचाव्या. त्या वाद्यावर म्हटल्या जात इतक्या त्या लोकप्रिय झाल्या होत्या. त्यानें रचलेल्या पद्यांपैकीं पुढील एक आहे—

"Once more I'll tune the vocal shell
To hills and dales my passion tell
A flame which time can never I quell,
Which burn for you my peggy!"

एकमेकांच्या प्रेमपाशांत सांपडल्यावर, माझी प्रीति तुझ्यावर किती अनावर झाली आहे हें दाखविणारें वरील पद्य आहे. हीं दोघेंही पुढें एकत्र राहूं लागली. नाटकाच्या धंद्यांत ती ग्यारिक इतकीच प्रसिद्धीस आली होती. नाट्यधर्मांत ती निपुण होती. स्त्रियांच्या भूमिका ती चांगल्या करीच; परंतु पुरुषांच्याही ती तितक्याच चांगल्या करीत असे. तिच्या अभिनयावर पुढील एक गीत प्रसिद्ध आहे, त्यांत पुढील वर्णन आहे.

Blest in each art! by nature form'd to please
With beauty, sense, with elegance and ease!
Whose piercing genius studied all mankind,
All Shakespeare opening to thy vig'rous mind.

लोकरंजन खऱ्या मनानें करणें हा तिचा प्रधान स्वभावधर्म होता. तसेंच ती धंदा म्हणूनही इमानानें करी. कधीं आजारीपणाचें सोंग करून तिनें नाटकाची खोटी केली नाहीं किंवा लोकांची निराशा केली नाहीं. अगदीं सामान्य दर्जाचा नट असला तरी त्याच्या मदतीकरतां प्रयोग व्हावयाचा असला तरी ती त्याच्याकरितां काम करीत असे.*

* एखाद्या नटाच्या मदतीकरतां स्वतंत्र खेळ करून त्याचें उत्पन्न त्याला द्यावयाचें याला Benefit night ( बेनिफिट नाईट ) म्हणतात.



मार्गारेट बुफिंग्टन. पृष्ठ २४–२५

बालोद्यान प्रेस, पुणें.

तिच्या एकच दुर्गुणाकडे दुर्लक्ष केलें तर ती इतर दृष्टींनीं सर्वगुणसंपन्न होती असें ग्रंथकाराचें मत आहे. ती रसिक व मार्मिक असे आणि अशाच लोकांशीं संभाषण करण्यांत तिला भूषण वाटत असे. हीं दोघें एकमेकां-च्या प्रेमपाशांत पडलीं तेव्हां ग्यारिक चोविशीच्या भरांत व वुफिंग्टनचें वयही जवळ जवळ तितकेंच होतें. अशा ऐन तारुण्याच्या रंगांत तीं एकत्र राहूं लागलीं. इला या वेळीं आठवड्याचा तनखा ३ पौंड १० शिलिंग, ५० पौंड कपड्याबद्दल व १८० पौंड तिच्याकरितां स्वतंत्र प्रयोगाचें उत्पन्न याप्रमाणें तिची प्राप्ति होती, व ग्यारिकची प्राप्ति ठरलेल्या कराराप्रमाणें १००० पौंड होती. प्रत्येकानें संसाराचा खर्च आळीपाळीनें करावयाचा असें ठरलें होतें. वुफिंग्टन सढळ हाताची असे, त्यामुळें तिच्याकडे पाळी आली म्हणजे ती उधळेपणानें खर्च करी. ग्यारिक हात राखून खर्च करीत असे. बाळपणच्या घरच्या संसाराची काटकसर करून राहण्याची संवय त्यानें टाकली नव्हती. त्यामुळें ३ दूरदृष्टीनें वाटेल तसा उधळेपणा करण्याचे परिणाम नाटकाच्या धंद्यांतल्या लोकांप्रमाणें त्याला भोगावे लागले नाहींत; परंतु दोघांचा समागम दोन वर्षांपेक्षां जास्त दिवस टिकला नाहीं. ग्यारिकची इच्छा अंतःकरणपूर्वक तिच्याशीं वैवाहिकविधीनें संसार करावा अशी होती; परंतु रंगभूमीवर जरी ती एखाद्या खऱ्या पतिव्रतेची भूमिका बरोबर करून दाखविण्याला योग्य होती. तरी जगाच्या रंगभूमी-वर सहधर्मचारिणी म्हणून राहण्याला ती नालायक होती. "एकावरी मन ठेवुनी नेत्र खुण करिती दुसऱ्याला" अशी तिची वृत्ति होती. अशा चंचल वृत्तीच्या स्त्रीबरोबर संसार करण्याची ग्यारिकसारख्या समजदार व व्यवहारज्ञ मनुष्याला इच्छा व्हावी, हें आश्चर्य आहे. कदाचित् तिची वृत्ति पालटेल व तिच्याबरोबर आपण खऱ्या प्रेमानें वागलों तर तीही आपल्याशीं तशीच वागेल अशी त्याची कल्पना असेल असें त्याचें चरित्रकार म्हणतात; परंतु आपला हा भ्रम आहे असें ग्यारिकच्या लौकरच ध्यानांत आलें. त्यांच्या दोघांच्या प्रेमसंबंधाची चर्चा लोकांतून व वर्तमानपत्रांतून होऊं लागली. आपला प्रेमसंबंध लोकांच्या करमणुकीचा विषय होऊन बसला आहे, असें जेव्हां ग्यारिकनें पाहिलें, तेव्हां तिच्याशीं त्यानें आपला संबंध तोडण्याचा निश्चय करून, एकमेकांनीं ज्या देणग्या—

प्रेमाची खूण म्हणून एकमेकांस दिल्या होत्या, त्या त्यांनीं परत केल्या. ही गोष्ट घडून आल्याबद्दल त्याच्या मित्रवर्गास आनंद झाला. याप्रमाणें ग्यारिकच्या संसारमार्गांत जी एक मोठी धोंड येणार होती ती नाहींशी झाली (१७४५).

वफिंग्टननें ग्यारिकचा संबंध तुटल्यावर पंधरा वर्षें नाटकाचा धंदा केला, संपत्ति पुष्कळ मिळविली व तिचा विनियोग परोपकाराच्या कृत्यांकडे केला. ही मोठी धोरणी व विचारी होती असें तिच्या एकंदर चरित्रावरून दिसुन येतें. तिनें ऐन उमेदींत असतांना नाटकाचा धंदा सोडला; यांत तिच्या मनाचा निग्रहीपणा व्यक्त होतो. एके दिवशीं एका धर्मोपदेशकाचा उपदेश चालला असतां, पापकर्मावर प्रायश्चित्त काय घ्यावें लागतें, हें ऐकून तिला आपल्या पूर्वचरित्राची उपरती झाली व तिनें एकदम नाटकाचा धंदा सोडून चांगल्या मार्गानें राहण्याचा निश्चय केला.

मनुष्याच्या आयुष्यक्रमांत केव्हांना केव्हां प्रमाद घडलेले असतात, निदान त्याच्या पूर्ववयांत तरी लहानसहान घडलेला असावयाचाच. नटांच्या हातून घडत असलेल्या प्रमादासंबंधानें तर बोलावयास नकोच. त्यांच्या सभोंवार मोहजालाचें वेष्टन पसरलेलें असतें. त्यांतून आपली सुटका करून घेणारा एखादाच बहाद्दर. सौंदर्य व दुसऱ्यावर मोहिनी टाकण्याचा अंगीं गुण, यांमुळें ग्यारिकही तारुण्याच्या मोहजालांत एकवार गुरफटला गेला होता हें एक त्याच्या चरित्रांतील पूर्ववयांतलें महत्त्वाचें सदर आहे.

## संयुक्त प्रयोग

आयर्लंडमधून परत आल्यावर ग्यारिक सहा प्रयोगांकरितां कव्हेंटगार्डन नाटकगृहांत काम करूं लागला. रिच हा या नाटकगृहाचा मालक होता. यानें प्रत्येक रात्रीं ग्यारिकला ५० पौंड ठरविले होते. या सहा प्रयोगांपैकीं, किंगलियर, रिचर्ड दि थर्ड, हॅम्लेट, अथेल्लो व म्याकबेथ हीं शेक्स्पियरचीं निवडक नाटकें–ज्यांत ग्यारिकची विशेष करामत दिसावयाची अशीं होतीं. व सहावें दुसऱ्या नाटककाराचें होतें. या सहा प्रयोगांत रिचला पुष्कळ फायदा झाल्याचें दिसतांच

त्याने ग्यारिकला पुन्हा सहा महिन्यांकरितां ठेविलें. हाही मोसम फायदेशीर झाला. या वेळेला ग्यारिकच्या बरोबरचा नटवर्ग व स्त्रिया हे प्रख्यात असलेले होते. याच्यापूर्वीच्या पिढींतला प्रसिद्ध नट क्वीन व ग्यारिक यांचा या वेळेस एका मंडळींत असण्याचा योग आला. परंतु तो एकमेकांचे प्रतिस्पर्धी म्हणून नसून मित्रत्वाच्या नात्यानें, चढाओढीनें आपली करामत प्रेक्षकांना दाखवून त्यांच्याकडून वाहवा मिळविण्याच्या ईर्षेनें होता. या दोघांनीं केव्हां केव्हां एका नाटकांत निरनिराळ्या भूमिका घ्याव्यात, तर कधीं कधीं एकानें एका प्रयोगांत जी भूमिका घेतली असेल तीच दुसऱ्यानें त्याच प्रयोगांत करून दाखवावी. इतिहासकारांनीं या दोघां नटांचें जें वर्णन केलें आहे, त्याची गोडी मुळांतच तें वर्णन वाचून कळणार आहे तें वर्णन पुढील प्रसंगाचें आहे:

"The last two ( ग्यारिक आणि क्विन ) met together for the first time in the same piece, on the 14th of November 1746 in the "Fair Penitent." Horatio (Quin) Lothario (Garrick) The audience who now first saw them face to face, absolutely disconcerted them by a hurricane of greating. When it had passed, every word was breathlessly listened to, every action marked. Some were won by the grand emphasis and the moral dignity of Quin; others by the grace, spirit and happy wickedness of Garrick."


"फेअर पेनिटंट" नांवाच्या नाटकाचा प्रयोग होता व त्यांतील भूमिका "होऱ्याशियो" व "लोथ्यारियो" क्विन व ग्यारिककडे होत्या. या भूमिका समोरासमोर आल्याबरोबर प्रेक्षकांनी त्यांचें स्वागत करण्याकरितां जो टाळ्यांचा वर्षाव केला त्यानें दोघेही गोंधळून गेले. आपली खरी कर्तबगारी दाखविण्याला या दोघांनाही नाटकांत जागा होती. त्यांत विशेषतः क्विनचें कौशल्य विशेष दिसण्यासारखें होतें. आज आपण आपली शिकस्त करून दाखविणार असें दोघेही आपआपल्या ठिकाणीं

समजून होते. परंतु प्रेक्षकांच्या टाळ्यांचा गहजब पाहून त्यांची प्रथम कांहीं वेळ धांदल उडाली असें दोघेही सांगूं लागले. क्विन प्रत्येक शब्दावर मुद्दाम जोर देऊन देऊन बोलूं लागला. त्याच्या भाषणांत जो एक गंभीरपणा असावयास पाहिजे होता तो नाहींसा झाला. ज्या वेळीं "लोथ्यारियो"नें (ग्यारिकनें) "होऱ्याशियो"ला (क्विनला) "चल द्वंद्वाला उभा रहा"‡ म्हणून आवाहन केलें, त्या वेळीं तें क्विननें एकदम करडेपणानें स्वीकारावयास पाहिजे होतें, परंतु तसें न करतां कांहीं वेळ थांबून त्यानें तोंडातल्या तोंडांत रेंगाळत गोंधळून उत्तर दिलें कीं, "करें-मी-तेथें भेटेन" (I will-meet Thee-There.) उत्तर देतांना ही त्याची धरसोड पाहून ग्यालरींतील एका प्रेक्षकानें विचारलें सुद्धां कीं, "अहो, तुम्ही त्या गृहस्थाला भेटणार का नाहीं हें सांगत कां नाहीं?" (Why don't you tell the gentleman whether you will meet him or not?" हें ग्यारिकच्या एका चरित्र-कारानें वरील नाटकांतील ह्या प्रसंगाचें वर्णन दिलें आहे व वर इंग्रजी जो उतारा दिला आहे तो दुसऱ्या चरित्रकाराचा आहे. ग्यारिक व क्विन समोरासमोर येऊन प्रेक्षकांकडून त्यांचें वर सांगितल्याप्रमाणें स्वागत झाल्यावर त्यांचें भाषण ऐकण्याकरितां प्रेक्षकांनीं आपला श्वासो-च्छ्वास आवरून धरला. त्यांच्या प्रत्येक हालचालीवर लक्षपूर्वक दृष्टि ठेवली. कांहीं प्रेक्षकांचें लक्ष क्विननें आपल्या गंभीर वाणीनें व भारदस्त-पणानें वेधून घेतलें तर कांहीं प्रेक्षक ग्यारिकचा मोहकपणा, त्याचें अवसान व चेहऱ्यावर प्रसंगाप्रमाणें उमटणारे स्पष्ट विकार पाहून तल्लीन होऊन गेले. तथापि क्विनचें या प्रयोगांत ग्यारिकपुढें तेज पडलें नाहीं. ग्यारिक यावेळीं तरुणपणाच्या उमेदींत होता. (१७४६त) त्याच्या अंगांत चपळाई खेळत होती. त्याची प्रत्येक मुद्रा आणि स्नायु हीं सतेज

‡ द्वंद्व-Dual-आपल्याकडील पैलवानांच्या कुस्तीसारखा "द्वंद्व" हा प्रकार आहे. दोघांमध्यें कांहीं कारणानें वितुष्ट पडलें असतां त्याचें समाधान करून घेण्याकरितां एक दुसऱ्याला द्वंद्वयुद्धाला आवाहन करतो. दोघे मग एका मोक या जागेंत जातात. हें शस्त्रयुद्ध असतें. बरोबर एक डॉक्टर व एक पंच म्हणून तिऱ्हाईत गृहस्थ असतो.



ग्यारिकचा नटवर्ग पृष्ठ २८-२९



ग्यारिकच्या मालकीचें ड्यूरिलेन नाटकगृह. पृष्ठ २८-२९

चालोंयान प्रेस, पुणें.

असून त्याच्या ताब्यांत होती. हा रंगभूमीवर केव्हां येतो म्हणून प्रेक्षक त्याची वाट पाहत होते. एकसमयावच्छेदें करून दोघांचें अभिनयकौशल्य पाहण्याचा योग प्रेक्षकांना याच प्रयोगांत आला होता. ग्यारिकनें रंगभूमीवर आल्याबरोबर प्रेक्षकांना एकदम चकित करून सोडलें. एका प्रवेशांतच, जणुं काय नाट्यसृष्टींत, गेल्या शंभर वर्षांपासून, ज्या असंबद्ध व भोळसट समजुती, रानटी हावभाव इत्यादि प्रकार चालत आलेले ते समूळ उखडून टाकण्याकरितांच माझा अवतार आहे असें त्यानें प्रेक्षकांस जाणविलें.*

## नाटकगृहाची मालकी

लंडन शहराच्या नाटकगृहांत ग्यारिकचा प्रथम प्रवेश झाला तो "ड्रूरिलेन" नाटकगृहांत इ० सन १७४२त झाला. हें नाटकगृह

* या प्रयोगाबद्दल एकानें वर्णन केलें आहे तें हें—When after a long and eager expectation I first beheld little Garrick, then young and light and active in every muscle, and feature come bounding on the stage—Heavens, what a transition! It seemed as if a whole century had been slept over in the transtition of a single scene. Old things were done away, and a new order at once brought forward, bright and luminous and dearly destined to dispel the barbarisms of a tasteless age too long superstitiously devoted to the illusions of imposing declamation."

—*Covent Garden Theatre.*

आमच्या नाट्यकलेच्या इतिहासांत अशा प्रकारची एका रात्रींत क्रांति झाल्याचे उदाहरण अण्णासाहेब किर्लोस्करांनीं संगीत शाकुंतल नाटकाचा प्रथम प्रयोग इ० सन १८८० सालीं पुण्याच्या भाजी आनंदोद्भव नाटकगृहांत करून दाखविला त्या प्रसंगाचें आहे. यापूर्वी पौराणिक ज्यांस "अलल्डुरर" चीं नाटकें म्हटलीं जात, त्यांचा सर्वत्र प्रघात होता; परंतु या नाटकाच्या पहिल्याच प्रयोगानें त्या नाटकावरची भक्ति अजिबात नाहींशी केली.

लंडन शहरांत सर्वांत वरच्या दर्जाचें समजलें जात असे हें पूर्वी सांगितलें आहेच. हें इ० सन १६६३ मध्यें प्रथम बांधलें गेलें. या नाटकगृहाच्या रंगभूमीवर नामांकित नट लोक रंजन करून गेले अशी त्याची ऐतिहासिक परंपरा आहे. याची आग लागून दोनदां रक्षा झाली होती. परंतु प्रत्येक वेळीं या रक्षेंतूनच त्यानें आपलें डोकें पहिल्यापेक्षांही भरभराटींत वर केलें.§

§ या नाटकगृहाचा इतिहास असा आहे—

१६६३ हें किलिग्रू नांवाच्या एका दुसऱ्या चार्लसच्या खुषमस्कऱ्यानें प्रथम उघडलें. हा नाटककारही होता.

१६७२ नाटकगृह आगीनें जळालें.

१६७२ पुन्हा बांधलें गेलें.

१६९० रिच नांवाचा एक नट याचा मालक झाला.

१७१० कालियर मालक झाला व रिचला कमी केलें.

१७११ वुइक, डागेट आणि सिबर हे कालियरबरोबर भागीदार झाले. हे तिघेही त्यांच्या वेळचे प्रसिद्ध नट होते.

१७१२ डागेटनें आपली मालकी सोडली व त्या जागीं बूथ भागीदार झाला हाही एक प्रसिद्ध नट होता.

१७१४ सर रिचर्ड स्टील नांवाच्या एका ग्रंथकार व नाटककाराला 'लाईफ पेटेन्ट' नांवाचे विशेष हक्क या नाटकगृहाचे मिळाले होते; परंतु १७१९ मध्यें ते परत घेतले गेले.

१७४७ ग्यारिक लेसीबरोबर भागीदार झाला.

१७७४ लेसी मरण पावला व ग्यारिक एकटा पूर्ण मालक झाला.

१७७६ शेरिडन, लिंडसे व फोर्ड या तिघांनीं ग्यारिकपासून मालकी विकत घेतली.

१७८९ ड्रूरिलेन नाटकगृह पाडून पुन्हा नवें बांधलें गेलें.

१७९४ नवें बांधलेलें नाटकगृह उघडण्यांत आलें.

१८०९ पुन्हा आगीनें जळालें.

१८१२ पुन्हा नवें बांधलें गेलें.

सुमारें पावणेतीन शतकें हें नाटकगृह जग्यत असून, अनेक नट यांतून कीर्ति मिळवून गेले आहेत. आमच्या इकडच्या नाटकगृहाचे इतिहास लाज उत्पन्न करतात.

(but on each occasion has risen stronger from its ashes.)—(*Guide to London*) या नाटकगृहाची मालकी लेसी नांवाच्या एका गृहस्थाकडे होती. यानें २१ वर्षांच्या करारानें हें नाटकगृह घेतलें होतें. या करारांतील फक्त सहा वर्षें बाकी राहिलीं होतीं; परंतु लेसीवर कर्जाचा बोजा वाढल्यामुळें नाटकगृहाची जबाबदारी एकट्यानें चालविण्यास तो असमर्थ होता. आपल्याला कोणीतरी जोडीदार असावा म्हणून नाट्यसृष्टींत त्याची नजर हिंडतीच. तिच्यांत त्याला नाटकाचा धंदा चालविण्यास योग्य असा ग्यारिक पसंत पडला. त्याचा मनमिळाऊ स्वभाव, दूरदृष्टि व युक्तायुक्त विचार करण्याची हातोटी या गोष्टी विचारांत घेऊन लेसीनें ग्यारिकला भागीदार होण्याबद्दल विचारलें. ग्यारिकनेंही आपला रुकार दिला व आपल्या मालकीच्या भागाकरितां आठ हजार पौंड स्वतःच्या कमाईचे व स्नेहाच्या मदतीनें उभारून त्यानें भरले. नाटकाच्या धंद्यांत शिरतांना, त्याची जी एक महत्त्वाकांक्षा होती ती सात वर्षांनीं पुरी झाली व ती पुरी होण्याला वर सांगितलेले त्याचे गुण उपयोगी पडले ( १७४७ ).

ग्यारिक व लेसीनें कामाची विभागणी केली ती अशी—ग्यारिकनें नाटकांची निवड करावयाची, नाटककारांशीं देण्याघेण्यासंबंधीं बोलणें करावयाचें, नट पसंत करणें, ठेवणें इत्यादि कामें करावयाचीं व लेसीनें नाटकगृहाची व्यवस्था पहावी, देखावे, पोशाख यासंबंधींच्या खर्चाच्या बाबी पाहाव्या. सारांश, धंद्याचा दर्शनी भाग ग्यारिककडे व अंतर्व्यवस्था लेसीकडे अशी कामाची विभागणी झाली. दोघां भागीदारांनीं पांचशें पौंड वर्षाचे घ्यावे. ग्यारिकनें मात्र नाटकांत काम करण्याबद्दल आणखी पांचशें पौंड अधिक घ्यावे. ग्यारिकनें दुसऱ्या नाटकगृहांत काम करावयाचें नाहीं व केलें तर जी प्राप्त होईल ती दोघांनीं घ्यावयाची याप्रमाणें मालकीच्या कराराचीं कलमें ठरलीं होतीं.

आपल्याकडील नाटक-मंडळ्यांची रचना व तिकडील नाटक-मंडळ्यांची रचना यांमध्यें थोडासा भेद आहे. तिकडे नाटकगृहाचा मालक किंवा कांहीं मुदतीपर्यंत नाटकगृह भाड्यानें घेणारा, ज्याला "लेसी" म्हणतात तो आपल्या जबाबदारीवर नाटक मंडळी जमवितो, इकडचा

नाटक-मंडळीचा मालक बहुतवरून स्वतः नट असतो. तो एकटा किंवा भागीनें नाटक-मंडळी बनवितो. तिकडचे नट कांहीं मुदतीपर्यंत मालकाशीं बांधलेले असतात. पूर्वीच्या पिढींतले इकडचे नट जरी करारानें बांधलेले नसत, तरी संस्थेशीं आपलेपणाच्या नात्यानें बांधलेले असत. प्रस्तुतच्या नटांना आतां कोणतेंच बंधन नाहीं. त्यामुळें नाटक-धंद्याची सुधारणा म्हणून कांहींच झाली नाहीं व होत नाहीं.


नाटकगृहाची मालकी मिळाल्याबरोबर, ग्यारिकनें नाटकगृहांत व नाट्यकलेंत एकंदर सुधारणा करण्याचा संकल्प केला. प्रथम प्रयोगाच्या आरंभीं म्हणण्याकरितां जॉन्सननें कविताबद्ध उपोद्घात तयार केला होता. त्यांत त्यानें दर्शविलें होतें कीं, पूर्वींचे रंगभूमीवर जे डोंबाऱ्यांचे (Rope-dancers) करमणुकीचे प्रकार चालत असत किंवा अर्थ न समजतां नटांकडून जीं भाषणें होत असत, तसेंच प्रेक्षकांचीं अंतःकरणें हलवून सोडणारे मनोविकारादि अभिनय, ज्यांचा आजपर्यंत अभाव असे, त्या गोष्टींत आतां रूपांतर केलें जाईल. शेक्सपीयरसारखे कवि जे अंधःकारांत जणुं काय घोरत पडले आहेत, त्यांच्या बुद्धिमत्तेचा प्रभाव रंगभूमीवर पाडला जाईल. ग्यारिकच्या पूर्वीं रंगभूमीची स्थिति कशी होती याची कल्पना जॉन्सननें जो उपोद्घात लिहिला त्यावरून होते.※ शेक्सपीयरच्या पश्चात् आपला उद्धार होण्याची वेळ केव्हां येईल अशी जणुं काय नाट्य-कला वाट पाहात होती. (Parting time toiled after him invain) असें ग्यारिकचे चरित्रकार सांगतात. जॉन्सननें नाटकगृहाच्या गृह-प्रवेशाला जो उपोद्घात करून दिला तो लोक्स इतका पसंत पडला कीं, प्रत्येक प्रयोगाच्या सुरुवातीला तो म्हटला जाण्याविषयीं लोकांचा आग्रह पडूं लागला; परंतु पुढें ग्यारिक आजारी पडल्याकारणानें तो छापून प्रसिद्धच करावा लागला.

※ पुढील उद्गार उपोद्घातांतील आहेत—

From bard to bard the frigid caution crept
Till declamation roared while passions slept.
In glowing numbers now he fires the age
And Shakespeare's sun relums the clouded Stage



डेव्हिड ग्यारिक



ग्यारिकची पत्नि.

पृष्ठ ३४-३५

चालोद्यान प्रेस, पुणें.

ग्यारिककी कारकीर्द सुरू झाल्याबरोबर प्रथम त्यानें नाटकें रंगभूमीवर चांगल्या तयारीनें आणण्याचा उपक्रम सुरू केला. मोठमोठे म्हणविणारे नट आपल्या भूमिकेसंबंधानें निष्काळजी असत. त्यांची भूमिका कधीं पाठ असावयाची नाहीं. ग्यारिकनें तालमी नियमानें झाल्याच पाहिजेत असा कडक नियम केला. जे नट आपल्या नकला तयार न करतां वेळेवर तोंडाला येईल तें बोलणारे असत त्यांना त्यांची तयारी होईपर्यंत काम करूं द्यावयाचें नाहीं असा कायदा अमलांत आणला.

नंतर नवीं माणसें ठेवण्याचा क्रम त्यानें सुरू केला. क्यारीसारखे प्रसिद्ध नट आपल्याकडे गुंतविले. नायिकेच्या कामाला लायक अशा स्त्रिया संग्रहीं ठेवल्या. दुसऱ्या नाटकगृहांतील नटवर्गापेक्षां आपला नटवर्ग अधिक सरस असण्याविषयीं त्याचा प्रयत्न असे नटांचा संग्रह चांगला झाल्यानें शेक्स्पियर व दुसऱ्या चांगल्या नाटककारांचीं नाटकें बसविण्यास त्यानें सुरुवात केली.

ग्यारिकच्या वेळीं दोन चाली फार वाईट असत. एक रंगभूमीवर प्रेक्षकांची निष्कारण गर्दी. कीर्तनांत जशी हरिदासाच्या भोंवतीं श्रोत्यांची गर्दी असते, तशी नटांच्या आजूबाजूस प्रेक्षक गर्दी करून बसत असत. त्या गर्दींतून नटांना आपला रस्ता काढावा लागत असे. एखाद्या नटाचें भाषण आत्मगत असलें, तरी रंगभूमीवर प्रेक्षक बसले आहेत ही कल्पना न करतां, मी एकटा आहें अशी त्यानें कल्पना केली पाहिजे व प्रेक्षकांनाही तो एकटा आहे अशी कल्पना करून घ्यावी लागत असे रोमियो ॲण्ड ज्युलिएट नाटकांतील एका प्रवेशांत ज्युलिएट स्मशानांत आहे, स्थंत तिच्या बापाच्या पूर्वजांचीं थडगीं आहेत असा देखावा आहे. या प्रवेशांत रंगभूमीवर शें-दोनशें प्रेक्षकांचीं डोकीं दिसत असत.*

* इंग्लिश लोकांत बड्या घराण्यांत प्रेत पुरण्याची त्यांची स्वतंत्र जागा असते. प्रेतांवर थडगीं बांधून, त्यांवर मृत मनुष्याचा पुतळा ठेवण्याची चाल असते. ज्युलिएट स्मशानांत पडल्यावर तिच्या आजूबाजूला प्रेक्षकांचीं डोकीं दिसत. तीं जणुं काय थडग्यांवरील प्रेतांचीं डोकीं आहेत अशी कल्पना करावयास अर्थातच साधन मिळत असे.

रंगभूमीच्या आंतल्या जागेंत, पडद्यांत रिकामटेकड्या व नाटकांतील स्त्रीपात्रांच्या भक्तांची गर्दी आमच्या रंगभूमीवर कांहीं कमी नसते. खऱ्या प्रेक्षकांची नाटकगृहांत गर्दी नसली तरी हरकत नाहीं; परंतु बिन पैशाच्या प्रेक्षकांची रंगभूमीवर गर्दी कधींच कमी नसते. पाश्चात्य रंगभूमीची ही उपाधि आतां कमी आहे कीं नाहीं हें सांगतां येत नाहीं; परंतु आमच्या रंगभूमीच्या मागची ही उपाधि अद्याप कमी झाली नाहीं.

दुसरी चाल, नाटकगृहाच्या दरवाज्यांत लुडबुड्या व आशाळभूत लोकांची गर्दी असावयाची, शंभर वेळां आंत बाहेर करणारे लोकही असावयाचे. या दोन्हीही वाईट चालींचें उच्चाटन ग्यारिकनें केलें. लुडबुड्या लोकांना पैसे घेतल्याशिवाय दारांत उभें करावयाचें नाहीं व रंगभूमीवर कोणासही बसूं द्यावयाचें नाहीं हे नियम सक्तीनें अमलांत आणले.

सारांश, ड्र्युरिलेन नाटकगृहाचा मालक झाल्यापासून-सदर नाटकगृहावर ग्यारिकचें राज्य, तो नाटकाच्या धंद्यापासून विराम पावेपर्यंत अव्याहत चाललें होतें.

## संसारांत प्रवेश

ग्यारिकचा दिवसेंदिवस उत्कर्ष होत चालला. लोकप्रियता त्यानें संपादन केली होतीच, त्यानंतर क्रमानें नाटक मंडळीच्या मालकीचेंही वैभव त्याला मिळालें. यापुढची वरची पायरी म्हणजे, मिळालेल्या वैभवाला वांटेकरीण पाहाणें ही होय, व या कामांतही त्याला चांगलें यश मिळालें. त्यानें जी सहधर्मचारिणी पाहिली, ती अत्यंत सुशील, मनमिळाऊ व संसाराला योग्य अशी पाहिली. इचा पूर्वेतिहास म्हणजे एक कादंबरी आहे. इचें नांव इव्हा व्हायवोलेटी होतें. ही एका संभावित घराण्यांत जन्मास आली होती. ऑस्ट्रियाच्या बादशहाच्या मुलीबरोबर ज्या इतर मुली नृत्य शिकत होत्या त्यांत ही शिकत होती; परंतु इच्यावर बादशहाचें मन बसण्याचीं चिन्हें दिसतांच राणीनें इला इंग्लंडमध्यें शिफारसपत्रें देऊन पाठविलें. ही पुरुषवेषानें चांगली सोबत पाहून इंग्लंडला आली. ज्यांच्या नांवानें शिफारसपत्रें होतीं, त्यांत लॉर्ड आणि लेडी बर्लिंग्टन यांनाही पत्रें होतीं. या दोघांनीं तिला आपल्या

आश्रयाला ठेवून घेतलें, इतकेंच नाहीं तर तिच्यावर इतकें प्रेम ते करूं लागले कीं, ती त्यांची प्रत्यक्ष मुलगी असावी अशीही बोलवा लोकांत सुरू झाली.

लंडनमध्यें आल्यावर "ड्रूरिलेन" नाटकगृहांत एका "आपेरा"त तिनें नाचकामाची नोकरी पत्करली. या कामाबद्दल तिची इतकी प्रसिद्धि झाली कीं, राजघराण्यापासून तों अमीर लोकांपर्यंत तिला बोला. वणीं येऊं लागलीं, ग्यारिक या वेळेस "कव्हेंटगार्डन" नाटकगृहांत नौकर होता. तो कधीं कधीं इचें नाच काम पाहण्यास जात असे व ती याचें काम पाहण्यास येत असे. अगोदरच याची कीर्ति ऐकून तिचें मन याचेकडे ओढ घेऊं लागलें होतें. त्यांत याचा रंगभूमीवरचा प्रभाव पाहून तिला याचा ध्यास लागला. "रोमियो आणि ज्युलिएट" नाटकांतील नायक-नायिकेच्या मनावर प्रथमदर्शनींच एकमेकांच्या प्रेमपाशांत पडण्याचा जसा संस्कार झाला तसा ग्यारिक व इव्हा यांच्या मनावर झाला. ग्यारिकनें तर तिला स्त्रीवेषांत स्वतःचीं प्रेमपत्रेंही पोंचविलीं होतीं.

या प्रेमभावनेचा परिणाम इव्हाच्या मनावर व शरीरावर दिवसेंदिवस होत चालल्याचें निदर्शनास आल्याबरोबर औषधोपचाराचे उपाय सुरू झाले; परंतु धन्वंतऱ्याच्या लक्षांत आलें कीं, इच्या शारीरिक रोगावर उपाय करण्यापेक्षां मानसिक रोगावर उपाय केले तर ते हितपरिणामी होतील. लेडी बर्लिंग्टनच्या मनांतून इव्हाकरितां एखादें घराणदार स्थळ पाहावयाचें होतें. वास्तविक ग्यारिकही या वेळेला इतक्या योग्यतेला चढला होता कीं, कोणाही उमरावाच्या मुलीनें त्याचें पाणिग्रहण करण्याची इच्छा करावी; परंतु लेडी बर्लिंग्टनला नाटकाचा धंदा करणारा मनुष्य कमी दर्जाचा वाटला. परंतु इव्हाच्या मनाचा कल पाहून शेवटीं बर्लिंग्टनला तिच्या इच्छेप्रमाणें रुकार द्यावा लागला व ग्यारिकची इव्हा व्हायवोलेटीशीं संसारग्रंथी पडली. या वेळीं इव्हाचें वय चोवीस वर्षांचें होतें व ग्यारिकचें तेतीस वर्षांचें होतें.(इ० सन १७४९).

ग्यारिकनें बायकोच्या नांवानें ४००० पौंड आंदण म्हणून दिलें. शिवाय तिला आणखी लग्नाचे आहेर म्हणून आले होते. एका नाटकाचा धंदा करणाऱ्या सामान्य नटाचा एका नाचकाम करणाऱ्या मुलीशीं संबंध

व्हावा व त्याला बड्या बड्या सरदार लोकांची सहानुभूति असावी ही गोष्ट ग्यारिकची कशा प्रकारची समाजांत योग्यता वाढली असावी व त्यानें नाटकांकडेला केवढ्या योग्यतेला आणलें असावें हें स्पष्ट दाखवितें. लग्न झाल्यावर एकांत सुखाचे दिवस ( honey moon ) घालविण्याकरितां ग्यारिक आपल्या गांवीं लिचफील्ड येथें जाणार होता; परंतु लेडी वालेन्टनला हा विचार पसंत पडला नाहीं. एका नाटक्याशीं संबंध झाला तेवढा पुरे, यापुढें त्याच्या नातेवाईकांशीं तरी संपर्क नको असें तिचें म्हणणें होतें. ग्यारिक मोठ्या लोकांची मर्जी संभाळणारा होता; परंतु त्यांची गुलामगिरीची खुशामत करणारा नव्हता. त्याचा व लेडीचा नेहमीं खटका उडत असे.

लग्न होऊन एकांत सुखाचे दिवस उपभोगून आल्यावर प्रथम तो रंगभूमीवर आला, त्या वेळीं Much ado about nothing या शेक्स्पीयरच्या नाटकांतील बेनिडिकची भूमिका त्यानें घेतली होती. बेनिडिक हा लग्न करून घेण्याचा निषेध करणारा होता. तें भाषण घेऊन ग्यारिक जेव्हां बोलूं लागला. तेव्हां प्रेक्षकांत मोठा हंशा उडाला! तें भाषण हें—

> "Here you may see the Benedick, the married man, I may chance to have some odd quirks and remnants of wits broken on me, because I have railed so long against marriage."
>
> [ तुम्हापुढें एक चतुर्भुज झालेला मनुष्य उभा आहे. आजपर्यंत मी संसाराची बेडी पायांत अडकवून घेण्याच्या विरुद्ध होतों. त्याबद्दल आतां तुम्ही माझ्यावर पुष्पांजली कराल असें मला भय वाटतें.]

## मालकीचा अनुभव

वैभवाच्या दृष्टीनें व संसारसुखाच्या दृष्टीनें ग्यारिकला चांगले दिवस आले खरे; परंतु गुलाबाचा वास घेतांना जसे कांटेही बोंचून घ्यावे लागतात, तसे अधिकाराच्या मोठेपणाबरोबर, त्याच्या यातनाही सोसाव्या लागतात. "जया अंगीं मोठेपण तया यातना कठीण" या उक्तीचा अनुभव

ग्यारिकला मालकी पतकरल्यापासून त्याच्या चरित्राच्या अखेरीपर्यंत येत होता. अगदीं आडमुठ्या नटांशीं त्यानें सरळ वागून पाहिलें, कडक रीतीनें वागून पाहिलें; परंतु ज्याचा स्वभाव तो स्वभाव. त्याच्याजवळ असलेल्या नटांना त्याची कोणतीच गोष्ट पसंत पडत नसे. रंगपटांत त्याच्याविरुद्ध नेहमीं बडबड चालावयाची; तिला (Rough passion of the green-room) असें ग्यारिकच्या चरित्रकारांनीं म्हटलें आहे. काम करावयाचें नसलें म्हणजे आजारीपणाची सबब आणून खोळंबा करावयाचा हें जणुं काय नटाचें सूत्र वाक्य ठरलेलें असावयाचें. ब्यारी नांवाच्या नटानें अशा तऱ्हेचा ग्यारिकला अनेक वेळां त्रास दिला. तरी ग्यारिक त्याची लहर संभाळतां येईल तितकी संभाळीत असे; परंतु या भडकलेल्या नटांचें (Spoiled lover of the stage) कशानेंच समाधान होत नसे. ब्यारीबरोबर दुसरे जे असंतुष्ट नट व स्त्रिया होत्या त्यांनीं ग्यारिकबरोबरचा करार संपल्यावर संप करून ग्यारिकला सोडलें. ग्यारिकवर राग असण्याचीं प्रत्येकाचीं निरनिराळीं कारणें असत. कोणा स्त्रीचा आपल्यापेक्षां दुसरीकडे ग्यारिकचें लक्ष म्हणून त्याच्यावर राग, कोणा नटाचा आपल्यापेक्षां कमी योग्यतेच्या मनुष्यास वर चढविल्याबद्दल ग्यारिकवर कटाक्ष–अशीं कोणाचीं कांहीं कोणाचीं कांहीं कारणें ग्यारिकवर राग असण्याला असत. अशा वेळेला दुसऱ्या मंडळ्या अधिक लालूच दाखवून नटांना फोडतात; व हें नाटक-धंद्याचें एक ब्रीद आहे असें म्हटलें तरी चालेल. ग्यारिकच्या नटांपैकीं पांच सहा चांगलीं माणसें अशा तऱ्हेनें निराळीं झालीं. तथापि त्याच्याजवळ गेलेल्या माणसांची उणीव भासूं न देणारीं दुसरीं माणसें होतीं. कोणी गेलें तरी नेपोलियन जसा एकटा लढाईच्या वेळीं पुरा आहें, तसा मी कसल्याही अडचणी भागवून घेण्याला एकटा समर्थ आहें असें तो अभिमानानें म्हणत असे.

या फाटाफुटीमुळें लोकांची अशी समजूत झाली कीं; ग्यारिक आतां डोकें वर काढूं शकणार नाहीं. कारण ज्या नटांवर खोऱ्यानें पैसा मिळत असे व जे नट ग्यारिकच्या स्वतःच्या तालमींत तयार झाले होते, तेच नसल्यावर ग्यारिकचें चालणार कसें असें लोक म्हणूं लागले; परंतु

ग्यारिकनें पुढें येणारी अडचण जाणून अगोदरच नायिकेची भूमिका दुसऱ्या एका नटीला देऊन स्वतः आपण नायकाची भूमिका घेतली व “रोमियो आणि ज्युलिएट” हें नाटक बसविलें.

नव्या तयारीनें त्यानें आपलें नाटकगृह सन १७५०च्या सप्टेंबरमध्यें उघडलें. नाटकारंभीं त्यानें जो उपोद्घात केला, त्यांत जातां जातां, ‘पळपुट्या नटीं’बद्दल विनोदानें पुढील उल्लेख केला—

Some few there are whom paltry passions guide,
Desert each day, and fly from side to side;
Others like swiss love fighting as their trade
For beat or beating they must all be paid.

[ कांहीं असे असतात कीं, त्यांच्यावर क्षुद्र मनोविकारांचा पगडा बसून ते नेहमीं इकडून तिकडे भटकत असतात. कांहीं कलहप्रिय असतात. त्यांचा भांडणें हाच व्यापार असतो. भांडणाला कारण असो कीं नसो, त्यांचा तनखा हा त्यांना दिलाच पाहिजे.]

शिवाय त्यानें नाटकगृह उघडतांना केलेल्या प्रास्ताविक भाषणांत पुन्हा प्रेक्षकांस जाणविलें कीं. आपल्या अभिरुचीवर नाट्यकलेची सुधारणा होणारी आहे. नुकसान सोसून कोणाही नाट्यकलेच्या सूत्रधाराला सुधारणा करतां येणार नाहीं. जर शेक्स्पीयरच्या हॅम्लेट व लियरसारख्या उच्च दर्जाच्या नाटकांची लोकांस किंमत न समजल्यामुळें आमचीं नाटक-गृहें रिकामीं पडूं लागलीं तर आम्हांला निरुपायानें तीं नाटकें व ते कवि मागें टाकून भपक्याचे देखावे दाखविण्याकरितां कवींच्याऐवजीं सुतारां-ची मदत घेणें भाग पडेल. पोटाला मिळविणें हें आमचें मुख्य ध्येय आहे. ( Our first ruling passion is to eat ! )

ग्यारिककडून निघालेल्या मंडळींनीं थोड्या दिवसांनीं आपलें नाटक रंगभूमीवर आणलें. त्या दिवशीं क्वारीनें आपल्या भाषणांत आपलें समर्थन केलें, त्यांत त्यानें ग्यारिकला अनुलक्षून पुढील उद्गार काढले—

“ जर राजे लोक आपल्या प्रजेची कदर ठेवीनासे झाले तर ती प्रजा तें राज्य सोडून दुसरीकडे वसाहत स्थापूं लागली तर त्यांत आश्चर्य कसलें ? ”

" When Kings allow no merit but their own,
Can it be strange that men for flight prepare,
And seek to raise a colony elsewhere ? "

या प्रस्तावनेचा गर्भित अर्थ असा होता कीं, ग्यारिक स्वतःकडे महत्त्वाच्या भूमिका घेतो व आम्हांस कांहीं करूं देत नाहीं; परंतु हा आरोप खरा नव्हता, त्यारीस तो आपल्यासारखींच योग्यतेचीं कामें देण्यास नेहमीं तयार असे. यासंबंधाचा उल्लेख दुसरे ठिकाणीं आला आहेच.

ग्यारिक व त्याच्यापासून निघून गेलेले नट यांमध्यें जें कलहाचें कारण नटांनीं दाखविलें होतें, तें दुसरीकडे ते गेल्यावर नसावयास पाहिजे होतें; परंतु त्याच नटांत तेथेंही कलहाचें बीज पसरलें गेलें.-इकडे ग्यारिकवर सर्वांचा कटाक्ष होता, तर तिकडे त्यांचा मालक जो रिच त्याच्यासंबंधानेंही तोच प्रकार. परंतु रिच हा कोणाचीच पर्वा करीत नसे, नटांपैकीं गोम्या आज तालमीला हजर नाहीं तर दुसऱ्या दिवशीं सोम्या नसावयाचाच. बायकाही एकमेकींस मत्सरानें अगदीं पाण्यांत पाहत असत. यांचा एकमेकींशीं द्वेष आहे हें रंगभूमीवर या एके ठिकाणीं असण्याचा प्रसंग आला म्हणजे प्रेक्षकांच्या लक्षांत आल्यावांचून राहात नसे. जो प्रयोग लावावयाचा ठरला असेल तो लागेलच अशी खात्री नाहीं. नव्या मंडळींत अशा तऱ्हेची अनवस्था वाढल्यामुळें तिचा मालक रिचही नुकसानींत आला.

या फाटाफुटीनें दोघांही मंडळींत कमीजास्ती प्रमाणानें व्यंगें दिसत होतीं. शेक्स्पीयरच्या नाटकांवर प्राप्ति कमी पडूं लागल्यानें ग्यारिकनें लोकांना रुचतील अशीं नवीं नाटकें, भपक्याचे नवे पोशाख व देखावे इत्यादि साधनांनीं प्रेक्षक आपल्याकडे ओढून घेतले व आपल्या मंडळींत दिसणारें व्यंग झांकून टाकलें.

## प्रवेशक

नाटवस्तूंतील मनुष्यस्वभावाची उपपत्ति लावण्याला ग्यारिकच्या चरित्रांत या प्रवेशकाची आवश्यकता वाटूं लागली आहे. ग्यारिकवर धंद्याची जबाबदारी जोंपर्यंत नव्हती व आपल्या गुणांचा उत्कर्ष दाखविणें

हेंच जोंपर्यंत त्याचें कर्तव्य होतें, तोंपर्यंत समव्यवसायी लोकांच्या स्वभावाचा त्याला फारसा अनुभव नव्हता; परंतु धंद्याची जबाबदारी त्यानें पत्करल्यापासून नाटकधंद्याच्या मार्गांत किती कांटे पसरलेले आहेत हें त्याला कळावयास लागलें. नाटककारापासून तों हलक्या नटापर्यंत क्षुद्र मनोवृत्तीचें प्राबल्य असलेलें त्याला आढळून येऊं लागलें. उपकार केलेल्या माणसाकडून अपकार, मिथ्यापवाद, द्वेषमूलक निंदा हीं पिशाचें त्याच्या मागें सारखीं असत; परंतु त्याचा स्वभाव खिमा असल्यानें या पिशाचांची बाधा त्यानें आपल्या मनाला होऊं दिली नाहीं. नटवर्गापासून त्याला पदोपदीं अपमान सोसावा लागलाच; परंतु नाटककार वर्गापासूनही त्याला कमी त्रास झाला नाहीं. या प्रकरणांत मुख्यतः सांगण्यासारखी गोष्ट ही कीं, या चरित्रद्वारा ज्या गोष्टी आपणास इतिहास म्हणून कळतील त्या प्रत्यक्ष कृतींनीं घडत असलेल्या आपल्या इकडच्याही नाट्यसृष्टींत पाहाण्यास मिळतील, जणुं काय तिकडच्या फक्त दुर्गुणांचा धडा आमच्या नाट्य सृष्टींतही गिरवला जात आहे. नाट्यसृष्टींतील मानवस्वभावाचें निरीक्षण करतांना असें म्हणावेंसें वाटतें कीं, या सृष्टींतील मनुष्यस्वभाव बनवितांना सृष्टी-कर्ता ब्रह्मदेव अगदीं वैतागून गेला असावा व सृष्टि निर्माण करतां करतां जें गबाळ बाकी राहिलें त्याची ही नाट्य-सृष्टि त्यानें बनविली

नटवर्गांत ग्यारिकचा द्वेष करणारेही असत; परंतु त्यांतल्या त्यांत मर्फी, म्याक्लीन, फूट यांच्या इतके दीर्घद्वेषी शत्रू त्याला कोणी नव्हते, व आश्चर्याची गोष्ट ही कीं, या सर्वांवर प्रसंगाप्रसंगानें त्यानें उपकार केले होते; परंतु या कृतघ्नांनीं त्या उपकारांचा असा अर्थ केला होता कीं, आम्ही ग्यारिकच्या विरुद्ध कांहीं बोलूं नये म्हणून तो आम्हांस भीतीनें ही लाच देत आहे.

## चढाओढीचे प्रयोग

ग्यारिक व क्वीन वेगळे झाल्यावर क्वीननें कव्हेंटगार्डन नाटकगृहांत स्वतंत्र मंडळी उभारली. गेल्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें ग्यारिकशीं असंतुष्ट असणारे नट त्यानें आपल्याकडे घेतले व चढाओढीनें

प्रयोगास सुरुवात केली. रोमियो आणि ज्युलिएटच्या प्रयोगांत प्रथम चढाओढ सुरू झाली. दोघांच्याही नाटकगृहावर प्रेक्षकांच्या उड्यावर उड्या पडूं लागल्या क्रीनचा बारा वेळां त्याच नाटकाचा प्रयोग झाला व ग्यारिकचा तेरा वेळां झाला, व या झगड्यांत आपली सरशी झाली असें लोकांच्या प्रत्ययास त्यानें आणून दिलें; परंतु दोन्ही नाटकगृहांतल्या या झगड्याला लोक इतके कंटाळले होते कीं, "आज रोमियो आणि ज्युलिएट नाटक आहे" असें त्यांनीं ऐकलें कीं, ते "दोन्ही नाटकगृहांस आग लागो" म्हणून शिव्या देत असत.

"What play to night" says angry Ned
As from his bed he rouses.
"Romeo again!" he shakes his head
"A plgaeue on both your houses."

या नाटकाचे ग्यारिक आणि ब्यारी या दोघांमध्यें जढाओढीचे प्रयोग चालले होते. यांत ज्युलिएटची भूमिका घेणाऱ्या दोन नटी यांना ब्यारींची रोमियोची भूमिका केव्हां आवडत असे, व ग्यारिकनें घेतलेली रामियोची भूमिका कशी आवडत असे यासंबंधानें दोन विनोदपर चुटके ग्यारिकच्या चारित्रांत वाचावयास मिळतात:—

"So reversed are the notions of Capulet's*
daughters.
One loves a whole length and the other three
quarters.

[ज्युलिएटच्या भूमिका घेणाऱ्या स्त्रिया बेलामी व सिबर यांची आवड कांहीं तऱ्हेवाईक आहे. एकीला पुरा उंचीचा रोमियो आवडतो तर दुसरीला त्याच्या पाऊण पट उंचीचा आवडतो.]
याच अर्थाचा दुसरा चुटका आहे—

[* रोमियो आणि ज्युलिएट नाटकांत क्यापुलेट हें ज्युलिएटच्या बापाचें पात्र आहे.]

"Fair Juliet at one house exclaims with a sigh
'No Romeo's clever,s that's not six feet high'
Less ambitiously t'other does Romeo adore
Though in size he scarce reaches to five feet four."

[एका नाटकगृहांतल्या ज्युलिएटला सहा फूट उंचीचा असलेला रोमियो आवडतो–तर दुसऱ्या नाटकगृहांतल्या ज्युलिएटची महत्त्वाकांक्षा कांहीं मोठी नाहीं. ती पांच फूट चार इंच उंच असलेल्या रोमियोवर फिदा आहे.]

ग्यारिक, ब्यारीपेक्षां ठेंगणा होता. म्हणून त्याला a little great man एक ठेंगणा वडा गृहस्थ–किंवा a great little man–एक वडा बुटबैंगण–असें म्हणत असत. या नटाच्या रोमियोच्या भूमिकेसंबंधानें तुलना करतांना प्रेक्षकांत द्विधा मत असे. कोणी असें म्हणत कीं, दुसऱ्या अंकांतील बागेच्या प्रवेशांत ब्यारीची भूमिका उत्तम होते व ग्यारिकची भूमिका रोमियोला हद्दपार केल्यावर–फ्रायर (हा रोमियो आणि ज्युलिएट या दोन्ही घराण्याचा कुलोपाध्याय असे.) जवळच्या प्रवेशांत हृदयद्रावक होते.

जिच्याकडे ज्युलिएटची भूमिका असे, ती म्हणत असे कीं, ब्यारी रोमियो व मी ज्युलिएट असलें तर बागेंतल्या प्रवेशांत मी ब्यारीकडे खिडकींतून खालीं उडी टाकून त्याची भेट घेईन, इतकें माझें अंतःकरण तो आपल्याकडे ओढून घेतो. व ग्यारिक रोमियो असून माझ्याकडे ज्युलिएटची भूमिका असेल तर ग्यारिकनें माझ्याकडे वर चढून यावें अशी मी इच्छा करीन. दोघांही नटांमध्यें रोमियोच्या भूमिकेसंबंधानें एकेक विशेषत्व असे. एकाचा दुसऱ्या पात्राचें मन आपल्याकडे ओढून घेण्याचा गुण, व दुसऱ्याची समोरच्या पात्राकडे जाण्याची आतुरता हीं स्पष्ट दिसत असत.

टीकाकार या प्रवेशाला "बालकनीचा प्रवेश" म्हणतात. या प्रवेशासंबंधानें ग्यारिकच्या वेळच्या एका नटानें एक विनोदपर टीका केली आहे. तो म्हणतो कीं, "बागेच्या प्रवेशांत ब्यारी हा (रोमियो) एखाद्या श्रीमंताचा उद्धट मुलगा बोलतो, त्याप्रमाणें एवढ्या मोठ्यानें बोलतो कीं,

ओतून नोकरांनीं येऊन त्याला चांगला चोप द्यावा; व ग्यारिक आपल्या रोमियोच्या भूमिकेंत रात्रीचे चोर जसे घरांत घुसतात तसा बागेंत प्रवेश करीत असतो." ब्यारीच्या रोमियोचें वर्णन स्वतः ग्यारिकनुद्धां करीत असे. ब्यारीची अथेल्लोची भूमिकाही ग्यारिकपेक्षां चांगली होत असे. व ग्यारिक, ब्यारीची या कामांत स्तुति करीत असे.

ग्यारिक व ब्यारी यांच्यामध्यें लियरच्या भूमिकेसंबंधानेंही मोठी स्पर्धा लागून राहिली होती. ब्यारीचा अभिनय गंभीर, मनावर ठसा उमटविणारा व अंतःकरण द्रवविणारा असे; परंतु लियरच्या भूमिवेला मात्र तितका अनुरूप नसे. वेड लागलेल्या प्रवेशांत तो असावा त्यापेक्षां अधिक होत असे; आणि ग्यारिकचा अभिनय याच प्रवेशांत अगदीं तंतोतंत पूर्ण होत, असे. कंठशोष करून ओरडणें, दांत ओठ चावून बोलणें. हातपाय आपटणें इत्यादि इतर पात्रांत असणारे दोष ग्यारिकच्या अभिनयांत नसून, क्षीण झालेला, दुर्दैवी! परंतु मी राजा आहें हें तो प्रेक्षकांस जाणवीत असे. मनोविकार व्यक्त करण्यांत धिमेपणा, अनिश्चित मुद्रा, अनिश्चित कृति, सर्व गोष्टींची विस्मृति, परंतु आपली मुलगी आपल्याशीं कृतघ्न झाली याबद्दल व तिच्या निर्दयपणाबद्दल आपल्याला पूर्ण स्मृति आहे, या गोष्टी त्याच्या अभिनयांत व्यक्त दिसत असत. या दोघांची लियरची भूमिका पाहून लोक तुलना करून असें म्हणत असत कीं, "ब्यारी हा रोमरोमांगाणिक राजा दिसतो, परंतु ग्यारिक हा रोमरोमांगाणिक राजा लियर दिसतो."

It was said for Barry that "he was every inch a King" for Garrick that "he was every inch a King Lear."

लिअरच्या भूमिकेसंबंधानें वरील दोघां नटांच्या भक्तांनीं पुढील चुटके लिहिले आहेत. हे चुटके लियरच्या नाटकाचे प्रयोग होत असत, त्या वेळेचे टीकात्मक आहेत.

The town has found out different ways
To praise the different Lears.
To Barry they give loud huzzas.
To Garrick only tears.

2

Critics attend and judge rival Lears.
While each commands applause and each
your tears.
Then own this truth, well he performs his
part
Who touches even Garrick to the heart.

ज्या अर्थी ग्यारिकच्याही अंतःकरणाला ब्यारी आपल्या लियरच्या भूमिकेनें द्रव आणीत असे त्या अर्थी ब्यारीची भूमिका सरस होते असें त्यांच्या भक्तांनीं म्हटलें आहे. या तुलनेंत ब्यारीचें अभिनयकौशल्य जितकें दिसून येतें तितकीच ग्यारिकची गुणग्राहकताही दिसून येते. ग्यारिक, ब्यारीच्या इतर भूमिकेबद्दलही प्रशंसा करीत असे.

या दोघां नटांसंबंधानें एके ठिकाणीं असें म्हटलेलें आहे कीं—

"ब्यारीचें नांव पाण्यावर लिहिलेलें आहे व ग्यारिकचें संगमरवरी दगडावर खोदलेलें आहे."

[Is not Barry's name writ in water, and Garrick's in Marble.]

## अभिनयपटुत्व

ग्यारिक राजकारणांत पडल्याचें त्याच्या चरित्रावरून दिसत नाहीं; परंतु राजकारणी पुरुषाप्रमाणें त्याचे उद्गार मात्र वाचावयास मिळतात. त्यानें एके प्रसंगीं म्हटलें आहे कीं, "राजा एखाद्या मूर्खालाहि पाहिजे त्या अधिकाराच्या जागेवर नेमूं शकेल; परंतु नट उत्पन्न करणें हें एक ईश्वरच करूं शकतो."

Sir, the King (God bless him) can make any fool an officer, but it is only Almighty that can make an actor.

ग्यारिकला अभिनयविद्येचें फार महत्त्व वाटत होतें. आपण आहोंत तें नाहीं असें भासवावयाचें, व नाहींत ते आहोंत असें प्रेक्षकांच्या अंतः-

करणावर बरोबर बिंबवावयाचें हें खरें अभिनयपटुत्व आहे.* खऱ्या अभिनयपटुत्वाला मानवी स्वभावाची ओळख लागते. नटांच्या पुढें मनुष्य-स्वभावाची सर्व सृष्टि खुली असते. कल्पना-सृष्टीपासून असो किंवा प्रत्यक्ष समाजाशीं दळण-वळण ठेवण्यापासून असो, नटांनीं आपल्या अंतःकरणांत निरनिराळ्या मनोविकारांचे संस्कार सांठविले पाहिजेत व तेच त्यांच्या अभिनयपटुत्वाला साह्यकारी होतात. नाट्य-सृष्टींत शिरल्याबरोबर ग्यारिकनें मानवी स्वभावाची ओळख करून घेतली होती. नटाच्या पश्चात् त्याच्या कृतीचें प्रत्यक्ष असें स्मारक कांहींच राखून ठेवतां येत नाहीं. त्याच्या ह्यातींतच त्याच्या अभिनय-कौशल्यापासून होणारा आनंद प्रेक्षकांना मिळावयाचा असतो. व त्याबद्दल त्यांनीं त्याचा गौरव करावयाचा असतो. तसा प्रकार कवि, नाटककार, चित्रकार यांचा नसतो. त्यांची कृति त्यांच्या पश्चात् त्यांच्या त्यांच्या पात्रतेप्रमाणें राहूं शकते. परंतु ग्यारिकसारख्या असामान्य नटांनीं आपलें नांव, जणुं काय, त्याची कृति त्यांच्या पश्चात् प्रत्यक्ष जागृत आहे असें राखलें आहे. नटांचें स्मारक म्हणजे त्यांच्या अभिनय-नैपुण्याच्या आख्यायिका प्रत्यक्ष पाहिलेल्या लोकांकडून व पिढ्यान्-पिढ्यांच्या चाळणींतून पसरत आलेल्या या होत. ग्यारिकच्या आख्यायिका याच त्याचें स्मारक होय. व या कवि, नाटककार व चित्रकार यांच्या कृतींच्या स्मारकापेक्षां कमी योग्यतेच्या नाहींत.

नटानें एका क्षणांत रंगभूमीवर मिळविलेली वाहवा व नाटकाच्या रात्रीं त्याचा झालेला जयजयकार हा एखाद्या अत्युत्तम चित्रकाराची कृति पाहून होणाऱ्या आनंदापेक्षां अधिक आहे. ज्या नटानें प्रेक्षकांच्या अंतःकरणाला द्रव आणला आहे, किंवा त्यांना पोट धरधरून हंसविलें आहे व आपल्या मागून येणाऱ्या पात्राबद्दल प्रेक्षकांची आतुरता न ठेवतां

---

* हेनरी आर्यव्हिंगनें अभिनयाचें तत्त्व असें सांगितलें आहे कीं, अभिनयांत आत्मस्फूर्ति पाहिजे. अभिनयाकरितां करावे लागणारे प्रत्येक प्रयत्न हे स्वाभाविक आहेत असें दिसलें, म्हणजे त्या त्या भूमिकेशीं तादात्म्य झालें असें समजावें. The essence of acting is its apparent spontaneity. Perfect illusion is attained when every effect seems to be an accident.

आपल्याकडेच त्यांची अंतःकरणवृत्ति वेधून ठेवली आहे, अशा वेळीं त्या नटाला ज्या उत्कट आनंदाच्या भावना होत असतील त्यांचें वर्णनच करतां येत नाहीं. उत्तम नटाच्या भोंवतीं एक प्रकारची मोहकतेची प्रभा चमकत असते; तिच्याकडे प्रेक्षकांची दृष्टि असते. एखाद्या राजाची स्वारी निघाली असतांना नागरिकांचे डोळे आपल्याकडे लागून राहिले आहेत हें पाहून त्याच्या अंतःकरणांत जी भावना उत्पन्न होत असेल तीच भावना, आपल्यामुळें रंगभूमि गजबजून गेली आहे व सर्व प्रेक्षकांचे कान, दृष्टि व अंतःकरण हीं आपल्याकडे लागून राहिलीं आहेत हें पाहून नटांची होत असली पाहिजे; व अशा वेळीं त्याला स्वतःबद्दल धन्यताही वाटत असली पाहिजे. ग्यारिक आपल्या अभिनयानें प्रेक्षक कसे तन्मय होतात हें अनुभवीत होता. त्यानें ज्या ज्या नाटकांतून आपल्या कसबाची कमाल केली, त्या त्या नाटकांतील नुसतीं वाक्यें पुस्तकांतून वाचलीं तर कांहीं कल्पना करतां येत नाहीं; परंतु त्याचे चरित्रकार तीं वाक्यें देऊन त्या ठिकाणीं आपल्या अभिनयानें प्रेक्षकांस तो थक्क करीत असें म्हणून सांगतात. प्रत्यक्ष पाहाणाराच्या अंतःकरणावर त्या वेळीं त्या वाक्यांचा ठसा कायमचा उठला असला पाहिजे; म्हणूनच तीं वाक्यें परंपरेनें त्याच्या चरित्रांत आलीं आहेत. त्याच्या बहुतेक चरित्रकारांनीं " रिचर्ड दि थर्ड " नाटकाच्या पांचव्या अंकांतील चौथ्या प्रवेशांत, रिचर्ड घाबरलेला येत आहे त्या वेळेचें—

(A horse! a horse, my kingdom for a horse!)

" माझा घोडा आणा! माझा घोडा आणा! त्याकरितां माझें राज्य देखील देण्यास मी तयार आहें." हें वाक्य दिलें आहे. हें वाक्य वाचण्यांत अगदीं साधें दिसतें; परंतु हें उच्चारतांना ग्यारिकच्या एकंदर अभिनयाचा, मुद्रेचा व उच्चाराच्या स्वरांचा (intonation) परिणाम प्रेक्षकांच्या मनावर कांहीं विलक्षण झाला असला पाहिजे. त्याशिवाय या वाक्याला ऐतिहासिक महत्त्व आलें नसतें.

ग्यारिकच्या अंगीं अभिनय-पटुत्व पूर्ण होतें, त्याप्रमाणेंच दुसऱ्याचें अनुकरण हुबेहूब करून दाखविणें हीही कला त्याच्या ठिकाणीं पूर्ण होती. एक मनोविकार बदलून एकदम दुसरा दाखविणें ही गोष्ट त्याला सहजा-

सहजीं करून दाखवितां येत होती. त्याच्या मुद्रेंत जे फरक होत असत ते अंतःकरणापासून होत असत. कोणत्याही मनोविकारांत तो अतिरेक करीत नसे. चर्चिल नांवाच्या एका टीकाकारानें त्याच्या अभिनयाविषयीं असें म्हटलें आहे कीं—

Each start is nature and each pause is thought.

[ त्याची प्रत्येक हालचाल अंतःकरणांतील विकाराला अनुरूप असते आणि जेव्हां जेव्हां, तो विराम घेतो, तेव्हां तेव्हां तो कांहीं-तरी विचारांत असतो.]

ग्यारिकच्या चरित्राचें महत्त्व त्याच्या अभिनयपटुतेवर आहे. आमच्या-कडे उदाहरणार्थ दाखविण्याला सर्वांगानें पूर्णत्वाला पोंचलेला नट कोणीच नाहीं, म्हणून ग्यारिकच्या अभिनयाचें जितकें विस्तृत वर्णन देतां येईल तितकें महाराष्ट्रीय नटाच्या दृष्टीनें अवश्य आहे. ग्यारिकचे मनोविकार आणि मुद्राविर्भाव हीं दोन, लोहचुंबकाप्रमाणें प्रेक्षकांची चित्त-वृत्ति खेंचून धरीत असत. कित्येक नटांना नाटकाची तालीम चालली असतां आपल्या भूमिका रंगभूमीवर करावयाच्या तशा करून दाखविण्याची लाज वाटते. आम्ही नाटकाच्या वेळीं करून दाखवूं, असें ते सांगत सुटतात. अशा नटांबद्दल ग्यारिकचे उद्गार ध्यानांत ठेवण्यासारखे आहेत. तो म्हणे कीं, " एखादें टेबल, खुर्ची किंवा संगमरवरी मूर्ति यांच्याशीं, मी एखाद्या सुंदर अप्सरेबरोबर भाषण करावयाचें त्याप्रमाणें प्रेमविषयक भाषण करीन. ज्या नटाला दुसऱ्या वस्तूवर तद्रुपतेची कल्पना करतां येत नाहीं तो नटच नाहीं व पुढें कधीं होणार नाहीं. ज्या नटाला मनोविकार व्यक्त होण्याकरितां खऱ्या प्रसंगाची आवश्यकता लागते तो नट होण्यास अपात्र आहे स्वतः माझ्यासंबंधानें मी असें सांगतों कीं, एखाद्या खांबाला देखील माझ्यासमोर एखादी सुंदर अप्सरा आहे असें समजून त्या प्रसंगा-ला योग्य अशा मनोविकारानें व अविर्भावानें मी भाषण करीन."

चारचौघां मंडळींत असतांना एखाद्या नाटकांतला प्रवेश, ग्यारिक साध्या पोषाखांत, खऱ्यासारखा करून दाखवीत असे. म्याक्बेथ नाटकां-तील Dagger scene-खंजिराचा प्रवेश, तसेंच ज्या प्रसंगावरून त्यानें लियरची भूमिका तयार केली होती तो, म्हाताऱ्याची मुलगी

खिडकींतून पडली तो प्रसंग व म्हातान्याचा दुःखातिरेकाचा देखावा हे दोन प्रसंग पॅरिस येथें त्यानें इतके हुबेहूब करून दाखविले कीं, ते पाहून जमलेली मंडळी आश्चर्यानें थक्क होऊन गेली. या जमलेल्या मंडळींत क्लेरान नांवाची फ्रेंच नटी होती तिनें एकदम उठून ग्यारिकला आपल्या बाहुपाशांत कवटाळून धरलें व त्याचें प्रेमानें चुंबन घेतलें. ग्यारिकची बायको जवळच होती, तिच्याजवळ जाऊन तिला ती म्हणाली, "क्षमा करा, माझ्याच्यानें राहवलें नाहीं." यांत विशेष गोष्ट ही कीं, जमलेल्या मंडळींत इंग्लिश भाषा न जाणणारेही होते; परंतु नुसत्या अभिनयानेंच त्यानें त्यांच्या मनावर परिणाम केला.

ग्यारिक रंगभूमीवर येऊं लागला म्हणजे, आपली भूमिका काय आहे हें तो लोकांस जाणवीत असे. प्रथम सावकाश पावलें टाकीत येऊन मग कांहीं वेळ विचारांत थांबत असे. त्या वेळच्या त्याच्या मुद्रेवरून आतां याच्या तोंडून काय उद्गार निघतील याची कल्पना प्रेक्षक बिनचूक करीत असत. जसजसे त्याचे मनोविकार बदलत जात, तसतसा त्याचा आवाज व त्याची मुद्रा बदलत जात असे. हॅम्लेट नाटकांतील भुताच्या प्रवेशांत, तो इतकें भेदरल्यासारखें दाखवी कीं, प्रेक्षकांना आपण खरो-खरच भुताच्या समोर आहोंत कीं काय असा भास होई. प्रथम तो आश्चर्य-चकित होऊन स्तंभासारखा उभा राही. त्याचा चेहरा फिक्का पडे, कांपत व हलक्या स्वरांत तो भाषणाला सुरुवात करी. व भीतीनें व कष्टानें तो भुताला प्रश्न विचारी. एका हॅम्लेटच्या भूमिकेवरून निरनिराळे विकार व्यक्त करून दाखविण्याची कला त्याच्या अंगीं किती बाणली होती या बद्दल लोकांची खात्री झाली होती.

ग्यारिकचा मुख्य गुण म्हटला म्हणजे, मनापासून आपलें काम करावयाचें मग त्याकरितां स्वतःला कितीही कष्ट पडले तरी चिंता नाहीं लोकांना प्रसन्न करण्यांत तो आपली पराकाष्ठा करीत असे. एकदां रंग-भूमीवर आला म्हणजे, स्वतःच्या सर्व मनोवृत्ति तो आपल्या कप्प्यांत ठेवून नंतर भूमिकेच्या मनोवृत्ति असतील त्यांच्या तान्यांत जाई. अभिनय करण्यांत तो रंगून जात असे; परंतु त्याला स्वतःला त्या अभिनयाची करमणूक होत नसे. रंगभूमीवर येण्यापूर्वीं, मला स्वतः-

बद्दल काळजी वाटली नाहीं, असें कधींच झालें नाहीं, असें तो आपल्या मित्रांजवळ म्हणत असे. स्वतःच्या बुद्धीबद्दल त्याला फाजील विश्वास नसल्यामुळें व स्वभावांत शांतपणा असल्यामुळें, नवेपणीं जसे तो आपल्या भूमिकेबद्दल परिश्रम करीत असे तसेंच शेवटपर्यंत घेत असे. प्रयोगाचे दिवशीं तो कोणाचीही भेट न घेतां आपल्या भूमिकेबद्दल चिंतन करीत असे. प्रयोग चालला असतांना इतर नटांशीं गप्पागोष्टींत न मिसळतां एकटा, रंगभूमीवर काय चाललें आहे, इकडे लक्ष देऊन असे. आपण रंगभूमीवर असतांना, आंत गडबड चाललेली त्यास खपत नसे. एकदा तो रंगभूमीवर असतांना जान्सन व मरफी नांवाचा एक नट व नाटककार वुईंगमध्यें बोलत बसले होते. आंत आल्यावर तो त्यांना म्हणाला कीं, "तुम्ही इतक्या मोठ्यानें बोलत होतां कीं, माझें अवधान माझ्या कामाकडे राहिलें नाहीं व त्यामुळें माझे मनोविकार मला व्यक्त करून दाखवितां आले नाहींत." जान्सन, म्हणजे "निस्पृहस्य तृणं जगत्" अशांतले असत. ते ग्यारिकला म्हणाले, "तुम्हां नाटक्यांना कसले आले आहेत मनोविकार!"

नव्या प्रयोगाच्या रात्रीं ग्यारिक अगदीं अस्वस्थ असे. फिल्डिंग नांवाच्या नाटककाराचें नाटक चाललें असतांना प्रेक्षक टाळ्या पिटूं लागले; तेव्हां ग्यारिक त्याला म्हणाला, "मी सांगत नव्हतों? हा प्रवेश तुम्ही गाळून टाका म्हणून, आतां माझें कामाकडे लक्ष लागणार नाहीं इतकें या लोकांनीं मला घाबरून सोडलें आहे." काम करीत असतां, कोणी मध्यें व्यत्यय आणला तर त्याला खपत नसे. तो म्हणे, "प्रेक्षक चित्रासारखे बसले म्हणजे झालें, मला त्यांच्या पसंतीच्या टाळ्यांची कांहा किंमत नाहीं."

ग्यारिक रंगभूमीवर असला म्हणजे प्रेक्षकांचें सर्व लक्ष त्याच्याकडे जात असे. नटानें सर्व प्रेक्षकांचें लक्ष आपल्या एकट्याकडे आकर्षून घेणें, यांत त्याचें कौशल्य आहे खरें. परंतु रंगभूमीवर असलेल्या इतर नटांकडे दुर्लक्ष होणें ही गोष्ट विशेषशी चांगली नाहीं असेंही कांहीं टीकाकारांचें मत आहे; परंतु हा दोष नटांपेक्षां प्रेक्षकांचाच अधिक असतो म्हटलें तरी चालेल. कारण रंगभूमीवर असलेल्या सर्व नटांच्या हालचालींकडे लक्ष असणें हा प्रेक्षकांत सावधानपणा जरूर पाहिजे आहे.

ग्यारिकनें शक्य तितके आपल्या संग्रहीं उत्तम नट बाळगले होते. एक-मेकांशीं संघट्टन वाढविल्यानें नटांची कल्पनाशक्ति वाढते, एकमेकांची योग्यता कळून येते व आपले दोष आपल्यास कळून येतात. चांगले नट एके ठिकाणीं जमविल्याचा हा फायदा आहे, असें ग्यारिक समजत असे. लोकांची अभिरुची सुधारण्याकडे या नटांचा त्याला चांगला उपयोग करतां आला.

## ग्यारिकचे टीकाकार

ग्यारिकचें चरित्र वाचतांना त्याच्या नाट्यपटुत्वाचें जसें आपणास कौतुक वाटूं लागतें, त्याप्रमाणें त्याच्या नाट्यपटुत्वाचें वर्णन करणाऱ्या त्याच्या टीकाकार लेखकांच्या मार्मिकतेचेंही कौतुक वाटल्याशिवाय राहात नाहीं. नटांची योग्यता प्रेक्षकांच्या मार्मिक कसोटीवर घांसली तरच समजणारी असते. म्हणून प्रथम मार्मिक प्रेक्षकांमुळें ग्यारिकसारखे इतिहासप्रसिद्ध नट उदयास आले किंवा ग्यारिकनें आपलें नाट्यनैपुण्य दाखवून प्रेक्षकांत मार्मिकपणा उत्पन्न केला हा प्रश्न करावासा वाटतो. त्याच्या वेळीं नाटकगृहांत टीकाकार प्रेक्षक बसण्याचें 'पिट' म्हणून एक विवक्षित स्थळ असे. नाटक पाहिल्यावर ते आपलीं मतें आपल्या नांवानीं प्रसिद्ध करीत असत.¶ हें टीकात्मक वाङ्मय नटांच्या कल्पनाशक्ती

¶ इंग्लंडमधील नाटकगृहांची रचना कशी असते व टीकाकार प्रेक्षकांची बसण्याची स्वतंत्र सोय कशी असते याचें वर्णन एका इंग्रजी पुस्तकांत वाचण्यांत आलें तें हें—

"The boxes were kept for the people of rank and condition, the pit, the centre of criticism was crowded with young merchants, barristers, and students; few women were seen there. It was all left to the professional critics. These sat gravely and listened to the piece, and after it was over, adjourned to the coffee houses, where strangers sat in adjoining boxes, and listened reverently to the criticisms and discussions given publicly for the benefit of the whole room."

वाढविण्याला फायद्याचें असे. ग्यारिकची आपल्यासमोर मार्मिक व रसज्ञ प्रेक्षक असावेत अशी इच्छा असे. यासंबंधानें अशी एक आख्यायिका आहे कीं, एका प्रसंगीं एका शहरांत कोणीं गृहस्थानें त्याला, प्रेक्षकांना उद्देशून भाषण करण्यास सुचविलें. परंतु तेथील प्रेक्षक अगदीं खेडवळ होते. त्यांना पाहून ग्यारिकनें भाषणास सुरवात केली ती अशी:—

“Ye sons of iron, copper, brass and steel, who have not heads to think, nor hearts to feel—”

[ हे लोखंड, तांबें, पितळ आणि पोलाद इत्यादि जड धातूंच्या निर्विकार व शून्यहृदय पुत्रांनो--]

हें भाषण पुढें चालणार तों त्या गृहस्थानें ग्यारिकला थांबवून विचारलें, “या भाषणाचा अर्थ काय?” तेव्हां ग्यारिकनें उत्तर दिलें कीं, “जर माझ्या भाषणाचा प्रेक्षकांच्या मनावर कांहीं परिणाम होण्यासारखा नाहीं असें मला दिसत आहे, तर अशापुढें भाषण करण्यापासून फायदा काय?”

ग्यारिक प्रेक्षकांकडून वाहवा मिळविण्याच्या कामांत फार अधाशी असे, असें त्याचे टीकाकार म्हणतात. नाटकगृहांत प्रेक्षकांकडून व टीकाकारांकडून टाळ्यांचा वर्षाव जरी झालेला असला तरी पुन्हा तो अगदीं कोन्याकोंपऱ्यांतल्या एखाद्या हुजऱ्याकडे किंवा लहानशा मुलाकडे दृष्टि फेंकून त्याच्यावर आपल्या भूमिकेचा कांहीं परिणाम झाला आहे कीं नाहीं हें पाहात असे. आपण काय दाखवितों हें सामान्य मनुष्याला सुद्धां समजलें पाहिजे याबद्दल तो दक्ष असे.

नाट्यविषयक इतिहासांत टीकाकार-वर्गांत चर्चिल, ली हंट, डिब्डीन यांचीं नांवें वरचेवर वाचण्यांत येतात. त्यांनीं ग्यारिकचें वर्णन अनेक ठिकाणीं केलें आहे, त्यावरून ग्यारिकचें नाट्य-कुशलत्व जसें दिसून येतें तशी त्याच्या टीकाकारांत नाटक पाहाण्याची विद्या कशी होती हेंही समजून येतें.

चर्चिल या टीकाकारानें, ग्यारिकच्या अभिनयाचें पुढील वर्णन केलें आहे:—

“If manly sense, if nature link'd with art;
If thorough knowledge of human heart;

If power of acting vast and unconfin'd
If fewest faults with greatest beauties join'd
If strong expression, and greatest powers
which lie
Within the magic circle of the eye;
If feelings which few hearts like his can know,
And which no face so well as his can show;
Deserve the preference; Garrick take the chair
Nor quit it, till thou place an equal there.

[ जर बुद्धिमत्ता, ज्याशीं कलेचें संमेलन झालें आहे असा स्वभाव-सिद्ध गुण, मानवी अंतःकरणाचें पूर्ण ज्ञान, अभिनय दाखविण्याची विशाल आणि अप्रतिबद्ध शक्ति, 'एकोहि दोषो गुण सन्निपातो', या उक्तीप्रमाणें अल्पदोष व गुण-समुच्चयाची त्याशीं सांगड, स्पष्ट मुद्राविर्भाव, नेत्राच्या मोहक वर्तुळांतील प्रखर तेज, इतर ठिकाणीं क्वचित् दिसणारी अंगची सहृदयता-जी फार थोड्यांना आपल्या मुद्रेवर दाखवितां येईल-इत्यादि इत्यादि सर्व गुणांना कांहीं महत्त्व असेल तर, अशा गुणांनीं भूषित असा, ग्यारिक तूंच एक आहेस. व जोंपर्यंत तुझ्या समानधर्मा तुझें सिंहासन घेण्याला योग्य असा उत्पन्न झाला नाहीं तोंपर्यंत तूं हें सिंहासन सोडूं नकोस.]

ग्यारिकच्या नजरेंत प्रेक्षकांना निरनिराळे मनोविकार दिसत असत त्याच्या एका टीकाकारानें यासंबंधानें जें वर्णन केलें आहे, त्यांत टीकाकाराचीही कुशाग्र दृष्टि दिसून येते. तें वर्णन हें:—

"एका प्रयोगांत ग्यारिककडे बधिर मनुष्याची भूमिका होती. अर्धवट बधिर माणसें मोठीं चाणाक्ष असतात. पुरें ऐकावयास तर येत नाहीं; परंतु दुसऱ्याचें बोलणें ऐकण्याची इच्छा-तिच्यांतच दुसरा काय बोलला तें आपल्याला समजलें हें दाखविण्याची लकब; परंतु पाहिजे तितकें ऐकावयास मिळालें नाहीं म्हणून निराशा-इतक्या क्रिया-अभिनयानें व मुद्रेनें दाखविणें किती कठीण असेल? व या गोष्टींचें शब्दांनीं चित्र वठवून देणें ह्याहीपेक्षा

कठीण आहे. दृष्टींत जडपणा व उल्हास हे दोन्हीही विकार, गोंधळलेली मुद्रा-परंतु तिच्यांत थोडासा पाणीदारपणा-त्यांत किंचित् मूर्खपणाची झाक, या क्रिया व आविर्भाव ग्यारिकनें दाखवून प्रेक्षकांत आचंबा उत्पन्न केला. परंतु टीकाकार म्हणतो कीं, "हें सर्व वर्णन मूळ कृतीच्या दहाव्या हिश्शानें तरी माझ्याकडून शब्दांत उतरलेलें आहे कीं नाहीं, याची मला शंका आहे."

दुसरा एक टीकाकार ग्यारिकचे अभिनय पाहून म्हणतो कीं, "मी लंडन येथें दोन वर्षें होतों, तेव्हां ग्यारिकचें नाटक पाहाण्यास नेहमीं जात असें. त्याचा अभिनय पाहून मला इतका आनंद होत असे कीं, रेशमाच्या दोरीनें तो मला नाटकगृहाकडे खेंचून नेतो कीं काय, असा मला भास झाल्याप्रमाणें होई. त्याच्या 'किंग लियर' नाटकांतील लियरच्या भूमिकेचें वर्णनच करतां येत नाहीं." टीकाकारानें लियरच्या दुसऱ्या अंकांतील चौथ्या प्रवेशांतील भाषणामधून एका वाक्याच्या अभिनयाचा उल्लेख केला आहे. तें वाक्य हें—

"I will do such things-What they are
Yet I know not."

टीकाकारानें या वाक्याचा पूर्वापार संबंध दिला नाहीं. म्हणून वरील वाक्याचा ओघ समजण्याकरितां मुळांतील लियरचें या प्रसंगाचें समग्र भाषण येथें दिलें आहे:—

"O reason not the need : our basest beggars
Are in the poorest thing superflous:

................................................................

................................................................

बोलतां बोलतां त्याच्या अंतःकरणाचा क्षोभ परमावधीला गेला व त्यांत तो आपल्या मुलींना म्हणतो आहे:—

No you unnatural hags
I will have revenges on you both
That all the world shall-*I will do such things—*
*What they are, yet I Know not;*

याच्यापुढचें वाक्य-but they shall be
The terrors of the earth......*
बोलण्याचें त्याला भान राहिलें नाहीं; परंतु या विशिष्ट वाक्याच्या अभिनयाचा परिणाम प्रेक्षकांच्या मनावर इतका कांहीं झाला कीं, त्यांचा हृदयाला तो भिनला. टीकाकारानें तेवढेच उद्गार चरित्रांत दिले आहेत.

चार्लस डिब्डीन नांवाचा एक टीकाकार होऊन गेला. (१७४६-१८१४). त्यानें म्हटलें आहे कीं, ग्यारिकची मुद्रा म्हणजे तिच्याबद्दल पाहिजे ती कल्पना करावी अशी आहे. वृद्धपणाला म्हटलें तर त्याला शोभणारी आहे. तरुणपणाला शोभणारी आहे. तिच्यावर वैभव शोभा देईल व दारिद्र्याचेंही हुबेहुब चित्र तिच्यावर उमटलेलें दिसेल. हाच टीकाकार असेंही आणखी म्हणतो कीं, ग्यारिक रंगभूमीवर असो, बाहेर असो, एकटा असो, किंवा मंडळींत असो, कोणत्याही अभ्यासांत, कामांत असो किंवा धंद्यांत असो; सारांश, कशाही रीतीनें गुंतलेला असो, तो नखशिखांत नट आहे. जसा पोप हा आजन्म अंतर्बाह्य कवि आहे-Nothing but a poet-तसा ग्यारिक हा अंतर्बाह्य नट आहे.-Nothing but an actor.

ग्यारिकच्या अभिनयासंबंधानें नटवर्गाकडूनही स्तुतीचे उद्गार आले आहेत. एका प्रसिद्ध नटानें म्हटलें आहे कीं,—ग्यारिकची काठीसुद्धां लियरच्या भूमिकेंत आपलें कसब दाखवीत असते.

---

* किंग लियर नाटकाचें थोडक्यांत कथानक असें आहे कीं, लियरनें आपलें राज्य दोघां मुलींत वाटून दिलें होतें. त्याला तीन मुली होत्या; परंतु दोघींनीं आमची प्रीति तुमच्यावर सर्व दृश्य अदृश्य वस्तूंहूनं अधिक आहे असें सांगितलें व तिसरीनें माझी प्रीति मुलगी म्हणून बापावर व पत्नी म्हणून भर्त्यावर जितकी असावयास पाहिजे तितकी आहे व राहील असें सांगितलें; परंतु राजाला दोघी मुलींचें वरकरणी प्रीतीचें भाषण खरें वाटून त्यानें आपलें सर्व राज्य दोघींत वांटून दिलें. पुढें या दोघी मुली 'कृतघ्न बनून बापाशीं बेपर्वा होऊन त्याची अवहेलना करूं लागल्या.' त्यामुळें लियरची चित्तवृत्ति भ्रमिष्टासारखी झाली व त्या क्षोभांत त्याचें हें वरील भाषण आहे. कै० श. मो. रानडे यांनीं नाट्यकथार्णव मासिकांत 'अतिपीडचरित' म्हणून याचें भाषांतर केलें आहे.

प्रसिद्ध नाटककार शेरिडन यानें ग्यारिकच्या नाट्यनैपुण्याबद्दल आपला अभिप्राय याप्रमाणें दिला आहे:—

The grace of action, the adapted mien
Faithful as nature to the varied scene;
The expressive glance–whose subtle comment draws
Entranced attention and a mute applause,
Gesture that marks with force and feeling fraught,
A sense in silence and will in thought;
Harmonious speech, whose pure and liquid tone
Gives verse a music scarce confessed its own.

[अभिनयाचा मोहकपणा, निरनिराळ्या प्रसंगांना उपयुक्त अशी निसर्गसिद्ध शरीराची ठेवण, आपल्या पाणिदारपणामुळें प्रेक्षकांची तन्मयता व मूकवृत्तीची प्रसन्नता आपल्याकडे ओढून घेत आहे, अशी अर्थबोधकदृष्टि, स्पष्ट मनोविकार, मुग्धपणांत गर्भित अर्थ व विचारांत निश्चितपणा दाखविणारे आवेशयुक्त अभिनय आणि काव्यांत स्वतःसिद्ध संगीताचा भास उत्पन्न करणारें मधुर आणि आर्द्र स्वरांतील सुरस भाषण हे गुण ग्यारिकच्या अभिनयांत आहेत.]

इ० सन १८११ सालच्या 'रिफ्लेक्टर' नांवाच्या वर्तमानपत्रांत ग्यारिकच्या वेळीं नाटक पाहिलेल्या एका गृहस्थाचा अभिप्राय प्रसिद्ध झाला होता. तो म्हणतो —

"आजपर्यंत मी नाटकाला गेलों नव्हतों, आज माझी लहर लागली म्हणून करमणुकीसाठीं नाटकाला गेलों. नाटकाला आरंभ होईपर्यंत मीं मित्रा बरोबर गप्पा मारल्या; पण पडदा उघडतांच मला माझ्या गप्पा थांबविणें भाग पडलें. कारण स्टेजवर मी अशी एक मूर्ति पाहिली कीं, मी चकित झालों. तें डोळ्याचें पाणी व अंगविक्षेप पाहून मी त्या माणसाची विचार-पूस करूं लागलों. तेव्हां मला असें समजलें कीं, नांवाजलेले नट मि० ग्यारिक ते हेच. सुख आणि दुःख हें शब्दांनीं व्यक्त करीत बसण्यापेक्षां मुद्रेनें व

अंगविक्षेपानें तें दृष्टोत्पत्तीस आलें पाहिजे. मीं माझ्या प्रियकर मित्राला बोलूं नकोस असें सांगितलें. खरें म्हटलें असतां त्याची माझी भेट बरेच दिवसांत झाली नव्हती. मी त्याच्याशीं बोलावयास पाहिजे होतें, परंतु आश्चर्य आणि आनंद होऊन मी समाधानवृत्तीनें ग्यारिककडे बघत राहिलों. प्रेक्षकांत हूं कीं चूं होत नव्हतें."

एका प्रसिद्ध नटीनें ग्यारिकला लिहिलें होतें कीं, "ज्या वेळेला तुमच्यावर लोकांकडून स्तुतीचा सारखा वर्षाव चालला होता, ज्या वेळीं तुम्हांला फक्त ग्यारिक म्हणून कोणी एक तरुण, देखणा व लोकांचें मन-रंजन करणारा एक नट आहे, असें सर्व स्त्री-पुरुष ओळखीत होते व तुमच्या प्रत्येक कृतीचें व लेखाचें वर्णन करीत होते, त्या वेळची मी–जिला तुम्ही पी. व्ही. म्हणून म्हणत होतां, ती–असें सांगूं शकते कीं, तुमच्या अंगीं काय गुण आहेत हें लोकांच्या समजण्यांत आलें नव्हतें व समजण्याची त्यांची पात्रताही नव्हती. ज्यांना स्वतःचें डोकें नव्हतें अशा मट्ठ प्राण्यांच्या डोक्यांत तुमचे विचार घुसविण्याचा प्रयत्न करतांना व तुमच्या हातांतील जादूच्या घणाचे घाव त्यांच्या डोक्यावर घालतांना मीं तुम्हांस पाहिलें आहे; या वेळेची तुमची गंभीरवृत्ति मीं पाहिली आहे; व जेव्हां तुमचे श्रम निष्फळ होत, तेव्हां तुमचा तो मेंढरासारखा शांतपणा सिंहाच्या उग्र स्वरूपांत येतांनाही मीं पाहिला आहे. नटांना वाटे कीं, आमच्या कसबांत आम्ही तयार झालों आहोंत; परंतु त्यांचे गुण प्रसिद्धीस आणण्याच्या कामांत तुम्हाला कशीं कशीं सूत्रें संभाळावीं लागत असत याची कल्पना त्यांना कोठून असणार?"

ही नटी ग्यारिक रंगभूमीवर असतांना, एका प्रसंगीं आंत उभी होती. ग्यारिकचे अभिनय पाहून प्रसंग असेल तशी रडत असे व संतापत असे. त्याच्या अभिनयाचा तिच्यावर इतका परिणाम झाला कीं, शेवटीं ती संतापून तेथून चालती झाली व म्हणाली, "मेल्यानें आपल्या अभिनयानें मला सतावून सोडलें."

ग्यारिकच्या हाताखालीं असलेल्या एका नटानें, त्याच्या मृत्यूनंतर असे उद्गार काढलेले आहेत कीं, "ग्यारिकला मी देवासारखा समजत

होतों. याशिवाय त्याच्यासंबंधानें दुसरें कांहीं मला म्हणतां येत नाहीं. मी त्याच्या वेळीं जन्मास आलों ही गोष्ट मी माझ्या आयुष्यांतील मोठ्या भाग्याची समजत आलों आहे."

ग्यारिककडे जीं टीकांचीं पत्रें येत तीं तो पद्धतशीर व्यवस्था लावून ठेवीत असे. कांहीं पत्रें ग्यारिकला अभिनय कसा करावा म्हणून शिकवणुकीचीं असत. प्रत्येक पत्रावर तो स्वतःचा शेरा मारून ठेवीत असे. 'माझ्या मॅक्बेथच्या भूमिकेवर टीका', 'उत्तर पाठविलें' असे शेरे त्यावर असत. त्याच्या हाताखालीं काम करावयाचें म्हणजे अंगमेहनतच केली पाहिजे असें नट म्हणत असत. तो स्वतः अविश्रांत श्रम करीत असे. तेव्हां माझ्या हाताखालीं काम करणारांनींही तसेच श्रम केले पाहिजेत असें त्याचें सांगणें असे.

ग्यारिकच्या टीकाकारांनीं त्याला Charactor actor स्वभावदर्शक नट असें नांव दिलें होतें. तो Romantic actor म्हणजे भावनाप्रधान–अतिशयोक्तीच्या रसाच्या भूमिका करणारा नव्हता. शेक्स्पीयरच्या "रोमियो"पेक्षां त्याची "म्याक्बेथ"ची भूमिका चांगली होत असे, असें त्याच्या टीकाकारांचें मत असे. एका बधिर चित्रकारानें असें म्हटलें आहे कीं, "ग्यारिकची मुद्रा म्हणजेच भाषा आहे" ग्यारिकच्या अभिनयानें जितका त्याच्या अंतःकरणावर प्रकाश पडत असे तितका दुसऱ्या कोणत्याही नटाच्या अभिनयानें पडला नाहीं.

जान्सननें त्याच्या अभिनयाबद्दल म्हटलें आहे कीं, "शोक व हास्यारसांतील अभिनयांत निष्णात असा मीं एकच नट ग्यारिक पहिला. भूमिकेची खरी कल्पना घेऊन ती वठवून दाखविणें हाच त्याच्या अंगीं मुख्य गुण आहे."

शेक्स्पीयरच्या नाटकांशिवाय दुसऱ्या नाटककारांच्या नाटकांतूनही पुष्कळ भूमिका ग्यारिकनें केल्या; व त्यांत आपलें अभिनयनैपुण्य दाखविलें; परंतु तीं नाटकें मराठी भाषेच्या वाचकांना अगदींच अपरिचित असल्यानें त्या नाटकांतील याच्या भूमिकांसंबंधानें या चरित्रांत कांहीं लिहिलें नाहीं.

## नटांस उपदेश

ग्यारिकनें नटांस उपदेश म्हणून केव्हां केव्हां जे उद्‌गार काढलेले आहेत ते आमच्या नटवर्गानें विचार करण्यासारखे आहेत. कारण आमच्या नटांची दिनचर्या पाहिली तर त्यांच्या डोक्यावर एक दिवस जाऊन दुसरा दिवस उगवतो हें जसें कांहीं ओझें असतें. पहिल्या दिवशीं जसा त्यांना खाणेंपिणें, नटणेंमुरडणें याशिवाय दुसरा कांहीं उद्योग नसतो, तसाच दुसऱ्या दिवसाकरितांही नसतो. रंगभूमीचें काम (प्रॉक्सीनें) मुखत्यारपत्रानें करतां येत नाहीं ही रंगभूमींच्या सृष्टींत चुकारतट्टू नटांच्या दृष्टीनें मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे. अशा नटांनीं ग्यारिकचा पुढील उपदेश लक्षांत ठेवण्यासारखा आहे.

"तरुण माणसें आपला वेळ खुशामती लोकांच्या संगतींत व गप्पागोष्टी करण्यांत घालवितात, तो न घालवितां त्यांनीं त्यांच्याकडे ज्या भूमिका असतात, त्यांच्यासंबंधानें चिंतन व अभ्यास करण्यांत घालविला पाहिजे. त्यांची एक सबब असते कीं, 'आम्ही जे चार मंडळींत जातों ते आमच्या फायद्याकरितां जातों'. परंतु ही सबब अगदीं पोरकट आहे, त्यांचा फायदा त्यांनीं जर आपल्या धंद्यांत कीर्ति मिळविली तरच होणार आहे. त्यांनीं आपल्या आळसानें आपलें नांव घालविलें तर ज्यांच्या संगतींत त्यांनीं ख्यालीखुशालींत दिवस घालविले तेच स्नेही प्रथम नटांची संगती सोडतील. नटांनीं लोकप्रीति अंगच्या घामानें व कष्ट करून संपादन केली पाहिजे. ती केली म्हणजे ते कोणत्याही लोकांत मिसळले तरी जे गुणग्राहक आहेत तेच खरे उपयोगी पडतील."

नट सुशिक्षित कां असावेत, याचें उत्तर पुढील उपदेशांत आहे:—

"नाट्यकलेचें ज्ञान देणाऱ्या पुस्तकांशिवाय दुसरींही पुस्तकें तुम्हीं वाचलीं पाहिजेत अशी मी तुम्हांस शिफारस करतों. कारण, तुमच्या धंद्याशिवाय इतर गोष्टींचें ज्ञान संपादन केल्यानें तुमचें महत्त्व वाढणार आहे. बहुतेक नट पोपटाप्रमाणें दुसऱ्यानें पढविलेले शब्द पाठ करूनच राहातात; व जसें पोपटाला आपला पिंजरा हेंच काय तें जग आहे असें

वाटत असतें, त्याप्रमाणें नटांचे सर्व व्यवहार नाटकाच्या धंद्यापुरतेच असतात. जगांत काय चाललें आहे याचें त्यांना ज्ञान नसतें."

"पात्रांनीं जो प्रवेश चालला आहे, त्याकडे स्थिरपणानें लक्ष देणें हें अभिनयाचें अंग आहे. आत्मगत भाषण करतांना स्वरामध्यें फेरफार करणें ही मुख्य कला आहे. ही कला भाषण करतांना कोठें विराम द्यावयाचा व किती द्यावयाचा यांकडे लक्ष दिल्यानेंच साध्य होणारी आहे."

प्रेक्षकांकडून टाळ्या मिळविण्याविषयीं नट हापापलेले असतात. त्यासंबंधानेंही ग्यारिकचा उपदेश लक्षांत ठेवण्यासारखा आहे:—

"आणखी एक गोष्ट मला सांगावयाची आहे, ती ही कीं, प्रेक्षकांच्या टाळ्या मिळविण्याकरितां आपली योग्यायोग्य विवेचकशक्ति व मनोधर्म बदलून त्यांच्या छंदानें चालण्यापेक्षां तुमच्या अंगचे खरे गुण प्रेक्षकांना दाखवा म्हणजे त्यांची अभिरुचि आपोआप तुमच्या बाजूला वळेल."

कित्येक नटांना आपल्या भाषणांत पदरचीं भाषणें घुसडण्याची संवय असते; हीं भाषणें सर्वकाळ प्रसंगाला अनुरूप असतात असें नाहीं. जेव्हां तीं अनुरूप नसतात तेव्हां तीं रसभंग करतात. यासंबंधानें ग्यारिकचा पुढील उपदेश आहे:—

"Ye actors who act what our writers have writ,
Pray stick to your part and spare your own wit.
For with your own, you unbridle your tongue
I will hold ten to one you are in the wrong."

[ कवीनें जें लिहिलें असेल, त्याला चिकटून राहाणें चांगलें. तेथें आपलें शहाणपण बाजूला ठेवा. तुम्ही आपली जीभ अशी सैल सोडाल तर तुम्ही दहा जरी एकमताचे असाल तरी मी असें म्हणेन कीं, तुम्ही प्रमाद करतां आहां.] *

* शेक्स्पीअरनें हॅम्लेट नाटकांत नटास हॅम्लेटकडून जो उपदेश केला तोही असाच आहे:—

ग्यारिकनें एका नटाला पत्र लिहिलें, त्यांत नटांच्या दिनक्रमाबद्दल पुढील उद्गार आहेत—

" तुम्ही आपल्या धंद्यांत यश मिळवीत आहां, हें ऐकून मला आनंद होत आहे. हें यश कायम राखणें सर्वस्वीं तुमच्यावर अवलंबून आहे. तुमच्यापैकींच एक जुनापुराणा शिपायी गडी या नात्यानें, पूर्वींच्या तरुण होतकरू नटांचा मार्ग कसा चुकला हें मला तुम्हांला दाखवावयाचें आहे. प्रेक्षकांकडून त्यांची स्तुति होत गेल्यामुळें ते शेंफारल्यासारखे होत असत व सामान्य प्रतीच्या लोकांकडून खुशामत करून घेण्याची त्यांना संवय लागल्यामुळें खऱ्या अभ्यासाकडे दुर्लक्ष होऊन रिकामटेकड्या लोकांच्या संगतींत त्यांचा काळ जाऊं लागला. या वर्तनक्रमामुळें त्यांच्या तुटपुंजा गुणांचा सांठा लवकरच रिता झाला व खाणेंपिणें, गप्पागोष्टी हाच त्यांचा व्यासंग बनला. रंगभूमीवर कसें तरी शब्द आठवून वेळ मारून नेण्याची त्यांना खोड जडली. तुम्हांस मुख्य गोष्ट सांगावयाची ती ही, तुम्हीं या धंद्यांत प्रामाणिकपणानें चालण्याचा उद्देश कायम ठेवा. ज्यांच्याशीं तुम्ही करारानें बांधले गेले आहांत, तो कोणत्याही बाहेरच्या फायद्याच्या लालुचीनें मोडूं नका. निश्चितपणा आणि चिकाटी तुमच्या धंद्यांत सावकाशीनें कां होईना; पण खात्रीनें यशच देईल. एका संस्थेंतून दुसरींत जाणें, भटकणें, पोंकळ घमेंड बाळगणें या गोष्टी तुमची फसगत करतील, तुम्हांस भ्रमांत पाडतील आणि शेवटीं तुमची सर्वस्वीं नुकसानी करतील हें पक्कें लक्षांत ठेवा."

## ग्यारिकविषयीं लोकमत

इंग्लंडच्या वरच्या वर्गाच्या समाजांत सन १७४० पासून १७८० पर्यंतच्या काळांत, जे मुत्सद्दी, कवि, विद्वान्, गुणी व रसिक पुरुष प्रसिद्ध होऊन

---

( * मागील टीपेवरून पुढें चालू )

" Let those that play your clowns speak no more than is set down for them."

[ तुमच्यांत, विदूषकाचें काम करणाराला सांगा कीं, जें काम तुम्हांला नेमून दिलें आहे त्यापेक्षां पदरचें कांहीं बोलूं नका. ]

गेले, त्यांमध्यें ज्याचें नांव ऐकतांच लोकांची जिज्ञासा अधिक जागृत व्हावी असा ग्यारिकशिवाय दुसरा कोणी प्रसिद्धीस आला नाहीं. त्याच्या निरनिराळ्या गुणांसंबंधानें अनेक ग्रंथकारांनीं अनेक उद्गार काढले आहेत. एक ग्रंथकार लिहितो कीं:—

"ग्यारिक कोवळ्या मनाचा होता. त्याची गुणग्राहक दृष्टि असे. त्याच्या दृष्टिपथांत कोणतीही गोष्ट येवो, मग ती मनोविकाराची दर्शक असो, अभिनयसूचक असो, किंवा अन्य कांहीं असो तिचा ठसा आपल्या मनावर पूर्ण बिंबवून घेऊन, नंतर तिचें बरोबर अनुकरण करून तो दाखवीत असे. दुसऱ्यांना आनंद देण्यांत त्याला हर्ष होत असे. आपल्या बुद्धीचा प्रभाव दुसऱ्यावर पडलेला पाहून तो आणखी दाखविण्याविषयीं प्रयत्न करण्याची त्याला स्फूर्ति होई. प्रेक्षकसमुदायानें तुडुंब भरलेलें नाटकगृह असो, अमीर-उमराव व रसिक लोक आले आहेत असा मेजवानीचा प्रसंग असो, छोट्या छोट्या मुलांचा मेळा जमलेला असो, मोकळ्या मैदानांत एखाद्या शिपायाचा मुलगा भेटो किंवा कोणा आढ्यता बाळगणाऱ्या माणसाशीं त्याची गांठ पडो, तो त्याच्याशीं सौजन्यानं, उदारपणानें-परंतु आपली इभ्रत संभाळून वागत असे. अगदीं निकट सहवासाच्या मित्रमंडळींत असला तरी तिच्याकडून वाहवा मिळविण्याची क्लृप्ति त्याच्यांत असे. तो उत्तम लेखक, विनोदी व रसिकांचा चाहता होता."

पोप कवीचें मत ग्यारिकची भूमिका पाहून प्रथमदर्शनींच काय झालें हें मागें सांगितलें आहेच. तो म्हणाला, "याच्या बरोबरीचा नट झाला नाहीं व होणारही नाहीं." ‡

‡ ग्यारिकनें प्रथम पोप नाटकगृहांत आलेला पाहिला तेव्हां त्याच्या मनाची काय स्थिति झाली याबद्दल ग्यारिक सांगत असे:

"पोपला पाहून माझें काळीज धडधड करूं लागलें. अंतःकरणाची खळबळ उडाली; परंतु एकप्रकारें माझ्या मनाला उल्हासही वाटूं लागला. मी त्या वेळीं अगदीं तरुण असें व महत्त्वाकांक्षेच्या शिखराला पोंचलों होतों. माझी रिचर्डची भूमिका पाहाण्याकरितां पोप आले आहेत हें पाहूनच मला विशेष आनंद झाला.

जान्सनचें मत केव्हां केव्हां ग्यारिकच्या विरुद्ध असे. तरी त्याची योग्यता तो जाणून होता. त्यानें म्हटलें आहे कीं, जे प्रसिद्ध पुरुष होऊन गेले, त्यांची कीर्ति त्यांच्यापासून दूर असे; परंतु ग्यारिकची कीर्ति त्याच्या पायाशीं लोळण घालीत होती. कानाशीं दुमदुमत होती व प्रत्येक रात्रीं हजारों लोकांकडून आलेल्या स्तुतीबरोबर त्याच्या उशाशीं खेळत होती. त्याचा प्रवेश मोठ्या लोकांच्या समाजांत, त्यांच्या पंक्तीला व त्यांच्या अगदीं अंतर्महालांत झाला तो त्याला आपोआप मिळाला नाहीं, तर त्यानें तो आपल्या कर्तबगारीनें करून घेतला. त्याच्या दराऱ्यामुळें, त्याची मेहेरबानी संपादन करण्याच्या आशेमुळें व त्याच्याविषयीं आदर असल्यामुळें, त्याच्या हाताखालीं जे लोक येऊन गेले ते त्याशीं नमून होते. **आपल्या धंद्याला जर कोणी भूषण आणलें असेल तर तें ग्यारिकनेंच.**"

स्मालेट नांवाचा एक ग्रंथकार लिहितो कीं, ग्यारिकनें आपल्या कल्पकतेनें व शिस्तीनें नाट्यकलेची सुधारणा करून तिला रमणीय स्वरूप आणिलें. या कामांत या धंद्यांतील जुन्या पिढींतल्या लोकांना त्यानें फार मागें टाकलें. अभिनय, बुद्धिमत्ता. स्वर-भेद, डोळ्यांतील प्रखर जादू, हालचालींत उल्हास व पाणीदारपणा, चालचलणुकींत सभ्यपणा व मुद्रेवरचा मोहकपणा या गोष्टींत तर प्रत्येक राष्ट्रांतल्या धंदेवाल्या लोकांस त्यानें कित्ता घालून दिला म्हटलें तरी चालेल.

एका दरबारी कवीनें त्याला असें म्हटलें होतें कीं, "राष्ट्राला योग्य

---

[ मागील टीपेवरून पुढें चालू.]

ते रंगभूमीला लागून असलेल्या चप्प्यांत ( Box ) बसले होते. मी रंगभूमीवर आल्याबरोबर त्यांनीं माझ्याकडे जी रोखून दृष्टि लावली, तिनें विजेचा धक्का बसावा त्याप्रमाणें मला झालें व कांहीं उल्हास व कांहीं भीति यामुळें, आरंभ-करतांना माझी थोडीशी धांदलही उडाली; परंतु जशी जशी मी घेतलेली रिचर्ड-ची भूमिका खुलूं लागली तसा तसा प्रेक्षकांतून टाळ्यांचा वर्षाव होऊं लागला व पोपही आपल्या हातानें मला आशीर्वादपूर्वक प्रोत्साहन देत आहेत असें मला वाटूं लागलें.

अभिरुचि लावणें तुमच्यावर अवलंबून आहे. इतकेंच नाहीं तर राष्ट्र सद्गुणी करणें हेंही तुमच्यावर अवलंबून आहे."

[ A nation's taste depends on you !
Perhaps a nation's virtue too.]

इंग्लंडचा इतिहासप्रसिद्ध मुत्सद्दी पिट, अर्ल ऑफ च्याथ्याम राज्य-कारभारांतून मुक्त झाल्यावर आपल्या वतनवाडीच्या गांवीं ग्यारिकला पाहुणचाराकरितां बोलवितांना लिहितोः

Leave Garrick, the rich landscape proudly gay;
Docks, forts and navies brightning all the bay;
To my plain roof repair, primeval seat

* * *

Come, then, immortal spirit of the stage
Great natur's proxy, glass of every age !
Come taste, the simple life of patriarch of old
Who rich in rural peace ne'er thought of gold.

[ ग्यारिक यांस—ज्यांना नाट्यकलेचा अमर आत्मा, विविध मनोवृत्तीचा प्रतिनिधि व प्रत्येक कालाचा आदर्श असें समजलें जातें, त्यांस विनंति कीं, तिकडील किल्ले, बंदरें, आरमारें, खवळणारे उपसागर, रमणीय प्रदेश कांहीं काळ सोडून माझ्या पूर्वजांनीं वैभव व संपत्ति यापेक्षां एकांतवासांतच सौख्य मानलें, त्यांच्या पर्णकुटिकेला, शांततेच्या सुखाचा आस्वाद घेण्याकरितां तुमचे पाय लागूंद्या. ]

पिटच्या बरोबरीचाच किंबहुना कांकणभर योग्यतेनें जास्त असा दुसरा इंग्लंडच्या इतिहासांतील प्रसिद्ध पुरुष व वक्ता एडमंड बर्क याचे ग्यारिकबद्दल असे उद्गार आहेत कीं, तो नट-वर्गांत प्रमुख नट होता. कारण मानवी स्वभावाचें अतिशय सूक्ष्म निरीक्षण करणारांपैकीं तो एक होता—

He was the first of actors, because he was one of the deepest observers of human nature.*

ग्यारिक डब्लीन येथें गेला असतांना (१७४६ त्याच्याबद्दल स्तुतीचें लेख वर्तमानपत्रांतून आले होते, त्यांपैकीं पुढील एक वाचण्यासारखा आहे–

" O thou, the Phinix (¶) of the age,
The prop and glory of the stage—
Thou Proteus,* that with so much ease
Assumest what charactor you please."

या वर्णनांत ग्यारिकला रंगभूमीचा आधारस्तंभ व रंगभूमीचें वैभव असें म्हटलें आहे

डब्लीनच्या पहिल्या खेपेंत त्याला तेथील लोकांनीं " रोझ्यस " असा किताब दिला होता. Roscious हे नांव पाश्चात्यांच्या पुराणांतील (Scriptural) आहे. नेहमीं ग्यारिकला उद्देशून लिहितांना किंवा बोलतांना या नांवाचा पुढें उपयोग केला जात असे.

Roscious Paris (†) of the stage
Born to please a learned age.

---

* बर्कनें स्वतः एक शोकपर्यवसायी नाटक लिहिलें होतें. फॉक्सनें ( बर्कच्या बरोबरीचा वक्ता ) " हें नाटक तुम्हीं ग्यारिकला दाखविलें होतें काय ? " म्हणून एकदां विचारलें. त्याचें उत्तर बर्कनें दिलें तें हें–" नाहीं, जरी मी नाटक लिहिण्याचा मूर्खपणा करून बसलों आहें तरी तें माझ्यापाशींच ठेवण्याचा शहाणपणाही मीं केला आहे."

¶ इजिप्शन पुराणांतील काल्पनिक पक्षी. हा शेंकडों वर्षें जगतो. या आख्यायिकेला अनुसरून ग्यारिकला फिनिक्स हें नामाभिधान मिळालें असावें व त्याचें कीर्तिरूप अमरत्व सूचित केलें असावें.

* ही प्राचीन ग्रीक लोकांची सागरदेवता आहे. ही पाहिजे तेव्हां पाहिजे ती आकृति धारण करते अशी त्या लोकांची समजूत होती. ग्यारिक कोणतीही भूमिका सहज करून दाखवीत असे म्हणून याला 'प्रोटिअस' असें नांव दिलें गेलें असावें.

† हा एक राजपुत्र होता, पोपच्या 'इलियड' काव्यांत याचें नांव आहे.

[ "रोझ्यस" हा सुधारणेच्या युगांत लोकांचें मनरंजन करण्याकरितां जन्मास आला आहे ]

जान्सननें ग्यारिकच्या अभिनयपटुत्वाबद्दल असें म्हटलें आहे कीं, "शोकरसांतील व हास्यरसांतील भूमिका करण्यांत निष्णात असा मी एकच नट–'ग्यारिक' पाहिला. भूमिकेची खरी कल्पना घेऊन ती वठवून दाखविणें हें त्याचें खरें ब्रीद असे."

वरील मताला अनुरूप असेच उद्गार ग्यारिकच्या एका भक्तानें काढले आहेतः

How did my swelling bosom glow
To see thy Lear's majestic woe;
And yet, O strange! on the same night,
How did thy "Lying Sharp delight!"

[ "Lying Sharp" हें एका नाटकांतील भूमिकेचें नांव आहे.]

एका रात्रींत रसाला परस्पर भिन्न अशा दोन भूमिका करून दाखविण्यांत ग्यारिकला अभिमान वाटत असे. प्रथम 'रोमियो' किंवा 'लियर' सारखी शोकरसाची भूमिका करून दाखविल्यावर अगदीं हास्यकारक भूमिका तितकीच परिणामकारक करून दाखविणें त्याला सहज गोष्टीसारखें वाटत असे.

डिब्डीन या टीकाकाराचा पूर्वीं उल्लेख येऊन गेलेलाच आहेच. यानें उत्तम प्रतीच्या नटांची व नटींची जी परंपरा लावली आहे, तिच्यांत पहिला बेटर्टन (१६३५–१७१०) त्यानंतर बूथ (१६८१–१७१ ) त्यानंतर काली सिबर (१६६१–१७५७) अशी नाट्यकलेंत निपुण नटांची परंपरा लावली आहे. तो म्हणतो कीं, हे नट कोणाचें नाहीं कोणाचें अनुकरण करून प्रसिद्धीस आले होते; परंतु शेक्सपीयरच्या वेळीं उदयास आलेल्या नटापासून तों ग्यारिक उदयास येईपर्यंत नाट्यकला पूर्णत्वास पोंचली असें म्हणतां येत नाहीं. लोकांना अनुकरण करण्यास योग्य अशी ग्यारिकचीच नाट्यकृति दिसून आली.

## नाटककारांशीं प्रसंग

नाटक मंडळीचा मॅनेजर असेल त्याच्या कर्तव्यांत नाटककारांशीं प्रसंग ही एक महत्त्वाची बाब असते. ही केव्हां केव्हां सुखाची असते व केव्हां केव्हां त्यांशीं प्रसंग म्हणजे एक उपाधि होऊन बसते. ग्यारिकच्या काळांत शेक्सूपीयरच्या नंतर गोल्डस्मिथ व शेरिडनशिवाय कोणीच पुढें आला नाहीं; परंतु त्यांचीं नाटकें ग्यारिककडून रंगभूमीवर येण्याचा योग आला नाहीं. त्याच्या वेळेला खंडीभर नाटककार होते; त्यांच्या-बद्दल त्या वेळच्या लोकांची मोठीशी पूज्यबुद्धि असलेली दिसत नाहीं. कोणा ग्रंथकारानें अशा नाटककारांना barren rascals of the stage-"उथळ डोक्याचे नाटककार" अशी संज्ञा दिली होती. ग्यारिकचा प्रसंग पुष्कळ नाटककारांशीं पडत असे. त्यांपैकीं रंगभूमीवर दाखविण्याच्या योग्यतेचीं ज्यांचीं नाटकें असतील तीं तो पत्करीत असे. अशा नाटकांत-सुद्धां त्याला रंगभूमीच्या सोयीकरितां फेरफार करावे लागत असत. जीं त्याला पसंत नसतील, त्यांत काय फेरफार केले पाहिजेत हें तो दाखवून ठेवीत असे. अशा नाटककार वर्गांत कांहीं नाटककार हलाखींत दिवस काढणारे असत, तर कांहीं नांवारूपाला आलेले असत. (Some known to famine, some known to fame.) यांतच कांहीं ग्यारिकला सतावून सोडणारे असत. चरित्रकारांनीं ग्यारिकशीं प्रसंग पडलेल्या नाटककारांचें वर्णन केलें आहे त्यांत बहुतेक अशाच प्रकारचे आहेत.

नाटकाच्या हस्तलिखीत प्रति ग्यारिककडे पुष्कळ येत. त्यांची व्यवस्था लावण्याकरितां त्यानें मुद्दाम एक मनुष्य ठेवला होता. बहुतेक नाटकें तो गाडींत बसल्या बसल्या वाचीत असे व ज्या नाटकांत आपल्याला कांहीं विशेष करून दाखवितां येईल अशीं नाटकें तो पसंत करीत असे. त्याचें असें मत असे कीं, "नाटककारानें नटाला आपली बुद्धि व कल्पकता दाखवितां येईल अशी जागा ठेवावी. सर्व गोष्टी आपणच सांगून ठेवूं नयेत." अशा नाटककाराला त्यानें Acting dramatist म्हणजे नटानें कोणत्या ठिकाणीं कोणता अभिनय करावयाचा हें सुद्धां

नाटकाच्या प्रतींत मुचवून ठेवणारा नाटककार असें म्हटलें आहे. नटाच्या हातीं त्याची भूमिका आल्यावर त्याला आपली करामत दाखविण्याकरितां मोकळा सोडणारा नाटककार त्याला पसंत असे. नाटककाराचें काम म्हणजे नटापुढें आपण काय लिहिलें असेल तें मांडावयाचें; नंतर तें नटवावें कसें हें पाहाण्याचें काम नटाचें आहे असें त्याचें मत असे.

ग्यारिकला, शेक्स्पीयरच्या नाटकाखेरीज, इतर नाटकांत मनासारखे फेरफार करून तीं नाटकें घ्यावीं लागत असत. हीं नाटकें रंगभूमीवर आणण्याच्या कामांत त्याला पुष्कळ आरोप सहन करावे लागले व पुष्कळ शत्रूही उत्पन्न झाले. एखादें नाटक नापसंत झालें म्हणजे ग्यारिकविरुद्ध पत्रद्वारें टीकांचा वर्षाव होत असे. नाटककारांचा मोठा अपमान म्हणजे त्यांचें नाटक नापसंत होणें हा होय. ज्याला नाटकें लिहिण्याची पात्रता नाहीं, त्याला एखाद्या भिकारड्या वर्तमानपत्रांत चार ओळी खरडतां येतात. निराश झालेला नाटककार मग आपली विषारी नांगी वर्तमानपत्रांतून ग्यारिकवर चालवीत असे.* म्हणून ग्यारिक कोणत्याच नाटककाराला होय किंवा नाहीं न सांगतां, त्याला अधांतरीं ठेवीत असे. कारण एखाद्या नाटककाराला उमेद यावी याकरितां किंवा त्याचें मन न दुखवावे म्हणून "तुमचें नाटक बरें आहे" असें सांगावें तर, त्यांच्या महत्त्वाकांक्षा, मधाच्या पोंवळ्याभोंवतीं फेऱ्या घालणाऱ्या गांधीलमाशांप्रमाणें, ग्यारिकच्या भोंवतीं घिरट्या घालीत असत. "मग नाटक कधीं रंगभूमीवर आणतां?" असा सारखा नाटककाराचा भुंगा त्याच्यामागें लागावयाचा. कित्येकदां मोठ्या लोकांच्या भिडेनेंही त्याला हलक्या प्रतीचीं नाटकें स्वीकारणें भाग पडे. त्यामुळेंही त्याला नुकसान सोसावें लागत असे.

---

* महाराष्ट्रीय नाट्य-कलेच्या इतिहासांत "नाट्य-कला-रुक्कुठार" हें वाङ्मयही द्वेषजन्य आहे. यांतील प्रतिपाद्य विषय रा०रा० श्री. कृ. कोल्हटकर, यांचें "गुप्तमंजुष" नाटक आहे. हें नाटक किर्लोस्कर मंडळी करीत असे. रा० कोल्हटकरांना इतर नाटककारांत त्या वेळीं प्राधान्य मिळालें होतें, हें या लेखाचें कारण.

ग्यारिकच्या मागें लागणाऱ्या नाटककार-वर्गांत स्त्री-वर्गही असे. त्याचें वर्णन ग्यारिकनें मजेदार केलें आहे:—

..................................." Those
Who show their genious in their dress,
Whose inky fingers, unpinn'd cloaths
The slip shod shoe, and snuffy nose,
Denote their wit and sluttishness:
Who with a play, like a pistol clock'd in hand,
Bid managers to stand

कोणी आपली विद्वत्ता डामडौली पोषाखांत दाखवीत येत. ज्यांचीं बोटें शाईनें भरलेली, पोषाखाच्या गुंड्या लावल्या आहेत-नाहींत, उंच टांचेचे बूट घालून, नाकाला तपकीर लागली आहे असा आपला तोरा व गबाळपणा दाखवीत, पिस्तुलाप्रमाणें नाटकाचें पुस्तक माझ्याकडे रोंखुन मला विचारीत—

स्त्री नाटककार—Deliver sir, your thoughts on this before you stir.

ग्यारिक—But madam-किंवा-miss—

स्त्री ना०—your answer strait, 1 will not wait—

ग्यारिक—'Iis fit you know—

स्त्री ना०—I' ill hear no reason, Ay or no.

["हं बोला रावजी, या नाटकाबद्दल तुमचें काय म्हणणें आहे तें?"
"परंतु बाईसाहेब—" ग्यारिक बोलूं लागतो.
"नाहीं नाहीं. तुमचें मला स्पष्ट उत्तर पाहिजे. आतां मी थांबणार नाहीं." बाई म्हणते.
"परंतु मी काय म्हणतों तें ऐकून तर घ्याल—" ग्यारिक बोलूं लागतो.]

अशा प्रकारचीं ग्रंथकारांशीं प्रसंग पडलेलीं उदाहरणें ग्यारिकच्या चरित्रकारांनीं अनेक दिलेलीं आहेत व तीं ग्यारिकच्या पश्चातही लोकांस आख्यायिकेच्या ठिकाणीं उपयोगीं पडत असत. स्वतः शेरिडननें कांहीं विषयाच्या ओघानें ग्यारिकसंबंधीची एक आख्यायिका सुमारें २९ वर्षांनीं

पार्लमेंटमध्यें सांगितली. ती वरील गोष्टीप्रमाणेंच मनोरंजक आहे. जी १८०१ मध्यें मार्च महिन्याच्या ७ तारखेच्या लंडन टाइम्समध्यें प्रसिद्ध झाली होती. ती ही—

ग्यारिककडे त्याचा एक स्नेही एक दुःखपर्यवसायी नाटकाची प्रत घेऊन आला. ग्यारिकनें पुस्तकाचीं पानें इकडून तिकडून चाळून पाहिलीं. त्या नाटकांत त्याला कांहींच अर्थ दिसेना. म्हणून त्यानें ती प्रत त्या गृहस्थाला परत केली व सांगितलें कीं, या दिशेनं तुमची बुद्धि चालेल असें मला वाटत नाहीं. या गृहस्थाला वाटलें का, दुःखपर्यवसायी नाटक लिहिण्याकडे माझी बुद्धि चालत नाहीं असें म्हणण्याचा ग्यारिकचा अभिप्राय असावा. म्हणन त्यानें पुढच्या वर्षी आनंदपर्यवसायी पांच अंकी नाटक लिहून तें ग्यारिककडे नेलें. तेंही ग्यारिकला पसत पडलें नाहीं. तेव्हां तो गृहस्थ म्हणाला—" हें काय बरें ? तुम्हीच पूर्वी म्हणालां नाहीं कीं दुःखपर्यसायी नाटक लिहिण्याकडे माझी बुद्धि चालणार नाहीं. म्हणून मीं हें आनंदपर्यवसायी लिहून आणलें." यावर ग्यारिकनें उत्तर दिलें—" होय-परंतु ती आनंदपर्यवसायी लिहिण्याकडे चालेल असें मी कधीं सांगितलें ?" हें ऐकून तो गृहस्थ संतापून म्हणाला—" तर मग ती रांड चालते तरी कशांत ?" ही आख्यायिका ऐकल्यावर पार्लमेंटसभेमध्यें मोठा हंशा उडाला.

## गुणदोषविवेचन

ग्यारिककडे मालकी आल्यापासून त्यानं एकंदर करडा अंमल सुरू केला. यापूर्वी नाटकांतले राजे व राण्या यांच्यावर अंमल म्हणून कोणाचा नसे ग्यारिकनें नाटकी संसाराला मोठ्या कुटुंबाची उपमा दिली होती. कुटुंबांत कोणाची आज्ञा न पाळणारीं कांहीं बेगुमान मुलें असतात, तसें या नाटकी-कुटुंबांत, कोणी भांडखोर, कोणी दुसऱ्याचा मत्सर करणारे, कोणी असंतुष्ट असावयाचेच; शिवाय आज कोणाचा आवाज बसला आहे, तर कोणाला ताप आला आहे, कोणाची हिंवाची पाळी आज आहे, तर आज एक गोम्या तालमीला हजर नाहीं, तर दुसरे दिवशीं सोम्या हजर नसावयाचा. या रोज कटकटी असावयाच्या. खेरीज इतर जे पुरुष-बायकांचें खिल्लार असावयाचें, त्यांच्या तक्रारी विचारूंच नये.

प्रत्येक नटाच्या अंगीं स्वतःबद्दल आढ्यता मोठी. कोणी म्हणतो, "मालकाला आमची किंमतच नाहीं. ते आम्हाला पुढें येऊं देत नाहींत." दुसरा म्हणतो. 'असलें हलकें काम मी करणार नाहीं." कांहीं बायका ग्यारिकची गांठ पडत नाहीं असें पाहून पत्रांनीं त्याला त्रास देत असत. रविवार हा विश्रांतीचा दिवस त्यानें ठेवला होता; परंतु त्या दिवशीं "स्त्री त्याला फुरसत पडूं देत नसत कोणाच्या कांहीं, कोणाच्या कांहीं तक्रारी असावयाच्याच. एका नटानें म्हटलें आहे कीं, नाटकांतल्या लोकांच्या मिजाशी जितक्या लवकर व अगदीं क्षुल्लक कारणांनीं बिघडतात, तितक्या दुसऱ्या कोणाच्याही बिघडत नाहींत.' No minds are so soon hurt on the least frivolous occasions as those of the theatre.) नटाच्या खाजगी वर्तणुकीबद्दल ग्यारिकचें चांगलें मत नसे पडद्यांत मधल्या वेळांत असतांना तो कधीं दुसऱ्याशीं गप्पा गोष्टी करीत बसत नसे. एकीकडे बसून आपल्या भूमिकेचा विचार करीत असे. या साऱ्या वागणुकीवर त्याच्यावर गर्विष्ठ व बेपर्वा असल्याचा आरोप होता. परंतु याचें खरें कारण तो सांगत असे कीं. "माझ्या भूमिकेची जबाबदारी नाटक चाललें असतांना माझ्या मनांत सारखी बोलत असते म्हणून मी एका बाजूला असतों "*

नाटकाच्या वेळीं रंगाच्या पडद्यांत, कोणी पत्र आणून देऊं नये म्हणून ग्यारिकची सक्त ताकीद असे. आपलें चित्त व्यग्र होऊं नये म्हणून त्यानें हा नियम केला होता. नाटकाच्या दिवशीं तो बाहेर जेवणाचें आमंत्रण घेत

* आमच्या नटाला रंगभूमीवरून जरा विश्रांति मिळाली कीं, पडद्यांत त्याच्यामागें फुकट्या तिकिटाच्या प्रेक्षकाची भुंग्यासारखी गर्दी असते. नटाला पुढील त्याच्या प्रवेशाला भूमिकांचा विचार करावयास फुरसतच ते लोक देत नाहींत या दोस्तांच्या चहापाण्याच्या सरबराईंत नटांचा वेळ जातो. किर्लोस्कर मंडळीनें किर्लोस्कर नाटकगृहाच्या पडद्यामागच्या भिंतीवर बाहेरच्या मंडळीनें येऊन पात्रास बोलण्यांत गुंतवूं नये म्हणून लिहून ठेविलें होतें; परंतु या सूचनेचा उपयोग फारसा झाला नाहीं. पारसी नाटक मंडळींतील प्रसिद्ध नट कावसजी खटाव मात्र मधल्या वेळांत स्वतंत्र आपल्या भूमिकेंत निमग्न असे. अण्णासाहेब किर्लोस्करही असेच विचारांत गुंतलेले असत.

नसे व घरींही थोडासाच उपाहार करी. त्या दिवशीं कोणाची भेटही तो घेत नसे. *

दुसरा एक नियम ग्यारिकच्या वेळच्या प्रसिद्ध नटांनीं पाळला होता. ते आपलें काम संपल्यावर प्रेक्षकांत न येतां तडक घरचा रस्ता सुधारीत, त्यामुळें आपल्या भूमिकेचा प्रेक्षकांच्या मनावर उठलेला ठसा ते घालवीत नसत. आपले नियम आणि हुकूम बरोबर न पाळणारावर नाराजी दाखविण्याचे ग्यारिकचे निरनिराळे प्रकार असत. वेळेवर हजर न राहाणाराचे व गैरवर्तन करणाराचे पगार तो बरोबर कमी करीत असे. कोणीं नटानें पगार न वाढविल्याबद्दल व कमी केल्याबद्दल तक्रार केली व "माझ्याबद्दल विचार करा" म्हणून म्हटलें तर त्याचें उत्तर तो असें देई की, "अगोदर तूं आपलें काम बरोबर करून प्रेक्षकांस खूप करण्याचा विचार कर म्हणजे मी तुझ्याबद्दल विचार करीन."

नाटकाच्या तालमीच्या बाबतींत ग्यारिक फार कडक असे, त्याच्या दृष्टीच्या रोखापुढें, भित्रे व चुकारतट्टू नट कापत असत. कोणी कांहीं गोष्ट विचारली तर तिचें उत्तर तो सरळ कधीं देत नसे. "हं"–"पाहूं" "आतांच काय आहे?" "मला वाटतें--" अशा प्रकारच्या तुटक उत्तरानें, किंवा केव्हां केव्हां नुसतें हास्य करूनच त्याला तो बोळवीत असे. तालमीच्या वेळीं एखाद्या दगड मनुष्याला शिकवितांना, त्याच्या अंगावर ओरडून किंवा त्याच्याकडे तिरस्कारानें पाहून, त्याला तो अगदीं घाबरून सोडी. तरी एखाद्या होतकरू नटाला हाताशीं धरून त्याच्याकडून काम करून घेण्याची त्याची हतोटी घेण्यासारखी होती. अशा होतकरू

---

* भरतमुनींच्या नाट्यशास्त्रांत नाटकाच्या दिवशीं उपोषित असावें असा निर्बंध आहे. कोणाची भेट न घेण्याचा नियम किर्लोस्कर मंडळींतील प्रमुख नट मोरोबा, भाऊराव कोल्हटकर, अण्णासाहेब हे सक्त पाळीत असत. पौराणिक नाटक मंडळ्या खेळाच्या दिवशीं भोजन न करतां खेळ संपल्यावर करीत. संगीत मंडळींनींही हा नियम पाळला होता. परंतु हल्लीं कांहीं मंडळ्यांत कित्येक नट रात्रीं जेवून पुन्हा पहांटेही पंक्तीला हजर असतात.

नटाला आपल्याकडे ठेवण्याची सोय नसली तर त्याला तो शिफारसपत्र देत असे.

ग्यारिकच्या स्वभावांतील दोष काढणारांनीं, तो कृपण आहे, दुसऱ्या नटांचा मत्सर करतो, त्याच्याकडे कोणी ग्रंथकार किंवा नट आले तर त्यांच्या तोंडापुरतें त्यांना 'होय' म्हणून मागाहून आपले शब्द खरे करीत नाहीं, इत्यादि अनेक आरोप त्याच्यावर ठेविले होते: परंतु हे आरोप उत्पन्न होण्याला मूळ कारणें कितपत असतात, याची कल्पना त्याच्या स्थितींतल्या मनुष्याशिवाय इतरांना होणार नाहीं. खरें पाहिलें असतां आपल्या धंद्याच्या भरभराटीकरितां आपले स्वतःचे विचार तो बाजूला ठेवीत असे.

त्याचा व्यवहार अगदीं सरळ होता. सारासार विचार पाहून तो वागत असे. इंग्रजी भाषेतील तीन तत्त्वांप्रमाणें—

[ "To think, to decide, and to act on the moment" ]

विचारपूर्वक कोणतीही गोष्ट प्रमगाला करणें हें तत्त्व त्याच्यापुढें नेहमीं असे कोणतीही बाजू पडती घेऊन काम करून घ्यावयाचें ही त्याच्या स्वभावाची मुख्य गोष्ट होती. एखाद्या धर्मोपदेशकानें दिवाणखान्यांत खुर्ची अशी नाहीं अशी ठेवावी व टेबल तसें मांडावें म्हणून सुचविलें, तरी तो त्याचें म्हणणें मान्य करी. धंद्याच्या संबंधानें ज्यांच्या ज्यांच्याशीं त्याचा संबंध आला त्यांच्याशीं भांडण्याचेही प्रसंग त्याला पडले; तरी तीं भांडणें तो विसरून जात असे त्याच्या एका चरित्रकारानें लिहिलें आहे कीं, ग्यारिकसारखा भांडणांत पड खाणारा शत्रु मिळावयाचा नाहीं. आज जो माझा मित्र आहे, तो कदाचित् उद्यां माझा शत्रु होईल व जो आज शत्रु आहे तो उद्यां मित्रही होईल अशा दूरदृष्टीनें त्याचा ज्याच्याशीं संबंध पडेल त्याच्याशीं तो वागत असे.

लोकांचा चांगुलपणा मिळविण्याकरितां केव्हां केव्हां त्याला तोंडापुरतें त्यांच्याशीं 'होय' नाहीं' म्हणावें लागत असे; परंतु त्यालाच पुढें आपण कांहींतरी बोलून गेलों असें म्हणण्याची पाळी येई. कांहीं उमेदवार नोकरीकरितां त्याच्याकडे हेलपाटे घालीत असत, त्यांना ठेवण्याची सोय नसेल किंवा त्यांची तितकी योग्यता नसेल तर त्या वेळीं त्यांना

बोलविण्याची त्याची पद्धत अशी असे: "आतां मला काम आहे, घरांत ग्यारिकबाई वाट पाहात आहे, आतां मंगळवारीं या" किंवा "हं! तुमच्या अंगांत करामत आहे, तुमचा आवाजही बरा आहे, मला तुमचें तें भाषण आवडलें. तुम्ही तें समजून केलें परंतु या वेळेला माझ्याकडे संधि नाहीं. तुम्ही आपला पत्ता माझ्या भावाकडे देऊन ठेवा. जागा झाली म्हणजे तो तम्हांला कळवील" अशा तऱ्हेचें आश्वासन त्यांना मिळे. हे उमेदवार मग "ग्यारिकनें धंदा सोडला म्हणजे याची जागा मलाच मिळणार आहे." असें मनोराज्य करीत परत जात. या ग्यारिकच्या धरसोडीच्या वर्तनामुळें त्याला शत्रु बरेच झाले होते. ते वर्तमानपत्रांतून त्याच्या विरुद्ध टीका करीत; परंतु तो म्हणे कीं "मी आतां या भांडणांत लक्ष घालण्याच्या पलीकडे गेलों आहें. भांडणें करीत बसण्याचें माझें वय नाहीं." त्याच्या समकालीन नटांत त्याचा मत्सर करणारे नट असत. एकानें म्हटलें आहे कीं The poison of the honey be is the artist's jealousy (गांधील माशा मध उत्पन्न करतात; परंतु त्यांचा दंश विषारी असतो.) नटांच्या अंगीं लोकांचें रंजन करण्याचा गुण असतो, त्याबरोबर त्यांच्यांत मत्सरविषही भरलेलें असतें. (Professional jealousy is an inevitable element in the player's lot) धंद्यांत एकमेकांचा मत्सर करणें ही घला नटांच्या अंगभूत असते. हे उद्गार धंद्यांतील लोकांच्या अनुभवाचे आहेत. वेळ पडेल तसें वागणें हें ग्यारिकचें धोरण असे. He was more diplomatic than straight forward. ज्याच्यावर बहुजनसमाजाशीं दळणवळण ठेवण्याची जबाबदारी असते, त्याला स्वतःचे विचार बाजूला ठेवून कसे वागावें लागतें याचा अनुभव प्रत्येक म्यानेजरला आहे.

चुकून एखादी गोष्ट करणें, हाताखालच्या किंवा पदरच्या मनुष्याशीं उतावळीनें भांडण करणें, किंवा एखाद्याला रागाच्या भरांत काढून टाकणें या गोष्टी आपल्या धंद्याला बाधक आहेत हें तो समजत असे. शेंकडों भानगडी त्याला मिटवाव्या लागत असत व तक्रारी ऐकाव्या लागत असत. सर्वांनां कष्ट करून कामाला अडथळा केला तर त्यांचशिवाय आपलें अडेल हें तो जाणून होता. आपला स्वभाव उतावळा आहे हेंही तो जाणून

होता. या सर्व अनुभवावरून त्यानें असें ठरविलें होतें कीं, वेळ पडेल तसें धोरण ठेवून वागणें, लेखी व्यवहार ठेवणें व कोण काय बोलतो व काय करतो, याची अंतस्थ बातमी ठेवणें, या गोष्टींवर आपल्या धंद्याची बळकटी आहे त्याच्या या स्वभावामुळें त्याला त्रास पडत असे असें त्याचे चरित्रकार सांगतात. हलके लोक या स्वभावाचा फायदा करून घेत असत. अनेक प्रकारच्या स्वभावाच्या मनुष्याशीं त्याचा जितका निकट संबंध पडत असे तितका नाट्य-धुरीण दुसऱ्या कोणाचा पडला नव्हता. तथापि तो आपल्या हाताखालच्या लोकांशीं फार न्यायानें वागत असे आपल्या प्रतिस्पर्धी नटांशीं तर तो फारच उदारपणानें वागत असे.

ग्यारिकच्या गुण-दोषांच्या विवेचनांत त्याच्या दोषांचें पारडें जरी खालीं येईल तरी त्याच्या स्थितींत असलेल्या मनुष्यास तसें वागणेंच क्रमप्राप्त होतें हेंही वाचकांस समजून येईल.

## ग्यारिक आणि जान्सन

चरित्राच्या आरंभीं जान्सन व ग्यारिक यांचा गुरुशिष्यत्वाचा संबंध कसा होता हें सांगितलें आहेच. हे दोघेही महत्त्व-कांक्षेनें आपल्या घराचा उंबरठा ओलांडून बाहेर पडले; तेव्हांपासून ग्यारिकचा जीवमान असेपर्यंत त्यांचा स्नेहसंबंध कायम राहिला होता. मागील प्रकरणांत जान्सनसंबंधानें मधून मधून उल्लेख आले आहेत. त्यांवरून ही स्वारी तोंडाची फटकळ होती हें कळून येतें. ज्या गोष्टीला आपण चांगली असें म्हणावें तिला या स्वारीकडून भलतेंच रूपक मिळावयाचें. कोणी नट कितीही लोकप्रिय असो, त्याच्यावर यांची टीका कांहीं विलक्षण असावयाची. यांच्या टीकेचे कांहीं मासले आश्चर्यासारखे आहेत. प्रत्यक्ष ग्यारिकसंबंधानें त्यांची कांहीं विलक्षण मतें असत. कधीं चांगलें तर कधीं विरुद्ध असा प्रकार दोघांच्या हयातीपर्यंत चालला होता.

एकदां बॉसवेलनें जान्सनला सहज विचारलें: "पिशाच्चाला पाहून ह्यॅम्लेटमध्यें ग्यारिक जसा भेदरल्यासारखें दाखवितो तसें तुम्हांला करतां येईल का?" यावर जान्सननें उत्तर दिलें, "मला जरी तसें करतां आलें नाहीं, तरी मीच त्या पिशाच्चाला भेवडावीन." या तत्त्ववेत्याचा नटाबद्दल



डॉ.–स्याम्यूअल जॉन्सन

जन्म १७०९ पृष्ठ ७४-७५ मृत्यु १७८४

बालोद्यान प्रेस, पुणें

असा अभिप्राय असे कीं, दोरावर नाचणाऱ्या डोंबाऱ्यापेक्षां नटांला आपलें डोकें काय अधिक खर्च करावं लागतं ?' ज्यानें शेक्सपीयरच्या नाटकांचें पुनरुज्जीवन केलें असें सर्व इतिहासकार सांगतात त्याच्याबद्दल ही स्वारी म्हणते कीं, 'शेक्सपीयरच्या नाटकांतलें एखादें तरी नाटक ग्यारिकनें आरंभापासून शेवटपर्यंत लक्षपूर्वक वाचलें असेल कीं नाहीं याची मला शंका आहे."

ग्यारिकच्या विरुद्ध रॅंबलर मासिकांतून कांहीं लेख प्रसिद्ध झाले होते. ते जान्सननें लिहिले असावेत असा त्या वेळीं लोकांचा समज होता. हे लेख अगदीं अनुदारमनाचे व दुराग्रहाचे द्योतक होते; परंतु ग्यारिकनें ते मनावर घेतले नाहींत. इतकेंच नाहीं तर जान्सनबद्दल आपली पूज्यबुद्धि अनेकवेळां त्यानें व्यक्त केल्याचीं उदाहरणें आहेत. जान्सनला त्यानें एक हातकाठी नजर केली होती व तिच्यावर सोन्याची मूठ बसवून त्या मुठीवर— स्याम्युअल जान्सन यांस डेव्हिड ग्यारिक यांजकडून' (१७७०) हा लेख व बाजूला 'योग्यता असेल त्यानेंच हें भूषण वापरावें' (Let him wear the lourel who deserves it) हीं अक्षरें खोदविलीं होतीं. ही यष्टि एकाकडून दुसऱ्याकडे जात जात शेवटीं १८६४ मध्यें विकण्यांत आली.

प्रिचर्ड नांवाची एक नटी ग्यारिकच्या वेळीं प्रसिद्ध होती. शेक्सपीयरच्या नाटकांतील तिच्या भूमिकेचें अनेक टीकाकारांनीं वर्णन केलें आहे परंतु तिच्यासंबंधानें जान्सनची टीका कांहीं विलक्षणच आहे. तो म्हणतो कीं, "एखादा चांभार जोडा शिवण्याकरितां कातडें कापीत असतो, तें कापतांना जसें त्याला कांहींच वाटत नसतें, त्याप्रमाणें प्रिचर्ड ज्या नाटकांत भूमिका करते त्या नाटकाबद्दल तिनें कांहींच विचार केलेला नसतो."

इंग्लंडांतील एक प्रसिद्ध चित्रकार सर जोशा रेनॉल्ड्स (१७२३-१७९२) याचा व जान्सनचा एकदां वाद चालला असतां रेनॉल्ड्स म्हणाला, "ग्यारिक हा मोठ्या योग्यतेचा मनुष्य आहे, नाहीं ?" यावर जान्सननें उत्तर दिलें तें हें. "दुसऱ्यानें लिहिलेलीं वाक्यें तोंडानें पाठ म्हणणाराला कोणी मोठ्या योग्यतेचा समजत नाहीं."

प्रसिद्ध नाटककार व वक्ता शेरिडन याचा बाप थॉमस शेरिडन हाही

एक ग्यारिकच्या वेळेचा बरोबरीचा नट व लेखक होता. इंग्रजी भाषेच्या उच्चारसंबंधानें त्यानें कांहीं लेख लिहिले आहेत. जान्सनचें याच्याबद्दल चांगलें मत नव्हतें. याच्या लेखांबद्दल त्यानें म्हटलें आहे कीं, एवढ्या विस्तीर्ण देशाच्या भाषेवर असल्या तुटपुंज्या लेखाचा काय परिणाम होणार आहे? हे लेख म्हणजे डोव्हरच्या सामुद्रधुनीवरून क्यालेच्या बंदरावर उजेड पाडण्याकरितां दोन दमडीची मेणबत्ती जाळणें आहे. (डोव्हर व क्याले यांच्यामधलं अंतर वीस मैलांचें आहे.)

एका गोष्टीत मात्र जान्सनचें मत बरोबर आहे; त्यानें म्हटलें आहे: नटांना उच्चार कसा करावा. कोणत्या शब्दावर जोर कसा द्यावा, कोठें द्यावा हें माहीत नसतें. एकसारखे ते बरळत सुटतात. [ The players sir, have got a kind of rant with which they run on, without any regard either to accent or emphasis.] आमच्या संगीत नटवर्गांत हा दोष परंपरेनें चालत आला आहे.

अशा तऱ्हेची नटांबद्दल त्याची विरोधी भक्ति असे; तरी पुष्कळ वेळां त्याचे ग्यारिकबद्दल अंतःकरणपूर्वक चांगलेही उद्गार निघाले आहेत व ते लोकमत या प्रकरणांत दिलेले आहेत. इतिहासकार गिबन याच्याशीं ग्यारिकसंबंधानें वादविवाद चालला असतांना, जान्सननें म्हटलें आहे कीं, ग्यारिकचा एकप्रकारें मी जो हेवा करीत असें तो त्याची लोकांत जी मान्यमान्यता वाढली तिच्याबद्दल नाहीं. तर ज्या रीतीनें ती त्याला मिळाली तिच्याबद्दल असे. जी कीर्ति त्याच्याकडे आपण होऊन चालत आली ती मला सक्तीनें मिळवावी लागली, व तिच्याकरितां मला जगाशीं झगडावें लागलें. आतां हें कांहीं अंशीं खरें आहे कीं माझ्या स्वभावांतील दोषांमुळें मला अपमान सोसावे लागले. परंतु लोकांनींही माझी किंमत केली नाहीं त्यामुळें मलाही त्या लोकांशीं 'जशास तसें' या नात्यानें बेपर्वा व्हावें लागलें. ग्यारिकचा प्रकार तसा नाहीं. लोक च मन आकर्षण करून घेण्याची त्याच्यांत जादू आहे.

जान्सनने 'आयरिन' नांवाचें एक नाटक लिहिलें होतें. त्याचा उल्लेख 'भावी उद्योग' या प्रकरणांत आला आहे. घरांतून बाहेर पडतांना हें नाटक काय तें त्याच्याजवळ भांडवल होतें; परंतु या भांडवलावर

त्याला इमारत बांधतां आली नाहीं. ग्यारिकनें मोठ्या परिश्रमानें हें नाटक रंगभूमीवर आणलें ( १७४८ ); परंतु तें लोकप्रिय झालें नाहीं. याचे फक्त नऊ प्रयोग होऊन तें मागें पडलें. ग्यारिकनें तीन नाटकांचें उत्पन्न जान्सनला दिलें. केवळ जुन्या मित्राशीं मित्रधर्म म्हणून त्यानें हें नाटक पुढें आणलें व स्वतःच्या लोकप्रियतेच्या जोरावर याचे नऊ तरी प्रयोग झाले. लोक म्हणत कीं, हें नाटक जान्सनसारखेंच ओबडधोबड व बोजड झालें आहे या नाटकांत चांगल्या ओळी खचून भरल्या आहेत; परंतु हें कांहीं नाटक नाहीं. ( Irene, as it was called on publication, is as heavy and essentially undramatic as its author himself. Irene is stuffed with good lines but Irene is no play.) या नाटकावरून लोकांचें असें मत झालें कीं, जान्सन हा किती जरी मोठा विद्वान् व तत्त्ववेत्ता असला तरी उत्तम नाटककाराच्या वर्गांत याला बसवितां यावयाचें नाहीं. जान्सननेंही पुढें नाटक लिहिण्याचा नाद सोडून दिला. एकंदर नटवर्गांत त्याचा विनोदी स्वभाव व निस्पृह वृत्ति पाहून त्याच्याबद्दल आदर असे. बहुत करून सर्व नाटकांना ही स्वारी हजर असावयाची. कधीं कधीं नाटकाच्या तालमी-ही स्वतः पाहावयास जात असे. गोल्डस्मिथचें एक नाटक 'गुड् नेचर्ड मॅन' ( Good natured man एका नाटकमंडळीला बसवून देण्यांत त्यानें फार मदत केली त्यांत कांहीं छाटाछाट केली व कांहीं फेरफार केले तेव्हां तें रंगभूमीवर आलें.

जान्सनच्या चरित्रांत ठिकठिकाणीं ग्यारिकचा उल्लेख आलेला आहे, तसाच ग्यारिकच्या चरित्रांत व नाट्यकलेच्या इतिहासांत सुमारें सन १७४२ पासून १७८४ पर्यंत म्हणजे जान्सनच्या मृत्यूपर्यंत त्याचाही अनेक वेळीं आला आहे. १८ व्या शतकांत इंग्लंडांत जे इतिहासप्रसिद्ध पुरुष होऊन गेले त्यांत हे दोघे सारख्याच योग्यतेचे आहेत. १७६३ त अशा इतिहासप्रसिद्ध पुरुषांचें एक मंडळ चित्रकला-निपुण सर जोशा रेनॉल्ड यानें स्थापन केलें; व त्याला Literary club ( सारस्वत मंडळ ) असें नांव दिलें. हा क्लब स्थापन झाला त्या वेळीं त्याचे नऊ सभासद होते. त्यांत निदान महाराष्ट्र वाचकांच्या परिचयाचे असतील असे जान्सन, बर्क

गोल्डस्मिथ व रेनॉल्ड हे होते. त्यानंतर सुमारें वीस वर्षांत आणखी तीस चाळीस जास्त झाले. त्यांत वॉरन हेस्टिंगच्या खटल्यांत प्रसिद्ध असलेले फॉक्स, शेरिडन, वायंध्याम व इतिहासकार गिबन हे होते. ग्यारिकचा प्रवेश या क्लबांत होण्यास दहा वर्षें लागलीं. हीं इतकीं वर्षें लागण्यास ग्यारिकचे गुरु व पुष्कळ वर्षांचे स्नेही जान्सन हेच कारणीभूत होते. यांच्या मनांतून या नाटकी मनुष्याचे पाय आपल्या पवित्र आश्रमास लागूं नयेत असें होतें. कोणाही सभासदाची निवडणूक बहुमतानें व्हावयाची असा जरी नियम असे तरी इतरांचीं मतें गुंडाळून टाकून हे राजश्री आपलीच राजवटी Monarchy चालवीत असत. ग्यारिकचे चरित्रकार सांगतात कीं, जान्सन व ग्यारिक दोघे एकदम घरांतून बाहेर पडले; परंतु कीर्ति-मंदिराच्या पायथ्याशीं पोंचण्याची आघाडी ग्यारिकनें मारली ही गोष्ट जान्सनच्या मनाला लागली असली पाहिजे. हें एक कारण व दुसरें असें कीं आपण या क्लबाचा एक सभासद असावें, अशी इच्छा ग्यारिकनें कोणाजवळ केव्हांतरी बोलून दाखविली होती, यामुळें या तापट स्वारीचें पित्त खवळून जाऊन ही स्वारी ग्यारिकचा प्रवेश क्लबांत होण्यास हरकत आणीत असे. जेव्हां जेव्हां ग्यारिकला क्लबांत घेण्याचा प्रश्न निघे, तेव्हां तेव्हां या स्वारीची हरकत येई. 'आमच्यासारख्या मंडळींत, जुगारी, नटवे, नाटकी यांचें काय काम आहे?' ( Surely one ought to sit in a society like ours unelbowed by a gamester, pimp or player ) असें तो म्हणत असे.

शेवटीं दहा वर्षांनीं स्वतः यानेंच ग्यारिकला क्लबांत घेण्याची संमति दिली. तेथें ग्यारिक या मंडळीचा एक आवडता घटक होऊन बसला. आपल्या अंगच्या गुणांनीं, बाणेदार स्वभावानें व सर्वांशीं सौजन्यानें वागण्याच्या प्रवृत्तीनें त्यानें सर्वांस आपलेसें करून घेतलं. जान्सनच्या लहरी स्वभावांत त्याचे कांहीं उद्गार मनाला पटण्यासारखे आहेत 'ढंगानें आणि स्तुतीनें नट बेपर्वा होतात' अशी त्याची समजूत झाली होती म्हणून नटांना तो बरोबरीच्या नात्यानें वागवीत नसे. पुढें पुढें ग्यारिकच्या बाबतींत मात्र त्याचें मतांतर होत गेलें.

# नाटकगृहांतील दंगे

नाटकाच्या धंद्यांत अशा कांहीं गोष्टी असतात कीं त्या नाटकाच्या मालकाच्या आवडीनें न विकतां लोकांच्या आवडीनावडीनें विकाव्या लागतात. एखाद्या नाटककारानें आपलें डोकें खर्च करून नाटक कितीही चांगलें लिहिलेलें असलें तरी तें लोकांना पसंत पडलें म्हणजे चांगलें म्हणावयाचें. म्हणून पक्वान्नांत जसा रुचि येण्याकरितां निरनिराळा मसाला घालतात, तसा धंद्याच्या मालकाला नाटकाच्या उभारणीला नवा नवा मसाला घालावा लागतो. हा मसाला म्हणजे 'नवे सीन', नवे 'पोषाख', 'नवे पडदे', हे तर आहेतच; त्याशिवाय एखादी नवी टूमही लागते. ग्यारिकनें एक नवी टूम आपल्या नाटक-मंडळींत सुरू करण्याचा एक प्रयत्न करून पाहिला, परंतु तो फसला.

"चायनीज फेस्टिव्हल" नांवाची एक टूम सुरू करण्याचा त्याचा उद्देश होता. प्यारिसहून नाचकाम करणारे सुमारें साठ इसम त्यानें आणविले. ही टूम दाखविण्याकरितां त्यानें खर्चही फार केला; परंतु लोकांस ती पसंत पडली नाहीं. याला कांहीं अंशीं त्या वेळचें राजकारणाचें वातावरणही कारण झालें. त्या वेळेला इंग्लंडचें व फ्रान्सचें बरेंच वितुष्ट आलें होतें व उभयतां राष्ट्रांमध्यें लढाई होण्याचाही रंग दिसत होता. ही नाचणारी मंडळी परराष्ट्रीय असल्यामुळें तिचें येणें लोकांस आवडलें नाहीं. शिवाय फ्रान्समधून निरनिराळ्या रूपानें पुष्कळ हेर लंडनमध्यें पसरले होते, हें एक कारण या नाचकाम करणाऱ्या लोकांबद्दल शंका येण्यास उद्भवलें होतें.

वास्तविक हें राजकारण उद्भवण्यापूर्वींच ग्यारिकनें ही नाचाची नवी टूम काढण्याचें प्रसिद्ध केलें होतें; परंतु खवळलेल्या समाजाचें या सबबीनें समाधान झालें नाहीं. त्यांचें असें म्हणणें पडलें कीं, परकी लोकांनीं येऊन आमच्या तोंडचा भाकरीचा तुकडा घेणें आम्हांस पसंत नाहीं. ग्यारिकनें पांच-सहा रात्रीं हा नाच दाखविण्याचा हट्ट चालविला; परंतु यामुळें-विशेषतः पिटमधले प्रेक्षक-फार खवळले. त्यांनीं नाटकगृहांत नासधूस करण्यास सुरवात केली; इतकेंच नाहींतर ग्यारिक राहात होता

तेथें जाऊन त्याच्या घराच्या खिडक्या व तावदानें फोडलीं,ग्यारिकला मत्र-संरक्षणाकरितां मदत बोलावणें भाग पडलें. एक-दोन रात्रीं स्वत. जॉर्ज राजे (दुसरे) प्रत्यक्ष नाटकगृहांत हजर होते. त्यांच्या समक्ष तरी दंगा होणार नाहीं अशी ग्यारिकची कल्पना होती; परंतु राजेसाहेब तेथें असण्याचा परिणाम दंगेखोरांच्या मनावर झाला नाहीं; उलट ते जास्तीच दंगा करूं लागले. राजेसाहेबांचा कल दंगेखोरांच्या बाजूला आहे असें दिसलें. शेवटीं ग्यारिकनें हे नाचणारे लोक परत पाठविले, तेव्हां दंगा होण्याचें थांबलें या कामांत ग्यारिकला चार हजार पौंड खर्च आला.

थोडे दिवस गेल्यानंतर एका नाटकाच्या वेळीं ग्यारिक रंगभूमीवर आला असतां पुन्हा लोक खवळले व 'क्षमा मागितली पाहिजे','क्षमा मागितली पाहिजे', म्हणून ओरडूं लागले. इतकेंच नाहीतर "ग्यारिकनें गुडघे टेकून क्षमा मागितली पाहिजे" अशी दंगेखोरांची इच्छा दिसली; परंतु या वेळेला ग्यारिकनें पडतें न घेतां, आपला खरा बाणेदारपणा दाखविला. नेहमींचा पड घेऊन वागण्याचा जो त्याचा स्वभाव त्याची या वेळेला मर्यादा संपली होती. मोठ्या धीमेपणानें तो पुढें आला व दंगेखोरांना चार समजुतीच्या गोष्टी सांगून त्यानें शेवटीं निश्चयाच्या शब्दांत सांगितलें कीं, "जर आपण आज मला काम करूं देणार नाहींत, तर यापुढें रंगभूमीवर मी कधीं-कधीं पाय ठेवणार नाहीं. मला धंदा केलाच पाहिजे असें नाहीं व अपमान तर मी कधींच सोसून घेणार नाहीं." या भाषणाचा प्रेक्षकांच्या मनावर परिणाम असा झाला कीं, त्यांनीं टाळ्यांचा गजर करून सर्व नाटकगृह दणाणून सोडलें (१७३३).

ग्यारिकच्या कारकीर्दींत दुसरा एक असाच दंगा झाला. या सुमारास नाटकाचे तीन अंक संपल्यावर अर्ध्या दरांनीं लोक घेण्याची वहिवाट होती; परंतु ग्यारिकनें नवे प्रयोग चालू असतांना ती बंद करण्याचा विचार केला. लोकांस हा विचार पसंत पडला नाहीं. त्यांनीं दंग्यास सुरुवात केली. दुसऱ्या रात्रीं दंगेखोरांच्या पुढाऱ्यानें ग्यारिकला पुढें बोलावून विचारलें कीं. तिसऱ्या अंकानंतर तुम्हीं आम्हांस अर्ध्या दरानें घेणार कीं नाहीं ? पाहिजे तर प्यांटोमाईम'चे* नवे प्रयोग असतील त्या दिवशीं

* भाषणाशिवाय नुसते हावभाव करून दाखविण्याचा करमणुकीचा एक प्रकार आहे. संस्कृत नाटकांत 'लास्य' म्हणून एक प्रकार आहे तो असाच आहे.

घेऊं नका. ग्यारिकनें आपल्या नेहमींच्या सौजन्यानें त्याचें म्हणणें मान्य केलें. एवढ्यानें दंगेखोरांचें समाधान व्हावयास पाहिजे होतें; परंतु तें झालें नाहीं. याला कारण असें झालें होतें कीं, पूर्व रात्रीच्या दंग्याच्या वेळीं, एका दंगेखोराला एका नटानें आग लावतांना पकडलें होतें. हा नटाकडून मोठा अपराध झाला असें समजून दंगेखोरांनीं त्या नटाला रंगभूमीवर माफी मागण्यास सांगितलें; परंतु या नटानें मोठ्या धिटाईनें पुढें होऊन भाषण केलें कीं, " सभ्य गृहस्थहो, इमारतीला आग लावली जात होती, ती थांबवून आपल्यापैकीं पुष्कळांचे प्राण वांचविले हा जर माझ्याकडून अपराध झाला असेल तर मी आपली क्षमा मागतों." या उत्तरानें प्रेक्षकांना आपला उलट अपमान झाला असें वाटलें व त्यांनीं त्याला गुडघे टेकून क्षमा मागण्याचा हुकूम केला. त्यावर तो पुन्हा म्हणाला, "महाराज, आपल्या दृष्टीनेंसुद्धां मी आपली किंमत कमी करून घेणार नाहीं. असें जर मी करीन तर मी एक अगदीं क्षुल्लक प्राणी समजला जाऊन आपल्यापुढें पुन्हा येण्याला अपात्र ठरेन." असें म्हणून मुजरा करून तो तडक पडद्यांत गेला. या त्याच्या कृतीनें ग्यारिकला इतका आनंद झाला कीं, त्यानें एकदम त्या नटाला आलिंगन दिलें. इकडे दंगेखोरांना पुन्हा अवसान आलें व असल्या उद्धट मनुष्याला काढून टाकला पाहिजे म्हणून त्यांनीं आग्रह धरला; परंतु ग्यारिकनें त्यांना सांगितलें कीं, "हा नट जरी माझ्या उपयोगाचा आहे, तरी तुमच्या नाराजींत तो असेपर्यंत तुमच्यासमोर तो येणार नाहीं." नंतर आंत येऊन पुन्हा त्या नटाला आलिंगन देऊनः " तुझा पगार नियमित तुला दिला जाईल-" असें त्यानें त्याला आश्वासन दिलें. ( १७६३ ).

कोणतेंही प्रकरण विकोपास पोंचवावयाचें नाहीं हा ग्यारिकचा स्वभाव या दोन प्रसंगीं उघड दिसून येतो. परंतु या दंग्याच्यासंबंधानें त्याला जी पड खावी लागली ती त्याच्या मनाला लागून राहिली. तिचा परिणाम त्याच्या प्रकृतीवर घडूं लागला. त्याच्या बायकोचीही प्रकृति बिघडत चालली होती. म्हणून हवा बदलण्याकरितां तो फ्रान्स व इटली देशांत निघून गेला.

## ग्यारिक आणि शेक्सपीयर

शेक्सपीयरच्या पूर्वी नाटककार होऊन गेले. त्यांचीं नांवें इतिहासांत प्रसिद्ध आहेत. त्याप्रमाणेंच ग्यारिकच्या पूर्वींही नाट्यनिपुण असे नट होऊन गेले; तेही इतिहासप्रसिद्ध आहेत. परंतु ग्यारिकचें नांव निघालें कीं, शेक्सपीयरचें नांव पुढें यावें व शेक्सपीयरचें नांव निघालें कीं, ग्यारिकच्या नांवाचें स्मरण व्हावें हा नाटककार व नट या संबंधाचा समसमान मान कोणत्याही नाटककारास किंवा नटास इंग्लंडच्या व जगाच्या नाटकाच्या इतिहासांत मिळाला नाहीं. शेक्सपीयरनें लिहिलेल्या नाटकांचे प्रयोग ग्यारिकच्या पूर्वी करून दाखविणारे नट होऊन गेले व त्याच्या नाटकांचें विवेचन करून त्याचीं नाटकें नटांना व वाचकांना सुबोध करून देणारे टीकाकारही ग्यारिकच्या पूर्वी होऊन गेले; परंतु शेक्सपीयरच्या नाटकांचें खरें हृद्गत समजून देणारा ग्यारिकच होऊन गेला असें इतिहासकार सांगतात. ग्यारिकनें शेक्सपीयरचीं नाटकें स्वतः मनन करून समजून घेतलीं व नंतर आपल्या अर्थपूर्ण अभिनयानें लोकांस समजावून दिलीं. तेव्हांपासून एकेका ग्रंथकाराचे व टीकाकाराचे जे उद्गार निघालेले आहेत, ते वाचले म्हणजे ग्यारिकनें हीं नाटकें समजून घेण्याकरितां किती बुद्धि खर्च केली असेल याची कल्पना करतां येते.

Best Commentator on Great Shakespear's text,
When Garrick acts no passage seems perplext.

शेक्सपीयरच्या नाटकांचा भाष्यकार अशी उपमा या ग्रंथकारानें ग्यारिकला दिली आहे. ग्यारिक अभिनय करूं लागला म्हणजे शेक्सपीयरच्या नाटकांत कांहीं शंकाच उरत नसत.

शेक्सपीयरचीं नाटकें ग्यारिकच्या अभिनयानें लोकप्रिय होऊं लागल्यापासून It was the reign of Shakespeare and Garrick. हें शेक्सपीयर आणि ग्यारिक यांचें नाटकाचें युग आहे अशी लोकांत म्हण पडली. शेक्सपीयरसारखा दुसरा शेक्सपीयर होणार नाहींच! परंतु ग्यारिक त्याच्यापेक्षांही अद्वितीय आहे. Inimitable Shakespeare, but

more matchless Garrick !-Always deep in nature as the poet, but never (What the poet is too often) out of it. ग्यारिकची मॅक्बेथची भूमिका पाहून पिटनें म्हटलें होतें कीं, मनोधर्म सोडून कवि केव्हां केव्हां त्याच्या बाहेर जातात; परंतु ग्यारिक हा त्याच्या तळाशीं नेहमीं असतो. पिटच्या या भाषणावरून शेक्सपीयरच्या नाटकावर ग्यारिकनें कसा प्रकाश पाडला असेल याची कल्पना करतां येते. एकानें ग्यारिकला High priest of oracle of Avon (आव्हान नदीकांठचा तत्त्वज्ञान सांगणारा धर्माचार्य) असें म्हटलें होतें. ग्यारिकच्या सर्व चरित्रकारांनीं शेक्सपीयरची योग्यता ग्यारिकनें उदयास आणली असेंच म्हटलें आहेः

To paint fair nature by divine command
Her magic pencil in his glowing hand.
A Shakespeare rose then to expand his fame
Wide over this breathing world a Garrick came,
Though sunk in death, the forms the poets drew
The actor's genius made them breath a new.
Though like the bard himself in night they lay
Immortal Garrick call'd them back to day.
And still eternity with power sublime,
Shall mark the immortal hour of hoary time
Shakespeare and Garrick like twin stars shall shine
And earth erradiate with a beam divine.

[ईश्वरी योजनेनें आपल्या प्रभावशाली हातांतील अद्भुत कलमानें मानवी स्वभावाचें चित्र रेखाटणारा प्रथम एक शेक्सपीयर नांवाचा कवि जन्मास आला; नंतर त्याच्या कीर्तीचा परिमल मानवी सृष्टीवर पसरविणारा ग्यारिक नांवाचा नट अवतीर्ण झाला. या कवीची कृति जवळजवळ मृतप्राय झाली होती, परंतु ग्यारिकनें आपल्या नाट्यशक्तीनें तिला श्वासोच्छ्वास करावयास लाविलें. कवि व त्याची अद्भुत कृति हीं अंधःकाररूपी रात्रींत जरी अस्तंगत झालीं होतीं तरी या विस्मरणरहित झालेल्या

ग्यारिकनें त्यांना उजेडांत आणून सोडलें. यापुढें मंद गतीनें चालणारो शाश्वति आपल्या अपार सामर्थ्यानें सर्वभक्षक काळाच्या घडामोडींतून कवीच्या कृतीची अजरामर घटका दाखवीत राहील व शेक्स्पीयर आणि ग्यारिक हे जोडताऱ्याप्रमाणें प्रकाशित राहून आपल्या किरणांनीं पृथ्वी प्रकाशित करतील.]

ग्यारिक उदयास येण्यापूर्वीं ब्याटर्टन नांवाचा नट इतिहासप्रसिद्ध होऊन गेला ( १६३५–१७१० ). त्यानें शेक्स्पीयरच्या नाटकांची योग्यता समजावून देण्याचा प्रयत्न केला होता; परंतु तो त्याच्यापुरताच झाला. त्याच्या पश्चात् सुमारें ऐशीं वर्षें लोकरुचि बेताल झाल्यामुळें नाट्यकले-ची अवनति झाली होती, ती ग्यारिकनें सुधारली. ही गोष्ट त्याच्या सम-कालीन नटांना असह्य झाली व "आम्ही आजपर्यंत जें करीत आलों तें चुकीचें झालें व हें कालचें पोर आतां आम्हांला ज्ञान शिकवूं लागलें" असें म्हणूं लागले. ग्यारिकनें मुख्यत: किंग लीयर, म्याक्बेथ, हॅम्लेट, रिचर्ड दि थर्ड हीं शोकपर्यवसायी नाटकें प्रयोगाच्या दृष्टीनें फेरफार करून रंगभूमीवर आणलीं, यावरून त्याच्या एका टीकाकारानें म्हटलें आहे कीं:—

Sometimes with Garrick's noble rage
You catch the fire of Shakespeare's page.

[ केव्हां केव्हां ग्यारिकच्या गंभीर अभिनयानें तुम्हांला शेक्स्पीयरच्या नाटकाचें हृद्गत ओळखतां येतें.]

ग्यारिक, शेक्स्पीयरला दैवत समजत होता. त्यानें आपल्या राहत्या जागीं शेक्स्पीयरचें मंदीर बांधलें होतें व त्यांत त्याचा संगमरवरी पुतळा ठेविला होता. ( तो सांप्रत ब्रिटिश म्यूझियमच्या इमारतींत आहे.) शेक्स्पीयरच्या जन्मभूमीवर त्याच्या नांवानें वार्षिक उत्सव (Jubilee) करण्याचा त्यानें विचार केला सुमारें दीडशें वर्षांनंतर ही महोत्सवाची कल्पना उद्भवली. त्यापूर्वीं ही कोणाच्याही मनांत आलेली नव्हती. इ०सन १७६९ च्या हिंवाळ्यांत स्ट्राटफर्ड येथें हा महोत्सव करण्याचें ठरलें; परंतु ग्यारिकच्या या कल्पनेला वेळ अनुकूल नव्हता. तीन दिवस समारंभ

मोठ्या थाटानें चालला होता. अनेक ठिकाणचे लोकही आले होते; परंतु मध्यंतरीं पर्जन्य पडून सर्वांची निराशा झाली व ग्यारिकला हा महोत्सव लंडन येथें ड्रूरिलेन नाटकगृहांत उरकून घेणें भाग पडलें.

हा महोत्सव करण्याची कल्पना, ग्यारिकच्या मनांत आली. इचा इतिहास असा आहे कीं, शेक्सपीयर ज्या घरांत राहात असे तें घर व त्याच्या भोंवतालची जागा एका धर्मोपदेशकानें विकत घेतली. या मोकळ्या जागेंत शेक्सपीयरनें लावलेला एक तुतीचा वृक्ष होता. तो या धर्मोपदेशकानें कापून टाकला. या वृक्षाबद्दल स्ट्राटफर्ड येथील लोकांची पूज्यबुद्धि होती. हा वृक्ष उलथून पाडल्यानें गांवचे लोक खवळून गेले व या धर्मोपदेशकाचा सूड घेण्याच्या बेतांत आले. शेवटीं त्याला तेथून पळ काढावा लागला. गांवच्या लोकांनीं असा निश्चय केला कीं, त्याच्या कुटुंबांतील कोणालाही, इतकेंच नाहीं तर त्याच्या नांवाच्या कोणा मनुष्याला सुद्धां गांवांत येऊं द्यावयाचें नाहीं. पुढें हा निर्बंध किती दिवस पाळला गेला याबद्दल इतिहासकार कांहीं सांगत नाहींत.

गांवच्या लोकांनीं हा वृक्ष विकत घेऊन व त्याचे तुकडे कापून, त्यांच्या कोठें तबकड्या, पदकें इत्यादि निरनिराळ्या आकृतीच्या वस्तु बनविल्या व त्या पवित्र समजून संग्रहीं ठेविल्या. शिवाय या झाडाच्या लांकडाची एक पेटी बनवून तिच्यांत त्या गांवाची ग्यारिकच्या नांवाची विशेष हक्काची सनद (freedom of the town) घालून गांवच्या लोकांतर्फे "शेक्सपीयरचा भाष्यकार" म्हणून ग्यारिकला ती अर्पण करण्यांत आली. लोकांनीं आपला अशा तऱ्हेनें बहुमान केला ता जाणून ग्यारिकच्या डोक्यांत ही ज्युबिलीची कल्पना उद्भवली असें त्याच्या चरित्रकाराचें म्हणणें आहे.

या ज्युबिलीच्या प्रसंगानें शेक्सपीयरच्या वंशजांपैकीं कोणी, शेक्स-पीयर जे हातमोजे वापरीत असे ते ग्यारिकला नजर केले व ते त्याच्या

पश्चात् पुष्कळ दिवसांनीं त्याच्या बायकोनें सिडान नांवाच्या एका प्रसिद्ध नटीस दिले.*

फूट म्हणून ग्यारिकचा समकालीन नट होता. त्यानें या ज्युबिली संबंधानें ग्यारिकची वर्तमानपत्रांतून फार नालस्ती केली होती. हा ग्यारिकचा फार द्वेष करीत असे. ज्युबिली उत्सव अर्धा स्ट्रॅटफर्ड येथें व अर्धा लंडनमध्यें पार पडला. "जेथें पिकतें तेथें विकत नाहीं" ही म्हण इतिहासप्रसिद्ध व्यक्तीच्या संबंधानें बरोबर लागू पडते. स्ट्रॅटफर्ड येथील लोकांच्या, या ज्युबिलीपूर्वी शेक्स्पीयरची योग्यता लक्षांत आली नव्हती. कोणी प्रवासी आले म्हणजे त्यांना एक लहानसें घर व शेक्स्पीयरचा पुतळा वगैरे तेथील लोक दाखवीत असत. ग्यारिक प्रवासाहून तेथें आला, तेव्हां तेथील लोकांनीं तुतीच्या झाडाच्या लांकडाची पेटी व मानपत्र देऊन त्याचा सन्मान केल्यामुळें ज्युबिलीची कल्पना त्याच्या मनांत आली हें या प्रकरणांत सांगितलें आहेच.¶

## एक खलपात्र

कादंबरींत जसें एखादें खलपात्र ( villian ) पुनःपुन्हा येतें, त्याप्रमाणें ग्यारिकच्या चरित्रांत फूट हें एक खलपात्र आहे. ग्यारिकच्या

---

* नाटकाच्या इतिहासांत ही नटी फार प्रसिद्ध होऊन गेली. ग्यारिकच्या शेवटच्या कारकीर्दींत चार वर्षें त्याच्या मंडळींत होती; परंतु त्या वेळीं तिचे गुण दृष्टोत्पत्तीस आले नाहींत. म्हणून आठ वर्षें बाहेर प्रांतांत ती अनुभव घेण्याकरितां फिरत होती. पुढें तिनें आपल्या अमदानींत नाटकाच्या इतिहासांत फार मोठें नांव कमविलें. सन १८१२ त तिनें धंदा सोडून पुढें वीस वर्षें विश्रांति घेतली.

¶ नाट्य-कवींच्या स्मारकांची कल्पना पाश्चात्यांची आहे. अलीकडे बीरबोहम ट्री नांवाचा नट प्रत्येक वर्षी ज्युबिलीचा समारंभ शेक्सपीयरच्या जन्मभूमीवर करीत असतो; परंतु इकडे महाराष्ट्र भाषेचे आद्य नाटककार विष्णुदास भावे व संगीत नाटकाचे संस्थापक यांची स्मृति जागृत राखण्याचें, त्यांच्या कलेवर मनमुराद पोट भरणाऱ्या नट-वर्गाच्या डोक्यांत येऊं नये ही आश्चर्याची व दुःखाची गोष्ट आहे.

मनाची समता बिघडविण्याला हा वरचेवर कारण होत असे. दुसऱ्याची नालस्ती करणें हाच त्याचा स्वभावधर्म होता. ग्यारिकनें शेक्सूपीयरचा जो ज्युबिली उत्सव केला, त्याचा उपहास करण्याचा त्यानें विचार केला होता. एका मनुष्याला ग्यारिकचें सोंग द्यावयाचें व त्याला पंख लावावयाचे. ज्युबिलीची मिरवणूक निघाली व ग्यारिकचा जयजयकार लोक करूं लागले, कीं ग्यारिकचें सोंग घेणाऱ्या मनुष्यानें दुसरें कांहीं उत्तर न देतां आपलें पंख फडफडावून तोंडानें कोंबड्यासारखें ओरडावें अशी योजना त्यानें केली होती. ग्यारिकला फूट असा कांहीं विचित्र प्रकार करणार आहे, असें कळल्यापासून, त्याबद्दल काळजी वाटूं लागली. त्याच्या मुद्रेवरचा तजेला सुकून काळजीचा परिणाम तोंडावर दिसूं लागला. तो इतका कीं, त्याच्या मित्रमंडळीला त्याची कींव येऊं लागली. कारण आपल्याविषयीं कोण काय बोलतो याबद्दल तो नेहमीं भिऊन असे. शेवटीं मध्यस्ती पडून त्याच्या मित्रमंडळीनें त्या दोघांच्या गांठीचा एके ठिकाणीं योग आणला व त्याचें सख्य करून दिलें.

ग्यारिकच्या वेळीं राजकीय व सामाजिक वातावरणांत, ज्या गोष्टीची विशेष चर्चा चाले, त्या नाटकरूपानें बाहेर आणल्या जात. यामुळें केव्हां केव्हां प्रसिद्ध व्यक्तींच्याही भूमिका रंगभूमीवर आणल्या जात. अशा संबंधाच्या कांहीं आख्यायिका प्रसिद्ध आहेत. या वेळीं ईस्ट-इंडिया कंपनीच्या हातीं हिंदुस्थानची राजसत्ता होती. या सत्तेच्या जोरावर कंपनीच्या सभासदांनीं थोड्याच काळांत फार संपत्ति मिळविली, पार्लमेंटच्या पिढीजात उमरावांना पदच्युत केलें, आपल्या देशांत मोठमोठाले वाडे बांधले व बादशाही थाटानें व ऐश्वर्यानें ते मिरवूं लागले. यामुळें या सभासदांच्या विरुद्ध लोकमत अगदीं खवळून गेलें. यावर या फूटनें "नबाब" नांवाचें एक प्रहसन रचून त्यांत या सभासदांच्या उन्मादपणाचें चित्र रेखाटलें. ही गोष्ट सभासदांपैकीं एकदोघांना न खपून त्यांनीं याचा वचपा काढण्याकरितां दोन सोटे विकत घेऊन ते फूटच्या घरीं गेले. फूटनें त्यांचा इतका कांहीं आदरसत्कार केला कीं, ज्या आवेशानें ते आले होते तो आवेश थंडगार पडून ते समजुतीच्या गोष्टी ऐकण्यास कबूल झाले. फूट म्हणाला कीं, मी हें प्रहसन कोणा विशिष्ट व्यक्तीवर लिहिलें नसून

लोकांत ज्या गोष्टीविषयीं विशेष बभ्रा झाला आहे, त्याला अनुलक्षून व नबाबासारख्या वागणाऱ्या लोकांच्या बेपर्वा वर्तनावर मीं हें प्रहसन लिहिलें आहे; हें स्पष्ट करून दाखविण्याकरितां फूटनें तें प्रहसन त्या दोघांना वाचून दाखविलें. तेव्हां आलेल्या सभासदांचें समाधान झालें. इतकेंच नाहीं तर त्यांची व फूटची एका ठिकाणीं पंगत होऊन हे आलेले पाहुणे फूटच्या हुशारीची व समयसूचकतेची तारीफ करीत निघून गेले.

जान्सनची भूमिका एका प्रहसनामध्यें आणून ती फूट रंगभूमीवर आणणार होता. ही गोष्ट जान्सनला कळली. तेव्हां त्यानें एक लठ्ठसा सोडगा बाजारांतून विकत आणविला व या प्रहसन लिहिणाराला व लोकांना कळविलें कीं, नाटकाच्या दिवशीं मी अगदीं पुढच्या रांगेवर बसून, माझी कोणी रंगभूमीवर थट्टा, नक्कल किंवा उपहास केला असें मला दिसलें, कीं, मी एकदम रंगभूमीवर उडी घेऊन माझी थट्टा करणाराची प्रेक्षकांसमोर चांगली कणिक मऊ करीन, आणि नंतर प्रेक्षकांना माझें रक्षण करण्याबद्दल विनंति करीन.

फूटचीं प्रहसनें, समाजांत ज्या गोष्टींवर लोकांत खळबळ उडत असे त्यांवर असत. अशा प्रहसनांत, कित्येक प्रसिद्ध व्यक्तीही प्रत्यक्ष किंवा पर्यायानें बळी पडत. त्यानें लिहिलेल्या कांहीं प्रहसनाच्या नांवावरूनच तीं कशा प्रकारचीं असतील हें समजून येतें. "मेअर ऑफ ग्यारेट" म्हणजे खोपटांतला नगराध्यक्ष, "डेव्हिल ऑन टू स्टिक्स" म्हणजे दोन काठ्यांवरचें भूत. अशीं प्रहसनें त्या त्या वेळीं लोकांचें मनरंजन करणारीं असतात किंवा समाजांत जे आचार-विचार प्रचलित होतात, त्यांवर कोरडे ओढण्याकरितां असतात; परंतु समाजाच्या चालीरीतींत फरक पडला म्हणजे, त्या प्रहसनाचें स्वारस्य नाहींसें होतें व ज्या व्यक्तीला अनुलक्षून तीं रचलेलीं असतात, त्या नाहींशा झाल्या म्हणजे दुसऱ्या पिढीला त्या प्रहसनाचें रहस्य समजेनासें होतें. Comedy is the glass of fashion, the figures are ever changing in it. म्हणजे प्रहसनांत लोकाचाराचें व रूढीचें चित्र दिसतें; परंतु हीं चित्रें ( रूढि ) वरचेवर बदलणारीं असतात. आणि–tragedy is the mirror of passions which are in every age similar

and unalterable. दुःखपर्यवसायी नाटकांच्या आरशांतून मनोविकार पाहावयास मिळतात. हे मनोविकार न बदलणारे व सर्वकाळ एकाच स्वरूपांत असतात.* असें एका ग्रंथकारानें म्हटलें आहे.

तात्कालिक लोकरंजन करणारे हास्यरसोत्पादक, किंवा लोकांची नालस्ती करणारे व्यक्तिविषयक–प्रहसनाचे प्रकार आपली लोकप्रियता नेहमीं राखीत नाहींत व लेखकांचीही लोकप्रियता कायम राहात नाहीं. फूटला पूर्वी जो मान समाजांत होता तो त्याच्या या लोकांची हुरमत घेण्याच्या संवयीनें राहिला नाहीं. त्याला शेवटीं आपला धंदा सोडावा लागला. ग्यारिक आणि फूट यांमध्यें तुलना करतांना जान्सननें म्हटलें आहे कीं, ग्यारिकला अब्रूची चाड आहे आणि फूट "निर्लज्जं सदा सुखी" असा आहे.

ग्यारिकचा द्वेष करणारे फूटशिवाय आणखीही पुष्कळ होते व ते ग्यारिकवर वेळीं अवेळीं द्वेषमूलक टीका करीत असत. अशांना ग्यारिकनें 'लेखणी बहाद्दर' ( Gentlemen of the pen ) अशी संज्ञा दिली होती; परंतु त्यांच्या टीकेचा परिणाम, फूटच्या टीकेच्या दहाव्या हिश्शानें सुद्धां त्याच्यावर होत नव्हता. हा फूट–समव्यवसायी व सलगींतला असून, कोणती गोष्ट ग्यारिकच्या वर्मी लागेल हें पाहत असे. ग्यारिकची बायको नेहमीं म्हणे कीं, मला व नवऱ्याला हा फूट अति त्रासदायक झाला आहे. परंतु "जो कमी दर्जाचा मनुष्य असतो तोच लोकांची निंदा व कुचेष्टा करण्यास प्रवृत्त होतो." असें ग्यारिकचे मित्र तिचें समाधान करीत असत.

## ग्यारिक ग्रंथकार म्हणून

ग्यारिक नट म्हणून जितका प्रसिद्ध आहे, तितका ग्रंथकार म्हणून नाहीं. त्यानें कांहीं नाटकें लिहिलीं आहेत "लेथें", "लाइंग व्हॅलेट",

* आपल्याकडीलं प्रहसनाचा हाच इतिहास. आहे. कै० शंकर मोरो रानडे यांचीं नाट्यकथार्णवांतील प्रहसनें, नारायण बापूजी कानिटकर यांचीं व नारायण हरि भागवत, यांचीं सुधारणाविषयक सुधारकांच्या विरुद्ध लिहिलेलीं प्रहसनें सुमारें ३० वर्षांपूर्वीच्या पिढींत लोकप्रिय झालीं होतीं. हल्लींच्या पिढींत रा० माधव नारायण जोशी हे "कॉमिक रायटर" प्रहसनकार म्हणून प्रसिद्ध झाले आहेत.

"मिस् इन हर टीनूस", "आयरिश वुइडो", "जान टाम" अथवा "हाय लाईफ अबव्ह स्टेअर्स." शेवटचें हें प्रहसन आहे. हें दुसऱ्या एका नाटककारानें "जिन्याखालचें रहस्य" (हाय लाईफ बिलो स्टेअर्स) म्हणून नाटक लिहिलें होतें त्याला अनुलक्षून "माडीवरचें रहस्य" हें नाटक ग्यारिकनें लिहिलें होतें. त्यानें लिहिलेलीं हीं नाटकें इकडच्या वाचकवर्गांत प्रसिद्ध नाहींत; म्हणून त्यांच्या बरेवाईटपणाबद्दल कांहींच लिहितां येत नाहीं. ग्यारिकच्या चरित्रकारांनींही याबद्दल फारसें कांहीं लिहिलें नाहीं. दुसऱ्या पुष्कळ नाटकांना त्यानें उपोद्घात म्हणून व शेवटीं उपसंहार म्हणून "प्रोलोग व इपिलोग" सुमारें ८० रचले आहेत; कित्येक नाटकांत प्रयोगाच्या सोईकरितां फेरफार केले आहेत. अशीं नाटकें एकत्र केलीं तर त्यांचें ओझें गाडीभर होईल असें चरित्रकारानें म्हटलें आहे. उपोद्घातांतील भाषणांत बहुतेक प्रचलित चळवळींचा उल्लेख असे. राजकीय चळवळीवर त्यानें कांहीं लिहिलेलें आढळत नाहीं. मित्रांच्या गौरवाचे व त्यांच्या मृत्यूवर त्यानें कांहीं स्फुट लिहिले आहेत. शेरिडनच्या नाटकावर त्याचे कांहीं प्रोलोग व इपिलोग आहेत. निरनिराळ्या प्रसंगांनीं त्यानें जे स्फुट लेख लिहिले आहेत, त्यांपैकीं कांहीं पुढें दिले आहेत:

ग्यारिक प्रवासाहून परत आल्यावर प्रथम रंगभूमीवर आला, तेव्हां त्यानें राजाच्या सूचनेवरून जें भाषण केलें, त्यांत आपली तुलना जुन्या लढवय्या शिपायाशीं केली आहे:—

Should the drum beat to arms, at first he'ill greave
For wooden leg, lost eye and armless sleeve;
Then cocks his hat, looks fierce and swells his chest
'Tis for my king! and zounds I'ill do my best.

[माझा एक पाय व एक हात तुटला आहे व एक डोळा नाहींसा झाला आहे तरी बिगुल वाजतांच माझ्या राजाकरितां मी खांद्यावर बंदुक टाकून एका पायावर तयार होईन.]

जान्सनचा 'इंग्लिश भाषेचा कोश' तयार झाल्यावर ग्यारिकनें त्यावर अभिनंदनपर स्फुट रचलें, त्यांत ग्यारिकचा स्वदेशाभिमान जसा ढळढळीत

व्यक्त होत आहे, तशीच त्याची जान्सनबद्दलची पूज्यबुद्धीही व्यक्त होत आहे. स्फुटाचा सारांश पुढें दिला आहे:—

फ्रान्सची लष्करी शक्ति, विद्वत्ता, शास्त्रीय शोध, कवित्वशक्ति, ग्रंथ-संग्रह या सर्व गोष्टींत आमचें इंग्लंड फ्रान्सपेक्षां पुढें आहे. शेक्सूपीयर, मिल्टन, ड्रायडन, पोप, न्यूटन यांच्यासारखीं दिव्य रत्नें इंग्लंडांत उदयास आलीं, त्यांच्यापुढें फ्रान्समधले कोणीही नाटककार किंवा कवि खिजगणतींत आहेत.

[ Let them rally their heroes, send forth all their powers
Their versemen and prosemen then match them with ours.
First Shakespeare and Milton, like Gods in the fight.
Have put their whole drama and epic to flight.
In satires, epistles and odes would they cope
Their numbers retreat before Dryden and Pope.]

फ्रेंच-भाषेचा कोश तयार करण्याकरितां फ्रान्समधल्या चाळीस तज्ज्ञांचें मंडळ बसलें होतें, त्याला उद्देशून ग्यारिकनें पुढील स्फुट केलें होतें—

And Johnson well armed like a hero of yore
Has beat forty French and will beat forty more.

[ जान्सननें प्राचीन सशस्त्र शूराप्रमाणें चाळीस फ्रेंच लोकांना झोडपलें आहे व आणखी चाळिसांना तो झोडपील.]

ग्यारिकच्या मनांतून इंग्लंडच्या नाट्यकलेचा इतिहास लिहावयाचा होता; परंतु तो विचार अमलांत आला नाहीं. गोल्ड्स्मिथ " कला आणि शास्त्र " (Popular Dictionary of Arts and sciences) यांचा विश्वकोश तयार करणार होता; व त्यांत प्रत्येक कलेचे व शास्त्राचे निष्णात लेखक लिहिणार होते. ग्यारिककडे नाट्याभिनयाचा भाग होता, जान्सन तत्त्वज्ञान, रेनाल्ड चित्रकला असे एकेकानें एकेक विषय घेतले होते; परंतु गोल्ड्स्मिथच्या अकालीं मरणानें हे विचार जागचे

जागीं राहिले. ग्यारिकचा खाजगी पत्रव्यवहार फारच मोठा आहे व त्याचे दोन भाग आहेत. सारांश, ग्रंथकार या नात्यानें ग्यारिकनें इंग्लंड-च्या नाट्यकलेचा इतिहास स्वतः लिहिण्याच्या ऐवजीं भावी ग्रंथकारांना तो लिहिण्याची भरपूर सामुग्री करून दिली आहे.

## स्वभाव

ग्यारिक रंगभूमीवर कामें करूं लागल्यापासून सुमारें पाव शतका-पर्यंतच्या त्याच्या चरित्रांतील महत्त्वाच्या गोष्टींचें वर्णन मागील प्रकरणा-पर्यंत आलें आहे. त्यानें आपल्या धंद्यांत काय कामगिरी केली हें वाचकांना समजून आलें असेल. हें वर्णन म्हणजे इंग्लंडच्या नाट्यकलेचा इतिहास आहे म्हटलें तरी चालेल. या पुढचा ग्यारिकचा इतिहास म्हणून व्यक्ति-दृष्ट्या समाजांत त्यानें आपला मान कसा राखून घेतला किंवा आपल्या-पेक्षां वरच्या वर्गाशीं व समकालीन नटांशीं तो कसा वागला, लोक त्याच्याशीं कसे वागत होते, त्याच्याबद्दल कोणाचा कसा ग्रह होता हें पाहावयाचें आहे. त्याच्या धंद्याच्या कारकीर्दींत त्याचे जसे पुष्कळ भक्त होते, तसे त्याचे निंदकही होते; परंतु निंदकाचें घर शेजारीं जागृत ठेवून त्यानें लोकप्रियता संपादन कशी केली हें या प्रकरणांत समजून येईल.

त्यानें मोठ्या कष्टानें संपत्ति मिळविली होती. ती सारासारविचार करून तो खर्च करीत असे. त्याबद्दल कृपणपणाचा आरोप त्याच्यावर होता; तसेंच तो बरोबरीच्या नटांचा हेवा करतो, असाही त्याच्यावर आरोप होता; परंतु त्याचेच चरित्रकार म्हणतात त्याप्रमाणें—" उधळ्या व व्यसनी लोकांना दूरदर्शीपणा हा कृपणपणा वाटतो व हात राखून खर्च करणें हा लोभीपणा वाटतो. (To profligate spendthrifts prudence is meanness and economy is avarice.) ग्यारिक स्वभावतः हात राखून खर्च करणारा होता, तरी योग्य वेळीं हाताचा उदारही होता. (Garrick was frugal by habit, he was liberal from principle.)

कृपणपणाचे आरोप-त्याच्या चरित्रकारांनीं सप्रमाण खोडले आहेत. तो कृपण होता हा आरोप त्याचा हेवा करणाऱ्या नटांचा होता; परंतु

कित्येक नटांच्या मदतीकरितां मुद्दाम प्रयोग करून त्यांला अधिक प्राप्ति व्हावी म्हणून त्यांत तो स्वतः काम करीत असे. कित्येक नटांना उसनवार पैसे देऊन त्यानें मदत केली होती. हे पैसे परत घ्यावयाचे नसले म्हणजे त्याच्याकडून लिहून घेतलेली वचनचिट्ठी (Promisary Note-"I. O. U.") पाकिटांत घालून तो परत करी व पाकिटावर "या लखोट्यांतील वस्तु दिव्यावर धरून ती कशी जळते ती पाहा." असें म्हणून त्याला आपल्या ऋणांतून मुक्त करण्याची त्याची वहिवाट असे. रिकामा असलेला नट व होतकरू कवि त्याच्याकडे मदत मागण्यास गेला तर तो विन्मुख परत गेल्याचें उदाहरण फारच क्वचित् घडत होतें. केव्हां दुसऱ्याला मदत करण्यास आपण होऊन पुढें होई; परंतु अशा वेळीं मी तुमच्यावर हे उपकार करीत आहे असें दिसूं नये म्हणून तो खबरदारी ठेवीत असे.

दुसऱ्या नटांचा तो हेवा करीत होता, या आक्षेपाचें निरसन ब्यारी व ग्यारिक यांच्यामध्यें जे चढाओढीचे संयुक्त प्रयोग झाले त्या गोष्टीनेंच होणार आहे. पैशासंबंधानें दुसऱ्याचा हेवा करण्याचें त्याला कारण नव्हतें. कारण सांपत्तिक दृष्टीनें दुसऱ्यांनींच त्याचा हेवा करावा अशी त्याची स्थिति होती. कीर्तीनें तो फारच उंच कळसावर पोंचला होता, तेव्हां दुसऱ्या नटांचा हेवा करून आपली कीर्ति त्याला वाढवावयाची नव्हती. आपल्या बरोबरीच्या नटांबरोबर काम करून लोकांना तुलना करण्याची संधि द्यावी या ईर्षेनें तो काम करीत असे. स्वतःचे दोष तो जाणून होता. आपल्यापेक्षां एखादा नट चांगलें काम करीत असेल तर तें तो मोकळ्या मनानें कबूल करीत असे. अथेल्लोची भूमिका त्याला साधली नाहीं, म्हणून त्यानें ती ब्यारीस करण्यास सांगितलें व आपण यागोची करूं लागला. माझ्यापेक्षां ब्यारी रोमियोची भूमिका चांगली करतो असें तो म्हणत असे. एखादा नट होतकरू दिसला, कीं त्याला शिकवून तयार करणें हा त्याचा स्वभाव होता. त्याच्याकडे मज्जाव कोणालाही नव्हता. सवड नसली तरी स्मश्रू करतां करतां नटास शिकविण्याची सवड काढून त्याला शिकविण्याचा त्याचा प्रघात असे.

ग्यारिकची दिनचर्या ठरलेली होती. आठवड्यांतून तीन वेळां नाटकें बदलून काम करावयाचें, नाटकगृहासंबंधींची जी व्यवस्था

त्याच्याकडे होती, ती पाहावयाची, भोजन ठरलेल्या वेळीं व्हावयाचें, परत भेटी द्यावयाच्या, फिरावयास जावयाचें, या नित्य व्यवहारांतल्या गोष्टी संभाळून कारकुनाच्या मदतीशिवाय सविस्तर मजकुराचीं पत्रें स्वतः लिहिण्यास त्याला वेळ सांपडत होता, त्याच्या वेळेला तो एक उद्योगी व वेळेवर कामें करणारा मनुष्य असें म्हटलें जात होतें. याच वेळांत त्यानें नाटकें लिहावीं, "प्रोलोग" "इपिलोग" लिहावे, स्फुट कविता कराव्या, असा त्याचा लेखनव्यवसाय अव्याहत चालत होता. त्याच्या नाटक-मंडळींतले नट व बायका यांच्याकडून त्याला फार त्रास होत असे; परंतु त्यानें मनाची शांतता कधीं ढळूं दिली नाहीं. त्याच्या मनाचा मोठेपणा, त्याचें धोरण व दूरदृष्टि हीं त्याच्या पत्रव्यवहाराचा जो संग्रह आहे त्यांत दिसून येतात.

त्याचे नट केव्हां केव्हां ग्यारिक आम्हांला हलकींसलकीं कामें देऊन मुख्य कामें आपणाकडे घेतो अशी तक्रार करीत असत, तेव्हां ग्यारिकनें तुम्हांला पाहिजे तो दिवस व पाहिजे ती भूमिका घ्या, मी इतर दिवशीं दुसरें काम ( भूमिका ) करीन असें म्हणून त्यानें नटांची तक्रार मिटवावी. ब्यारी नटाचीही अशी तक्रार असे. ग्यारिकनें त्याला सांगितलें कीं, "तूं आपला दिवस पसंत करीत जा." तेव्हां ब्यारीचें समाधान होऊन तुम्ही सांगाल तसें मी करीन असें तो म्हणाला.*

* नटांची अशी समजूत असते कीं, मुख्य भूमिका करण्यानें आपलें महत्त्व वाढतें, परंतु ज्याच्या अंगीं तसे गुण आहेत त्याला आपली करामत कशाही हलक्या कामांत सुद्धां दाखवितां येते. ग्यारिकच्या नंतर म्याक्रिडी म्हणून एक प्रसिद्ध नट होऊन गेला, त्याचें आपल्या नटांना नेहमीं सांगणें असें कीं, नट हा भूमिका बनवीत असतो. भूमिकेनें नट बनत नाहींत. it was the actor that made the part, not the part that made the actor.

अण्णासाहेब किर्लोस्कर याच मताचे असत. त्यांच्या वेळीं तीन नाटकें असत. शाकुंतल व रामराजवियोग नाटकांत त्यांनीं शिष्य व चोपदार अशा हलक्या भूमिका करून पुढच्या अंकांत मोठ्या भूमिका घेतल्या आहेत. शेक्सपीयर हॅम्लेटमध्यें भुताची भूमिका करीत असे अशी आख्यायिका आहे.

नवीन नाटकें स्वीकारण्यासंबंधानें त्याचें म्हणणें असें कीं, "माझा शत्रु असला तरी त्याचें नाटक मी रंगभूमीवर आणीन" आपलें नांव लोकांत जागृत असावें असा नेहमीं त्याचा प्रयत्न असे. चार मंडळींत असला व आपल्या भाषणाचा व कोटिक्रमाचा त्या मंडळीवर ठसा उमटला आहे असें त्याला दिसून आलें कीं, मध्येंच ती मंडळी सोडून उठून जावयाचें ही त्याची संवय असे. याचें कारण इतकेंच कीं, आपल्या येण्याचा जो ठसा मंडळींवर झाला असेल तो कायम राहावा. त्याच्या एका स्नेह्यानें म्हटलें होतें कीं, ग्यारिक चार मंडळींत येण्यापूर्वी तिच्यांतून उठून कसें जातां येईल ही योजना करून ठेवल्याशिवाय तो मंडळींत येत नसे.

ग्यारिकच्या चरित्रकारांनीं त्यानें आपल्या संसाराला जी सहधर्मचारिणी केली होती, तिच्या निवडणुकीबद्दल त्याची फार वाखाणणी केली आहे. स्वभावतः ग्यारिकची बायको मनमिळाऊ होती. त्यामुळें नवरा जितका समाजांत लोकप्रिय झाला होता, तितकीच तिच्याबद्दल लोकांची पूज्यबुद्धि होती. या जोडप्याची परस्परांवर अकृत्रिम प्रीति होती. ग्यारिक स्वभावतः प्रेमळ स्वभावाचा असे, परंतु एखादे वेळीं जेव्हां त्याची तब्येत गरम होण्याचा प्रसंग येई, तेव्हां तिला ताळ्यावर आणण्याला तिच्या सौम्य स्वभावाचाच उपाय उपयोगीं पडत असे. "माझी लहर फक्त बायकोजवळच मी उपयोगांत आणतों, ती तिच्या इतकी अंगवळणीं पडली आहे कीं, जसा एखादा खलाशी तोफांचा गडगडाट चालला असला तरी खुशाल झोंपी जातो, तशी मी कितीही तिच्यावर रागावून बोलत असलों तरी ती निश्चिंत झोंपी जाते." असें तो नेहमीं सांगत असे.

ग्यारिक आपल्या भावाशीं फार उदारपणानें वागत असे. एका भावाला प्राप्ति कमी असून तो उधळ्या होता. त्याचा संसार प्राप्तीच्या मानानें मोठा होता, त्यामुळें त्याला वरचेवर मदत करणें ग्यारिकला भाग पडत होतें. तो प्रवासाला गेला होता, तेव्हां आपल्यातर्फे मागची व्यवस्था पाहाण्याला त्यानें आपल्या भावाला मुखत्यारी देऊन ठेविली होती व हँपटन येथील ग्यारिकच्या राहत्या जागीं वरचेवर जाऊन, जें काय माझें आहे तें तुझेंच आहे असें समजून त्याचा उपयोग करीत जा म्हणून तो नेहमीं भावाला लिहीत असे.

ग्यारिकवर त्याच्या धंद्याची जबाबदारी होती व समाजांतील वरच्या दर्जापासून सामान्य जनसमूहांत त्याची मान्यता वाढली होती. अशा स्थितींत त्याच्या ठिकाणीं जर सौजन्यानें लोकांची प्रीति संपादन करण्याचे गुण नसते तर ग्यारिक हा कोणी अद्वितीय पुरुष होऊन गेला असें त्याच्या चरित्रकारांनीं म्हटलें नसतें. फूट हा नट त्याचा समकालीन असून अभिनयकुशलतेबद्दल त्याची ख्याति असे; त्याचेंही चारचौघांत जाणें येणें असे; परंतु त्याला करमणूक करणारा एक नकल्या असें लोक समजत असत आणि ग्यारिक कोठें गेला तरी बरोबरीच्या नात्यानें त्याला वागवीत असत.

गोल्ड्स्मिथचें व ग्यारिकचें रहस्य नव्हतें. याचें कारण गोल्ड्स्मिथनें ग्यारिकवर कधीं एकदां टीका केली होती. म्हणून गोल्ड्स्मिथचें 'गुड नेचर्ड मॅन' नाटक त्यानें घेतलें नाहीं, असा त्याच्यावर अपवाद होता परंतु खरें कारण हें नाहीं असें त्याचे चरित्रकारच सांगतात. तें नाटक त्याला पसंत पडलें नाहीं म्हणून त्यानें घेतलें नाहीं व दुसरें नाटक लिहिण्याबद्दल त्याला ग्यारिकनें सांगितलें व त्याबद्दल आगाऊ साठ पौंड त्याला देऊन ठेवले.

ग्यारिक आणि गोल्ड्स्मिथ एका विश्रांतिगृहांत (Jame's Coffee house) जमत असत. तेथें समयस्फूर्तीनें लिटररी क्लबाच्या सभासदांच्या गुणदोषांवर एकमेक कविता करीत असत. त्यांपैकीं ग्यारिकवर गोल्ड्स्मिथची कविता—

Our Garrick is a salad, for him we see,
Oil vinegar sugar, and saltness agree.

[ग्यारिक ही एक चटणी आहे. इच्यांत खारट, आंबट, तेलकट व गोड सर्व कांहीं खपतें.]

ग्यारिकनें गोल्ड्स्मिथच्या मृत्यूवर पुढील कविता रचली आहे—

Here lies Nolly Goldsmith for shortness called Noll
Who wrote like an angel, but talked like poor Poll.

[गोल्ड्स्मिथच्या लेखांत मोहिनी असे, परंतु त्याचें भाषण पोपटा-सारखें असे.]

• Retaliation नांवाचें गोल्डस्मिथचें एक काव्य प्रसिद्ध आहे. त्यांत ग्यारिकच्या स्वभावाचें पुढील वर्णन आहे:—

Here lies David Garrick, describe me who can
An abridgement of all that was pleasant in man
As an actor confest without rival to shine
As a wit if not first in the very first line
On the stage he was natural simple affecting.
'T was only that he was off he was acting.

[ मनुष्यांत जो चांगुलपणा लागतो त्या सर्वांचें सार ग्यारिकमध्यें होतें. नाट्यकलेंत तर तो अद्वितीय नट होता. तो जरी पहिल्या प्रतीचा कोटीबाज नव्हता, तरी कोटीबाजाच्या पहिल्या पंक्तींत बसण्याच्या योग्यतेचा होता. रंगभूमीवर तो एक वेषधारी साधा असा नट होता; परंतु त्याचें सारें नाट्यनैपुण्य तो रंगभूमीच्या बाहेर असला म्हणजेच दिसून येई असें म्हटलें तरी चालेल.]

हें वर्णन त्याच्या गुणाचें झालें, आतां त्याच्या स्वभावांतील दोषांचें वर्णन आहे तें हें:—

Of praise a mere glutten he swallowed what came
And the puff of dunce he mistook for fame.

[ स्तुति करून घेण्याच्या कामांत तो अत्यंत आधाशी होता. मूर्खाच्या स्तुतीला तो आपली कीर्तिच समजत असे.]

बर्क, रेनॉल्ड, गिबन यांच्यावरही गोल्डस्मिथनें असेच चुटके लिहिले आहेत.*

ग्यारिकचे क्वीन, ब्यारी, फूट, म्याक्लीन इत्यादि नट प्रतिस्पर्धी होते; परंतु खाजगी व्यवहारांत त्यांच्याशीं याचें वितुष्ट नव्हतें. आपल्या गुणांनीं

* अण्णासाहेब किर्लोस्करांनां बेळगांवास शिक्षक असतांना, तेथील त्या वेळच्या त्यांच्या स्नेही मंडळींवर अशाच कविता केल्या होत्या. त्या शिमग्यांत धुळवडीच्या दिवशीं प्रसिद्धपणें म्हटल्या जात होत्या. त्या कवितेंत अश्लीलपणा असल्यानें शिमग्याच्या दिवशीं त्या लोकांची करमणूक करीत.

त्यांच्यावर श्रेष्ठत्व मिळावें म्हणून तो धडपड करीत असे; परंतु त्यांच्याबद्दल त्यानें वेळोवेळीं आदरच दाखविला आहे. क्वीन आजारी असतांना ग्यारिकचा पाहुणा होता. त्याच्या मृत्यूनंतर त्याचे सद्गुण व त्याची नाट्यकुशलता यांवर रसभरित काव्य करून आपली पूज्यबुद्धि त्यानें व्यक्त केली आहे:—

That tongue which set the table on roar
And charm'd the public ear, is heard no more
Closed are those eyes, the harbingers of wit
Which spoke, before the tongue what Shakes peare writ;
Cold are those hands, which living were stretched forth
At friendship's call to succour modest worth.
Here lies James Quin! deign reader to be taught
Whatever thy strength of body fore of thought
In natures happiest mould however cast
To this complexion then must come at last.

[ ज्याच्या जिव्हाचापल्यानें भोजनसमारंभांत हास्यरसाचा कल्लोळ उडत असे व भाषण ऐकण्याविषयीं लोकांचे कर्ण आतुर असत ते आतां आपणास ऐकण्यास मिळणार नाहीं. शेक्सपीअरचीं वाक्यें जिव्हाग्रांतून बाहेर पडण्यापूर्वीं विनोदाची वार्ता देणारे त्याचे नेत्र आतां मिटले आहेत. मित्रांच्या हांकेला मदत देण्याकरितां पसरणारे हात थंड पडले आहेत. अशा गुणांचा नट जेम्स क्विन इहलोक सोडून गेला! वाचकहो, त्याच्या चरित्रापासून कांहीं बोध घेण्यासारखा असेल तर तो घ्या. ईश्वरानें जरी तुम्हांस शरीर-संपत्ति व विचारशक्ति पूर्ण कृपाप्रसादानें दिली आहे तरी तुम्हांस शेवटीं या स्थितींतच मिसळलें पाहिजे. ]

ग्यारिकच्या उदार स्वभावाच्या गोष्टी त्याच्या चरित्रकारांनीं पुष्कळच सांगितल्या आहेत व प्रसंगाप्रसंगानें त्या या चरित्रांतही आल्या

आहेत. लहान-मोठ्यांना, गरीबगुरिबांना त्यानें द्रव्याची मदत केल्याचीं उदाहरणें सर्वच देत बसलों तर तीच एक मोठा ग्रंथ होईल. तो लोकांत आल्यापासून त्याचें बुद्धिवैशिष्ट्य जसें दिसून आलें, तसाच त्याचा उदारपणाही आजन्म राहिला.

## मधलीं आठ वर्षे

[१७६६ – १७७४]

ग्यारिक दोन वर्षे फ्रान्स व इटलीमध्यें प्रवास करीत होता. तेवढ्या काळांत त्याच्या मोठमोठ्या अमीरउमरावांच्या भेटी झाल्या व प्रसिद्ध नटांशीं परिचय झाला. सन १७६५ मध्यें तो प्रवासाहून परत आला. परत आल्यावर त्यानें नव्या नाटकांत भूमिका घेण्याचें सोडलें. या सुमारास त्याचें वय पन्नास वर्षांचें होतें; परंतु दोन रोगांनीं त्याच्यावर आपली झडप घालण्यास सुरवात केली होती. एक मूत्ररोग व दुसरा संधिवात. त्यामुळें विशेष अवसानाच्या व ज्यांत उभ्यानें अंग टाकण्याचे प्रसंग असतील अशा भूमिका त्यानें करण्याच्या सोडल्या. इकडे पुढच्या आठ वर्षांत नाट्यसृष्टींत बरेच फेरफार झाले होते. कांहीं नट त्याला सोडून गेले. कांहीं नटींचें काम करणाऱ्या स्त्रिया मृत्यु पावल्या. कित्येक धंदा सोडून घरीं राहिल्या. ज्यांच्याबरोबर त्यानें नांव व कीर्ति मिळविली, त्यांच्या जागेवर आलेले नट कमी योग्यतेचे व स्त्रिया कजाग होत्या. नट-वर्गाशीं व ग्रंथकारांशीं सारखी घासाघीस करावी लागत असल्यानें तो धंद्याला अगदीं कंटाळून गेला होता. त्याच्या पूर्ववयांत जें त्याला सुख झालें होतें तें नाहींसें झालें. हा धंदा केव्हां सोडीन असें त्याला झालें होतें. I shall shake my chains and no culprit in a jail delivery will be happier) "हा धंदा सोडण्याचा दिवस उगवेल तेव्हां तुरुंगांतील कैद्याला आपल्या मुक्ततेबद्दल आनंद होणार नाहीं इतका मला होईल" असें तो म्हणत असे.

प्रवासाहून परत आल्यावर त्यानें महत्त्वाच्या अशा दोन गोष्टी केल्या. एक शेक्स्पीयरची ज्युबिली. ही हकीगत पूर्वीच्या प्रकरणांत येऊन गेली आहेच. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे निरुपयोगी झालेल्या नटांच्या

मदतीकरितां त्यानें एक फंड उभारला ही होय. प्रवासांत असतांना कव्हेंट गार्डन नाटकगृहांच्या मालकांनीं नटांच्या मदतीकरितां फंड उभारला होता; परंतु आपल्याला ही गोष्ट कळविलीसुद्धां नाहीं याबद्दल त्याला विषाद वाटला; म्हणून परत आल्यावर आपल्या भागीदाराच्या मदतीनें त्यानेंही स्वतंत्र फंड उभारला ( १७६६ ). स्वतःची मोठी रक्कम प्रथम घालून सुरुवात केली व प्रत्येक वर्षी या फंडाकरितां एक स्वतंत्र प्रयोग करून त्यांत स्वतः भूमिका करण्याचें ठरविलें. याचे व भागीदाराचे मिळून ४५०० पौंड प्रथम जमवून पार्लमेंटकडून त्याची कायदेशीर व्यवस्था करण्याकरितां जो खर्च लागला तो स्वतः ग्यारिकनें केला. त्याचा एक चरित्रकार सांगतो कीं, "कव्हेंट गार्डन" संस्थेचा फंड भरभराटीस आला नाहीं. नटांचा म्यानेजरवर विश्वास बसेना व म्यानेजर फंडाकरितां स्वतंत्र प्रयोग करण्याला कबूल होईनात. पुढें दोन्ही फंड एक करण्यांत आले व त्याची रक्कम सन १८६८ पर्यंत साठ हजार पौंड झाली होती.

ग्यारिकच्या स्वभावांत एक गोम होती, तो उदार मनाचा होता, उदार हाताचा होता, त्याच्या धंद्यांत त्याच्या बरोबरीचें कोणी नव्हतें. इतक्या गोष्टी त्याच्या स्वभावांतील गुण सिद्ध करण्यास पुऱ्या होत्या; तरी त्याच्याविरुद्ध कोणीं कांहीं टीका केली कीं, ती त्याच्या मनास लागत असे. मग अशा टीकाकारांना आर्जवानें किंवा आपल्याकडे कमीपणा घेऊनसुद्धां अनुकूल करून घ्यावयाचें असा त्याचा स्वभाव असे. ग्यारिकच्या वेळेला वर्तमानपत्रांतून किंवा हस्तपत्रकांतून नाट्यविषयक चर्चा, नाटककार व नटांवर टीका येत असून शिवाय खाजगी पत्रांनीं त्याचे शत्रु किंवा त्याच्याविरुद्ध असणारे किंवा दुसऱ्या नटांचे अभिमानी ग्यारिकवर हल्ला करीत असत. ग्यारिकचें वय या वेळेला सत्तावन वर्षांचें होतें. वार्धक्याचीं चिन्हें स्वभावतः त्याच्या तोंडावर दिसूं लागलीं होतीं. हीं त्याच्या टीकाकारांना टीका करावयास कारण झालीं. वर्तमानपत्रांतून ग्यारिकचें वय किती असावें म्हणून चर्चा होऊं लागली. कोणी तुमचें वय किती असावें म्हणून प्रत्यक्ष विचार करूं लागले. कोणी "तुमचें वय साठ वर्षांचें आहे अशी लोकांत पैज लागली आहे; तेव्हां खरेंच तुमचें

वय तितकें आहे काय ?" म्हणून चौकशी करूं लागले. त्याचे जे निंदक असत ते "Rouge and powder cannot give the bloom of youth." गालाला रंग लावून तारुण्य येत नाहीं अशा भाषेनें त्याचा उपहास करूं लागले.

सारांश, ग्यारिकला समजून आलें कीं, आपण आतां आपला कारभार आटोपावा हें बरें. वयाचा प्रश्न त्यालाच प्रत्यक्ष विचारण्यांत येऊं लागला तेव्हां तो म्हणाला, "तुम्हीं ज्या अर्थीं माझ्या तोंडावरचा बुरखा काढला आहे त्या अर्थीं मीं आतां लोकांचा निरोप घ्यावा हें बरें. (As you have so kindly pulled off my mask it is time for me to make my exit) ग्यारिकचें वय साठीच्या जवळ आलें होतें हें तर खरेंच; परंतु त्याचें अर्धें अधिक आयुष्य रात्रंदिवस विचार करण्यांत व चेहऱ्याला निरनिराळे मनोविकार दाखविण्याचे श्रम देण्यांत गेल्यानें इतर नटांपेक्षां त्याच्या चेहऱ्यावर श्रमाचा बोजा दुप्पट पडला होता. त्यामुळें वार्धक्याची छाया त्याच्या तोंडावर अधिक दिसूं लागली असें जान्सन म्हणत असे. ग्यारिकला आपल्या धंद्यापासून परावृत्त व्हावें असें वाटूं लागल्यापासून तो त्या तयारीला लागला.

कांहीं इतिहासकारांनीं १८ व्या शतकाला नाट्यकलेचें शतक असें म्हटलें आहे (Age of acting). सतराव्या शतकांत उत्तम नाटकें उदयास आलीं; परंतु प्रयोगरूपानें तीं प्रसिद्धीस आणणारे नट अठराव्या शतकांत उदयास आले. त्यांत ग्यारिक मेरुमणि होता. या शतकांत रंगभूमीच्या उज्वलतेची व नटांचा प्रभाव उघड करण्याला दर्शनीय देखाव्यांची साधन-सामुग्री व उंची भपक्याच्या पोषाखाची अनुकूलता नव्हती तरी नटांनीं आपलें अंगभूत नाट्यकौशल्य दाखवूनच लोकांचे मनरंजन केलें. या शतकांत नाट्यकलेचें इतकें महत्त्व वाढलें कीं, कवि, टीकाकार व मुत्सद्दीवर्गाला नाट्यकलेची करमणूक आवश्यक वाटूं लागली. नटांना आपल्या गुणांची पारख करण्याला जर एखादी कसोटी असेल तर ती लंडन राजधानीची रंगभूमि आहे असें वाटत असे. कांहीं वर्षें बाहेर प्रांताच्या रंगभूमीवर उमेदवारी करून तेथील समाजाकडून मान्यता मिळविली आहे अशी जरी नटांची खात्री

झालेली असली तरी मुख्य राजधानीच्या रंगभूमीचा पल्ला गांठून तेथील समाजाचीं अंतःकरणें आपल्या कह्यांत आणलीं म्हणजे आपली पात्रता सिद्ध झाली अशी नटांची समजूत असे.

There I could please, but there my fame must end
For hither none must come to boast but to mend

[ इतर ठिकाणीं मी लोकांचें मनरंजन करूं शकलों असेन; परंतु माझी कीर्ति मी तेथेंच ठेवून आलों पाहिजे. येथें येऊन तेथली प्रौढी कोणीं मिरवूं नये. येथें येऊन शिकूनच राहिलें पाहिजे.]

असे एका नटाचे उद्गार आहेत.*

ग्यारिकनें प्रथम नाट्यसृष्टीच्या उंबरठ्यांत पाऊल ठेविलें, तें राजधानीपासूनच्या दूर अंतरावर एके गांवीं, कीं जेथें त्याला नाट्यकलेची पुरी दीक्षा घेतां येईल अशा ठिकाणीं ठेविलें. लंडन शहरांतील नाट्य-मंदिरांत प्रविष्ट होण्यापूर्वीं जी तयारी लागते ती म्हणजे शेक्स्पीयरच्या नाटकांचा पूर्ण अभ्यास करून नंतर तो नाट्यसृष्टींत आपल्या तेजानें चमकूं लागला व तेथें त्यानें आपलें कीर्ति-मंदिर अजरामर राहील असें उभारलें. पस्तीस वर्षें नाट्यकलेची अव्याहत सेवा करून विश्रांति घेण्याचा त्यानें आपला निश्चय जाहीर केला ( मार्च १७७६ ). ग्यारिकच्या चरित्रकारांनीं त्याच्या शेवटच्या प्रयोगाच्या प्रसंगाचें वर्णन केलें आहे तें हृदयद्रावक आहे.

## शेवटचे प्रयोग !

ग्यारिकनें रंगभूमीवरची विश्रांति घेण्याचा निश्चय केल्याबरोबर, आपल्या इतिहासप्रसिद्ध ड्र्यूरिलेन नाटकगृहाची व्यवस्था लावण्याचा व मालकी सोडण्याचाही त्यानें निश्चय केला. त्यानें आपली अर्धी मालकी ३५००० पौंडांस तीन नव्या भागीदारांस विकली. त्यापैकीं प्रसिद्ध नाटककार व वक्ता शेरिडन् हा एक होता. हा शेरिडन् या वेळीं २२

*एके काळीं पुणें शहरच्या प्रेक्षकांच्या मार्मिकपणाबद्दल असाच दरारा असे. हरदास, गवयी, वक्ते, पुराणिक, नट पुणें शहरांतून नांव मिळवून गेले म्हणजे त्या लौकिकावर ते दुसरीकडे लोकादरास पात्र होत असत. उलट बाहेरून येणाऱ्या खऱ्या गुणी लोकांचीच चहा पुणें शहरांत होत असे.

वर्षांचा होता; व महत्त्वाकांक्षी असल्याबद्दल त्याची प्रसिद्धि होती. जवळ भांडवल नाहीं, अननुभवी, तरुण इतक्या गोष्टी प्रतिकूल होत्या, तरी त्याच्या धाडसी स्वभावावर त्याला नाटकगृहाची मालकी देण्याचें ग्यारिकनें ठरविलें. प्रथम ८००० पौंडांस त्यानें नाटकगृहाचा अर्धा भाग विकत घेतला होता. ही गोष्ट मागें येऊन गेली आहेच. त्याची चौपट किंमत २९ वर्षांच्या ड्र्यूरिलेन नाटकगृहाच्या मालकींत त्यानें वाढविली होती. धंदा सोडण्याच्या सुमारास त्याची प्राप्ति ८०० पौंड नाटकांत काम करण्याबद्दल, ५०० पौंड व्यवस्था पाहाण्याबद्दल, ४०० पौंड भागीदाराकडून नफ्याच्या हिश्शाचें येणें होतें तें, शिवाय नाटकगृहाच्या अर्ध्या मालकीचा फायदा. पहिला भागीदार लेसी यानें आपला हिस्सा ग्यारिककडे २२००० पौंडांस गहाण ठेविला होता; व त्याबद्दल नवे जे तीन भागीदार झाले होते त्यांनीं जबाबदारी घेतली होती. एकंदर जवळ जवळ १७५० पौंड त्याची वर्षाची प्राप्ति होती व बत्तीस हजार पौंडांचें गहाणाचें व्याज २२०० पौंड मिळून त्याची प्राप्ति ४००० पौंड वाढली होती.

जून १७७६ च्या १०-व्या तारखेस त्यानें शेवटची भूमिका करून विश्रांति घेतली. तोंपर्यंत मार्च महिन्यापासून जूनपर्यंत निवडक अशा बारा नाटकांतील भूमिका त्यानें शेवटच्या शेवटच्या केल्या. या भूमिका पाहाण्याकरितां त्याच्या नाट्यलोलुपांची उत्कंठा इतकी परमावधीला पोंचली होती कीं, त्याच्याकरितां जो टाळ्यांचा गहजब चालत असे तो कल्पनातीत होता. प्रेक्षकांपैकीं एका सभ्य स्त्रीनें या प्रसंगाचें असें वर्णन केलें आहे कीं, "आमच्या बसावयाच्या जागा हदरूं लागल्या व नाटकगृह आतां कोलमडून पडतें कीं काय अशी आम्हांस भीति वाटूं लागली" दुसऱ्या एकीनें असें लिहिलें आहे कीं, "प्रत्येक नाटकांतील ग्यारिकच्या भूमिका पाहात असतांना मला असें वाटलें कीं, जणुं काय त्या त्या नाट्यकवींची प्रेतयात्रा मी पाहात आहें."

शेवटचे प्रयोग चालले असतांना, प्रेक्षकांची जी भीड लोटूं लागली तिला नाटकगृह अपुरें पडूं लागलें. कळशीभर सांठवण्याच्या पात्रांत जसें हौदाभर पाणी घालण्याचा प्रयत्न करावा तसा प्रकार प्रत्येक प्रयोगाच्या अपरिमित गर्दीला नाटकगृह अपुरें पडूं लागल्यामुळें होऊं लागला.

Quart of audience poured for each performance into a pint of theatre. कशीही जागा असली तरी आम्हांला चालेल म्हणून जागा राखून ठेवण्याकरितां मोठमोठ्या लोकांचीं पत्रें ग्यारिकला येऊं लागलीं. परंतु सर्वांचें समाधान करण्याकरितां त्याला मार्ग सुचेना. डब्लिन व पॅरिसपासून नटवर्ग ग्यारिकच्या शेवटच्या भूमिका पाहाण्याकरितां जमूं लागला. त्याच्या कित्येक निकटच्या स्नेह्यांनासुद्धां जागा मिळेनात. दुसरे नट आपल्या आश्रयदात्यांचा शेवटचा निरोप एका रात्रींत घेतात; परंतु ग्यारिक चार महिने आपल्या आश्रयदात्यांचा निरोप घेत होता. या शेवटच्या प्रयोगांचें महत्त्व लोकांस इतकें वाटूं लागलें कीं, एका सरदाराच्या बायकोनें जागा राखून ठेवण्याकरितां अधिक रक्कम देऊं केली. ती म्हणाली कीं, " माझ्या मुलांनीं ग्यारिकच्या भूमिका पाहिल्याच्या गोष्टी स्वतः पन्नास वर्षांनीं पुढच्या पिढींतल्या लोकांत सांगितल्या पाहिजेत."*

## ग्यारिकचें रंगभूमीवर अखेरचें येणें

ग्यारिकची शेवटची भूमिका घेण्याची तारीख जून १० सन १७७६ ही ठरली होती. ज्या भूमिकेवर माझी कीर्ति झाली ती रिचर्डची भूमिका माझी शेवटची असावी अशी त्याची इच्छा होती; परंतु तसें घडून आलें नाहीं. कारण हा प्रयोग राजेसाहेब व राणीसाहेब यांच्या इच्छेवरून ता. ५ रोजीं करण्यांत आला. तेव्हां शेवटचा प्रयोग " वंडर " नांवाच्या एका हास्यरसप्रधान संविधानकाचा ठरविण्यांत आला. या प्रयोगांत 'डान-

---

* महाराष्ट्रीय नाट्यकलेच्या इतिहासांत अशा प्रकारचें एकच उदाहरण आहे. किर्लोस्कर संगीत मंडळींतले प्रसिद्ध नट भाऊराव कोल्हटकर यांच्या तोंडीचें पात्र नायिकेच्या कामास मिळेनासें झाल्यावर अखेरची विश्रांति घेण्याचा मंडळीनें संकेत जाहीर केला. तेव्हां भाऊरावांची सुभद्रा, मंथरा या भूमिका पाहाण्याकरितां अशाच प्रकारची भींड लोटत होती. कोल्हटकर हें नामांकित पात्र होतें. किर्लोस्कर मंडळी त्यांच्या अभावीं स्मृतिशेष होण्याची वेळ त्या वेळीं आली होती; परंतु ईश्वरी इच्छा ती ४५ वर्षें टिकावी अशी होती !

फेलिक्स' नांवाची एक विनोदी भूमिका ग्यारिकनें घेतली होती. या प्रयोगाचें पुढील प्रसिद्धिपत्रक होतें:—

**रॉयल ड्रूरिलेन नाटक मंडळीचा**
**या खेपेचा शेवटचा प्रयोग**
**जून ता. १० ( १७७६ ) रोजीं**

## वंडर

यांत ग्यारिक डानफेलिक्सची भूमिका घेतील.

[ नंतर इतर पात्रांचीं नांवें आहेत ]

" पहिल्या अंकानंतर हाराचें नृत्य दाखविण्यांत येईल व यालाच जोडून गायनयुक्त मजलस होईल.

" शेवटीं नौकेच्या शर्यतीचा देखावा दाखविला जाईल.

" या प्रयोगाचें उत्पन्न नटवर्गाच्या मदतीकरितां जो फंड उभारण्यांत आला आहे, त्याच्या कामीं लावलें जाईल.

" प्रयोगाच्या मध्यंतरीं ग्यारिक भाषण करतील. कुलस्त्रियांनीं आपल्या जागा राखून ठेवण्याकरितां आपले नोकर पांच वाजल्यानंतर थोड्या वेळानें पाठवावे म्हणजे गोंधळ होणार नाहीं. पडद्यांत कोणासही येऊं दिलें जाणार नाहीं. प्रयोगास सुरवात झाल्यावर कोणत्याही सबबीवर पैसे परत दिले जाणार नाहींत.

" दरवाजे ५–३० वाजतां उघडले जातील व प्रयोगास सुरवात बरोबर ६–३० वाजतां होईल."

शेक्सपीअरच्या नाटकांतील एखादी भूमिका करून ग्यारिकनें, त्याच्या नाटकाची मशाल शेवटीं पाजळत ठेविली नाहीं याबद्दल ग्यारिकच्या चरित्रकारांनीं खेद व्यक्त केला आहे.

'वेंडर' हें नाटक आनंदपर्यवसायी असून त्याचें संविधानक चातुर्यजनक व मनोरंजक आहे. तेव्हां अशा नाटकाच्या प्रयोगानें आपल्या भूमिकेचा ठसा प्रेक्षकांच्या अंत:करणांत खेळत राहावा हाही एक उद्देश हें नाटक शेवटीं ठेवण्याचा होता. शेवटच्या प्रयोगाला प्रेक्षकसमाज समुद्रासारखा पसरला होता. ग्यारिक जिकडे नजर फिरवी तिकडे त्याला त्याच्या परिचयाचीं माणसें दिसत होतीं. अर्धचंद्राकृति नाटकगृहांतील हा अमर्याद प्रेक्षकसमुदाय ग्यारिकला पाहाण्याकरितांच प्रेमभावानें व भक्तिभावानें गोळा झाला होता. यांत दूरदूरच्या प्रांतांतूनही आलेले अनोळखी लोक होते. प्रयोगांतील भूमिकेचें याचें कार्य संपल्यावर प्रेक्षकांत निश्चल शांतता पसरली. या शांततेंत पस्तीस वर्षें ज्यानें रंगभूमि भूषित केली असा लोकांचा आवडता नट प्रेक्षकांच्या समोर आपला शेवटचा निरोप घेण्याकरितां सावकाश सावकाश पावलें टाकीत रंगभूमीवर येऊं लागला. पडद्यामागें त्याचे व्यवसायबंधु त्याचें भाषण ऐकण्याकरितां उभे राहिले. रंगभूमीच्या दोन्ही बाजूंस प्रेक्षकांची गर्दी झाली. आजपर्यंत ज्यानें दुसऱ्याकरितां भाषणें तयार करून दिलीं, तो या वेळीं स्वत: भाषण करण्यास असमर्थ झाला. शेवटीं मन आवरून त्यानें भाषणास सुरुवात केली. तो म्हणाला:—

"माझ्या स्थितींतल्या मनुष्यानें शेवटचे दोन शब्द बोलावे असा सांप्रदाय आहे. माझाही मनोदय तसाच होता व त्याप्रमाणें मी आपलें भाषण लिहून काढणार होतों; परंतु तें मी लिहून काढण्यास जसा असमर्थ झालों तसा बोलण्यासही असमर्थ आहें.

"माझ्या मनाची स्थिति या वेळेस अशी झाली आहे कीं, शब्दालंकारांनीं किंवा प्रासानुप्रासाच्या झणत्कारांनीं ती व्यक्त करून दाखवितां यावयाची नाहीं. हा क्षण मला अत्यंत उद्वेगाचा वाटत आहे. ज्या ठिकाणीं आपण माझ्यावर प्रेम केलेलें मी आजपर्यंत अनुभवीत आलों आहें, तेथून आपला शेवटचा निरोप घेणें म्हणजे जणुं काय मीं आपला कायमचा निरोप घेत आहें असें मला वाटतें."

या ठिकाणीं त्याचा कंठ दाटून येऊन त्याचा शब्द उमटेना. अश्रूंनीं

त्याचा उद्वेग आवरेपर्यंत तो थांबला, नंतर त्यानें पुन्हा भाषणास सुरवात केलीः—

" माझ्या भावी आयुष्यांत काय स्थित्यंतर व्हावयाचें असेल तें होवो; परंतु आपल्या कृपेचा ठसा जो माझ्या अंतःकरणांत उमटला आहे तो फार खोल गेलेला आहे व तो व्यक्त करून दाखवितां येत नाहीं असा आहे.

" माझ्या मागून येणारे माझे व्यवसायबंधु, माझ्यापेक्षां आपल्या कलेंत अधिक निष्णात व योग्यतेचे असतील हें मी कबूल करतों; परंतु मी खात्रीनें सांगतों कीं, त्या सर्वांपेक्षां आपली कृपा संपादन करण्याला मीं जे अहर्निश परिश्रम केले आहेत, ते त्यांच्यापेक्षां यत्किंचितही कमी योग्यतेचे ठरणार नाहींत; व आपल्या कृपेबद्दल माझ्या अंतःकरणांत जी कृतज्ञ-बुद्धि वसत आहे ती त्यांच्यापेक्षां रतिमात्रही कमी ठरणार नाहीं!"

इतकें बोलून तो प्रेक्षकांवर निश्चल दृष्टि ठेवून तसाच मागें परतला. परंतु पुन्हा तो थांबला. जणुं अखेरची दृष्टादृष्ट करण्यास त्याला फार कष्ट होऊं लागले. प्रेक्षकांचीही अशीच स्थिति झाली होती. त्यांच्या नेत्रांतून अश्रुधारा चालल्या होत्या व त्यांचे हुंदके ऐकूं येत होते. हजारों जणांच्या तोंडून Fare well! Fare well! (तुमचें कल्याण असो! कल्याण असो!) असे उद्गार निघाले. रंगभूमीजवळच्या चौक्यांत त्याची सुशील, पतिनिष्ठ पत्नी हुंदके देत होती. अशा स्थितींत पुनःपुन्हा प्रेक्षकां-कडे पाहात मोठ्या कष्टानें तो प्रेक्षकांच्या दृष्टिआड झाला!

त्या दिवसाच्या कार्यक्रमांत आणखी एक जो भाग दाखवावयाचा होता, तो ग्यारिकनें शेवटचा निरोप घेतल्यावर करून दाखविण्याला नट-वर्गाला उत्साह राहिला नाहीं म्हणून रहित करावा लागला व ग्यारिकचा अंतर्धान पावण्याचा शेवटचा दुःखपर्यवसायी भाग झाल्यावर शेवटीं शेवटचा पडदा खालीं सोडण्यांत आला! त्यानंतर इंग्लंडच्या रंगभूमीवर एवढ्या योग्यतेचा नट अवतीर्ण झाला नाहीं!

शेवटचे प्रयोग चालले असतांना आपली आठवण म्हणून कोणाला कांहीं, कोणाला कांहीं वस्तु ग्यारिकनें बक्षिस दिल्या. या प्रसंगासंबंधींची एक स्मरणीय गोष्ट एका चरित्रकारानें दिली आहे. ग्यारिकनें 'लियर'ची

भूमिका घेतलेली असली म्हणजे कार्डेलियेची ( लियरची तिसरी मुलगी) भूमिका यंग नांवाची एक नटी करीत असे. किंग लियरचा शेवटचा प्रयोग झाल्यावर पडदा पडण्याच्या वेळीं ग्यारिकनें या यंग नटीचा हात धरून तिला पडद्यांत नेलें.¶ व सुस्कारा टाकून तो तिला म्हणाला, "मुली, तुझ्या बापाची भूमिका मी आज शेवटची केली आहे. तुला आतां दत्तक बाप कोणी तरी दुसरा पाहिला पाहिजे." Oh, Bess! This is the last time of my being your father; you must now look out for some one else to adopt you. "तर मग–" ती म्हणाली, "मला बापाप्रमाणें आशीर्वाद द्या." असें म्हणून तिनें ग्यारिकपुढें गुडघे टेंकले. ग्यारिकनें तिला उठवून "ईश्वर तुझें कल्याण करो" असा आशीर्वाद दिला. नंतर इतर नटांकडे पाहून तो म्हणाला, "तुम्हां सर्वांचेंही ईश्वर कल्याण करो!"

शेवटच्या प्रयोगाची हकीगत ग्यारिकनें आपल्या एका मैत्रिणीला कळविली. त्या पत्रांत त्यानें लिहिलें कीं, "मी जेव्हां शेवटचा निरोप घेण्याकरितां रंगभूमीवर आलों, तेव्हां माझा कंठ दाटून येऊन मला बोलवेना. इतकेंच नाहीं तर माझे हातपाय शिथिल पडले. खरोखर तो प्रसंग मोठा उद्वेगकारक होता. प्रेक्षकांच्या तोंडचे उद्गार ऐकण्याला व त्यांची स्थिति काय झाली हें पाहाण्याला तुम्ही प्रत्यक्ष असतां तर प्रेक्षक सदय अंतःकरणाचे नाहींत असें तुमच्यानें म्हणवलें नसतें!"

ग्यारिकनें विश्रांति घेतल्यावर त्याची रंगभूमीवर वापरण्याची तरवार

---

¶ इंग्लिश प्रेक्षकांचा एक शिष्टाचार आहे. रंगभूमीवर ज्या नटाची किंवा नटीची भूमिका प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली असेल, त्याला किंवा तिला अंकाच्या शेवटीं टाळ्यांच्या गजरानें पुन्हा रंगभूमीवर बोलावून सन्मान करावयाचा व त्या नटानें किंवा नटीनें आपली मान लववून या मानाचा स्वीकार करावयाचा व पुन्हा पडद्यांत जावयाचें. नायिकेची भूमिका करणाऱ्या नटीचा हात धरून तिला पडद्यांत पोंचविणें हा तिच्याबद्दल आदर दाखविणें हा शिष्टाचार आहे. युरोपियन सर्कसमधील नायिकांना सर्कशीचा व्यवस्थापक ( ring master ) प्रथम रंगणावर आणून सोडतांना पुष्कळांनीं पाहिलें असेल.

त्यानें टाम किंग नांवाच्या नटास बक्षिस दिली व तिच्या सोबत एक पत्र त्याला लिहिलें:—

" किंग यास, आपल्या निकट संबंधाच्या सहवासाची अल्पशी आठवण म्हणून रंगभूमीवर माझ्या कंबरेला लटकत असलेली तरवार मी तुम्हांला नजर करीत आहें, तिचा स्वीकार करावा. ही तरवार नाटकांत वापरण्याची आहे, तरी इचा मला अभिमान आहे. ही आपल्या उभयतांच्या मित्रत्वांत अंतर आणणार नाहीं व ही कांहीं दिवस माझ्या कंबरेला लटकत होती, म्हणून तिची किंमत कमी आहे असें तुम्ही समजणार नाहीं अशी मी आशा करतों. तुम्हांला आरोग्य, यश व कीर्ति हीं सदैव प्राप्त होवोत !

" ईश्वर तुमचें कल्याण करो. माझी आठवण असूं द्या !

तुमचा
ग्यारिक."

ग्यारिकनें शेवटच्या नाटकाच्या वेळीं जो कंबरपट्टा घातला होता तो त्यानें हाना मोर नांवाच्या आपल्या एका मैत्रिणीला दिला. तिनें तो आपल्या मैत्रिणीला दाखविला. त्याबरोबर त्या मैत्रिणीच्या तोंडून सहज-स्फूर्तीनें पुढील उद्गार निघाले:—

Thy buckles, O Garrick thy friends may now use
But no mortal hereafter shall tread in thy shoes.

[ ग्यारिकचा पट्टा त्याचे स्नेही आतां वापरतील; परंतु त्याच्या पावलावर पाऊल ठेवून चालणारा मात्र यापुढें कोणी होणार नाहीं.]

ग्यारिकनें शेवटच्या प्रयोगाचें उत्पन्न खर्च वजा जाऊन नटांच्या मदतीकरितां जो फंड उभारला होता त्याला दिलें. ग्यारिकच्या चरित्र-कारांनीं त्याला Great monarch of the stage " नाट्यकलेचा छत्रपति " असें म्हटलें आहे. जान मोर्लेनें बर्कच्या चरित्रांत लिहिलें आहे कीं, ग्यारिकनें आपल्या सिंहासनापासून विराम पावतांना जे प्रयोग केले, त्या प्रसंगाला बर्कइतका आस्थेवाईक व खरा भक्त प्रेक्षक दुसरा कोणी नव्हता.

ग्यारिकनें विश्रांति घेतली हें वर्तमान हाना मोरनें आपल्या मैत्रिणीला कळविलें. त्या पत्रांत तिनें असें लिहिलें होतें:—

“ग्यारिकनें रंगभूमीशीं आपला संबंध सोडला व नाटकगृहाची मालकीही सोडली. आतां नाट्यदेवतेला अश्रु ढाळीतच बसावें लागेल. आतां, मानवी अंतःकरणाच्या कपाटाच्या किल्ल्या कोण हातांत घेईल? जादूपेक्षां अजब शक्तीनें मनोविकार आपल्या ताब्यांत कोण घेईल? नाट्यकलेचा कोण आतां उद्धार करील? व माझ्या अंगीं जें नाट्यकलेचें अल्पसें ज्ञान आहे त्याचें संगोपन करून, त्याला कोण चालना देईल हें मला समजत नाहीं!”

रंगभूमीशीं इतिकर्तव्यता ग्यारिकनें ता. १० जून १८७६ रोजीं संपविली; परंतु आज दीडशें वर्षें त्याचा प्रभाव नाट्यसृष्टीवर आहे व पुढेंही त्याचें नांव अव्याहत चालत राहाणार आहे. ग्यारिकनें विश्रांति घेतल्यावर एका वर्षानें गिबननें पारिसहून त्याला एक पत्र लिहिलें होतें:—

“भावी पिढींतील जनसमाजाला ज्यांच्याविषयीं आदर वाटेल अशांच्या तोंडून आपल्याबद्दल चांगले उद्गार निघालेले ऐकून कोणाला धन्यता वाटणार नाहीं? एका राष्ट्राचीं परराष्ट्रें ही पुढची पिढी आहे व एका राष्ट्राची कीर्ति दुसऱ्या राष्ट्रांत जाण्याला कांहीं अवधि लागते; परंतु त्या राष्ट्रांत तुम्हीं आपली कीर्ति अगोदरच पेरून ठेविली आहे. आणि मी तुम्हांला खात्रीनें सांगतों कीं, प्रत्येक सुशिक्षित समाजांत ग्यारिकचें नांव वारंवार निघालेलें जितकें मी ऐकतों तितकें, दुसरें कोणाचेंही निघत असलेलें मला ऐकूं येत नाहीं.” एखाद्या नटानें धंदा सोडल्यावर त्याचें नांव स्वदेशांतच नव्हे तर परदेशांतसुद्धां निघणें ही गोष्ट नटाच्या अनेक गुणांचा फैलाव सर्व स्थितींतल्या समाजांत झाला असल्याशिवाय शक्य नाहीं. ग्यारिकनें नाट्यकलेला महत्त्व आणलें व तिचा दर्जा वाढविला हें त्याच्या चरित्रकारांनीं जें म्हटलें आहे, त्याची सत्यता, त्यानें धंदा सोडला तरी त्याचें नांव वरच्या दर्जाच्या लोकांपासून कनिष्ठ स्थितींतल्या समाजांतील लोक घेत राहिले यावरून पटते.

नाट्यसृष्टींत ग्यारिकचीच योग्यता सर्वांत अधिक कां समजली जाते याचीं कारणें दोन आहेत. एक त्याचें अद्वितीय नाट्यनैपुण्य व दुसरें त्याचें

उत्तम शील. या दोन गुणांनीं तो सर्वांस पाहिजे असा झाला होता. ग्यारिक विद्वान् नव्हता, विद्या संपादन करण्याकरितां जान्सनबरोबर चाळीस वर्षांपूर्वी तो लंडन येथें आला; परंतु येथें योगायोग असा आला कीं, तो निराळ्याच वातावरणांत जाऊन पडला. तथापि ज्या वातावरणांत तो गेला, त्यांतील दूषित संस्कार त्यानें आपल्यास स्पर्श करून घेतले नाहींत. त्यानें फक्त वैभवाच्या क्षितिजाकडे नजर देऊन ठेविली होती व तें क्षितिज त्यानें गांठलें.

## आणखी कांहीं गोष्टी

चरित्रनायकाच्या चरित्रांतील महत्त्वाच्या गोष्टींबरोबर त्याच्या संबंधाच्या बारीकसारीक गोष्टींनींही चरित्राला चटकदारपणा येतो. ग्यारिकच्या चरित्रांत अशा गोष्टी इतक्या आहेत कीं, त्यांचा एक स्वतंत्र ग्रंथ होईल. नाटकधंद्याच्या बाबतींत प्रत्येक जण त्याचा सल्ला घेऊं लागला. Chief magistrate of the stage "रंगभूमीचा शास्ता" ही त्याला एक पदवी मिळाली म्हटलें तरी चालेल. विश्रांति घेतल्यावरची त्याच्या चरित्रांतली एक महत्त्वाची गोष्ट प्रसिद्ध आहे. तिच्यावरून राजकीय वातावरणांतही या नटाची योग्यता किती होती हें कळून येतें.

ग्यारिक एके प्रसंगीं पार्लमेंट सभागृहांत वादविवाद ऐकत बसला होता. वादविवाद अगदीं रंगांत आला होता. व्यक्तिविषयक भाषणें, सभासद एकमेकांसंबंधानें उघड उघड उद्गारूं लागले व हा वाद कोणत्या थराला जाईल याबद्दल भीति उत्पन्न झाली. पार्लमेंटच्या अध्यक्षाला (Speaker) वाद मिटविण्याबद्दल विनंति करण्यांत आली. एका सभासदाकडून पार्लमेंटची अब्रू बाहेर येऊं नये म्हणून, परक्या लोकांनीं (Stranger's Gallery) सभागृहाबाहेर जावें म्हणून सूचना देण्यांत आली. त्याप्रमाणें प्रेक्षकांच्या सज्जावरील सर्व लोक बाहेर गेले; परंतु ग्यारिक बसून राहिला. हें पाहून एका चिडखोर सभासदानें उभें राहून सूचना केली कीं, "परक्या लोकांना बाहेर जाण्यास सांगितलें असतां, एक गृहस्थ तसेच बसून राहिले आहेत; परंतु त्यांनीं बसूं नये."

एवढें ऐकतांच बर्क उठला व सर्व सभासदांस उद्देशून बोलूं लागला,

"सर्व सभासदांना माझें नम्रपणाचें असें विचारणें आहे कीं, ज्याच्या-पासून आपण वक्तृत्वप्रचुर भाषा कशी बोलावी हें व अलंकारिक भाषेची धाटणी शिकलों असा पहिला व विद्यमान् वक्तृत्वकलेचा आचार्य (Master of eloquence) त्याला आपण आपला वादविवाद ऐकण्यास बसूं देऊं नये हें योग्य व शिष्टाचारास अनुसरून आहे काय? स्वत: माझ्यासंबंधानें म्हणाल तर मला वक्तृत्वकलेचें शिक्षण मिळालें आहे, तें या सद्गृहस्थापासून मिळालें आहे हें मी अभिमानानें सांगतों." एक सभासद ज्या गोष्टीचा निषेध म्हणून करावयास गेला त्याचा उलट असा परिणाम झाला कीं, बर्कच्या मागून फॉक्स, त्याच्यामागून दुसरा असे वक्ते ग्यारिकवर स्तुतीचा वर्षाव करूं लागले व सर्व मतांनीं टाळ्यांचा गजर करून ठरविलें कीं, ग्यारिकनें खुशाल बसावें."

ग्यारिकची योग्यता राजघराण्यांतही मानली जात असे. तिसरे जॉर्ज राजे हे बकिंगहॅम किंवा उईंडसर राजवाड्यांत त्याला बोलावून त्याचे-कडून नाटकें वाचवून घेत असत. सिडान नांवाची प्रसिद्ध नटी ग्यारिक-बरोबर असे.

चरित्राच्या अनुरोधानें एक गोष्ट येथें देण्यासारखी आहे. लॉर्ड वेस्ली नांवाच्या एका गृहस्थावर जॉर्ज राजाची गैरमर्जी झाली होती. तेव्हां लॉर्ड वेस्लीनें आत्मसमर्थनपर जें भाषण केलें त्याचा राजाच्या मनावर परिणाम होऊन त्याच्या नेत्रांत अश्रु आले. तेव्हां ग्यारिक त्याला म्हणाला, "माझ्या भाषणानें महाराजांच्या मनावर असा परिणाम कधीं झाला नाहीं." त्यावर लॉर्ड वेस्लीनें उत्तर दिलें, "याचें कारण तुम्ही महा-राजांच्या गैरमर्जींत असण्याचा व त्यांच्यापुढें भाषण करण्याचा तुमच्या-वर कधीं प्रसंग आला नाहीं हेंच होय."

ग्यारिकच्या अभिनयासंबंधानें त्याच्या एका मित्राला मोठा विचार पडला कीं, हा आपल्या भूमिकेशीं इतका एकजीव होतो कसा? त्याचें ग्यारिकनें उत्तर दिलें कीं, "तुम्ही खऱ्या गोष्टी काल्पनिक आहेत असें घेऊन चालतां व मी काल्पनिक गोष्ट खरी आहे असें दाखवितों. "I account for it in this way. You deal with facts

as if they were fictions, I deal with fictions as if they are facts."

एका धर्मोपदेशकालाही ग्यारिकनें एके प्रसंगीं असेंच सांगितलें होतें कीं, "We actors portray fiction as if it were true and you clergymen preach truth as if it were fiction. It is no use preaching to a Jury–but the eloquence of persuation will work miracles."

[आम्ही नट कल्पनासृष्टि खरी आहे अशी रंगवितों; आणि तुम्ही धर्मोपदेशक खऱ्या गोष्टी कादंबरी बनवितां. ज्यूरीपुढें भाषण करावयाचें तें धर्मोपदेश म्हणून करून उपयोग नाहीं, तर त्यांचें अंतःकरण द्रवेल असें भाषण केलें तर त्याचा परिणाम कांहीं विलक्षण होईल.]*

इंग्लिश भाषेंत Suspicious Husband (संशयी नवरा) या नांवाचें एक नाटक प्रसिद्ध आहे. या नाटकाची अशी आख्यायिका आहे कीं, तें पहिल्या जॉर्जनें संशयावरून आपल्या राणीला वाईट रीतीनें वागविलें, या गोष्टीवर रचलेलें होतें. तें दुसऱ्या जॉर्जला कर्त्यानें अर्पण केलें होतें. व त्याबद्दल त्याला हजार पौंड राजानें बक्षिस दिले होते. ग्यारिकची या नाटकांतील भूमिका राजाला फार आवडत असे. म्हणून वरचेवर हें नाटक तो पाहात असे.

ग्यारिकचें धंद्यांतील शेवटचें आयुष्य सुखांत गेलें नाहीं. "धंदा सोडल्यावर मला दुरंगांतून मुक्त झाल्याप्रमाणें वाटेल" हे त्याचे उद्गार होते, यावरूनच उघड होत आहे. आपल्या चरित्ररूपी नाटकाचा शेवट-चा पडदा पडण्यापूर्वीं कांहीं दिवस तरी आपल्यास विश्रांतीचे घेतां येऊन "एक सुखवस्तु गृहस्थ" म्हणून राहातां यावें ही तो इच्छा करीत होता. अशी त्याला इच्छा होण्याला गटारगप्पी लोकांनीं अनेक प्रकारचीं कारणें लाविलीं होतीं. त्याच्या नटवर्गांतल्या बायका मोठ्या बंडखोर

* वेटर्टन नांवाच्या एका विख्यात् नटानें एका धर्मोपदेशकालाही असेंच सांगितले होतें. "तुम्ही व्यासपीठावरून नुसत्या गोष्टी सांगतां; परंतु मी रंग-भूमीवर दाखवावयाच्या गोष्टी खऱ्या आहेत असें दाखवितों. "You in the pulpit, only tell a story, I on the stage show facts."

होत्या. आमच्या इकडच्या नाटकमंडळ्यांतील स्त्रियांची भूमिका घेणाऱ्या नटांचा त्यांच्या मालकास जो अनुभव, तोच ग्यारिकला या स्त्रियांपासून पदोपदीं येत होता व त्यांच्या त्रासामुळें ग्यारिकला धंदा सोडावा लागला अशी टवाळी लोक करीत होते. तिचा नमुना पुढील चुटक्यांत आहे :

Three thousand wives kill'd Orphius* in a rage,
Three actresses drove Garrick from the stage.

[आरफियसला तीन हजार बायकांनीं ठार मारलें व ग्यारिकला तिघी नटींनीं रंगभूमीवरून हांकून लाविलें.]

या तिघी नटी म्हणजे अबिंग्टन, यंग व एट्स या होत. या आपल्या गुणांत इतक्या प्रवीण होत्या कीं, यांच्यासारख्या व इतक्या योग्यतेच्या दुसऱ्या नाटकगृहांत सांपडण्यासारख्या नव्हत्या. तथापि या सर्वांचें महत्त्व एकट्या ग्यारिकवर अवलंबून होतें. नाटकगृह रिकामें पडतें असें दिसूं लागलें कीं, याची मदत त्यांना घ्यावी लागे. या तिघींपैकीं अबिंग्टनचा त्याला फार तिरस्कार वाटत असे. "स्त्री जातींत एक खरवड, सभ्य स्त्री-पुरुषांनीं तिचें नांवसुद्धां काढूं नये व दगलबाज अशी ती आहे." असे त्याचे तिच्याबद्दलचे उद्गार आहेत. परंतु नाटकाच्या इतिहासांत तिचें नांव वारंवार आढळतें. धंदा सोडून ती घरीं बसली तेव्हां तिच्याबद्दल एकानें स्फुट लिहिलें आहे :

Scarce had our tears forgot to flow,
By Garrick's loss inspired,
When Fame, to mortalize the blow,
Said Abington retired.
Sad with the news Thalia† mourn'd
The Graces joined her train;
And nought but sighs for sighs returned
Were heard at Drury Lane.

[ग्यारिकनें धंदा सोडल्यामुळें वाहाणारे आमचे अश्रु कोठें

---


* Orphius हें ग्रीक व रोमन पुराणांतील नांव आहे.

† १ ग्रीक पुराणांतील एक नांव. २ रंगदेवता.



स्वर्गदेवता ग्यारिकला घेऊन जात आहेत व नटवर्ग त्याला सद्गति मिळावी म्हणून त्याच्या थडग्याजवळ प्रार्थना करीत आहे. पृष्ठ ११४

वालोद्यान प्रेस, पुणें.



ह्यांपटन येथील ग्यारिकचें उद्यान व शेक्सपीयरचें देवालय. पृष्ठ ११५

बालोद्यान प्रेस, पुणें.

ज्यांच्याशीं उदारपणानें वागला, ते त्याच्याशीं कृतघ्नपणानें वागले याही गोष्टी पुष्कळ आहेत. त्यांपैकीं एखादी या प्रकरणांत दिली असतां अप्रस्तुत होणार नाहीं. थामसन नांवाच्या एका जहाजावरच्या अधिकाऱ्याला ग्यारिकच्या शिफारशीनें नोकरी मिळाली होती. या थामसननें एक नाटक लिहिलें होतें. तें ग्यारिकनें रंगभूमीवर आणलें; परंतु तें लोकांस पसंत पडलें नाहीं म्हणून थामसननें वर्तमानपत्रांत–ग्यारिकनें माझें नाटक बिघडविलें अशी त्याची नालस्ती केली–"ड्र्युरीलेनचा हत्ती" हा त्या टीकेचा मथळा होता. या टीकेला वेट नांवाच्या तिसऱ्याच एका गृहस्थानें उत्तर देऊन थामसनवर ग्यारिकनें कसे कसे उपकार केले होते ते प्रसिद्ध केले. थामसननें कल्पना केली कीं, हें पत्र ग्यारिकनेंच लिहिलें असावें. म्हणून तो ग्यारिककडे आला. ग्यारिकनें वर्तमानपत्राच्या मालकाला आणून खरा लेखक कोण होता याबद्दल थामसनची खात्री करून दिली. तेव्हां त्यानें ग्यारिकची माफी मागितली; परंतु ग्यारिकच्या मनाला ही गोष्ट फार लागून राहिली. तो म्हणाला, "मी माझ्या मित्राचा कधींच उपहास केला नाहीं. ज्याला मी मित्र म्हणून समजत होतों, त्यानें कारण नसतांना माझें मन दुखविलें ही गोष्ट मी कधीं विसरणार नाहीं. यापुढें आपण कधींही भेटलों तरी त्यापासून माझ्या मनाला दुःखच होणार आहे. म्हणून आपली दोघांची गांठ जितकी कमी होईल तितकी चांगली. आणखी मी हेंही सांगून ठेवतों कीं, तुम्हीं जें कांहीं माझ्याविरुद्ध लिहिलें असेल तें मी विसरून गेलों आहें व माझ्याविरुद्ध लिहिणारा–अशी कृतघ्नपणाची कृति करणारा–कोणी होता हेंही मी विसरण्याचा प्रयत्न करीन." थामसनशीं त्याचा पुष्कळ दिवसांचा निकट स्नेह होता. त्यानें आपल्या खाजगी गोष्टी लोकचर्चेत आणण्याचा नीचपणा कसा केला, याबद्दल ग्यारिकला किती वाईट वाटलें असेल हें त्याच्या वरील उद्गारांवरून दिसून येतें.

ग्यारिकच्या धंद्यासंबंधानें ज्यांच्याशीं प्रसंग पडला त्यांनीं ग्यारिकवर कृपणपणाचा व अधमपणाचा आरोप केला होता. तो आरोप करणारा नट असो किंवा नाटककार असो, हलक्या कानाचे लोकही मग आपले कान लांब करून अशा निंदकांच्या मदतीला येऊन ग्यारिकच्या कृपण-

पणाच्या दंतकथा लोकांत पसरीत असत. ग्यारिकच्या तीस वर्षांच्या धंद्यांत त्याला नटांकडून जे अपमान सोसावे लागले, वेळीं अवेळीं त्यांचे अडवणुकीचे व बेपर्वाईचे प्रकार निवारणें भाग पडलें, ते त्याला मनुष्य-स्वभावाची पारख करण्यास फारच उपयोगी पडले असले पाहिजेत. त्याचा खाजगी पत्रव्यवहार (Private correspondence of David Garrick 2 Vols, 1831) प्रसिद्ध झाला आहे, त्यामध्यें त्याचे निरनिराळे अनुभव त्यानें दिले असण्याचा संभव आहे; परंतु ते ग्रंथ सुसाध्य नसल्यानें अनुमानानें आपण चरित्रांतून ठरवावयाचे.

## ग्यारिकचा परिवार

चरित्राचा शेवट करण्यापूर्वी, ग्यारिकनें आपली संसारयात्रा कशा प्रकारें शेवटास नेली हें सांगितलें पाहिजे. आपल्या समाजांतील गृहस्थाश्रमाचा संसार म्हणजे—

यदिरामा यदिच रमा । यदि तनयो विनयधी गुणोपेतः
तनये तनयोत्पत्तिः सुरवर नगरे किमाधिक्यम् ।
[सुंदर ललना स्थिर लक्ष्मी गृहीं गुणवान् सुत जो ज्याला ।
पुत्रापोटीं पुत्र होय परि स्वर्गाधिक सुख त्याला ॥]
—सं. सौभद्र.

ज्याला इतक्या ऐहिक गोष्टी अनुकूल आहेत तो सर्वसुखी समजला जातो. ग्यारिकला यांपैकीं फक्त दोनच गोष्टींची अनुकूलता होती. त्याला प्राणाहून प्रिय अशी पत्नी होती व लक्ष्मी त्याच्या पायांशीं लोळण घालीत होती. आपल्या समाजांत गृहस्थाश्रमांतल्या कुटुंबांत आपलें नांव चालवावयाला पुढें कोणी नसलें म्हणजे त्याच्या घरांत "दिवा लावायला कोणी नाहीं." अशी म्हण आहे. त्याप्रमाणें ग्यारिकला संतति मात्र नव्हती. तरीपण त्याबद्दल तो कधीं खिन्न नव्हता. त्याच्या घरीं पाहुण्यांचा खुला दरबार होता. शिवाय बाहेर ठिकाणाहून अमीर-उमरावांचीं पाहुणचाराकरितां दोघां नवरा-बायकोस नेहमीं निमंत्रणें येत असत. याप्रमाणें त्यांच्या सहवासांतही त्याचा विश्रांतीचा काळ आनंदांत जात असे.

ग्यारिकच्या बायकोच्या सुस्वभावाचें वर्णन चरित्रकारांनीं केलें आहे.

नवऱ्याला आवडेल तीच गोष्ट करावयाची हा तिचा मनोधर्म असे. त्या उभयतांचें प्रेम पौर्वात्य समाजांत पतिपत्नींचें जें प्रेम आपण पाहातों, त्या प्रकारचें होतें. नवरा हें दैवत आहे, या भक्तिभावानें तिनें त्याच्याबरोबर संसार केला; इतकेंच नाहीं तर त्याच्या पश्चात् ती सुमारें ४३ वर्षें होती; तरी एकही दिवस तिचा असा गेला नाहीं, कीं त्याचें स्मरण होऊन तिला उद्वेग झाला नाहीं.

ग्यारिकच्या आप्तांचा परिवार मोठा होता. तीन भाऊ व दोन बहिणी. थोरला भाऊ लिचफील्ड येथें दारूच्या दुकानचा धंदा करून होता. त्यानें लग्न केलें नव्हतें. दुसरा भाऊ पलटणींत नोकर होता; परंतु तो तरुणपणींच वारला. तिसरा भाऊ जॉर्ज हा मात्र लंडन येथेंच होता. हा ग्यारिकचा दिवाण, कारभारी, गुमास्ता, म्यानेजर इत्यादि इत्यादि नात्यानें सर्व कांहीं होता. हा ग्यारिकचा भाऊ म्हणूनच याची प्रतिष्ठा असे. याला ओळखण्यासारखे अन्य याच्यांत कांहींच गुण नव्हते; परंतु ही स्वारी खलबतें करण्यांत, नसते उपद्व्याप व कुलंगडीं करण्यांत पटाईत होती. त्यामुळें ग्यारिक वरचेवर घोंटाळ्यांत येत असे. या भावाच्या दोन मुलांवर व मुलीवर या नवराबायकोचें अकृत्रिम प्रेम असे. त्यांच्या शिक्षणाचा भार ग्यारिकवर होता. हा भाऊ व्यसनी होता. ग्यारिकनंतर हाही थोड्याच दिवसांनीं वारला. ग्यारिकनें आपल्या मृत्युपत्रांत पुतण्यां-ची व पुतणीची, आणि बहिणींची त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें व्यवस्था लावून ठेविली होती. बाकीच्या मालमत्तेची मालकीण बायको होती.

## शेवटचा पडदा !!!

नाटकाचा शेवट आनंदपर्यवसायी करावयाचा ही गोष्ट नाटककारा-च्या हातांतली असते. परंतु चरित्रकाराला तसें करतां येत नाहीं. नाटक-काराला तो मनांत आणील तर आपल्या नायकाला राज्यावर बसवून मोकळें होतां येतें; परंतु चरित्रकाराला आपल्या नायकाला थेट स्मशानां-त पोंचविल्याशिवाय गत्यंतर नसतें. मग त्याचा नायक कितीही वैभवांत खेळलेला असो. प्रस्तुत चरित्रनायकाच्या चरित्राचा शेवट करतांना लेखकाला शेवटपर्यंत गेलें पाहिजे. मागील प्रकरणांत ग्यारिकनें आपल्या संसाराची व्यवस्था कशी लावली हें सांगितलें आहेच. विश्रांति घेतल्या-




ग्यारिकच्या प्रेतयात्रेचें प्रसिद्धिपत्रक. पृष्ठ ११७



ग्यारिकचें निर्याण. पृष्ठ ११९

बालोद्यान प्रेस, पुणें.

पासून तो आपल्या घरीं मंडळी बोलावून किंवा बाहेरच्या मित्रमंडळीकडे जाऊन कालक्रमणा करीत असे. त्याचा एका उमरावाच्या कुटुंबांत फार घरोबा होता. प्रत्येक वर्षीं नाताळच्या सणाच्या दिवसांत तो त्याचेकडे बायकोसुद्धां पाहुणचारास जात असे. या खेपेस त्याची प्रकृति बरी नव्हती तरी आपल्या स्नेह्यास वाईट वाटूं नये म्हणून व आपल्यालाही त्याच्या सहवासांत बरें वाटेल म्हणून त्याच्या गांवीं गेला. तेथें त्याला बरेंही वाटूं लागलें; परंतु तेथें एकाएकीं त्याचा नेहमींचा मुतखड्याचा रोग पुन्हा उद्भवला. म्हणून तो लंडन येथें परत आला (जानेवारी १५–१७७९). परत आल्यावर त्याचा आजार अधिक बळावूं लागला असें वाटल्यावरून त्याच्या नेहमींच्या डॉक्टरानें आणखी दोघांना सल्ला घेण्याकरितां बोलाविलें. त्यांनीं दुखणें काळजी करण्यासारखें आहे असें पाहून ग्यारिकला आपली व्यवस्था करण्यास सांगितलें. ग्यारिकनें "मरणाला माझी तयारी आहे," म्हणून सांगितलें. राष्ट्राच्या या आवडत्या पुरुषाला वांचविण्याकरितां एकूण एक धन्वंतऱ्यांनीं आपली बुद्धि खर्च केली असतां; परंतु ग्यारिकच्या रोगानें आपला अम्मल त्याच्या एकंदर इंद्रियांवर बसविला होता. त्याच्या खोलींत डॉक्टर लोकांची गर्दी जमलेली पाहून त्यानें एका नाटकांतलें पुढील वाक्य उच्चारलें:—

> Another and another still succeeds
> And the last fool is welcome as the former.

[एकामागून एक मूर्ख अजून येतच आहेत; माझें पहिल्याप्रमाणेंच शेवटच्या मूर्खाचेंही स्वागत असो.]

मरणाच्या पूर्वी एक दिवस त्याचा एक स्नेही समाचारास आला होता: त्याला ग्यारिकच्या बायकोनें ठेवून घेतलें. दोघें गोष्टी बोलत असतां, ग्यारिक खोलींतून बाहेर हीं दोघें बसलीं होतीं तेथें आला. या वेळेला त्यानें आपला उंची झगा अंगाभोंवतीं गुरफटून घेतला होता, त्यामुळें रंगभूमीवर एकाद्या भूमिकेंत तो येत आहे असा दिसला. येऊन खुर्चीवर बसला परंतु बोलण्याची शक्ति नव्हती. तोंडावर प्रेतकळा आली होती व प्राणज्योति मावळत चालल्यासारखी दिसत होती. मधून मधून तो सावध होत होता; परंतु हें सावध होणें गुंगींतलें होतें. ज्यानें इतके दिवस अंतः

काळची गंभीर वृत्ति कशी असते हें अभिनयरूपानें प्रेक्षकांच्या अंतःकरणावर ठसविलें होतें तो खरोखरीच्या मृत्युद्वारीं उभा राहिला! त्याच्या आयुष्यांतील पूर्वस्मृति किती तरी त्याच्या अंतःकरणांत या वेळीं घोळत असतील. कदाचित् हें जग सोडून जाऊं नये असें त्यास वाटत असेल किंवा या जगाचा कंटाळा येऊन तो ईश्वराच्या बोलावण्याची वाट पाहात असेल. मृत्युद्वारीं असलेल्या मनुष्यप्राण्याचे अंतर्यामींचे विचार जवळच्या पाहाणाऱ्यांनीं आपल्या कल्पनेनें ठरवावयाचे असतात. अंतकाळच्या यातना न होतां तो अंतर्यामीं सावध होता असें शेवटीं, "Oh! dear!" प्रिये! म्हणून बायकोच्या नांवानें त्यानें हांक मारली यावरून वाटलें. शेवटीं एक श्वास सोडून त्यानें प्राण सोडला! याप्रमाणें स्वतःची कीर्ति अमर करून तो मृत्युवश झाला! (ता. २० जानेवारी सन १७७९.) या वेळेस त्याचें वय ६२ वर्षांचें होतें!!!

## प्रेतयात्रा !!!

मनुष्याची खरी योग्यता त्याच्या जीवमानकाळीं जशी समजून येते, तशी त्याच्या पश्चातूही समजून येते. ग्यारिकची लोकांत मान्यता किती वाढली होती हें चरित्राच्या मागील प्रकरणांत जें अनेक वेळां वर्णन आलें आहे, त्यावरून समजून येणारें आहे. परंतु त्याच्या पश्चात् त्याच्या प्रेतयात्रेच्या प्रसंगीं जो त्याचा सन्मान लोकांनीं केला तोही अपूर्व होता. असा मान त्याच्या धंद्यांतील प्रसिद्ध नटास त्याच्यापूर्वीं कोणास मिळाला नाहीं. ग्यारिकची प्रेतयात्रा फेब्रुवारीच्या पहिल्या तारखेस निघावयाची ठरलें.

ग्यारिकच्या राहात्या घरापासून तों वेस्ट मिनिस्टर ॲबेपर्यंतचा* रस्ता प्रेतयात्रेच्या बरोबरच्या लोकांच्या गर्दीनें भरून गेला होता. ही प्रेतयात्रा

*वेस्ट मिनिस्टर ॲबे ही इंग्लंडच्या राजघराण्याची राज्यारोहणाची व अंत्यविधीची इमारत आहे. या इमारतींत प्रसिद्ध पुरुषांचे व कवींचे अंत्यविधि होतात व त्यांचे पुतळे उभारले जातात. सातव्या शतकाच्या आरंभीं ही इमारत प्रथम बांधण्यांत आली. तेव्हांपासून आतांपर्यंत इच्यांत फेरफार होऊन इंग्लंडच्या राजधानींत ही एक अत्यंत महत्त्वाची इमारत आहे. या इमारतींत इंग्लंडच्या

फारच सन्मानाची निघाली होती. धर्माधिकारी, पार्लमेंटचे कांहीं सभासद, कांहीं ड्यूक, शेरिडन नाटककार, फॉक्स व बर्क हे प्रसिद्ध वक्ते, कव्हेंट गार्डन व ड्रूरिलेन नाटकगृहांचे सभासद व नट, इतिहासकार गिबन चित्रकार जोशा रेनॉल्ड, जॉन्सनसारखे त्याचे परम मित्र—सारांश, देश-रिवाजाप्रमाणें थोर पुरुषाचा सन्मान करण्याकरितां, त्याच्या प्रेतयात्रेच्या वेळीं अमीर-उमराव, धर्माध्यक्ष, मुत्सद्दी, मध्यम स्थितींतले लोक हजर असण्याची वहिवाट असते ते सर्व जमले होते. ग्यारिकची पत्नी वेस्ट मिनिस्टर इमारतींत प्रेतसंस्काराच्या वेळीं होती. ग्यारिकच्या कुटुंबा-पैकीं त्याचे पुतणे होते. भाऊ आजारी असल्यामुळें येऊं शकला नाहीं. बर्क व जान्सन प्रेतसंस्काराच्या वेळीं आपल्या अश्रूंची तिलांजली ग्यारिकला अर्पण करीत होते. शेरिडन विधि संपल्यावर घरीं एक दिवस सचिंत बसला होता. ग्यारिकच्या शवाच्या पेटीला खांदा देणारे (Pall bearers) दहाजण होते. एका बाजूला लॉर्ड लोक व दुसऱ्या बाजूला ड्यूक होते.† शवाला अक्षय्यची विश्रांति देण्याचें स्थानही या इमारतींत अत्यंत उच्च सन्मानाचें म्हणजे ज्या ठिकाणीं शेक्सूपियरचा पुतळा आहे, त्याच्या पायथ्याशीं दिलेलें आहे व थोडक्या अंतरावर समोरच्या भिंतीवर पडद्याबाहेर तोंड काढून ग्यारिक पाहात आहे व त्याच्या पायाशीं आनंद

[टीप मागील पृष्ठावरून पुढें चालू.]

राजे व राण्यांचीं कबरस्थानें आहेत. Poet's Corner म्हणून कवीं-करितां एक स्वतंत्र भाग या इमारतींत आहे. यांत शेक्सपीयर, ग्यारिक व हेनरी आयर्व्हिंगसारख्या जगविख्यात नाटककारांचे व नटांचे पुतळे आहेत. या इमारतीची लांबी ५१३ फूट, रुंदी २०० फूट, मनोऱ्यांची उंची २२५ फूट व देवळाची उंची १०२ फूट आहे. या इमारतीचा आकार त्रिशुळासारखा आहे. अशी ही भव्य इमारत आहे.

† पाल बेअरर्स—मृतांची योग्यता जितकी अधिक त्या मानानें प्रेतयात्रेच्या वेळीं त्याच्या शवाच्या पेटीला खांदा देणारेही मोठ्या योग्यतेचे असतात.

व दुःखपर्यवसायी देवता* अधोमुख करून बसल्या आहेत असें दाखविलें आहे. ग्यारिकच्या ड्र्यूरीलेन नाटकगृहांत रंगपटांत जे प्रसिद्ध नटांचे अर्धपुतळे आहेत, त्यांतही शेक्स्पियरचा पुतळा असून त्याच्यासमोर ग्यारिकचा पुतळा-शेक्स्पियरची ओळख करून देणारा ( His great interpreter ) म्हणून-हास्य मुद्रेनें इतर नटांकडे पाहात आहे असा दाखविलेला आहे!!!


## राष्ट्राचा आनंद मावळला!!!

### His death eclipsed the gaity of the nation.

ग्यारिकच्या मृत्यूनें " राष्ट्राचा आनंद मावळला " असे जॉन्सननें उद्गार काढले. नटवर्गासंबंधानें आणि प्रत्यक्ष ग्यारिकसंबंधानें जॉन्सनचें मत कसें होतें हें चरित्राच्या अनुरोधानें मागें येऊन गेलेंच आहे; परंतु त्याचे खरे व अंतःकरणापासून निघालेले हे उद्गार ग्यारिकची योग्यता किती होती, हें दाखवितात. अद्वितीय नट म्हणून त्याची योग्यता मोठी होतीच; परंतु एक शीलवान ग्रंथकार व कवि म्हणून आणि समाजांतील व्यक्ति या दृष्टीनें त्याच्यापेक्षां अधिक योग्यतेचा तर कोणी झाला नाहींच; परंतु त्याच्या बरोबरीचे सुद्धां थोडेच निघतील, असें जॉन्सननें म्हटलें आहे. जॉन्सन विद्यार्थी असतांना ग्यारिकच्या आईनें तो कसा काय शिकतो, म्हणून जॉन्सनला विचारलें; तेव्हां त्यानें ग्यारिकबद्दल विलक्षण भाविष्य तिच्याजवळ केलें होतें. " एक हा फांसावर तरी चढेल किंवा एक अतिशय योग्यतेला तरी चढेल." परंतु या तत्त्ववेत्याचें दुसरें भविष्य खरें ठरलें.

उदरभरणाची सोय पाहाण्याकरितां आपल्या घराचा उंबरठा ओलांडून ही गुरु-शिष्यांची जोडी बाहेर पडली. त्या वेळीं जॉन्सनच्या खिशांत दोन पेन्स व ग्यारिकच्या खिशांत तीन अर्ध्या पेनी होत्या. दोघांमिळून दोन-चार आण्यांच्या भांडवलावर त्यांना आपली भावी संसारयात्रा पार पाडावयाची होती; परंतु धातूच्या नाण्याच्या भांडवलापेक्षां कशीं रितें न

* ग्रीक पुराणांत Melpomene व Thalia या काव्याच्या देवता कल्पिलेल्या आहेत. अशा एकंदर नऊ देवता निरनिराळ्या काव्यशास्त्रांच्या आहेत. त्यांपैकीं या दोन आहेत.



वेस्टमिनिस्टरॲबेमधील प्रसिद्ध नाटककार व नट यांचें अक्षय्य निवासस्थान ( Poets' Corner). पृष्ठ १२३

बालोद्यान प्रेस, पुणें.

होणारें मनाच्या हिंमतीचें भांडवल त्यांच्याजवळ भरपूर होतें. या भांडवलावर एक इंग्लंडच्या इतिहासांत तत्त्वज्ञानी म्हणून व दुसरा राष्ट्राच्या इतिहासांत अनेक गुणांनीं अद्वितीय योग्यतेचा म्हणून, असे दोघे प्रसिद्धीस आले. एक अकिंचन राहिला व दुसरा ऐश्वर्यानें भूषित झाला. तरी जगाच्या दृष्टीनें दोघांच्या योग्यतेंत अंतर नव्हतें. ग्यारिकची समाजांत योग्यता वाढली ती जणुं काय त्याचा जन्मसिद्ध हक्कच होता या नात्यानें वाढली, हें जॉन्सन स्वतः बोलून दाखवीत असे; व याबद्दल त्याला थोडा विषाद वाटत असे. परंतु तो त्याच्या ऐश्वर्याबद्दल नव्हता, तर त्याला ज्या मार्गानें तें मिळालें त्याबद्दल होता. म्हणजे जी कीर्ति त्याचप्राकडे आपण होऊन चालत आली होती, ती जॉन्सनला बलात्कारानें ओढून घ्यावी लागली याबद्दल होता. ही हकीगत मागील एका प्रकरणांत आली आहे. जॉन्सन, ग्यारिकच्या मृत्यूनंतर सहा वर्षे होता. ग्यारिकची त्याला आठवण झाली म्हणजे त्याला उद्वेग येत असे.

ग्यारिकचे समकालीन नट जरी त्याच्या तोडीचे नव्हते, तरी त्यांची गणना चांगल्या नटांत होती व ते ग्यारिकशीं गुणाच्या बरोबरीकरितां स्पर्धा करीत होते. नाटयकलेच्या इतिहासांत इंग्लंडच्या रंगभूमीवर एकामागून एक वरचढ नट पैदा झाले याचें श्रेय पुष्कळसें त्या वेळच्या नाटक पाहाणाऱ्यांच्या मार्मिकपणावर आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. ग्यारिकच्या पुढच्या पिढींत जे नट होऊन गेले त्यांपैकीं कित्येकांनीं ग्यारिकला पाहिलेंही नव्हतें. परंतु त्याची कीर्ति कर्णोपकर्णीं त्यांच्या कानावर आदळत असे. त्यामुळें ग्यारिकच्या कीर्तिमंदिराच्या कळसाला हात घालण्याचा प्रत्येक नटानें अनुयेनें प्रयत्न केला आहे व त्या योगानें त्यांचींही नांवें त्या देशाच्या इतिहासांत जागृत आहेत.*

---

* प्रस्तुत चरित्रांत ग्यारिकच्या समकालीन नटांचे उल्लेख आलेले आहेतच; परंतु त्याच्यानंतर जे नट प्रसिद्ध झाले ते म्याक्रिडी, चार्लस कीन व केंवल हे होते. नाट्यकला म्हणजे वदफैली लोकांचा धंदा नसून तरुणांना शिक्षण देण्याचें व प्रौढांना ज्ञान देण्याचें मोठें साधन आहे असे उद्गार एका प्रसंगीं कीन नटाच्यासंबंधानें बोलतांना एका ड्यूकनें काढले आहेत. याच नटासंबंधानें ग्लयाडस्टनचे उद्गार असे आहेत कीं, "आपल्याला कीनकडे या दृष्टीनें पाहिलें पाहिजे कीं, त्यानें नीति व समाजबंधनाला विटाळ मानणाऱ्या वातावरणांतून नाट्यकलेला सोडविण्याचें एक मोठेंच पवित्र कार्य केलें आहे."

नाटक-धंद्यांत मान्यता पावलेल्या नटांत ग्यारिक किती वरच्या दर्जाचा होता, याची साक्ष त्याच्या नांवानें ठिकठिकाणीं लंडन शहरांत ज्या संस्था आहेत त्यांवरून पटते:—

१. "ग्यारिक-क्लब" म्हणून त्याच्या नांवाची संस्था आहे. इच्यांत तसबिरांचा फार मोठा संग्रह आहे व तो मुख्यतः नाट्यविषयक प्रसंगांचा आहे. हा क्लब इ० सन १८३१मध्यें स्थापन झाला. यामध्यें नाट्यविषयक-वाङ्मय व सामाजिक विषय यांचा ऊहापोह होतो. येथें नट व ग्रंथकार जमतात. ग्यारिक-स्ट्रीट नांवाच्या रस्त्यावर ही संस्था आहे.

२. व्हिक्टोरिया आणि आलबर्ट नांवाच्या संग्रहालयांत ग्यारिकचा पत्रव्यवहार राखून ठेवलेला आहे.

३. ग्यारिकच्या नांवाचें नाटकगृह आहे.

४. न्याशनल पोर्ट्रेट ग्यालरी नांवाच्या इमारतींत शेवटच्या मजल्यावर १३ नंबरच्या दालनांत, ग्यारिक, शेरिडन इत्यादि प्रसिद्ध पुरुषांच्या तसबिरा आहेत.


सारांश, स्मारकाच्या रूपानें ग्यारिकचें नांव ठिकठिकाणीं दृष्टीसमोर राखण्याचा मान इंग्लंडच्या राष्ट्रानें त्याला अव्याहत दिला आहे.

ग्यारिकची वायको त्याच्या पश्चात् ४३ वर्षें होती. (१८२२) जार्ज राजा व त्याची राणी केव्हां केव्हां इच्या भेटीस येत असत. ज्या खोलींत ग्यारिकचें प्राणोत्क्रमण झालें ती खोली तिनें स्वतःच्या मरणाची पाळी येईपर्यंत उघडली नव्हती. शेवटीं उघडण्याची पाळी आली तेव्हां आंतील सर्व सामानाचा कचरा झाला होता. फक्त लांकडी सामान शाबूत राहिलें होतें. ग्यारिकला ज्युबिलीच्या वेळीं शेक्स्पियरच्या वंशजांकडून जे हातमोजे मिळाले होते ते तिनें मरणापूर्वीं सिडान नांवाच्या एका प्रसिद्ध नटीस दिले. (ही नटी इ० सन १८३१ पर्यंत होती.) ग्यारिकचीं दोन घरें होतीं. एक ह्यांपडन उद्यान व दुसरें आडेल्फी महाल. या दुसऱ्या घरांत त्याचा मृत्यु झाला. या घरांत "लिटररी-फंड-सोसायटी" व "इन्स्टिट्यूट-ऑफ-नेव्हल-आर्किटेक्ट"–म्हणजे–"ग्रंथप्रसारक मंडळीची संस्था" व "आरमार खात्यांतील शिल्पशास्त्राची संस्था" आहेत.

ह्यांपडन उद्यान हें इ० सन १८६४ मध्यें एका शिवणकामाच्या कारखान-दारास १०,८०० पौंडांस विकलें गेलें.

## ग्यारिकचें चरित्र संपलें !

जुन्या पोथ्या-पुस्तकांच्या शेवटीं फलश्रुति सांगितलेली असते. "जो हें पुस्तक पठण करील, श्रवण करील किंवा लिहून काढील त्याचे सर्व मनोरथ पूर्ण होतील" असा त्या फलश्रुतीचा इत्यर्थ असतो. प्रस्तुत चरित्राची फलश्रुति फक्त नटवर्गाला मिळावयाची आहे. जर नटवर्ग या चरित्राचें योग्य मनन करील तर त्यास आपल्या धंद्याचा व्यवहार सरळ मार्गानें कसा करावा, आपल्या धंद्यांत यश कसें मिळवावें याविषयीं हें चरित्र मार्गदर्शक होईल व त्यांचा धंदा त्यांना फलद्रुप होईल अशी पुष्कळ आशा आहे.



# उपसंहार

कोणत्याही पुस्तकाला जशी प्रस्तावना अवश्यक आहे तसा त्याला उपसंहारही अवश्य असतो. प्रस्तावनेंत ग्रंथ लिहिण्याचा उद्देश, व उपसंहारांत ग्रंथांत काय लिहिलें आहे व तें कां लिहिलें इत्यादि आणखी कांहीं सांगावयाचें असल्यास तें सांगावयाचें असतें. प्रस्तावनेंत "हें चरित्र कां लिहिलें" याचा उहापोह आहे. नाटक-धंद्यांतील एक अद्वितीय नट, असें ज्याला पाश्चिमात्य इतिहासकारांनीं म्हटलें आहे, अशा नटाचें चरित्र मराठी भाषेंत पाहिजे होतें तें लिहिलें हें सांगितलें. हल्लींच्या चळवळीच्या काळांत, स्वदेशी व परदेशी, हे शब्द प्रत्येक मनुष्याच्या जिव्हाग्रीं आहेत. परंतु स्वदेशी फक्त जिव्हाग्रीं आहेत व परदेशी अंतःकरणांत आहेत. हिंदुस्थानांतील सर्व विश्व परदेशीय आचार-विचारांनीं व वस्तुमात्रांनीं व्यापिलेलें आहे; परंतु त्यांत पाश्चिमात्य नाट्यकलेचें अंतरंग म्हणजे नाट्यरचनेचें कौशल्य; व अभिनय-कौशल्याची पूर्णता हे गुण मात्र महाराष्ट्र नाट्यकलेपासून दूर आहेत.

प्रस्तुत चरित्रांतील वर्णनावरून हेंही दिसून येईल कीं, पाश्चिमात्य नट समाजांत आपली जागा शोधीत असतात, आमचा नटवर्ग तसा प्रयत्न करूं लागल्याचें दिसत नाहीं. पाश्चिमात्य नटांची नाट्यकुशलता; त्यांना भाग्यास पोंचविण्यास कारण झाली पाहिजे, हें तर उघडच आहे; परंतु त्यांचें समाजांत वर्तन हेंही या गोष्टीला कारण असलें पाहिजे. पाश्चिमात्य समाज नटांच्या कृतीकडे कसा डोळे लावून बसलेला असतो, हें चरित्रांत नटाच्या गुणावगुणांचें जें टीकाकारांनीं मार्मिकतेनें विवेचन केलें आहे, त्यावरून दिसून येतें.

मराठी भाषेंत ग्यारिकविषयीं माहिती अशी फक्त कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं निबंधमालेंत "डॉ० जॉन्सन" या प्रकरणांत दिली आहे. ती माहिती या चरित्ररूपानें आज पुन्हा पन्नास वर्षांनीं लोकांपुढें येत आहे. जॉन्सनशीं ग्यारिकचा निकट सहवास व त्याशीं शिष्यत्वाचें नातें असल्यामुळें, जॉन्सनबरोबर ग्यारिकचीही नट म्हणून माहिती शास्त्री-

...नीं बरीच दिली आहे. ते म्हणतात : "गेल्या शतकांत (१८व्या) साऱ्या ...रोपखंडांत प्रमुख असणारें जें इंग्लंड त्यांत ग्यारिक हा मोठी कीर्ति पावला, ...ांत नवल नाहीं. त्याच्या अंगीं सामान्य नटांप्रमाणें यथोचित अंगविक्षेप ...रण्याचा व नाटकी स्वरानें बोलण्याचा एवढाच गुण होता असें नाहीं; तर ... अभिनय त्यानेंच लोकांत प्रवृत्त करून दाखविला, असें म्हणण्यास ...त नाहीं...पण आपल्या राष्ट्रावर किंबहुना साऱ्या जगावर, त्यान(ें ग्या)रिकनें) केलेला उपकार सांगावयाचा राहिला आहे. तो इंग्लंडांत-किंबहुना तद्देशीयांच्या मतें साऱ्या जगांतल्या कवींत अग्रगण्य जो ...ुपियर याच्यासंबंधानें होय. या महाकवीचे ग्रंथ पहिल्यापासून सर्वांस प्रिय होऊन राहिले होते तरी ग्यारिकच्यापूर्वी त्याची असावी ...ा चहा नसे...पण ग्यारिकचा अपूर्व नाट्यप्रकार जेव्हां सुरू ...ला तेव्हांपासून तें मान फिरत चाललें. शेक्सुपियरच्या कीर्तीचें ...ुनरुज्जीवन होऊन, ज्या कवितेच्या अंतर्गत गुणांकडे लोकांची दृष्टि पोंचली नव्हती ती तिजकडे पोंचूं लागली...ग्यारिकसारख्या नामांकित व सर्वमान्य मनुष्यानें नाट्य-कर्माचा अंगीकार केल्यानें यास प्रतिष्ठा येऊन नाटक करणारी मंडळी म्हणजे दुराचरणाचें माहेरघर होऊन जी राहिली होती तोही प्रकार बराच मोडला."

शास्त्रिबुवांचें ग्यारिकसंबंधाचें हें वर्णन म्हणजे चरित्रांतल्या विधानांना मोठाच आधार आहे यांत शंका नाहीं. प्रसिद्ध पुरुषाचें चरित्र लिहावयाचें तें त्याच्या विद्यमानकालीं लिहावें का त्याच्या पश्चात् लिहावें? आपलें चरित्र आपणच लिहावें का दुसऱ्या कोणीं लिहिलें असेल तें वाचावें? असे प्रश्न चरित्र लिहिण्यासंबंधानें उपस्थित होण्यासारखे आहेत. आत्मचरित्राचा प्रकार सोडला तर प्रसिद्ध पुरुषाचें चरित्र त्याच्या पश्चातच लिहिलेलें-शुद्ध मनानें लिहिलें जाईल व त्यांत गुणदोषविवेचन निःपक्षपातानें करतां येईल; परंतु जेथें दुराग्रहानें व द्वेषबुद्धीनें लेखकाचें मन दूषित असेल तेथें हा नियम लागू पडावयाचा नाहीं. याला उदाहरण, लोकमान्य टिळकांच्या चरित्राचेंच घेतां येईल. त्यांचें चरित्र प्रसिद्ध झाल्याबरोबर त्यांच्या किंवा चरित्रकाराच्या प्रतिपक्षांच्या लेखण्या सज्ज झाल्या. याला कारण लोकमान्यांच्या देहावसाना-

बरोबरच त्यांचें चरित्र प्रसिद्ध झालें. त्या वेळीं त्यांच्या प्रतिस्प- दुराग्रहाची तीव्रता तितकी शमली नव्हती हेंच असावें. ग्यारि- चरित्रें अनेक ग्रंथकारांनीं लिहिलीं आहेत. तीं त्याच्या पश्चात् म्हण इ० सन १७८०, १७८१, १८०१, १८६८, आणि १८९४ इतक्या/ला काळापर्यंत आलीं आहेत. अर्थात्च चरित्राला जशी जशी सामुग्री उप- होत गेली तसतसा तिचा उपयोग चरित्रांत करण्यांत आला आहे. आणखी बहुतेक विवेचन ग्यारिकच्या गुणांचेंच आहे. दोषांचें असेल चरित्र "शशिमाजी लांछनाची बहु शोभा" देणारेंच आहे. प्र नट,

आपल्याकडे कांहीं नट, 'नट' या पदवीला शोभणारे झाले चरित्र नाहीं असें नाहीं; परंतु त्यांचें ध्येय यांच्या स्वतःपुरतेंच होतें. नाटकीच्या च्या अभिमानानें त्यांनीं कांहीं कृति केल्याचें स्मारक नाहीं. या आहेत. एक अण्णासाहेब किर्लोस्कर यांचीच संगीत मंडळी जागृत होती; हेत. तिच्यासंबंधानें अधिक विस्तार करण्याचें हें स्थळ नाहीं. गीं

हें चरित्र यापेक्षांही अधिक माहिती देऊन लिहितां येण्यासारखें होतें. परंतु ती माहिती महाराष्ट्र वाचकांना अगदींच अपरिचित असल्यानें नीरस वाटली असती; म्हणून ती देण्याची खटपट केली नाहीं. ज्यांच्या- करितां मुख्यतः हें चरित्र लिहिलें आहे, तें त्यांना अप्रिय किंवा निरुप- योगी होऊं नये अशी लेखकाची इच्छा आहे. ती कितपत सफल होते हें पाहावयाचें आहे.

REFBK-0004111
समाप्त
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
ठाणे (महाराष्ट्र)

# महाराष्ट्र नाट्यकलेचा

# इत्थंभूत इतिहास.

## लेखक शं. बा. मुजूमदार.

बेळगांवच्या १९२९ सालच्या साहित्य संमेलनांत नाट्यकलेच्या ५० वर्षांचा इतिहास मागवावा म्हणून दोन नाटक मंडळ्यांची सूचना होती. त्याप्रमाणें १९३० सालच्या गोंव्याच्या साहित्य संमेलनापुढें या संबंधानें कांहींच उहापोह झाला नाहीं असें कळतें. प्रस्तुत लेखकानें हा इतिहास नाट्यकलेच्या उत्पत्तीपासून लिहिण्यास घेतला आहे. त्यांत प्रसिद्ध जुन्या नव्या नाटक मंडळ्या, नाटककार व नट यांचा इतिहास व फोटो येणार आहेत. पृष्ठें सुमारें ३०० होतील. किंमत मागाहून कळविण्यांत येईल.

कव्हर प्रिंटिंग बालोद्यान प्रेस, ६८९ सदाशिव पेठ, पुणें.